<u>सभापतीस्थानी माननीय उपसभापती</u>

पृ.शी./मु.शी.: औचित्याच्या मुद्यासंबंधी

श्रीमती उषाताई दराडे (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मला याठिकाणी औचित्याचा मुद्दा उपस्थित करावयाचा आहे. उल्हासनगर महापालिकेचे सचिव श्री.प्रकाश कुकरेजा यांना निलंबित करण्याचे आदेश दिले गेले. परंतु श्री.प्रकाश कुकरेजा, महापालिका सचिव, उल्हासनगर महापालिका यांना निलंबित करण्यात आले त्या संदर्भात आपणास कळविण्यात येते की, सदर निलंबन आदेशास माननीय मुख्यमंत्र्यांनी स्थगिती दिलेली आहे, या प्रकरणी कारवाई करण्यात येऊन सदर प्रकरणाचा स्वयंस्पष्ट अहवाल विनाविलंब सादर करण्यात यावा अशा प्रकारचे आदेश 4 डिसेंबर, 2006 रोजी मुख्यमंत्री कार्यालयाकडून श्री.राजेश गोविल, उल्हासनगर महापालिका आयुक्त यांना देण्यात आले. 4 डिसेंबर रोजीच माननीय मुख्यमंत्र्यांनी स्थगिती दिलेली आहे. या आदेशाची पायमल्ली होत असेल, सभागृहाला याची माहिती मिळत नसेल तर ही गंभीर बाब आहे. मुख्यमंत्र्यांच्या आदेशाला धाब्यावर बसविणाऱ्या उल्हासनगर महापालिका आयुक्तांबाबत काय निर्णय घेणार आहात याची सभागृहाला माहिती मिळणे आवश्यक आहे. ही गंभीर बाब आहे.

श्री.रामनाथ मोते : सभापती महोदय, हा विषय गंभीर आहे. उल्हासनगर महापालिकेचे आयुक्त, ज्यांना अधिकार नाही त्यांनी आपली अधिकार कक्षा ओलांडून 4 डिसेंबर, 2006 रोजी महापालिकेच्या सचिवांना निलंबित केले. त्यांनी रिप्रेझेंटेशन दिल्यानंतर तातडीने राज्याच्या सन्माननीय मुख्यमंत्र्यांनी त्या निलंबनाला स्थगिती दिली आणि तातडीने 6 डिसेंबर रोजी हे आदेश आयुक्तांना मिळाले. अद्यापही या आदेशाची अंमलबजावणी झालेली नाही. खरे म्हणजे राज्याच्या सन्माननीय मुख्यमंत्र्यांनी आदेश देऊनही त्या आदेशाचे पालन होत नाही, त्यांनी निलंबनाला स्थगिती देण्यात येत आहे असे कळवूनही त्या आदेशाबाबत अद्याप कारवाई झालेली नाही. राज्याच्या मुख्यमंत्र्यांचा अवमान करणारे जे उल्हासनगर महापालिका आयुक्त असतील त्यांच्यावर तातडीने कारवाई व्हावी अशी या निमित्ताने विनंती आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.संजय केळकर : सभापती महोदय, उल्हासनगर महापालिकेचे आयुक्त हे शासनातर्फे माननीय मुख्यमंत्र्यांनी दिलेल्या आदेशाचे पालन करीत नसतील तर हा विषय अतिशय गंभीर आहे. निरनिराळया महापालिकेच्या आयुक्तांकडून शासनाच्या आणि माननीय मुख्यमंत्र्यांच्या आदेशाचे पालन केले जात नसेल तर म्हातारी मेल्याचे दु:ख नाही परंतु काळ सोकावतो आहे. त्यामुळे या विषयामध्ये आपण गंभीरपणे लक्ष घालावे अशी विनंती आहे.

प्रा.जोगेंद्र कवाडे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्या श्रीमती उषाताई दराडे यांनी अत्यंत महत्वाच्या प्रश्नाला औचित्याच्या मुद्याने वाचा फोडली आहे, त्याबद्दल मी त्यांचे अभिनंदन करतो. उल्हासनगर महापालिकेचे आयुक्त यांनी त्यांच्या अधिकार कक्षेत नसताना एका अधिकाऱ्याला निलंबित करण्याचे आदेश पारित केले. त्या आदेशास राज्याच्या सन्माननीय मुख्यमंत्र्यांनी स्थगिती दिल्यानंतर देखील त्या आदेशाचा अवमान करण्यात आला. खरे पाहता माननीय मुख्यमंत्री महोदयांच्या आदेशाची अशा प्रकारे पायमल्ली करणारे अधिकारी असतील, आयुक्त असतील तर त्यांना ताबडतोब निलंबित करण्यात यावे अशी मी मागणी करतो. आपण या प्रकरणी निर्देश द्यावेत. अशा प्रकारे माननीय मुख्यमंत्र्यांचा अवमान करणाऱ्या घटना घडतात, भविष्यात अशा घटना घडू नयेत म्हणून जे आयुक्त आहेत त्यांना तातडीने निलंबित करण्यात यावे आणि त्यांच्या कारभाराची चौकशी करण्यात यावी आणि ज्यांच्या निलंबनास स्थगिती दिली आहे त्याचे पालन व्हावे अशी माझी विनंती आहे.

(नंतर श्री.जुन्नरे.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जयंत प्र.पाटील महापालिकेचे आयुक्त लोकप्रतिनिधींचे ऐकत नाहीत हे आम्ही आतापर्यंत ऐकत होतो. अशा प्रकरणाच्या संदर्भात सभागृहामध्ये ब-याच वेळा चर्चा झालेल्या आहेत. गेल्या वर्षी अकोल्याच्या कमिशनरांच्या संदर्भात या सभागृहात अडीच तास चर्चा देखील झालेली होती. अकोल्याचे आयुक्त सुध्दा शासनाचे कोणत्याही प्रकारचे आदेश पाळीत नव्हते. उल्हासनगर महापालिकेच्या कमिशनरांनी देखील माननीय मुख्यमंत्री महोदयांचे आदेश पाळलेले नाहीत. या आयुक्तांना कारवाई करण्याच्या संदर्भातील अधिकार नसतांना देखील त्यांनी कारवाई केलेली आहे. यासंदर्भातील कारवाई करण्याचे अधिकार महासभेला असतात. त्यामुळे संबंधित आयुक्तांवर कारवाई झाली पाहिजे अशी माझी मागणी आहे. या राज्याचा कारभार लोकप्रतिनिधी, माननीय मुख्यमंत्री करतात की, अधिकारी करतात अशा प्रकारचा संभ्रम माझ्या सारख्या सदस्याला पडलेला आहे. त्यामुळे या प्रकरणाच्या संदर्भात संबंधित कमिशनरांना निलंबित करुन चौकशी करण्यात यावी. या आयुक्तांनी जे बेकायदेशीर कृत्य केलेले आहे त्यामुळे उल्हासनगर महापालिकेच्या आयुक्तांचे तातडीने निलंबन करुन नंतर चौकशी करावी अशी माझी मागणी आहे.

उपसभापती : विधानपरिषदेच्या सन्माननीय सदस्या श्रीमती उषा दराडे यांनी औचित्याच्या मुद्याद्वारे सभागृहात गंभीर प्रश्न उपस्थित केलेला आहे. या औचित्याच्या मुद्याच्या संदर्भात सन्माननीय सदस्य श्री. रामनाथ मोते, सन्माननीय सदस्य श्री. संजय केळकर, सन्माननीय सदस्य प्रा. जोगेंद्र कवाडे, सन्माननीय सदस्य श्री. जयंत पाटील यांनी यासंदर्भात आपल्या तीव्र भावना व्यक्त केलेल्या आहेत. महाराष्ट्राच्या माननीय मुख्यमंत्र्यांनी या प्रकरणाच्या संदर्भात जवळपास चार दिवसापूर्वी आदेश दिलेले होते. कोणत्याही शासकीय अधिका-यांने माननीय मुख्यमंत्री महोदयांच्या आदेशाची पायमल्ली करणे हे निश्चितपणे भुषणावह नाही. लोंकशाहीच्या रचनेमध्ये शासनाचे प्रमुख आदरणीय मुख्यमंत्र्याचे, आदेश ज्यांनी धाब्यावर बसविले आहे त्यांच्यावर शासनाने योग्य ती कारवाई करावी. तसेच प्रकाश कुकरेजा,महापालिका सचिव यांच्या निलंबनाच्या आदेशास जो स्थगिती आदेश दिलेला आहे त्याच्या संदर्भात साधारणत: आज दुपारपर्यंत अंमलबजावणी करावी. तसेच सभागृहाची भावना लक्षात घेऊन उल्हासनगर पालिकेच्या संदर्भात आदेश निर्गमित करावे . या ठिकाणी सन्माननीय संसदीय कार्यमंत्री उपस्थित आहे त्यांनी यासंदर्भात नोंद घ्यावी व शासनाच्यावतीने माननीय मुख्यमंत्री महोदयांनी जे आदेश दिलेले आहेत त्याची अंमलबजावणी

....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

उपसभापती .....

करावी. उल्हासनगर महापालिकेच्या आयुक्तांनी माननीय मुख्यमंत्र्यांच्या आदेशावर चार दिवसापूर्वीच कार्यवाही करावयास पाहिजे होती परंतु माननीय मुख्यमंत्र्यांनी आदेश देऊन आज पाच दिवस झाले आहेत. तरी सुध्दा कार्यवाही झालेली नाही त्यामुळे यासंदर्भात आज दुपारी एक वाजेपर्यंत अंमलबजावणी करण्याच्या संदर्भात त्वरीत निर्देश द्यावे. तसेच संबंधित आयुक्तांच्या बाबतीत शासनाने शिस्तभंगाची कारवाई करावी अशा प्रकारचे सुस्पष्ट निर्देश मी देत आहे.

श्री. जयंत प्र. पाटील : माननीय सभापती महोदय, माझी मागणी अशी होती की, उल्हासनगर महानगर पालिकेच्या आयुक्तांनी माननीय मुख्यमंत्र्यांच्या आदेशाची पायमल्ली केलेली असल्यामुळे त्यांचे प्रथम निलंबन करण्यात यावे. नंतर चौकशी व्हावी अशी माझी मागणी आहे.

श्री. हर्षवर्धन पाटील : माननीय उपसभापती महोदयांनी या प्रकरणाच्या संदर्भात जे निदेश दिलेले आहेत त्यासंदर्भात त्वरीत कार्यवाही केली जाईल. माननीय मुख्यमंत्री महोदयांच्या आदेशाची आयुक्तांनी अंमलबजावणी का केली नाही यासंदर्भात माहिती घेऊन निश्चितपणे कारवाई केली जाईल

उपसभापती : या प्रकरणाच्या संदर्भातील माहिती सभागृहाला एका तासात द्यावी.

श्री. हर्षवर्धन पाटील : ठीक आहे

यानंतर श्री. अजित.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

अशासकीय कामकाज

पृ.शी.: नळपाणी पुरवठा योजना स्वतंत्र महामंडळाकडे सोपविणे

मु.शी.: नळपाणी पुरवठा योजना स्वतंत्र महामंडळाकडे सोपविणे

या विषयावरील श्रीमती उषाताई दराडे, वि.प.स. यांचा ठराव.

श्रीमती उषाताई दराडे (महाराष्ट्र विधानसभा सदस्यांद्वारा निर्वाचित) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने खालील ठराव मांडते

" राज्यातील ग्रामीण भागातील ग्रामपंचायतींना देखभालीसाठी हस्तांतरीत करण्यात आलेल्या नळपाणी पुरवठा योजना निधी अभावी बंद पडतात, व्यवस्थापन नीट होत नाही, त्यामुळे देखभाल व व्यवस्थापन सुरळीत होण्यासाठी शासनाने ह्या सर्व नळ पाणी पुरवठा योजना स्वतंत्र महामंडळाकडे सोपवाव्यात, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे."

सभापती महोदय, आपण ग्रामीण भागात पिण्याच्या पाण्याची कार्यवाही करीत असताना नवीन नवीन योजना घेत असतो. पाणी पुरवठा करण्यासाठी ज्या विविध योजना कार्यान्वीत आहेत त्यामध्ये जीवन प्राधिकरण योजनेचा देखील समावेश आहे. ही अतिशय महत्वाची संस्था आहे. परंतु या जीवन प्राधिकरण योजनेचा अनुभव काहीसा चांगला नाही. आमच्या बीड जिल्ह्यातील पिंपळनेर येथे जीवन प्राधिकरणाने 65 लाख रुपये खर्च करुन नळ पाणी पुरवठा योजनेचे काम केले. ती योजना ग्रामपंचायतीकडे हस्तांतरीत केली, परंतु त्या नळपाणी योजनेमधून ग्रामपंचायतीला एकही थेंब पाणी मिळालेले नाही. मग त्या योजनेची देखभाल दुरुस्ती ग्रामपंचायतीने कशी करायची ? जीवन प्राधिकरणाने ग्रामपंचायतीकडे योजना हस्तांतरीत करताना त्याची टेस्ट घेतली नाही. अशाचप्रकारची परिस्थिती परळी तालुक्यातील संगमगावांत आहे. त्याठिकाणी नळ पाणी पुरवठा योजनेद्वारे दहा दिवस,पंधरा दिवस पाणी पुरवठा होत नाही. जीवन प्राधिकरणाने ग्रामपंचायतीकडे योजना सोपविली परंतु या योजना ग्रामपंचायतीनी कशाप्रकारे सांभाळाव्यात हा त्यांच्यापुढे प्रश्न पडलेला आहे.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती उषाताई दराडे.....

सभापती महोदय, ग्रामीण भागात हातपंप आणि विद्युतपंप बसविण्यात आलेले आहेत. परंतु त्यांच्या देखभाल दुरुस्तीकडे पूर्णत: दुर्लक्ष करण्यात आलेले आहे. जिल्हापरिषदेच्या कर्मचाऱ्यांना सांगितले जाते की, या संदर्भातील वसुली करण्यात यावी आणि वसुलीतूनच देखभाल दुरुस्ती करण्यात यावी. ही वसुली तीस टक्के सुध्दा होत नाही. वसुलीबाबत अडचणी निर्माण झालेल्या आहेत. महाराष्ट्रात एकूण 1 लाख 22 हजार 951 हातपंप आहेत. तर 12 हजार 323 विद्युत पंप आहेत. कर्मचाऱ्यांकडून 100 टक्के वसुली करायची झाली तर त्यातून 9 कोटी 22 लाख 83 हजार इतकी रक्कम जमा होते. परंतु कर्मचाऱ्यांच्या पगारापोटी 11 कोटी रुपये खर्च अपेक्षित आहे. त्यामुळे दुरुस्तीचा खर्च कसा होणार हा प्रश्न उभा राहिलेला आहे.

सभापती महोदय, लोकवर्गणी आणि लोकसहभागातून जलस्वराज, महाजल योजना यशस्वी होत आहेत असे दिसते. या योजनेद्वारे पाणी पुरवठा सुरु होई शकेल, परंतु पुढे देखभाल दुरुस्तीचा प्रश्न आहेच. तेव्हा माझी शासनाला विनंती आहे की, नळपाणी पुरवठा योजना व्यवस्थित होण्यासाठी सर्व नळपाणी पुरवठा योजना स्वतंत्र महामंडळाकडे सोपविण्यात याव्यात. एवढे बोलून माझे भाषण पूर्ण करते.

ठराव प्रस्तुत झाला.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.संजय केळकर (कोकण विभाग पदवीधर) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्या श्रीमती उषाताई दराडे यांनी नळपाणी पुरवठा योजना संदर्भात जो अशासकीय ठराव मांडलेला आहे, त्यावर बोलण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, मी फक्त काही सूचना करणार आहे. सन्माननीय सदस्या श्रीमती उषाताई दराडे यांनी त्यांच्या भाषणात सांगितले की, "नळपाणी पुरवठा योजनांची देखभाल व व्यवस्थापन सुरळीत होण्यासाठी या योजना स्वतंत्र महामंडळाकडे सोपवाव्यात." या योजना स्वतंत्र महामंडळाकडे सोपवावयाच्या झाल्यास त्यासाठी स्वतंत्र स्टाफ नेमावा लागेल. त्यासाठी वेगळी तरतूद करावी लागेल. माझ्या माहितीप्रमाणे महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडे अतिरिक्त कर्मचारीवर्ग आहे. त्यांना काम न करता पगार मिळत आहे. तेव्हा त्यांच्याकडे हे काम सोपविण्यात यावे अशी माझी सूचना आहे. कोणत्याही योजनांची स्थिती खर्च जास्त आणि वसुली कमी अशी झालेली आहे.

यानंतर श्री.पुरी..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(सभापतीस्थानी तालिका सभापती माननीय श्री.विनोद तावडे)

श्री.संजय केळकर...

त्यामुळे या सगळया योजनांची देखभाल व दुरुस्ती न होऊ शकल्यामुळे ग्रामीण भागामध्ये या योजना बंद पडतात. माझी याठिकाणी एवढीची सूचना आहे की, ही योजना थेट जीवन प्राधिकरणाने राबवावी व यासंबंधी जी काही तूट येईल ती शासनाने पेलावी. आज जीवन प्राधिकरणाकडे अतिरिक्त कर्मचारी उपलब्ध असल्यामुळे याबाबतीतील काम त्यांच्याकडे सोपविता येईल. त्यामुळे कुठल्याहीप्रकारे जिल्हा परिषदेस यामध्ये न आणता ही योजना आपण थेट जीवन प्राधिरकणाकडे द्यावी व प्राधिकरणास आपण योग्य प्रकारचा निधी उपलब्ध करुन देऊन त्याची अंमलबजावणी करुन घ्यावी, असे मी या अशासकीय ठरावाच्या निमित्ताने मागणी करतो व माझे भाषण संपवितो.

..2.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.एन.पी.हिराणी (यवतमाळ स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, अत्यंत ज्वलंत समस्येवर या अशासकीय ठरावाद्वारे याठिकाणी विचार उपस्थित करण्यात येत आहेत. हा प्रश्न फक्त ग्रामीण भागापुरताच मर्यादित नसून नगरपरिषदेतीही अशीच परिस्थिती आहे. सुरुवातीच्या काळामध्ये जीवन प्राधिकरण हे काम करीत होते. राज्यामध्ये सगळीकडे या यंत्रणेच्या माध्यमातून या योजना चालविल्या जात होत्या. परंतु पुढे स्थानिक स्वराज्य संस्थांकडे त्यांचा कारभार सोपविला पाहिजे म्हणून तशा प्रकारचे काम शासनाने त्यांच्याकडे देऊन शासन यातून बाजूला झाले. ग्रामपंचायत किंवा नगरपालिका त्या योजना चालविण्याकरिता पुढे आल्या. परंतु दुर्दैवाने त्यामध्ये कॉम्पिटेन्सी नसल्यामुळे, टेक्निकल माहिती नसल्यामुळे अशा अनेक कारणांमुळे आज या कुठल्याही योजना चालत नाहीत. आज ग्रामपंचायत व नगरपालिकांमार्फत पाणीपट्टीची वसुली होत नाही. त्याठिकाणी ग्रामपंचायतीमध्ये व नगरपालिकेमध्ये लोकप्रतिनिधी असल्यामुळे व ते लोकांचे प्रतिनिधी असल्यामुळे त्यांच्यामार्फत वसुली होऊ नये अशाप्रकारची व्यवस्था त्याठिकाणी करण्यात येत असते. त्यामुळे कुठल्याही प्रकारची पाणीपट्टी वसुली इफेक्टीव्हली नगरपालिका किंवा ग्रामपंचायतीमध्ये होत नाही. अशा परिस्थितीमध्ये जीवन प्राधिकरणाने त्यांच्या टेक्निकल स्टाफकडून नगरपालिकेच्या व ग्रामपंचायतीच्या स्टाफला ट्रेनिंग दिले पाहिजे. यामुळे कॉम्पिटेन्सी निर्माण होईल. वसुलीकरिता कायद्याने किंवा एकप्रकारे कम्पल्शन करुन कॉंट्रॅक्ट पध्दतीने नगरपालिकेतील, ग्रामपंचायतीतील पाणीपट्टी वसुलीकरिता प्रयत्न झाले तर त्या माध्यमातून चांगल्या प्रकारचा फंड नगरपालिका व ग्रामपंचायतीकडे येईल. तसेच त्यांचेकडे रिकरिंग एक्सपेंडीचरची सोय नसल्यामुळे योजना बंद पडतात. कर्मचाऱ्यांचा पगार करण्याकरिता किंवा एखादा पंप फेल झाला तर त्यासाठी दुसरा पंप स्टॅण्ड बाय नसतो, अशाप्रकारची भयानक परिस्थिती या सगळया पाणी पुरवठा योजनांच्या बाबतीत निर्माण झालेली आहे. याबाबतीत मी एवढीच सूचना करु इच्छितो की, ग्रामपचांयत आणि नगरपरिषदेच्या ही योजना चालविणाऱ्या स्टाफमध्ये आपण इफेक्टीव्हली कॉम्पिटेन्सी निर्माण करावी, या योजनेमध्ये जीवन प्राधिकाऱ्यांच्या अधिकाऱ्यांना सहभागी करुन घ्यावे, त्यांना आपण विश्वासात घ्यावे. नगरपालिका व ग्रामपंचायतीमध्ये चालवित असलेली ही योजना त्यांच्याकडून घेऊन, वसुलीबाबतीत त्यांच्यावर अवलंबून राहण्याऐवजी कॉंट्रॅक्ट पध्दतीने वसुली करावी, असे जर आपण केले तर या योजना व्यवस्थितपणे व सक्षमपणे चालू शकतील,असे मला वाटते.

(..3....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयंत प्र. पाटील (महाराष्ट्र विधानसभा सदस्यांद्वारा) : सभापती महोदय, या ठरावाला विरोध करण्यासाठी मी उभा आहे. मुळामध्ये ही योजना ग्रामपंचयातीची नाही व याबाबतीत ग्रामपंचायतीला कुठलाही अधिकार नाही. ग्रामसभेमार्फत पाणीपुरवठयाची योजना राबविली जाते.

नंतर श्री.रोझेकर....

अप्रधारित पत्र / परिपत्रकासाठी नाही

श्री.जयंत प्र.पाटील.....

पाणी पुरवठा योजना उभारणीचे कॉंट्रॅक्ट देण्यापासून ती योजना कार्यान्वीत करण्यापर्यन्त निर्णय घेण्यासाठी ग्रामसभेने निवडलेली पाणी पुरवठा समिती असते. त्या ठिकाणी याबाबतचा निर्णय घेतला जातो. ज्या केंद्र सरकारच्या गाईडलाईन्स आहेत, जागतिक बँकेचे फंडिंग होते त्यामध्ये जी मार्गदर्शक तत्वे आहेत त्यानुसारच राज्य शासनाला चालावे लागते, असे मला वाटते. त्यादृष्टीकोनातून 10 टक्के लोकसहभाग आणि 90 टक्के शासन यामधून ही योजना तयार होते. सन्माननीय सदस्या, श्रीमती उषाताई दराडे यांना मी सांगू इच्छितो की, आपले दु:ख खरे आहे. या ठिकाणी योजना सुरु करतांना राज्य शासन किंवा जिल्हा परिषद यांच्याकडून योग्य ती काळजी घेतली जात नाही. त्या ठिकाणी कॉंट्रॅक्टरना कॉंट्रॅक्ट मिळण्यासाठी योजना राबविल्या जातात. ज्या ठिकाणी केवळ उन्हाळयाच्या 2 महिन्यांसाठी पाण्याची गरज असते, इतर 8 महिने पावसाळयाचे किंवा विहिरीचे पाणी उपलबध असते अशा ठिकाणी योजना राबविल्या जातात आणि मग त्या ठिकाणी स्थानिकांकडून लोकवर्गणी दिली जात नाहीत किंवा पाणीपट्टी भरण्यास हे लोक तयार नसतात. नवीन महामंडळ तयार करुन आणखी एक हत्ती पोसण्याची गरज नाही, असे माझे स्पष्ट मत आहे. यासाठी हा पर्याय नाही तर लोकांचे प्रबोधन करण्याची खरी गरज आहे. अलिबाग तालुक्यातील 202 गावांमध्ये मी स्वत: पाणी पुरवठा योजना केल्या. या ठिकाणी पाणीपट्टी वसूल करण्याचे काम योग्य प्रकारे केले गेले. पाणीपट्टी वसूलीचे काम योग्य प्रकारे केले तर या योजना प्रॉफीटमध्ये येतात, असा अनुभव आहे. या ठरावाच्या निमित्ताने मी शासनाचे लक्ष वेधू इच्छितो की, निसर्गदत्त पाण्याचे स्त्रोत आणि एमआयडीसीकडून मिळणारे पाणी या दोन स्त्रोतांमधून पाणी पुरवठा योजना होतात. ज्या ठिकाणी औद्योगिकरण होते त्या ठिकाणी एमआयडीसी स्थापन होते. औद्योगिकरणामुळे पाणी दुषित होते, पाणी खराब होते, पाण्याचा जास्त वापर होतो. परंतु, त्या ठिकाणी लोकांच्या पिण्याच्या पाण्यासाठी मात्र एमआयडीसीकडून औद्योगिक रेट लावला जातो. हा निवासी रेट करण्याची आवश्यकता आहे. मी या विषयी अनेक वेळा सभागृहात चर्चा केलेली आहे. या रेटमध्ये देखील सुसूत्रता नाही. नागपूरला वेगळा, रायगड जिल्हयात वेगळा आणखी कुठे वेगळा रेट एमआयडीसीकडून लावला जातो. ज्यांचे

..2.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयंत प्र.पाटील.....

राजकीय वजन जास्त त्यांना कमी रेट लावला जातो, ज्यांचे राजकीय वजन कमी त्यांना जास्त रेट लावला जातो, हे जे धोरण आहे त्यामध्ये बदल करण्याची आवश्यकता आहे. सन्माननीय सदस्या, श्रीमती उषाताई दराडे यांची मागणी चांगली आहे. परंतु, अंमलबजावणी करतांना ज्या त्रुटी आहेत त्या दूर करण्याची आवश्यकता आहे. मी या क्षेत्रात काम केलेले आहे. माझ्या पक्षाचे पनवेलचे लोकप्रतिनिधी सन्माननीय सदस्य, श्री.विवेक पाटील यांनी त्यांच्या मतदारसंघामध्ये अनेक योजना प्रभाविपणे राबविल्या आहेत, यशस्वी केल्या आहेत. त्या ठिकाणी लोकवर्गणी जमा केलेली आहे. ज्या लोकांसाठी या योजना होत आहेत त्यांचा सहभाग या योजनांमध्ये मिळाला पाहिजे, तरच या योजना यशस्वी होऊ शंकतील. परंतु, अनेक ठिकाणी मी मघाशी सांगितल्याप्रमाणे कॉंट्रॅक्टरसाठी योजना राबविल्या जातात आणि मग लोकांचा सहभाग मिळत नाही, या योजना अयशस्वी होतात. यावर शासनाने नियंत्रण ठेवले पाहिजे, जे अधिकारी अशा पध्दतीने काम करतात, खोटे रेकॉर्ड तयार करतात त्यांच्यावर कारवाई होण्याची आवश्यकता आहे. ज्या पध्दतीने या योजना आखल्या जातात त्याचे सुत्र चांगले आहे परंतु अंमलबजावणी कशी करावयाची याबाबत शासनाने योग्य निर्णय घ्यावा, अशी या निमित्ताने मी विनंती करतो. त्याच पध्दतीने जीवन प्राधिकरणाकडे जो अतिरिक्त कर्मचारीवर्ग आहे त्यांना काम देण्याचे नियोजन देखील करण्याची आवश्यकता आहे. त्यामुळे आहे ती पध्दत तशीच चालू ठेवावी मात्र त्यामध्ये आवश्यकता त्या सुधारणा लवकरात लवकर कराव्यात, लोकांचा जास्तीत जास्त सहभाग घ्यावा, त्यांचे प्रबोधन करावे, संबंधित चुकार अधिका-यांवर कारवाई करावी तरच या योजना यशस्वी होऊ शकतील, अशा प्रकारची अपेक्षा व्यक्त करतो आणि माझे दोन शब्द पूर्ण करतो. धन्यवाद.

यानंतर श्री.बोरले.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर चव्हाण (मुंबई स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्या श्रीमती उषाताई दराडे यांनी लोकांच्या अडचणी लक्षात आल्यामुळे अशासकीय ठराव मांडलेला आहे. यामध्ये एका गोष्टीचा उल्लेख होणे आवश्यक होते. सर्व नळ पाणी पुरवठा योजना स्वतंत्र महामंडळाकडे सोपवाव्यात, असे त्यांनी म्हटलेले आहे. आज जी महामंडळे आहेत त्यातील काही महामंडळे बोगस आहेत. त्या महामंडळांना पैशांचे कुरण म्हटले पाहिजे. सन्माननीय सदस्या, श्रीमती उषाताई दराडे यांनी महामंडळ स्थापन करण्याची सूचना केलेली आहे. त्याचे आर्थिक निकष काय ? त्याला अर्थपुरवठा कोण करणार ? त्यामुळे या योजना स्वतंत्र महामंडळाकडे देणे योग्य होणार नाही. जनताभिमूख अशासकीय ठराव येथे येतात, त्यावर चांगली चर्चा होते. त्यानंतर शासनाच्यावतीने ठराव मागे घेण्यास सांगितले जाते. माझा मागच्या 3 वर्षाचा अनुभव असा आहे की, कोणताही अशासकीय ठराव मांडल्यानंतर त्या ठरावावर चर्चा झाल्यानंतर ठराव मागे घेतल्यानंतर त्याची अंमलबजावणी झाली किंवा नाही याचे आमदारांना पत्र येत नाही. सन्माननीय सदस्यांनी ठरावाद्वारे केलेली सूचना मागे घेतल्यानंतर ज्या चांगल्या सूचना सन्माननीय सदस्यांनी केल्या व त्यापैकी ज्या सूचनांची अंमलबजावणी करण्यात येईल, त्यासंबंधी आदेश काढले जातील, त्याची माहिती संबंधित सन्माननीय सदस्यांना मिळाली पाहिजे. अन्यथा जी चर्चा होते त्या चर्चेला काही अर्थ राहणार नाही. या ठिकाणी होणा-या चर्चेचे पॉईंटस् लिहून घेतले असतील तर त्यावर अधिका-यांची बैठक बोलाविली पाहिजे. या सूचना सन्माननीय सदस्यांकडून आलेल्या आहेत त्यासाठी आपल्याला आर्थिक तरतूद करता येईल काय ? त्याची अंमलबजावणी करता येईल काय ? याबाबतची विचारणा केली पाहिजे व त्याबाबत निर्णय घेतला गेला पाहिजे. मला असे वाटते की, ग्रामीण भागामध्ये नळ पाणी पुरवठा योजना केल्या जातात त्या आपल्या जवळच्या बगलबच्चांना कॉन्ट्रॅक्ट देण्यासाठी केल्या जातात. नळ पाणी पुरवठा योजनांची अंमलबजावणी करतांना योग्य निकष ठरविले गेले पाहिजेत, अशी माझी या ठरावाच्या अनुषंगाने सूचना आहे. एवढे बोलून मी माझे दोन शब्द संपवितो.

...2/-

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.राजन तेली (महाराष्ट्र विधानसभा सदस्यांद्वारा निर्वाचित) : सभापती महोदय, राज्यातील ग्रामीण भागातील नळ पाणी पुरवठा योजनांसंबंधीचा अतिशय चांगला ठराव सन्माननीय सदस्या श्रीमती उषाताई दराडे यांनी मांडलेला आहे. मी सिंधुदुर्ग जिल्हयातील उदाहरण देईन. सिंधुदुर्ग जिल्हयामध्ये एकूण 809 योजना आहेत. त्यापैकी 114 योजना बंद पडलेल्या आहेत. 52 योजना अशा आहेत की, ज्या विद्युत देयके भरलेले नसल्यामुळे बंद पडलेलेल्या आहेत. या 52 योजनांमध्ये अजून वाढ होऊ शकते. त्या वेळच्या नळ पाणी पुरवठा योजना भौगोलिक रचनेप्रमाणे झालेल्या नाहीत. महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने केलेल्या योजना विचित्र असल्यामुळे आज ग्रामीण भागात पाण्याची अडचण भासत आहेत. विद्युत देयके न भरल्यामुळे योजना बंद पडलेल्या आहेत. ज्या येाजना दुरुस्तीसाठी आलेल्या आहेत त्यांची संख्या वाढत आहे. यासंदर्भात कायम स्वरुपी ठोस निर्णय झाला पाहिजे. ग्रामीण भागावतील नळ पाणी पुरवठा योजना बंद पडलेल्या आहेत. याचा सर्वसामान्य जनतेला भुर्दंड पडलेला आहे. माझ्याकडे मागच्या मार्च महिन्यातील आकडेवारी आहे. 114 पेक्षा जास्त नळ पाणी पुरवठा योजना बंद पडलेल्या आहेत. यावर कायम स्वरुपी तोडगा निघावा ,असे मी सुचवितो आणि माझे दोन शब्द संपवितो.

यानंतर श्री.सुंबरे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रणजित कांबळे (ग्रामविकास राज्यमंत्री) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्या श्रीमती उषाताई दराडे यांनी या ठिकाणी नळपाणी पुरवठ्यासंबंधात अशासकीय ठरावाच्या रूपाने चर्चा उपस्थित केली आहे आणि त्यामध्ये येथे उपस्थित सन्माननीय सदस्यांनी भाग घेतला आहे त्याबद्दल मी त्यांचे आभार मानतो. सभापती महोदय, 73 वी घटना दुरूस्ती झाल्यानंतर कोणत्याही योजनेची देखभाल दुरूस्ती किंवा त्यांची मालकी ही स्थानिक स्वराज्य संस्थांकडे राहणार आहे हे निश्चित झ ाले आणि हा निर्णय योग्य असाच आहे. कारण सन्माननीय सदस्यांनी सांगितले की, ही योजना कोणासाठी आहे ? तर लोकांसाठी आहे. या योजनेचे पाणी कोण वापरते ? तर लोक वापरतात. म्हणजे हे स्वाभाविक आहे की, ते पाणी आपल्यासाठी आहे आणि आपल्याला पाणी पाहिजे असेल तर त्यासाठीचा खर्च उचलण्याची जबाबदारी देखील आपल्यावरच राहणार. म्हणजेच त्यावरील कर भरणे आपल्याला आवश्यकच आहे. सन्माननीय सदस्य श्री.तेली यांनी येथे एक मुद्दा उपस्थित केला की, त्यांच्या सिंधुदुर्ग जिल्ह्यामध्ये जवळपास 112 योजना बंद आहे आणि 52 योजना वीज बिल न भरल्यामुळे बंद आहेत. सभापती महोदय, कोणतीही योजना नीटपणे चालविण्यासाठी कर वसुली करणे अत्यंत आवश्यक असते. आपला खर्च किती आहे आणि आपली वसुली किती आहे हे यासाठी लक्षात घेणे गरजेचे आहे. तसे यासंबंधीचे गणित अगदी सोपे आहे. सध्या ग्रामीण भागातील वसुली ही जवळपास 35 टक्के आहे म्हणजेच 65 टक्के लोक या योजनांचे पैसेच भरीत नाहीत. लोक पैसेच भरणार नसतील तर मग योजना चालणार तरी कशा ? आपण नेहमी याबाबत शासनावर दोष देतो, अधिकाऱ्यांवर दोष देतो. पण यामध्ये अधिकाऱ्यांकडे दोष केव्हा जाईल, तर जेव्हा नागरिकांकडून 100 टक्के कर भरला गेला असेल आणि त्यानंतर त्या योजनांमध्ये काही तांत्रिक अडचण, दोष निर्माण झाला म्हणून योजना बंद पडली असेल तर मग मी समजू शकतो. आज बहुतांश योजन तेथील सोर्स ड्राय झाले म्हणून बंद आहेत किंवा पाणी कमी आहे म्हणून तसेच वीज बिले न भरल्यामुळे देखील मोठ्या संख्येने योजना बंद आहेत. तरीही आता शासनाचे यासंबंधीचे धोरण मी सांगू इच्छितो. त्यांचे म्हणणे आहे की, याबाबतीतील सगळे अधिकार हे ग्रामपंचायतीचे आहेत. तैथे जी पाणीपुरवठा समिती असते त्यांच्याकडेच याबाबतचे सारे अधिकार असतात. अगदी प्रस्ताव देण्यापासून बांधकाम करणे आणि नंतर वसुली पर्यातचे सगळे अधिकार हे त्या पाणीपुरवठा समितीकडे राहतात. सध्या राज्याचे जल स्वराज्य प्रकल्प चालू आहेत. ..

श्री. मधुकर चव्हाण : सभापती महोदय, या संदर्भात मी आपल्याला 10-12 गावांची नावे देऊ शकतो की, तेथील 65 ते 70 टक्के लोक पाणीपट्टीच भरीत नाहीत. त्यांचे पाणी कनेक्शन कापण्याचे अधिकार आपण ग्रामपंचायतींना, पाणीपुरवठा समितीला दिले पाहिजेत. आज तसे कोणतेही अधिकार ..... जी 2

....

11-12-2006 (असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही) G

2

KBS/MAP/KGS. श्री. बोरले नंतर ---

11:30

श्री. मधुकर चव्हाण

....

त्यांना नाहीत. त्यासाठी आपण कायदा केलेला नाही.

श्री. रणजित कांबळे : सभापती महोदय, हा अधिकार त्यांच्याकडे अगोदरपासून आहेच. परंतु त्या अधिकाराचा वापर ते करतात की नाही हा प्रश्न आहे. मी स्वत: ग्रामपचांयतीचा सरपंच असताना 15 दिवस टुल्लू पंप लावले होते पण नंतर पाणी येत नव्हते. त्याबाबतीत पाणी पट्टी वसुली न झाल्याने मी 30-40 कनेक्शन्स कापली होती आणि दुसऱ्या दिवशी त्या लोकांनी कर भरला आहे. पंप जप्त करण्याचे अधिकार देखील यामध्ये ग्रामपंचायतीला आहेत. कोणी कर भरला नाही तर पाणीपुरवठा समितीला त्यांची कनेक्शन्स कापण्याचे अधिकार आहेत हे मला येथे आवर्जून सांगितले पाहिजे. सभापती महोदय, या ठिकाणी सन्माननीय सदस्यांनी एक मुद्दा असा उपस्थित केला की, तेथे जे कर्मचारी आहेत त्यांना प्रशिक्षण दिलेले नसते. बांधकामासंबंधातील, योजनेच्या अमलबजावणीसंबंधातील किंवा योजनेच्या देखभाल-दुरूस्तीबाबतचे वा एकूणच योजना चालविण्याच्याबाबतीत प्रशिक्षण तेथील कर्मचाऱ्यांना देण्याची गरज आहे. मी आपल्याला सांगू इच्छितो की, आता जलस्वराज योजनेमध्ये योजनेचे बांधकाम करण्यापूर्वी त्यामध्ये प्रशिक्षण देण्याचाही एक भाग आहे. त्यानंतर लोकवर्गणी आणि त्यानंतर योजनेचे बांधकामाचा भाग येतो. इतकेच नव्हे तर बांधकामामध्ये देखील त्यांचा सहभाग राहणार आहे. तसेच देखभाल-दुरूस्ती आणि दैनंदिन कामकाजामध्ये देखील त्यांचा सहभाग राहणार आहे. त्याचबरोबर 10 टक्के लोकवर्गणी त्यांनी दिली पाहिजे अशी शासनाची अट आहे आणि योजना कदाचित आम्ही बांधली वा कंत्राटदाराने बांधली असेल तर ती बांधल्यानंतर ती योजना टेकओव्हर करण्याची जबाबदारी व

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

खात्री ही ग्रामपंचायतीने दिली पाहिजे असेही बंधन त्यामध्ये आहे. कारण शेवटी या योजनेची मालकी ही ग्रामपंचायतीकडे राहते आणि तिच्या देखभाल-दुरूस्तीची जबाबदारी ही देखील 100 टक्के ग्रामपंचायतीकडेच राहते. सन्माननीय सदस्यांनी येथे मुद्दा उपस्थित कला की, ...

(यानंतर श्री. सरफरे ..... एच 1..

अप्रधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रणजित कांबळे...

अनेक योजनांचे बांधकाम झाल्यानंतर त्या योजना जिल्हा परिषदेला हस्तांतरीत केल्या जातात.माननीय सदस्या श्रीमती उषाताई दराडे यांनी बीड जिल्हयाचे उदाहरण सांगितले. कोणत्याही योजनेचे हस्तांतरण करण्यापूर्वी एम.जे.पी. आणि जिल्हा परिषदेच्या कार्यकारी अभियंत्यांमार्फत ही योजना योग्य पध्दतीने चालू आहे की नाही याबाबत सर्व्हेक्षण केले जाते. त्यापूर्वी तीन महिने ती प्रादेशिक नळ पाणीपुरवठा योजना चालविण्याची जबाबदारी महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाची आहे. त्यानंतर महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे अधिकारी आणि जिल्हा परिषदेचे अधिकारी हे त्या योजनेचे जॉईंट इन्सेक्शन करतात. जिल्हा परिषदेचे पदाधिकारी आणि अधिकाऱ्यांचे समाधान झाल्यानंतर ती योजना हस्तांतरीत करण्यात येते. महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने योजनेचे फक्त बांधकाम केले आणि जबरदस्तीने ती योजना हस्तांतरीत करण्यात आली असे याठिकाणी सांगण्यात आले असले तरी ते खरे नाही. जिल्हा परिषदेच्या अधिकाऱ्यांनी त्या योजनेचे इन्सपेक्शन केल्यानंतरच ती योजना हस्तांतरीत केली जाते. योजना हस्तांतरीत झाल्यानंतर सुध्दा तिच्या देखभाल आणि दुरुस्तीसाठी जिल्हा परिषदेचा देखभाल निधी असतो. त्याचप्रमाणे ग्रामपंचायतीकडे सुध्दा त्यांचा स्वत:चा निधी असतो. बँकेत त्याचे वेगळे अकाऊंट करुन त्यामध्ये तो ठेवला जातो. त्याचप्रमाणे प्रादेशिक नळ पाणी पुरवठा योजनेमधून ग्रामपंचायतीला 20 टक्के आणि जिल्हा परिषदेला 80 टक्के रक्कम मिळते. त्याव्यतिरिक्त केंद्र सरकारच्या एक्सलरेटेड रुरल वॉटर सप्लाय स्किममधून जिल्हा परिषदेला 15 टक्के निधी मिळतो. त्याचप्रमाणे राज्य सरकारकडून मिनिमम नीड प्रोग्रामची 15 टक्के रक्कम जिल्हा परिषदेला मिळते. त्याचप्रमाणे जिल्हा परिषदेच्या स्वत:च्या उत्पन्नातील 20 टक्के रक्कम पाणी पुरवठा योजनेसाठी ठेवणे अत्यंत आवश्यक आहे. तशाप्रकारचे राज्य शासनाचे आदेश आहेत. ज्याप्रमाणे जिल्हा परिषदेच्या स्वत:च्या निधीमधून महिला व बाल कल्याणकरीता 1 टक्का निधी राखून ठेवला जातो, समाज कल्याणकरीता देखील निधी राखून ठेवला जातो. त्याप्रमाणे पाणीपुरवठा योजनेकरीता देखील वेगळा निधी राखून ठेवणे बंधनकारक आहे. त्याचप्रमाणे 12 व्या वित्त आयोगाचे जे पैसे आले आहेत त्याबाबत सुध्दा स्पष्टपणे सूचना दिलेल्या आहेत. त्या सूचना आहेत की, हे पैसे खर्च करतांना पाणी पुरवठा योजनेच्या किरकोळ दुरुस्तीवर प्राधान्य देऊन खर्च करणे आवश्यक आहे. ग्रामपंचायतीच्या ताब्यातील योजनेच्या दुरुस्तीसाठी लँड रेव्हेन्यू ऑफ इक्वलायझेशन ॲक्टनुसार जी ग्रँट मिळते तिच्या 35 टक्के निधी पाणीपुरवठा योजनेसाठी वेगळा ठेवणे आवश्यक आहे. कर वसूलीमधून जे

पैसे जमा होतात,आणि वॉटर सप्लाय कनेक्शनमधून जे पैसे जमा होतात ते सुध्दा त्या निधीमध्ये शिल्लक

अधिकृत पत्र / परिपत्रकासाठी नाही

श्री. रणजित कांबळे...

राहतात. त्याचप्रमाणे एक्सलरेटेड रुरल वॉटर सप्लाय स्किमचे पैसे मिळतात त्यातील 50 टक्के निधी जिल्हा परिषदेला आणि 50 टक्के निधी ग्रामपंचायतीला दिला जातो. याचा अर्थ असा की, शासन आपल्या परीने 100 टक्के मदत करीत असते.परंतु प्रश्न असा आहे की, स्थानिक स्वराज्य संस्था म्हणून जिल्हा परिषदेची ही योजना नीटपणे चालविण्याची जबाबदारी आहे. त्याचप्रमाणे जिल्हा परिषदेला टी.सी.एल. पावडरकरीता शासनाकडून 50 टक्के निधी दिला जातो. जिल्हा परिषदेच्या विद्युत बिलाच्या 50 टक्के रकमेची भरपाई शासन करते. माझ्याकडे अशी माहिती आहे की, अनेक जिल्हा परिषदांनी याकरीता पैशाची मागणी केलेली नाही. त्यांची कार्यपध्दत अशी आहे की, पूर्ण पंचायत समितीचे एकत्रित बिल जिल्हा परिषदेकडे पाठविले जाते. ते बिल पंचायत समितीकडून आल्यानंतर एकत्रितपणे ते शासनाकडे पैशाची मागणी करतात. त्यामुळे कदाचित ज्या ग्रामपंचायती प्रामाणिकपणे बिल भरतात त्या मागे राहू शकतात. परंतु ज्या इतर ग्रामपंचायती अशा आहेत की, त्यांनी आपले बिल भरले नसेल तर त्या जिल्हा परिषदेकडे मागणी करीत नाही. माहितीसाठी मी आपणास सांगू इच्छितो की, मागील पाच वर्षामध्ये किंवा 2005-06 मध्ये मिनिमम नीड प्रोग्राममध्ये 7 कोटी,

(यानंतर श्री. किल्लेदार)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रणजित कांबळे (पुढे सुरू...

एक्सलरेटर रूरल वॉटर सप्लाय स्कीमसाठी 140 कोटी रुपये, टी.सी.एल.साठी 2 कोटी 55 लाख रुपये आणि जिल्हापरिषदेला वीज बील देण्यासाठी 3 कोटी रुपये असे मिळून 53 कोटी रुपये जिल्हापरिषद, ग्रामपंचायतींना दिलेले आहेत. ज्या काही स्थानिक स्वराज्य संस्था आहेत...

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, विजेची बिले भरण्यासाठी 3 कोटी रुपये दिल्याचे मंत्री महोदयांनी सांगितले. परंतु ही पध्दत चुकीची आहे. आपण ही रक्कम एकाच जिल्हापरिषदेला देता, दुसऱ्या जिल्हापरिषदेला ती देत नाही. लाईट बीलाची रक्कम द्यावयाची असेल तर ती सगळ्याच जिल्हापरिषदांना द्यावी, नाही तर कोणालाच देऊ नये.

श्री.रणजित कांबळे : त्या विषयावर मी नंतर येतो. सभापती महोदय, एम.जी.पी.ने आतापर्यन्त 10,050 योजना बांधलेल्या आहेत. त्यापैकी 980 योजना या वेगवेगळया ग्रामपंचायतींना हस्तांतरित केलेल्या आहेत.

श्री.भास्कर जाधव : सभापती महोदय, मंत्री महोदय चुकीचे सांगत आहेत. वस्तुस्थिती अशी आहे की, एम.जी.पी.कडे 75 लाखाच्या वरच्या योजना आहेत. 75 लाखाच्या आतील योजना या जिल्हापरिषदेने करावयाच्या आहेत. रत्नागिरी जिल्ह्यामध्ये एम.जी.पी.मधून किती स्कीम झालेल्या आहेत ?

श्री.रणजित कांबळे : किती योजनांची कामे हातामध्ये घेतलेली आहेत, याची माहिती माझ्याकडे आहे.

श्रीमती उषाताई दराडे : किती बांधकामे केली हा महत्वाचा मुद्दा नाही. मी पिंपळनेर गावचा प्रश्न उपस्थित केलेला आहे. त्या गावामध्ये मी दोन वेळा जाऊन आलेली आहे. या योजनेवर शासनाचे 65 लाख रुपये खर्च झालेले आहेत. गुत्तेदाराचे बील देण्यासाठी ही योजना कागदोपत्री हस्तांतरित केलेली आहे, असे आमचे म्हणणे आहे. 65 लाख रुपये खर्च करून एक थेंबही पाणी त्या गावामध्ये मिळणार नसेल तर त्या योजनेचा काय उपयोग आहे? हा पांढरा हत्ती पोसण्याचा प्रकार आहे. तेथील लोकांचे म्हणणे आहे की, ती योजना उचलून घेऊन जावी. त्याऐवजी 2 लाख रुपयामध्ये विहीर सरकारने बांधून द्यावी. आम्ही मोटर लावून त्या विहिरीमधील पाणी घेऊ. जे काम केलेले आहे ते निकृष्ट झालेले आहे असे त्यांचे म्हणणे आहे. त्या योजनेचे काय करावे, असा प्रश्न पडलेला आहे ?

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रणजित कांबळे : एम.जी.पी.चे कार्यकारी अभियंता आणि जिल्हापरिषदेचे कार्यकारी अभियंता याच्याकडून त्या योजनेचे इन्स्पेक्शन होते. तीन महिने चालवून नंतर ती योजना हस्तांतर केली जाते.

श्रीमती उषाताई दराडे : जॉइन्ट इन्स्पेक्शन म्हणजे काय ? हे कळत नाही.

श्री.रणजित कांबळे : जिल्हापरिषदेचे कार्यकारी अभियंता आणि एम.जी.पी.चे कार्यकारी अभियंता यांचे जॉईन्ट इन्स्पेक्शन होते.

श्रीमती उषाताई दराडे : यातून मार्ग कसा काढणार आहात ?

श्री.रणजित कांबळे : एम.जी.पी.ने वॉटर सप्लायच्या 10 हजार योजना बांधलेल्या आहेत. 543 योजना हस्तांतरित केलेल्या आहेत. 116 योजना बांधकामाच्या स्टेजवर आहेत. ग्रामपंचायत, जिल्हापरिषदेला कॉन्टॅक्टवर एम.जी.पी.ने या योजना दिलेल्या आहेत. सन्माननीय सदस्यांनी ज्या योजनेचा उल्लेख केलेला आहे, त्याची चौकशी केली जाईल.

यानंतर श्री.बरवड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री परशुराम उपरकर : ज्या नळ योजना बांधल्या जातात त्यांची आयुर्मर्यादा 15 वर्षाची असते. योजना बांधून 15 वर्षे झाल्यानंतर त्या योजनेच्या देखभाल व दुरुस्तीसाठी काय उपाययोजना करावी असा प्रश्न आहे. ज्या नळ योजना डिझाईन केलेल्या आहेत त्या योजनांच्या टाक्या भरण्यास 20-25 तास लागतील असे पंप बसवून डिझाईन केलेल्या आहेत. पंधरा वीस तास वीज न मिळाल्यामुळे टाक्या भरल्या जात नाहीत. त्यामुळे ग्राहक पाणीपट्टी देत नाहीत.

श्री. रणजित कांबळे : समजा टाकी गळणे, पाईपलाईन फुटणे, योजना चालू न होणे किंवा दुरुस्ती करणे अशी परिस्थिती निर्माण झाली आणि जर कोणत्याही ग्रामपंयायतीने 10 टक्के लोकवर्गणी भरुन प्रस्ताव दिला तर शासन 90 टक्के खर्च करते अशी तरतूद आहे. सन्माननीय सदस्या श्रीमती उषाताई दराडे यांनी हातपंपाचा मुद्दा उपस्थित केला. आज आपल्या राज्यामध्ये जवळपास 1 लाख 75 हजार हापपंप आणि 12 हजार मोटरपंप आहेत. सन्माननीय सदस्यांनी कर्मचारीवर्गाबाबतचा मुद्दा उपस्थित केला. जिल्हा परिषदांची यासंदर्भातील आकडेवारी पाहिली तर 1 लाख 75 हजार कर्मचारी आहेत. त्यांनी वसुली करुन द्यावयाची आहे. ते कॉन्ट्रक्टवर आहेत. ही बाब खरी आहे की, आज आपण प्रति हापपंप 500 रुपये आणि प्रति मोटरपंप 2500 रुपये ग्रामपंचायतमध्ये वसुली करतो. आम्हाला जवळपास 25 कोटी रुपये देखभाल दुरुस्ती किंवा त्यांच्या पगारासाठी लागतात. माझ्या माहितीप्रमाणे ग्रामपंयातींकडून 80 टक्के वसुली होते. त्यामुळे आम्हाला 8 कोटी रुपये मिळतात. बाकीचे जे पैसे आहेत ते मिनिमम नीड प्रोग्राम किंवा एक्स्लरेटेड रुरल वॉटर सप्लाय स्कीम यांच्या माध्यमातून देतो. ती रक्कम जवळपास 48 कोटी रुपये आहे. हे जे पैसे आहेत त्यातील 50 टक्के रक्कम जिल्हा परिषदेला आणि 50 टक्के रक्कम ग्रामपंचायतीला देतो. मोटरपंप किंवा हँडपपच्या कर्मचारीवर्गाच्या पगाराचा प्रश्न आहे. तो खर्च जिल्हा परिषदेकडून करण्यात येतो. वेगवेगळ्या तीन हेड्सच्या माध्यमातून पैसे वसूल होतात त्याच्या माध्यमातून त्यांचा पगार करतात. हातपंपासाठी 500 रुपये आणि मोटरपंपासाठी 2500 रुपये ही रक्कम दहा ते बारा वर्षापूर्वी ठरविलेली आहे. त्यामध्ये वाढ करण्याची गरज आहे. काही जिल्हा परिषदस हातपंपासाठी 800 ते 900 रुपये आणि मोटरपंपासाठी 5 हजार रुपये वसूल करीत आहेत. यापुढे कंपल्सरी हातपंपासाठी 1 हजार रुपये आणि मोटरपंपासाठी 5 हजार रुपये वसूल करणे आवश्यक आहे. तसे

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ KGS/ MAP/

श्री. रणजित कांबळे ....

आदेश पुढे काढणारच आहोत. आमच्याकडे स्टाफ नाही असा प्रश्न उपस्थित करण्यात आला. प्रत्येक ग्रामपंचायतीकडे एक दोन कर्मचारी पाणीपुरवठा योजनेचे काम करीत असतात. आपल्याकडे जवळपास 77 हजार कर्मचारी मोटरपंपवर काम करतात. ते ग्रामपंचायतीच्या स्तरावर आहेत. ते अनेक वर्षे या योजनांवर काम करीत आहेत. शेवटी तेच योजना चालवितात. ते ग्रामपंचायतीचे कर्मचारी असतानाही त्यांचा अर्धा पगार शासनच देते. सर्व जिल्हा परिषदांचे एकूण 162 डिव्हीजन्स आणि 33 सबडिव्हीजन्स आहेत. हे सगळे डिव्हीजन्स सक्षम आहेत. कोणताही तांत्रिक प्रश्न आला तर त्याबाबतचे काम ते केव्हाही करु शकतात. त्याच्या व्यतिरिक्त कोणालाही असे वाटले की, देखभाल दुरुस्तीमध्ये काही अडचण आहे किंवा जिल्हा परिषदेची काही अडचण होत आहे तर त्यासंदर्भात एक जी.आर. काढलेला आहे. ते काम महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाला कॉन्ट्रॅक्ट बेसिसवर देऊ शकतात. ते खाजगी कंत्राटदाराला किंवा महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाला काम देऊ शकतात. तो अधिकार जिल्हा परिषदेकडे आहे. ते केव्हाही कॉन्ट्रक्टने काम देऊ शकतात. स्टाफ नाही किंवा दुरुस्ती ही योजना बंद होण्याचे कारणे नाहीत.

यानंतर श्री. शिगम...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री.रणजित कांबळे...)

नळपाणी पुरवठा योजना बंद होण्याची अनेक कारणे आहेत. टॅक्स वसूल न होणे, सोर्स ड्राय होणे अशा कारणांमुळे ह्या योजना बंद पडतात. सन्माननीय सदस्यांना माझी नम्र विनंती आहे की, याबाबतीत लोकप्रतिनिधी म्हणून आपली सुध्दा काही जबाबदारी आहे. या योजना आपापल्या भागामध्ये, जिल्हापरिषदांमध्ये सर्वांना समाजावून सांगणे आवश्यक आहे. मुख्य म्हणजे टॅक्स वसुली शिवाय योजना चालविता येणे शक्य नाही. म्हणून टॅक्स वसुलीवर जास्त भर देण्याची आवश्यकता आहे. एमआडीसीने पिण्याच्या पाण्यासाठी वेगळे दर लाववेत अशी सन्माननीय सदस्यांनी मागणी केलेली आहे.

श्री. जयंत प्र. पाटील : एमआयडीसीचे औद्योगिक वापरासाठीचे पाण्याचे दर 7 रुपये असतील तर पिण्याच्या पाण्यासाठी 1 रु. दर लावावा.

श्री. रणजित कांबळे : संपूर्ण इन्फ्रास्ट्रक्चर उभारण्यासाठी लागणारी इन्व्हेस्टमेंट ही एमआयडीसी करीत असते. पिण्याच्या पाण्याचे दर कमी करण्यासांबंधी शासनाच्यावतीने एमआयडीसी सोबत निश्चितच चर्चा करण्यात येईल. तेव्हा सन्माननीय सदस्यांनी आपला ठराव मागे घ्यावा अशी मी त्यांना विनंती करतो.

श्रीमती उषाताई दराडे : सन्माननीय राज्यमंत्री महोदयांनी ठराव मागे घेण्यासंबंधी विनंती केलेली आहे. जल स्वराज आणि महाजल या योजना लोकवर्गणीतून, लोकसहभागातून चालतात असे राज्यमंत्री महोदयांनी सांगितले. हातपंप दुरुस्तीसाठी 500 रु. ऐवजी 1 हजार रु. आणि विद्युतपंप दुरुस्तीसाठी 2500 रु. ऐवजी 5 हजार रु. वसूल करण्याचा निर्णय शासन घेणार आहे. पिंपळनेर योजनेची चौकशी करण्यात येईल असेही राज्यमंत्री महोदयांनी सांगितले. ग्रामपंचायतीला वसुलीचे अधिकार देण्याची चर्चा झाली. खरे म्हणजे झालेल्या योजना ह्या कशा चालवायचा हा प्रश्न क्लिष्ट असला तरी मार्ग काढण्याच्यादृष्टीने राज्यमंत्री महोदय प्रयत्न करतील. राज्यमंत्री महोदयांच्या उत्तराने माझे पूर्ण समाधान झाले नसले तरी त्यांच्या विनंतीचा मान राखवून मी माझा ठराव मागे घेण्यास सभागृहाची अनुमती मागते.

सभागृहाच्या अनुमतीने ठराव मागे घेण्यात आला.

...2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी.: विनाअनुदान तत्वावर मान्यता दिलेल्या शाळांना 100 टक्के अनुदान मिळण्याची आवश्यकता

मु.शी.: विनाअनुदान तत्वावर मान्यता दिलेल्या शाळाना 100 टक्के अनुदान मिळण्याची आवश्यकता या विषयावरील श्री. रामनाथ मोते, वि.प.स. यांचा ठराव.

श्री. रामनाथ मोते (कोकण विभाग शिक्षक) : महोदय, मी आपल्या अनुमतीने खालील ठराव मांडतो.-

राज्यातील विनाअनुदान तत्वावर मान्यता देऊन सुरु करण्यात आलेल्या माध्यमिक शाळेतील विद्यार्थ्यांना अनुदानाअभावी प्रयोगशाळा, ग्रंथालये व इतर शैक्षणिक सोयी सुविधा उपलब्ध होऊ शकत नाहीत. त्यामुळे विद्यार्थ्यांच्या प्रगतीवर होणारा विरित परिणाम विचारात घेता विनाअनुदान तत्वावर मान्यता दिलेल्या राज्यातील सर्व माध्यमिक शाळांना चालू शैक्षणिक वर्षापासून 100 टक्के अनुदान देण्यात यावे, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे."

सभापती महोदय, राज्यातील विनाअनुदानित शाळांना आर्थिक मदत न मिळाल्यामुळे एकूणच शिक्षण क्षेत्रावर निर्माण झालेला विपरित परिणाम यासंदर्भातील प्रस्तुत ठराव आहे. माझ्या या ठरावाला शासनाकडून नेहमीच्याच पध्दतीने उत्तर मिळेल याची मला पूर्ण कल्पना आहे. उत्तर दिल्यानंतर ते अशासकीय ठराव मला मागे घ्यायला सांगतील. सभापती महोदय, शासनाचे या शिक्षण क्षेत्राबद्दलचे धोरण, नीती याबाबतीत या सभागृहामध्ये चर्चा होणे आवश्यक आहे. विनाअनुदानित शाळांना अनुदान न मिळणे, तेथील शिक्षक, विद्यार्थी, उपलब्ध होणा-या शैक्षणिक आणि मूलभूत सुविधा इत्यादी प्रश्न मी सातत्याने सभागृहामध्ये मांडलेले आहेत. परंतु त्याबाबतीत शासनाने अद्यापपर्यनत गांभीर्याने विचार केलेला नाही, निर्णय घेतलेला नाही. या राज्याच्या माजी शिक्षण मंत्र्यांचे मनोगत मी या ठिकाणी वाचून दाखवतो. त्यांचे म्हणणे असे होते की, "शिक्षणावरील खर्च हा खर्च नसून ती दूरगामी स्वरुपाची भांडवली गुंतवणूक आहे". शिक्षणमंत्री महोदय पुढे असे म्हणतात की, " शिक्षण हे सर्वांगिण मानवी विकासाचे मूलभूत साधन आहे. शिक्षणाद्वारे मानवाच्या सुप्त क्षमतांचा अत्युच्च विकास साध्य करता येतो. शिक्षणामुळे समाजाचे रहाणीमान उंचावणे, आत्मसन्मान वाढवणे ....

...नंतर श्री. भोगले...

अशासकीय ठराव / शिक्षणासाठी नोंद

व स्वातंत्र्याचा खरा आस्वाद त्यांना घेता येणे हे आवश्यक आहे. प्रत्येक व्यक्तीतील सूप्त क्षमता व देशात विविध क्षेत्रास लागणारे मनुष्यबळ यांची सांगड शिक्षण व्यवस्थेतून घातला येणे हे शिक्षण व्यवस्थेसमोरील आव्हान आहे. भारतात शिक्षणाबरोबर मानवी जीवनाच्या मुलभूत गरजा पूर्ण करणे हेही तितकेच निकडीचे आहे. विकसनशील राष्ट्रात अपुऱ्या साधनसामुग्रीतून द्यावयाच्या मुलभूत गरजाबरोबर विकास साधत साधत शिक्षणाचा गुणात्मक व संख्यांत्मक विस्तार साधणे हे कठीण आव्हान आहे. महाराष्ट्र राज्य देशातील इतर राज्यांच्या तुलनेत सर्वच क्षेत्रात आघाडीचे राज्य म्हणून गणले जाते. राज्यासमोर आर्थिक अडचण कितीही असली तरी शिक्षणासारख्या महत्वाच्या विकास क्षेत्रासाठी पुरेसा खर्च करावयाचा हा आघाडी शासनाचा निर्धार आहे असे शासनाने म्हटले आहे.

सभापती महोदय, हे शासनाचे धोरण जरी फक्त भाषणासाठी असले तरी प्रत्यक्षात मात्र शासनाने त्यासाठी कोणत्याही प्रकारचा प्रयत्न केलेला नाही. सभापती महोदय, मागील पंचवार्षिक योजना पाहिल्या तर आपल्या असे लक्षात येईल की, पहिल्या पाच पंचवार्षिक योजना होत्या त्या पहिल्या पाच योजनांमध्ये शिक्षणाला अग्रक्रम देण्यात आला होता. पहिल्या पाच पंचवार्षिक योजनांमध्ये शिक्षणावर फार मोठया प्रमाणावर प्राधान्याने खर्च करण्याची तरतूद होती. त्यानंतर आलेल्या पंचवार्षिक योजनांचा विचार केला तर माझ्या माहितीप्रमाणे शिक्षण विभाग हा पहिल्या दहाच्या आत आलेला नाही.

सभापती महोदय, आज शासनाचे जे काही शिक्षणाबद्दलचे धोरण आहे, खरे म्हणजे या राज्याचे सन्माननीय माजी मुख्यमंत्री कै.वसंतदादा पाटील यांनी विनाअनुदान धोरण महाराष्ट्रात सुरु केले, त्या पाठिमागील किंवा त्यावेळची परिस्थिती वेगळी होती. राज्यातील विद्यार्थी अन्य राज्यामध्ये, शेजारच्या राज्यांमध्ये शिक्षणासाठी जातात. प्रचंड देणग्या, पैसा त्या शिक्षण संस्थांना दिला जातो. ही योजना फक्त प्रोफेशनल कोर्ससाठी होती. बी.एड, डी.एड, इंजिनिअरिंग कॉलेज, मेडिकल कॉलेज यापुरती होती. महाराष्ट्रातील विद्यार्थी परराज्यात शिक्षणासाठी जातात. प्रचंड पैसा महाराष्ट्रातून अन्य राज्यातील शिक्षण संस्थाना मिळतो. त्याच धर्तीवर महाराष्ट्रात विनाअनुदानित शिक्षण संस्था सुरु केल्या तर निश्चित स्वरुपात राज्यातील विद्यार्थ्यांना शिक्षणाची सोय उपलब्ध होऊ शकेल. ज्यांची आर्थिक क्षमता आहे त्यांनी बाहेर जाऊन शिक्षण घेण्याऐवजी,

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामनाथ मोते.....

बाहेरच्या राज्यात पैसा जाण्याऐवजी याच राज्यात शिक्षणाची सोय व्हावी म्हणून त्या विशिष्ट क्षेत्रापुरती ही योजना राज्य शासनाने राबविणे सुरु केले. हळूहळू मात्र राज्याच्या शिक्षण विभागाने ही विनाअनुदानित योजना प्राथमिक विभाग, माध्यमिक विभाग, उच्च माध्यमिक विभाग, डिग्री कॉलेज यांना सुध्दा लागू केली आहे. शासनाचे आता धोरण असे आहे की, एका बाजूला शासन म्हणते वयाच्या 14 व्या वर्षापर्यंत सक्तीने सर्वांनी शिक्षण घेतले पाहिजे. शिक्षणमंत्र्यांनी घोषणा केली की, ज्या पालकांचे विद्यार्थी शिकणार नाहीत त्यांच्यावर ते कारवाईची तरतूद करणार आहेत. दुसऱ्या बाजूला मात्र शिक्षण घेण्यासाठी आजूबाजूच्या परिसरात ज्या काही शाळा आहेत त्या नगरपालिकांच्या शाळा, जिल्हा परिषदांच्या शाळा आहेत. काही शाळांची अवस्था अशी आहे की,मी त्यांचे वर्णन याठिकाणी करण्याची आवश्यकता नाही. एका-एका शाळेमध्ये जेवढे विद्यार्थी शिकतात, पहिली ते सातवीपर्यंत दोन शिक्षक द्यावयाचे असताना पहिली ते सातवी, पहिली ते चौथीपर्यंतच्या वर्गाना एक किंवा दोन शिक्षक शिकवितात. एकच शिक्षक चौथी ते सातवीच्या वर्गाना सांभाळतो, चार-चार वर्ग सांभाळतो.

सभापती महोदय, याठिकाणी मंत्रीमहोदय उत्तर देताना अनुदानित शिक्षण संस्थांमधील काम करणारे शिक्षक आहेत त्यांच्यावर ठपका ठेवणार आहेत याची मला पूर्ण कल्पना आहे. अनुदानित शिक्षण संस्थांमध्ये काम करणारे शिक्षक चुकत असतील, गृहखात्यातील एका मोरे नावाच्या व्यक्तीने काही वाईट केले असेल तर संपूर्ण खाते दोषी धरणार का? शिक्षक चुकले तर जरुर कारवाई करावी. आम्ही त्याचे समर्थन करणार नाही. जे आपल्या कामात कुचराई करतात त्यांच्यावर कारवाई करु नये याचे समर्थन आम्ही करणार नाही.

(नंतर श्री.जुन्नरे...

अपुष्ठीत पत्र / प्रतिक्षेसाठी नाही

श्री.रामनाथ मोते....

शासनाने शिक्षणाच्या संदर्भात जे धोरण अवलंबविले आहे ते अतिशय चुकीचे आहे. शासनाने यासंदर्भात त्रिस्तरीय शिक्षण पध्दती जाहीर केलेली आहे. 1) मूळ वेतन श्रेणी. 2) उच्च वेतनश्रेणी आणि तिसरी श्रेणी ही निवड श्रेणी आहे. उच्च वेतन श्रेणी ही 12 वर्षानंतर दिली जाते तर निवड श्रेणी 24 वर्षानंतर दिली जाते. पहिल्या श्रेणीतील शिक्षकाचे पोट भरते उच्च श्रेणीमधील शिक्षक हे अर्धपोटी आहेत सुरुवातीला 25 टक्के, 75 टक्के आणि 100 टक्के अनुदान मिळत होते. परंतु आता 20 टक्के, 40 टक्के, 60 टक्के, 80 टक्के,100 टक्के अशा प्रकारे 10 वर्षानंतर अनुदान मिळते. त्यामुळे 10 वर्षानंतर या शिक्षकांचा चरितार्थ चालणार आहे. सभापती महोदय, मला असे म्हणावयाचे आहे की, विनाअनुदानीत शाळेमध्ये काम करणा-या शिक्षकांच्या संदर्भात शासनाला असे वाटते काय की, ज्यांनी शाळा काढलेल्या आहेत त्या संस्था चालकांनीच तेथील शिक्षकांचे पगार द्यावे? या संस्था चालकांकडे प्रचंड पैसा आहे, करोडो रुपये आहेत त्यामुळे त्यांच्या पैशांचे काय करावयाचे असा संस्थाचालकांकडे प्रश्न पडलेला आहे का? परंतु सभापती महोदय, संस्था चालकांची अशी परिस्थिती नाही. विनाअनुदानित शाळेला 20 टक्के अनुदान दिले तर 80 टक्के पैसे संस्थाचालक टाकू शकतील अशी परिस्थिती नक्कीच नाही. शाळेला अनुदान मिळाले तर काही संस्थाचालक शिक्षकांकडून दीड दोन लाख रुपये घेऊन त्यांचे पगार सुरु करीत असतात. सभाती महोदय, भविष्यामध्ये विनाअनुदानित शाळेला शासनाकडून कोणत्याही प्रकारची मदत मिळणार नाही. विनाअनुदानित शाळेमध्ये काम करणारे शिक्षक आज अर्धपोटी राहून विद्यार्थ्यांना शिक्षण देत आहे. या शाळेवर शासनाचे कोणतेही बंधन राहिलेले नाही. शासनाला जर शिक्षण क्षेत्रासंदर्भात कळकळ असेल, ग्रामीण भागातील, आदिवासी भागातील सर्वसामान्यांच्या मुलांना, गरीब मुलांना, झ ोपडपट्टीत राहणा-या मुलांना शिक्षण मिळाले पाहिजे अशी शासनची अपेक्षा असेल तर विनाअनुदानित शाळेला अनुदान मिळण्याची अत्यंत आवश्यकता आहे. आज विनाअनुदानित शाळांची काय अवस्था आहे हे आपल्या सर्वांना माहिती आहे. विनाअनुदानित शाळेमध्ये कोणत्याही प्रकारच्या सुविधा उपलब्ध नाहीत. शिक्षणाच्या संदर्भात माननीय माशेलकर साहेबांनी सांगितले आहे की, "भारतासमोर एक नवी Y2K समस्या निर्माण झालेली आहे. इ.स. 2000 व त्यानंतरच्या

....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रामनाथ मोते.....

काळातील तरुण पिढीच्या उभारणीची ही समस्या आहे. 2015 वर्षापर्यंत भारताच्या लोकसंख्येत निम्म्याहून अधिक प्रमाण वीस वर्षाखालील वयाच्या तरुणांचे असेल, असे भविष्य वर्तवण्यात आले आहे. ही नक्कीच महत्वाची बातमी आहे. ही भारतीय मुले एक तर जन्लेली आहेत किंवा लवकरच जन्मणाला येणार आहेत. तरुण पिढी ही शक्ती, जोम, चैतन्य यांचे प्रतीक असते. युवाशक्ती हीच राष्ट्राची खरी शक्ती असते. तरुणांना योग्य दिशा दिल्यास ते आपल्या संस्कृतीतील विजेते, राष्ट्रीय स्वाभिमानाचे रक्षक आणि देशाच्या स्वातंत्र्याचे विश्वस्त बनू शकतात. पण अशा योग्य दिशा-दिग्दर्शनाच्या प्रतिकयेसाठी बालवयापासूनच योग्य शिक्षण देण्याची आवश्यकता असते. अशा आव्हानांना सामोरे जाण्याची तयारी आमच्या शिक्षण व्यवस्थेने केली आहे का? मला वाटते याचे उत्तर "नाही" असेच येईल. यासंदर्भात विज्ञान शिक्षणावर अधिक प्रकाश टाकता येईल."

यानंतर श्री. अजित.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामनाथ मोते.....

सभापती महोदय, विनाअनुदानित शाळेत काम करणाऱ्या शिक्षकांना कोणत्याही प्रकारचे वेतन मिळत नाही. विद्यार्थ्यांना कोणत्याही प्रकारच्या सोयीसुविधा मिळत नाहीत. अशा शाळांकडून शासन चांगल्या मूल्यांकनाची अपेक्षा करीत आहे. अशा शाळांना सांगण्यात येत आहे की, आपल्या शाळेस चांगले गुण मिळाल्यास अनुदानाबाबत विचार करण्यात येईल. विनाअनुदानीत शाळांमध्ये ग्रंथालये नाहीत, वाचनालये नाहीत, विद्यार्थ्यांना कोणत्याही प्रकारच्या सुविधा नाहीत. मग अशा शाळांची गुणवत्ता कशी वाढेल ? या सर्व प्रकारच्या सोयीसुविधा फक्त रेकॉर्डवर दाखविल्या जातात. परंतु प्रत्यक्षात शासनाकडून अनुदान मिळण्याची खात्री होत नाही, तोपर्यंत कोणत्याही प्रकारच्या सुविधा उपलब्ध करुन दिल्या जात नाहीत. शाळेत प्रयोगशाळा असली तरी प्रयोगशाळेचे साहित्य नसते. वाचनालये असली तरी पुस्तके नसतात, क्रीडा साहित्य असले तर मैदाने उपलब्ध नसतात. आज अशी परिस्थिती आहे की, 90 टक्के शाळांना मैदाने नाहीत. या सर्व परिस्थितींचा विचार करता शाळांची गुणवत्ता कशी वाढेल ?

सभापती महोदय, अनुदानित आणि विनाअनुदानित शाळांसाठी वेगवेगळा न्याय लावण्यात आलेला आहे. मध्यंतरी शासनाने घोषित केले की, विनाअनुदानित शाळांना दुपारचे भोजन देणार आहोत. याची अंमलबजावणी सर्व ठिकाणी होते काय ? शासनाने मोफत शिक्षण देण्याचा निर्णय घेतलेला आहे, पण त्याची रिएम्बर्समेंट शासनाकडून किती मिळते ? याचा देखील विचार झाला पाहिजे. आजही काही शाळांमध्ये पाचवीच्या वर्गासाठी तीन रुपये फी, सहावीच्या वर्षासाठी चार रुपये, सातवीसाठी पाच रुपये, अशी फी आकारली जाते. ही फी भरण्यास विद्यार्थ्यांचे पालक सक्षम नाहीत. त्यामुळे विद्यार्थी शिक्षणापासून वंचित राहत आहेत. सभापती महोदय, विनाअनुदानित शाळेत काम करणाऱ्या शिक्षकांचे तसेच विद्यार्थ्यांचे शासनाने शोषण सुरु केलेले आहे. या निमित्ताने माझी शासनाला विनंती आहे की, यापुढे आवश्यकता असेल त्याच ठिक्राणी शाळा काढण्याचे धोरण स्वीकारले पाहिजे. शासन या धोरणामध्ये बदल करीत नाही तोपर्यंत शिक्षण क्षेत्राचे चित्र बदलणार नाही. तेव्हा या संदर्भात शासनाने धोरणात्मक निर्णय घेण्याची आवश्यकता

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामनाथ मोते.....

आहे. कोणालाही शाळा काढण्याची परवानगी दिली जाते, कोणत्याही ठिकाणी शाळा काढण्याची परवानगी दिली जाते, असे होऊ नये म्हणून त्यासाठी एक मास्टर प्लॅन करण्याची आवश्यकता आहे. ज्याठिकाणी खरोखरच शाळेची आवश्यकता आहे, त्याठिक्राणी शाळा काढण्याची परवानगी दिली पाहिजे आणि ती अनुदान तत्त्वावर असली पाहिजे. संस्थाचालक मोठ्या प्रमाणावर शाळा काढण्याची परवानगी मागते आणि शासन त्यांना मान्यता देते. या गोष्टींना आळा बसला पाहिजे. आवश्यकता असेल त्याच ठिकाणी शाळा काढण्याची मान्यता द्यावी. हे सर्व करीत असताना ज्या शाळांना मान्यता देण्यात येईल त्या शाळा 100 टक्के अनुदानित असल्या पाहिजेत. शिक्षण क्षेत्रात चांगल्या प्रकारचे वातावरण राहण्यासाठी शिक्षकांना वेळेवर पगार मिळाले पाहिजेत. जेणेकरुन त्यांना पोटभर जेवता येईल आणि त्यांना विद्यादानाचे काम चांगल्याप्रकारे करता येईल.

सभापती महोदय, शिक्षण विभाग हा सर्वात महत्वाचा विभाग आहे. राज्यातील नवीन पिढी घडविण्याचे काम शिक्षक करीत असतात, त्यामध्ये हलगर्जीपणा झाला तर विद्यार्थ्यांचे संपूर्ण आयुष्य उद्ध्वस्त होणार आहे. तेव्हा यादृष्टीकोनातून शासनाने विचार करावा आणि राज्यातील विना अनुदानित शाळांना 100 टक्के अनुदान देण्यात यावे अशी विनंती करतो आणि माझे भाषण पूर्ण करतो.

ठराव प्रस्तुत झाला.

यानंतर श्री.पुरी...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.कपिल पाटील (मुंबई शिक्षक) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. रामनाथ मोते यांनी मांडलेल्या ठरावाला पाठिंबा देण्यासाठी मी उभा आहे. सभापती महोदय, आज राज्यातील शिक्षण क्षेत्रामध्येही नवा चातुर्वर्ण निर्माण करण्याची व्यवस्था निर्माण केली जात आहे. यामध्ये धनदांडग्यांचा एक वर्ग, दुसरा अनुदानित शाळांचा वर्ग, तिसरा विना अनुदानित शाळांचा वर्ग व चौथा वस्ती शाळांचा वर्ग निर्माण झालेला आहे. अशा प्रकारची विषमता निर्माण झालेली आहे. माननीय वसंतदादांचा उल्लेख याठिकाणी झाला.

तालिका सभापती : सन्माननीय सदस्यांनी फक्त मुद्दे मांडावेत.

श्री.कपिल पाटील : सभपती महोदय, भारतीय संविधानामध्ये 14 वर्षापर्यंत शिक्षण सक्तीचे आणि मोफत देण्यासंबंधीची व्यवस्था आहे. परंतु याठिकाणी जे विना अनुदानित धोरण निर्माण करण्यात आलेले आहे ते घटनेशी सुसंगत नाही, त्यामुळे ते ताबडतोब बंद झाले पाहिजे, अशी या सभागृहाची मागणी आहे. अशा प्रकारची व्यवस्था एका बाजूला निर्माण केली असताना इंग्रजी शाळांसाठी आपण विना अनुदान धोरण राबविणार आहात, ते योग्य असून त्याबाबतीत आमचा आक्षेप नाही. परंतु ग्रामीण भागामध्ये व मुंबईसारख्या शहरांमध्ये झोपडपट्टीमध्ये ज्या शाळा सुरु करण्यात आल्या, त्या झोपडपट्टीतील जी गुरीब मुले शिक्षण घेत आहेत, ती मुले फी देऊ शकत नाहीत, त्यामुळे त्या शाळा आपण अनुदानावर घेतल्या पाहिजेत. ज्या शाळांना परवानगी दिली त्याबाबतीत 5-7-8 वर्षानंतर त्या शाळा टप्प्याटप्प्याने 100 टक्के अनुदानावर येतील असे धोरण आहे. परंतु या सगळया प्रक्रियेस 10-15 वर्षांचा कालावधी लागतो. त्यावेळी त्या शाळांतील शिक्षणाचा दर्जा खालावून शिक्षकांचे मोठया प्रमाणात शोषण होते. आपण मुलांना दर्जेदार शिक्षण देण्याची आवश्यकता आहे. याबाबतीत घटनेमध्ये तरतूद आहे, परंतु त्या तरतुदीशी आपण फारच दूर आहोत. आज मुल्यांकनाच्या बाबतीत फारच वाईट स्थिती असून ग्रामीण भागातील शाळांसाठी आपण 10 गुण देतो, मुंबईसारख्या शहरी भागातील शाळांसाठी आपण 5 गुण देतो. परंतु झोपडपट्टीतील शाळांच्या बाबतीत आपण काहीच गुण देत नाही, हे योग्य नाही. आपण झोपडपट्टीतील शाळांच्या बाबतीत पूर्ण गुणांचे मुल्यांकन केले पाहिजे. याबाबतीतील आपली मुल्यांकनाची जी पध्दत आहे ती आपण बदलली पाहिजे, असे मला वाटते. तसेच, ज्या शिक्षण सेवकांनी त्यांच्या सेवेची सुरुवातीची 3 वर्षे पूर्ण केलेली आहेत व ज्या विना अनुदान शाळांनी सगळया शर्ती पूर्ण केल्या आहेत, त्यांना आपण 100 टक्के अनुदान ताबडतोबीने दिले पाहिजे.

..2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.कपिल पाटील....

सभापती महोदय, याठिकाणी 1973 सालाचा उल्लेख करण्यात आला. आपण मोफत शिक्षणाची व्यवस्था निर्माण केली असून अनुदानित शाळांतील मुलांचाही मोफत शिक्षणाचा अधिकार आहे. त्यांची फी सरकारने ताबडतोबीने परत करण्याची आवश्यकता आहे. एवढे बोलून मी माझे दोन शब्द पूर्ण करतो.

..3.....

अप्रधारित प्रत / परिषदेसाठी नाही

श्री.जी.एल.अैनापुरे (पुणे विभाग शिक्षक) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.रामनाथ मोते यांनी जो याठिकाणी अशासकीय ठराव मांडला आहे, त्याला पाठिंबा देण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, या अत्यंत महत्वाच्या प्रश्नावर चर्चा करण्यासाठी अडीच तासाची चर्चाही कमी पडली असती. गेल्या 60 वर्षामध्ये एवढा काळाकुट्ट निर्णय शिक्षण खात्याने घेतला नसेल तेवढा आज या विना अनुदानाचा घेतलेला आहे.. विना अनुदानाची संकल्पनाच चुकीची आहे. आज विना अनुदान शालेय शिक्षणाची गरज होती का ? व्यवसाय शिक्षणाची गरज असू शकते. परंतु विना अनुदान तत्वावर शाळा देण्याची आवश्यकता नव्हती. गरज नसताही महाराष्ट्र शासनाने अशा प्रकारचा निर्णय घेतलेला आहे, हे योग्य नाही. कोणाची तरी सोय करण्यासाठी, अशा शाळा देण्यात आल्या. ज्यांची लायकी नाही त्यांना अशा शाळा देण्यात आल्या. समाजातील गुंड, एक नंबरचे नालायक आणि ज्यांची नांवे पोलीस स्टेशनमध्ये लागलेली आहेत अशांनी आज शाळा मिळवलेल्या आहेत.

नंतर श्री.रोझेकर...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जी.एल.ऐनापुरे.....

याची उदाहरणे शिक्षण खात्यातील लोकच सांगत आहेत. या विनाअनुदानित शाळा गरज नसतांना दिल्या आहेत, स्वार्थासाठी दिलेल्या आहेत त्यामुळे त्या शाळांची अवस्था अशी झाली आहे. लिंबाच्या झाडाखाली शाळेची स्टाफ रुम आहे, कुडाच्या खोल्यांमध्ये शाळा भरविल्या जातात, त्या ठिकाणी वर्षाचा अभ्यासक्रम देखील पूर्ण होत नाही, क्रमिक पुस्तके नाहीत, लायब्ररी हा प्रकारच नाही, शिकविण्यासाठी जागा नाही, शिक्षकसुध्दा सवडीने शिकवित असतात, शिक्षकांना पगार दिला जात नाही. संस्थाचालक सांगतात की, आम्ही शाळा काढून दिलेली आहे, शाळा चालविण्याची जबाबदारी ही शिक्षकांची आहे. दुस-या बाजूला अनुदानिक शाळा बंद पडत चालल्या आहेत. त्या ठिकाणी सरप्लस शिक्षक भरले जात आहेत. त्यामुळे या शाळा बंद पडत आहेत. शिक्षणमंत्र्यांना माझी विनंती आहे की, पुढील 10 वर्षात एकही शाळा देऊ नका, शाळांची बिलकूल गरज नाही. पण ज्या शाळा सध्या आहेत त्या व्यवस्थित चालविण्यासाठी प्रयत्न करा. अगोदरच मुडदूस झालेल्या बालकाला चांगले खाऊ-पिऊ घाला, इंजेक्शन, औषधे द्या आणि त्याला सुदृढ करा. आणखी काही नवीन बालकांना यामध्ये ढकलू नका. यासंबंधी शासनाने सर्वेक्षण करावे व उपाययोजना कराव्यात, अशा प्रकारची विनंती करतो आणि माझे दोन शब्द पूर्ण करतो.

..2.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयंत प्र.पाटील (महाराष्ट्र विधानसभा सदस्यांव्दारा निर्वाचित) : सभापती महोदय, या ठिकाणी सन्माननीय सदस्य, श्री.रामनाथ मोते यांनी जो अशासकीय ठराव आणला आहे त्या ठरावावर माझे विचार व्यक्त करण्यासाठी मी उभा आहे. सन्माननीय सदस्यांनी असे विचार या ठिकाणी मांडले की, शिक्षकांना पगार दिले जात नाहीत. मी अनेक वेळा या विषयावर सभागृहामध्ये चर्चा केली आहे. सन्माननीय मंत्रीमहोदयांना प्रत्येक अधिवेशनामध्ये जाऊन भेटतो. सन 2002 पर्यन्तच्या सगळया शाळा अनुदानावर आलेल्या आहेत. सन 2002 नंतरची एकही शाळा अनुदानावर आलेली नाही. टप्प्याटप्प्याने शाळा अनुदानावर आणण्याचा निर्णय शासनाने घेतलेला आहे. मी या सभागृहाचा 6 वर्षापासून सदस्य आहे. प्रत्येक अधिवेशनामध्ये मी याबद्दल बोलतो. शासनानेही आम्हाला या ठिकाणी आश्वासन दिलेले आहे. औरंगाबाद खंडपीठापुढे शासनाने असे लिहून दिलेले आहे की, टप्प्याटप्प्याने या शाळा अनुदानावर आणण्यात येतील. परंतु, त्याची अंमलबजावणी झालेली नाही. मी माझ्या भागात विनाअनुदानित तत्वावरील 32 शाळा चालवितो. 32 शाळातील 25 शाळा या आदिवासी, ग्रामीण व डोंगराळ भागात आहेत. माझ्या उत्पन्नातील 25 टक्के हिस्सा मी शिक्षणावर खर्च करतो. माझ्या शाळेचे सर्व व्यवहार हे चेकव्दारा होतात. इतर कोणतीही बाब करण्याअगोदर मी त्या ठिकाणी शिक्षकांना पगार देतो. परंतु, या ठिकाणी शासनाचे धोरण कसे आहे ? 10 हजार कोटी रुपये शासन शिक्षणावर खर्च करते. विनाअनुदानित तत्वावरील शाळा टप्प्याटप्प्याने अनुदानावर आणण्याचा जो निर्णय घेण्यात आलेला आहे, त्याची अंमलबजावणी कधी होणार आहे ? मला या ठिकाणी सांगावयाचे आहे की, शासन लबाडीने बोलत आहे. मी ज्या 32 गावांमध्ये शाळा काढल्या त्या जर काढल्या नसत्या तर त्या परिसरातील अनुदानित शाळांमध्ये विद्यार्थी गेले असते आणि तेथे शासनाला शिक्षकांची पदे वाढवून द्यावी लागली असती व त्यायोगे शासनावर आर्थिक भार निश्चित पडला असता. मी सुतारपाडा या डोंगराळ भागामध्ये शाळा काढली नसती तर पोयनाड येथील अनुदानीत शाळेमध्ये विद्यार्थी गेले असते आणि त्या ठिकाणी शिक्षक वाढवावे लागले असते. सन्माननीय मंत्रीमहोदय स्वत: शिक्षक आहेत. मी माननीय राज्यमंत्री महोदयांकडे गेलो तर ते म्हणतात मंत्रीमहोदयांना भेटा, मंत्रीमहोदयांकडे गेलो तर ते म्हणतात मुख्यमंत्री महोदयांना भेटा.

यानंतर श्री.बोरले.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयंत प्र.पाटील .....

सन्माननीय सदस्य श्री.रामनाथ मोते यांनी मांडलेल्या ठरावाला पाठिंबा देतांना शासनाने आश्वासन दिले पाहिजे की, सन 2003 आणि 2004 च्या शाळा आम्ही अनुदानावर आणू. गरीब मुले कायम विनाअनुदानित शाळेमध्ये जातात आणि श्रीमंतांची मुले मोठ मोठया रिलायन्स कंपन्यांच्या शाळांमध्ये जातात. माझी अशी विनंती आहे की, या चर्चेच्या निमित्ताने शासनाकडून ठोस निर्णय आणि ठोस आवश्वासन मिळाले पाहिजे. मी सन्माननीय सदस्य श्री.रामनाथ मोते यांचे जरुर अभिनंदन करतो. "कायम विनाअनुदान" हा शब्द काढून टाकू असे आश्वासन शासनाने डिमांडमध्ये दिलेले आहे. आश्वासन फक्त देण्यासाठी असतात की अंमलबजावणी करण्यासाठी असतात याचा देखील यानिमित्ताने उहापोह झाला पाहिजे, अशी विनंती करतो आणि माझे दोन शब्द संपवितो.

...2/-

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.वसंतराव खोटरे (अमरावती विभाग शिक्षक) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.रामनाथ मोते यांनी जो ठराव मांडलेला आहे त्याला मी पाठिंबा देतो. महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्रातील तळागाळातील गोरगरीबांच्या, दलितांच्या मुलांना शिक्षण मिळावे यासाठी शिक्षण व्यवस्था सुरु केलेली आहे आणि ही शिक्षण व्यवस्था सुरु करतांना अनुदानित तत्वावर शाळा काढल्या गेल्या. जेव्हा अनुदानित तत्वावर शाळा होत्या तेव्हा विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षण मिळत होते. परंतु लोकसंख्या वाढल्यामुळे विनाअनुदान तत्वावरील शाळा सुरु झाल्या. विनाअनुदान तत्वावरील असंख्य शाळांना परवानगी दिली गेली. सन 2000 पासून कायम अनुदान तत्वावर शाळा दिलेल्या आहेत आणि आता अनुदानित, विनाअनुदानित आणि कायम अनुदानित अशा तीन प्रकारच्या शाळा सुरु आहेत. त्यामुळे विद्यार्थ्यांमध्ये असमतोल निर्माण होत आहे. शिक्षकांना विद्यार्थ्यांना समानतेचे धडे शिकवावे लागतात, विद्यार्थ्यांवर चांगल्या प्रकारचे संस्कार करावे लागतात. सभापती महोदय, अनुदान तत्वावरील शाळांमधील विद्यार्थ्यांना पोषण आहार मिळतो आणि विनाअनुदान तत्वावरील शाळेतील मुलांना पोषण आहार मिळत नाही. अनुदान तत्वावरील शाळांना शैक्षणिक सुविधा मिळतात, विनाअनुदान तत्वावरील शाळांना शैक्षणिक सुविधा मिळत नाहीत. यामुळे असंतोष निर्माण झालेला आहे. एका घरातील दोन विद्यार्थी अनुदानित आणि विनाअनुदानित शाळांमध्ये शिक्षण घेत असतील तर एक भाऊ जेवण करतो आणि दुसरा भाऊ उपाशी राहतो. माझे असे म्हणणे आहे की, अनुदानित शाळा असो, विनाअनुदानित शाळा असो किंवा कायम विनाअनुदानित शाळा असो या शाळेतील विद्यार्थ्यांना सर्व शैक्षणिक सुविधा, पोषण आहार आणि इतर ज्या सुविधा असतील त्या मिळाल्या पाहिजेत. आपल्याला माहित आहे की, उद्या 12 तारखेला कायम विनाअनुदानित तत्वावरील शाळेतील शिक्षकांचा भव्य मोर्चा निघणार आहे. माननीय मंत्री महोदय "कायम विनाअनुदानित" हा शब्द काढून त्या शाळांना शंभर टक्के अनुदान देणार आहेत काय ? एवढे बोलून मी माझे दोन शब्द संपवितो.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.चंद्रकांत रघुवंशी (धुळे तथा नंदुरबार स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.रामनाथ मोते यांनी जो ठराव मांडलेला आहे त्याला मी 50 टक्के पाठिंबा देण्यासाठी उभा आहे. कारण एकंदरीत शासनाने ज्यावेळी या जाहिराती काढल्या त्यावेळी कायम विनाअनुदानित असे ठरलेले असतांना जे सन्माननीय सदस्य श्री.जयंत पाटील यांच्या सारखेच "कायम विनाअनुदानित" तत्वावरील शाळा काढून मुलांना चांगले शिक्षण देतात त्यांचा निश्चितपणे विचार झाला पाहिजे. परंतु कायम विनाअनुदानित शाळा मिळतील म्हणून कोणत्याही लोकांनी अर्ज केले आणि ज्यांची लायकी नव्हती त्यांना सुध्दा 10-20 शाळा एकाच वेळी मिळाल्याचे उदाहरण माझ्या नंदुरबार जिल्हयामध्ये आहे. एल.आय.सी.मध्ये कारकून असलेल्या माणसाने अर्ज करावयाचे आणि त्यांना 21 शाळा मिळाल्या. त्या शाळा कोठे चालणार, कशा चालणार याचा देखील आपल्याला विचार करावा लागेल. म्हणून माझी अशी विनंती आहे की, याचा मास्टर प्लॅन तयार करावा आणि ख-या अर्थाने गुणवत्तेने शिक्षण देण्याचे काम आदिवासी भागामध्ये कोणती संस्था करीत असेल तर त्यांनाच विनाअनुदानित करावे, ज्यांनी पोट भरण्यासाठी संस्था काढलेल्या आहेत त्यांना मात्र अनुदानित करणे योग्य होणार नाही, अशी विनंती करुन मी माझे दोन शब्द संपवितो.

....4/-

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

तालिका सभापती : सभागृहाची वेळ 12.30 वाजेपर्यंत होती. मी 12.40 वाजेपर्यंत वेळ वाढवितो. त्यानंतर 1.00 वाजता प्रश्नोत्तरे सुरु होतील.

प्रा.वसंत पुरके (शालेय शिक्षण मंत्री) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.रामनाथ मोते यांनी अतिशय चांगला ठराव मांडलेला आहे. मी सर्वांच्यावतीने त्यांचे अभिनंदन करु इच्छितो. खरे म्हणजे अशासकीय ठराव हे एक महत्वाचे शस्त्र आहे. अशासकीय ठरावाच्या माध्यमातून स्वत:चे यथासांग विचार व्यक्त करुन, साकल्याने विचार व्यक्त करुन सन्माननीय सदस्यांनी मांडलेले विचार सरकारला निश्चितपणे अंतर्मुख करणारे आहेत, हे मी मान्य करतो. अनेक अशासकीय ठराव असे आहेत की, मग ते खालच्या सभागृहातील असतील किंवा विधान परिषदेतील असतील हे ठराव शासकीय ठरावाच्या माध्यमातून आलेले आहेत.

यानंतर श्री.सुंबरे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. पुरके .....

म्हणून या अशासकीय ठरावाच्या निमित्ताने आपण जी चर्चा येथे उपस्थित केली आहे त्याचे मी स्वागत करतो आणि या चर्चेच्या माध्यमातून सन्माननीय सदस्यांनी केलेल्या सूचना तसेच काही आरोप असतील तर त्याबद्दल खुलासा करण्याचा मी प्रयत्न करणार आहे.

सभापती महोदय, राज्यामध्ये आज किती शाळा या अनुदानित आहेत, किती विनाअनुदानित आहेत आणि किती कायम विनाअनुदानित तत्त्वावर आहेत याची आकडेवारी देण्याची गरज आहे असे मला वाटत नाही. तरीही मी आपल्याला सांगू इच्छितो की, राज्यामध्ये जवळपास 17370 माध्यमिक शाळा कार्यरत आहेत त्यापैकी 7712 विनाअनुदान तत्त्वावर असून 13 हजार शाळा या अनुदान तत्त्वावर आहेत आणि केवळ 3163 शाळा या कायम विनाअनुदान तत्त्वावर दिलेल्या आहेत. सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. कपिल पाटील, जयंत पाटील यांनी सांगितले आहे की, त्यांनी जनकल्याणासाठी काही शाळा विनाअनुदान तत्त्वावर चालविल्या आहेत आणि त्या उत्तम तऱ्हेने चालविल्या आहेत. अर्थात त्यांचाही पुढेमागे अनुदानासाठी विचार करण्याची गरज आहे. कारण शेवटी या विनाअनुदान तत्त्वांवरील शाळांना, त्या शाळांतील मुलांना अनुदान तत्त्वावरील आणि एकूणच बाहेर स्पर्धेमध्ये टिकावे लागते. एकीकडे ज्या अनुदानित संस्था-शाळा आहेत त्यांच्या स्पर्धेमध्ये विनाअनुदानित आणि कायम विनाअनुदानित संस्थांच्या शाळा टिकू शकतील काय हाही प्रश्न निर्माण झालेला आहे. खरे तर कोठल्याही प्रकारे भेदभाव करणाऱ्या या शाळा असू नयेत याबद्दल दुमत नाही. पण कायम विनाअनुदानित शाळांच्याबाबतीतील धोरण अगोदर जाहीर केले असूनही काही संस्था अशा कायम विनाअनुदान तत्त्वावर शाळा चालविण्यासाठी पुढे आल्या. त्यासाठी त्यांनी ॲफिडेव्हिटही करून दिलेले आहे. त्यातील काही जुन्या संस्था निश्चितच चांगल्या आहेत, होत्या. परंतु आता अनुदानित संस्था-शाळा आजारी पडायला लागल्या असताना ज्यांना एकही टक्का अनुदान मिळत नाही त्या कशा चांगल्या प्रकारे चालू शकतील तेव्हा त्यांचाही विचार केला पाहिजे हे म्हणणे बरोबर आहे. राज्याच्या 1986 च्या आयोगानुसार किती खर्च यासाठी व्हावा हे आपण लक्षात घेतले पाहिजे. या संदर्भात आपण कोर्टापुढेही लिहून दिले आहे की, जेव्हा राज्याची आर्थिक परिस्थिती सुधारेल तेव्हा कायम अनुदानित संस्थांचाही अनुदानासाठी विचार आम्ही निश्चितपणे करू. विनाअनुदान तत्त्वांवरील शाळांमध्ये क्वालिफाईड स्टाफ, फर्निचर, प्यून, प्रयोगशाळा, ग्रंथालये आणि इतर शैक्षणिक सोयी-

..... आर 2 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. पुरके .....

सुविधा इत्यादी सगळ्या प्रकारच्या गैरसोयी आहेत हे मी मान्य करतो. परंतु ज्या शाळा 100 टक्के अनुदानावर आहेत त्या ठिकाणी देखील 35 वर्षानंतरही सर्व सोयी नाहीत. मी मागील महिन्यातच 21 तारखेला एका शाळेला भेट दिली असता तेथे 35 वर्षानंतरही वर्गामध्ये केवळ पडदे लावले आहेत. त्यामुळे तिसऱ्या वर्गातील मुलांना दुसऱ्या वर्गातील शिकविलेले सारे ऐकू येत होते. सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.माते यांना मी सांगेन की, अशासकीय ठराव वा अन्य कोणताही ठराव हा केवळ अनुदान, पेन्शन, पेमेंट यासाठी येथे येता कामा नये. एक दिवस आपण शाळांतील गुणवत्तेच्या बाबतीत देखील अशासकीय ठराव आणला पाहिजे, तो आपण आणावा आणि त्याबाबत चर्चा करावी. या ठिकाणी डॉ. माशेलकरांचे उदाहरण देऊन सांगितले गेले की, बालपणापासून शिक्षण अनिवार्य करण्याची गरज आहे. पण या शाळांतील एकाला भोजन मिळते तर दुसऱ्याला मिळत नाही ही गोष्ट कोठल्याही प्रकारे आपल्या महाराष्ट्रीयन संस्कृतीमध्ये बसत नाही. म्हणूनच विनाअनुदान तत्त्वावरील बहुश: शाळा आज 100 टक्के अनुदानावर आलेल्या आहेत, टप्प्याटप्प्याने आपण त्या अनुदानावर आणतो आहोत. आता आपण पुरवणी अंदाजपत्रकाची प्रत पाहिली असेल तर आपल्याला समजून येईल की, 638 कोटी रूपयांची तरतूद यासाठी केलेली आहे. त्यामध्ये मग वेतनेतर अनुदानाचा यप्रश्न सुटेल. यातून 2004 पर्यंत अनुदान देण्याची व्यवस्था आपण केलेली आहे. तेव्हा शिक्षणाचा जो मुलभूत हक्क आहे तो देण्याचा आम्ही प्रयत्न करीत आहोत. जेथे एखाद्या संस्थेला अनुदान मिळत नाही, अर्थसहाय्य मिळत नाही तरीही त्या संस्थेचा शैक्षणिक दर्जा निश्चितपणे चांगला असतो. याबाबतीत सांगताना सन्माननीय सदस्य श्री.जयंत पाटील यांनी सांगितले की, त्यांच्या विनाअनुदान तत्त्वावरील शाळांतील पगार त्यांच्या स्वत:च्या पगाराच्याही अगोदर करतात आणि ही निश्चितच मोठी चांगली गोष्ट आहे. सभापती महोदय, माननीय राष्ट्रपतींनी परवाच म्हटले आहे की, " If the political leaders of the nation have vision then the prosperity of the nation is certain."

(यानंतर श्री. सरफरे ..... एस 1 ...

अप्रमाणित प्रत / Uncertified Copy

प्रा. वसंत पुरके...

असे द्रष्टे, जाणते, निष्णात राज्यकर्ते असतील तर निश्चितपणे महाराष्ट्राच्या शिक्षण खात्याला गती मिळाल्याशिवाय राहणार नाही. माझी आपणास नम्र विनंती आहे की, कायम विना अनुदानीत तत्वावरील शिक्षण संस्थांच्या बाबतीत महाराष्ट्रामध्ये मी स्वत: जाणीवपूर्वक लक्ष देऊन याबाबतचा एक मास्टर प्लॅन मी स्वत: तयार करणार आहे. एवढेच नव्हेतर कोर्टाने मान्य केल्याप्रमाणे या राज्यात भविष्यामध्ये 20 ते 25 वर्षामध्ये त्या गावची रिक्वायरमेंट किती असणार आहे? किती वर्गापर्यंत शाळा असणार आहेत? मुलांची शाळा कोणत्या इयत्तेपर्यंत असणार आहे? याकरीता मास्टर प्लॅन केला गेला पाहिजे. कुणीही कितीही मोठा माणूस असला तरी या मास्टर प्लॅनच्या बाहेर शाळा दिली जाऊ नये. आम्ही असाही विचार करीत आहोत की, यानंतर कोणतीही शाळा ही कायम विना अनुदानीत तत्वावर दिली जाऊ नये. ज्या शाळा आहेत त्या व्यवस्थित चालत आहेत किंवा नाहीत? त्यामध्ये मूलभूत आणि संरक्षणात्मक परिस्थिती निर्माण झाली आहे की नाही.? असेलतर क्वॉलिफाईड स्टाफ आहे किंवा नाही? स्टाफ असेल तर तो व्यवस्थित शिकवीत आहे किंवा नाही? शिकवीत असतील तर त्यांचे गुणात्मकदृष्ट्या निकाल चांगले आहेत की नाहीत? याचा सुध्दा आपण दक्ष राहून अतिशय साकल्याने आणि गांभीर्याने विचार केला पाहिजे.

सभापती महोदय, मूल्यांकनाचे निकष सुध्दा अतिशय साधे आणि सोपे आहेत. ज्या शाळेला खऱ्या अथाने अनुदान द्यावयाचे आहे त्या शाळेकडे जागा पाहिजे, इमारत पाहिजे. आपण म्हटले आहे की, झोपडपट्टीमधील शाळांना कोणत्याही प्रकारचे निकष लावू नयेत. काळाची गरज म्हणून त्यांचे बेसिक नीड म्हणून त्यांना परवानगी दिली गेली पाहिजे अशी आपली मागणी आहे. त्याबाबत सुध्दा गांभीर्याने विचार करु. अनेक ठिकाणी लोक मॅनेज करतात. कधी कधी आमचे अधिकारी करीत असतील, शाळेच्या मॅनेजमेंटचे लोक करीत असतील. त्यासाठी सुध्दा वस्तुनिष्ठ पहाणी करणे आवश्यक आहे.म्हणून आम्ही एक निर्णय असा घेतला आहे की, महाराष्ट्रातील या शिक्षण संस्थांवर आपला मॉरल अंकुश असणे आवश्यक आहे. त्याकरीता आमदारांच्या अध्यक्षतेखाली तालुका शिक्षण समिती गठीत केली असून या शिक्षण संस्था चांगल्या चालत असतील तर त्यांना ॲप्रिसिएशन दिले पाहिजे. ज्या संस्था चांगल्या चालत नसतील तर त्यांच्यावर कारवाई केली पाहिजे. म्हणून मूल्यांकनाचे निकष कालपरत्वे शिथिल करावे किंवा कसे अशी आपली सूचना आहे त्याबाबत गांभीर्याने विचार करु. सभापती महोदय, या शाळांचा बृहत आराखडा गरजेनुसार तयार केल्यानंतर टप्प्या-टप्प्याने अनुदान देण्याची प्रक्रिया एक-दोन वर्षामध्ये पूर्ण होईल. आणि या

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. वसंत पुरके...

संस्थांना कुणाही पुढे अनुदानासाठी भीक मागण्याची गरज पडणार नाही. परंतु 35 वर्षे झाल्यानंतर देखील आत्ताच्या आत्ता ही संस्था बंद केली पाहिजे, अशाप्रकारच्या अनेक संस्था असतांना सुध्दा आमच्या अधिकाऱ्यांकडून त्यांना वेतनेतर अनुदान कसे दिले गेले ? हा सुध्दा एक प्रश्न आहे. म्हणून याची एक कॅटेगरी तयार करणे गरजेचे आहे. ज्या संस्थेकडे जागा देखील नाहीत अशा संस्थांचे प्रस्ताव आमच्या अधिकाऱ्यांनी पॉझिटीव्ह करुन पाठविले आहेत. तेव्हा कुणालाही पाठीशी घालण्याचे कारण नाही. या राज्यातील प्रत्येक पालकाला आपल्या पाल्याच्या भवितव्याचे सुंदर स्वप्न पहाण्याचा अधिकार आहे. एवढेच नव्हेतर आम्ही अनुदानीत शाळांबाबत सुध्दा विचार केला आहे. राज्यात 5000 प्राथमिक खाजगी अनुदानीत शाळा आहेत. प्रश्न असा आहे की, माध्यमिक शाळा गेल्या दीड दोन वर्षामध्ये जशा नॉन ग्रँट बेसिसवर मिळाल्या, त्या शाळांना अनुदान दिले गेले पाहिजे. त्यांना अनुदान प्राप्त करुन द्यावे. जेणेकरुन कोणत्याही माणसाला भेदाभेदाला बळी पडता कामा नये अशी आपली रास्त भावना आहे, ही मला मान्य आहे. मी एवढेच सांगतो की, हे खाते शिक्षण खाते म्हणूनच रहावे. फक्त पेमेंट, प्रमोशन, पेन्शन, नॉन सॅलरी ग्रँट एवढया पुरते मर्यादीत रहाता कामा नये. म्हणून यानंतर कुणालाही परमनंट नॉन ग्रँटची शाळा काढावयास सक्ती नाही....

श्री. वसंतराव खोटरे : सभापती महोदय, मला प्रश्न विचारावयाचा आहे.

तालिका सभापती (श्री. विनोद तावडे) : माननीय सदस्यांनी पुन्हा वेगळया मार्गाने अडीच तासाची चर्चा उपस्थित करावी. आता माननीय मंत्रिमहोदयांना त्यांचे उत्तर पूर्ण करु द्यावे.

प्रा. वसंत पुरके : सभापती महोदय, या परमनंट नॉन ग्रँटच्या शाळेमध्ये कुणीही आपल्या पाल्याला टाकावे अशी बिलकुल सक्ती नाही. परंतु हेच लोक मोठमोठी प्रलोभने दाखवून आपल्या मुलांना आणतात. त्याचवेळी 100 टक्के प्राप्त अनुदान असलेल्या संस्थांनी याची दखल कां घेऊ नये? आपल्या शाळेतील मुले दुसऱ्या शाळेत चालली याचा अर्थ आपले दुकान कुठेतरी सबस्टँडर्ड होऊ लागले आहे. माननीय सदस्य श्री. अैनापूरे यांच्या शाळेतील एकही मुलगा बाहेर जात नाही. त्यांच्या शाळेतील 20-22 मुले मेरीटमध्ये येतात. त्यांचा शिक्षक पहाटे चार वाजता मुलांचे दार ठोठावतो. आणि मुलांना अभ्यास करावयास सांगतो. डिव्होशन आणि डेडिकेशनची प्रवृत्ती समाजामध्ये निर्माण झाली तर निश्चितपणे कुणालाही भेदाभेदाला बळी पडता येणार नाही.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. वसंत पुरके...

अशाप्रकारचा बृहत् आराखडा आम्ही तयार करु, आणि गुणवत्ताप्राप्त शिक्षक महाराष्ट्रामध्ये मिळतील याची मी देखील दखल घेणार आहे. माननीय सदस्य श्री. मोते साहेब आपण आतापर्यंत बघितले आहे. आपल्या एका सुध्दा शाळेच्या तुकडीची ग्रँट आम्ही प्रलंबित ठेवलेली नाही. जेव्हा या विषयावर चर्चा होईल तेव्हा आम्ही बोलू. परंतु माझी याबाबत खात्री व आत्मविश्वास आहे की, शिक्षण हे मूलभूत गरज आहे, बेसिक नीड आहे म्हणून त्याला प्राधान्य देणे हे शासनाचे कर्तव्य आहे. शासन याचा निश्चितपणे गांभीर्याने विचार करील अशी मी सभागृहाला ग्वाही देतो. आणि माननीय सदस्यांना विनंती आहे की, त्यानी आणलेला ठराव अतिशय चांगला आहे.

(यानंतर श्री. किल्लेदार)

अधिकृत मत / प्रतिक्रियासाठी नाही

(सभापतीस्थानी माननीय उपसभापती)

प्रा.वसंत पुरके (पुढे सुरू..

एक दिवस हा शासकीय ठराव व्हावा, ही सुध्दा आंतरिक इच्छा आहे. त्याबाबत गांभीर्याने विचार करण्याचे शासनाने ठरविलेले आहे. परंतु आता आर्थिक परिस्थिती बरोबर नाही, तोपर्यन्त आपण याबाबत निश्चित सहकार्य करावे. वित्तीय परिस्थिती सुधारल्यानंतर आपण ग्रँट रिलीज करणार आहोत. माझी विनंती आहे की सन्माननीय सदस्यांनी त्यांचा हा ठराव मागे घ्यावा.

श्री.रामनाथ मोते : सभापती महोदय, मी दोन-तीन मुद्दे उपस्थित केले. फीच्या स्ट्रक्चरच्या संदर्भात मी उल्लेख केलेला आहे. 3 रुपये, 4 रुपये फी ही गेली चाळीस वर्षापासून आहे त्यामध्ये बदल केलेला नाही, याबाबत विचार करावा. शाळांना टप्प्याटप्प्याने अनुदान देतो. महाराष्ट्रातील अनेक शाळांच्या तुकड्या अनुदानास पात्र असूनही शासकीय अधिकाऱ्यांनी त्यांना अनुदानापासून वंचित ठेवलेले आहे. त्यांना 40 टक्के, 60 टक्के 100 टक्केही अनुदान मिळाले असते. मराठवाड्यातील 305 तुकड्या अनुदानास पात्र होत्या, तरी देखील त्यांचे प्रस्ताव आपल्याकडे पाठविलेले नाहीत, त्यामुळे त्या तुकड्या अनुदानापासून वंचित राहिलेल्या आहेत. याबाबत संबंधितांवर कोणती कारवाई करणार आहात ? विना अनुदान शाळांच्याबाबतीत मधल्यावेळी मुलांना जेवणाची सोय करू असे सभागृहामध्ये आश्वासन दिलेले होते, त्याबाबत कोणती भूमिका घेतलेली आहे ?

श्री.वसंतराव खोटरे : ज्या ठिकाणी श्रीमंत शाळा आहेत, त्या ठिकाणची मुले पोषण आहार खात नाहीत, तो कमी करून इतर शाळांमध्ये तो पोषण आहार दिला जाणार आहे काय ?

प्रा.वसंत पुरके : फीच्या स्ट्रक्चरच्या संबंधाने आठ-दहा सन्माननीय सदस्यांशी चर्चा करणे गरजेचे आहे. तशी चर्चा केली जाईल. आपल्याकडे दरवर्षी अनुदानाचे प्रस्ताव येत असतात. सन्माननीय सदस्यांनी सांगितल्याप्रमाणे अनुदानास पात्र असूनही अधिकाऱ्यांची त्याबाबतचे प्रस्ताव पाठविले नसतील तर त्याची दखल घेतली जाईल. सन्माननीय सदस्यांनी विना अनुदानित शाळांमधील मुलांना मधल्या वेळी पोषण आहार दिला पाहिजे,तसे ज्याना आवश्यकता नाही त्यांचा पोषण आहार कमी करण्याबाबतचा मुद्दा मांडला. ज्या विभागातील शाळांमध्ये भोजनाची आवश्यकता नसेल तर त्याबाबत कोर्टाच्या निदर्शनास ही बात निदर्शनास आणून देऊन कोर्टाच्या निदेशाप्रमाणे आपण कार्यवाही करू.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ SBT/ KTG/

श्री.रामनाथ मोते : या ठिकाणी विना अनुदानित शाळांच्या संबंधाने प्रस्ताव माडला. सन्माननीय शिक्षणमंत्र्यांनी त्या संदर्भात उत्तर दिलेले आहे. अजूनही आम्हाला अपेक्षा आहे, विश्वास आहे की, सन्माननी श्री. पुरके साहेब याबाबत निश्चित लक्ष घालतील. तसे त्यांनी आश्वासन दिलेले आहे त्याप्रमाणे काहीतरी होईल अशी अपेक्षा व्यक्त करतो आणि माझा अशासकीय ठराव मागे घेण्यास सभागृहाची अनुमती मागतो.

सभागृहाच्या अनुमतीने ठराव मागे घेण्यात आला.

उपसभापती : सभागृहाची बैठक आता स्थगित होत आहे. नियमित बैठक दुपारी 1-00 वाजता भरेल.

(सभागृहाची बैठक दुपारी 12-38 ते 1-00 वाजेपर्यन्त स्थगित झाली.)

यानंतर श्री.बरवड...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(स्थगितीनंतर)

(सभापतीस्थानी माननीय सभापती)

नियम 289 बाबत

श्री. पांडुरंग फुंडकर (विरोधी पक्ष नेता) : सभापती महोदय, मी आज आपल्याकडे नियम 289 अन्वये नोटीस दिलेली आहे. या अधिवेशनाचा मागचा आठवडा खैरलांजी प्रकरण आणि शेतकऱ्यांच्या आत्महत्येवरील चर्चेमध्ये गेला. मागच्या आठवड्यामध्ये या सभागृहामध्ये शेतकऱ्यांच आत्महत्त्यांच्या संदर्भात चर्चा झाली आणि दुर्देवाने या आठवड्याच्या पहिल्या दिवशी ही नोटीस द्यावी लागली आहे. आमही स्वत:ला शेतकऱ्यांचे प्रतिनिधी म्हणवतो. आमच्या दुर्दैवाने आज हत्त्येसंबंधीचा प्रश्न उपस्थित करावा लागत आहे. मागच्या आठवड्याच्या शेवटच्या दिवशी म्हणजे 8 तारखेला यवतमाळ जिल्ह्यातील वणी येथील कापूस संकलन केंद्रावर कृषी उत्पन्न बाजार समितीच्या आवारामध्ये जवळपास 1500 गाड्यांची आवक झालेली होती. त्या ठिकाणी कापूस खरेदी केंद्र, जिनिंग-प्रेसिंग 6 असताना तीनच जिनिंगमध्ये कापूस खरेदी सुरु होती. रोज 400 ते 500 गाड्यांचे मोजमाप व्हावयास पाहिजे परंतु त्या ठिकाणी फक्त गाड्याच फेडरेशनच्या माध्यमातून सोडल्या गेल्या. सी.सी.आय. च्या अधिकाऱ्यांनी त्या ठिकाणी खरेदी करण्यास नकार दिला. आठ आठ दिवस केंद्रावर गाड्या उभ्या असल्याने शेतकऱ्यांच्या बैलांसाठी चारा नव्हता, पाणी नव्हते. शेतकरी थंडीने कुडकुडत होते. त्यावेळी शेतकऱ्यांनी आग्रह धरला की, आमच्या गाड्यांचे मोजमाप झाले पाहिजे.त्या ठिकाणी सी.सी.आय.चे जे कर्मचारी होते ते त्या स्पॉटवरुन निघून गेले. फेडरेशनच्या अधिकाऱ्यांनी सांगितले की, आमच्याकडे माल ठेवण्यास जागा नाही त्यामुळे त्यांनी त्या ठिकाणी टोकन देणे बंद कले. ते शेतकऱ्यांना वाऱ्यावर सोडून कृषी उत्पन्न बाजार समितीच्या कार्यालयातून निघून गेले. आठ आठ दिवस उभ्या असलेल्या शेतकऱ्यांमध्ये संतापाची लाट निर्माण झाली त्यांनी कृषी उत्पन्न बाजार समितीच्या आवाराच्या आजूबाजूला गर्दी केली. त्यांनी आमच्या कापसाची खरदी करावी अशी मागणी करण्यास सुरुवात केली. त्यांच्याशी कोणत्याही प्रकारची चर्चा न करता, पणन महासंघाच्या अधिकाऱ्यांनी आणि सी.सी.आय.च्या अधिकाऱ्यांनी ताबडतोब

..2...

श्री. पांडुरंग फुंडकर .....

पोलिसांना फोन केला. पोलीस त्या ठिकाणी आले आणि कोणतीही विचारपूस न करता, लाठीचार्ज न करता, अश्रुधुराच्या नळकांड्या न फोडता गोळीबार करण्यास सुरुवात केली. त्या गोळीबारामध्ये तीन चार लोक जखमी झाले. गोळीबार करुन त्या ठिकाणचे वातावरण पांगविण्याचा प्रयत्न झाला. त्यामुळे वणी शहरातील वातावरण बिघडले. पुन्हा 4.00 वाजता त्या जिल्ह्याचे एस.पी. श्री. अब्दुल रहमान हे त्या ठिकाणी गेले आणि कृषी उत्पन्न बाजार समितीच्या आवारामध्ये जाताबरोबर त्यांनी त्या ठिकाणी गोळीबाराचे आदेश दिले. दुर्दैवाची गोष्ट अशी की, त्या पोलिसांजवळ ज्या कार्बन होत्या, ज्या कार्बनमधून अतिरेक्यांवर धुआधार गोळीबार केला जातो, ज्या कार्बनमधून सीमेवर गोळीबार केला जातो त्या कार्बनमधून शेतकऱ्यांच्या जमावावर धुआधार गोळीबार करण्यात आला. गोळीबार करताना सुध्दा आधी कमरेच्या खाली गोळीबार केला जातो परंतु त्या ठिकाणी शेतकऱ्याच्या पोटातून आरपार गोळी निघून गेली. बैलगाडीवर बसलेल्या शेतकऱ्यावर पोलिसांनी गोळ्या झाडल्या. अशा पध्दतीने जो अन्नदाता शेतकरी आपला माल विकावयास आला त्या शेतकऱ्याचा मुडदा या शासनाने त्या ठिकाणी पाडला. त्यामुळे दोन दिवस वणीमध्ये कर्फ्यू लागलेला असल्यामुळे वणीतील जनजीवन उद्ध्वस्त झालेले आहे. तालुक्यातील बाहेरगावच्या ठिकाणाहून वणी येथे बैलगाड्या आल्या होत्या. वणी शहरातील लोकांचा दोष नसताना त्या ठिकाणी कर्फ्यू लावून त्या ठिकाणी पूर्णत: दहशत माजविण्याचा प्रयत्न झाला. मी आणि सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते आम्ही काल वणी येथे गेलो. त्या ठिकाणाहून परतत असताना आम्हाला रस्त्यामध्ये अशी बातमी समजली की, वाढोणा या गावामध्ये रात्री लोडशेडिंग करण्यात आले. नियमित जे लोडशेडिंग होते त्याच्या व्यतिरिक्त हे जास्तीचे लोडशेडिंग करण्यात आले. त्यामुळे त्या ठिकाणी रास्तारोको आंदोलन झाले. या दडपशाहीची सुरुवात नागपूर पासून झाली.

यानंतर श्री. शिगम...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. पांडुरंग फुंडकर...)

प्रथम दलितांना मोर्चा काढू दिला नाही. राज्यामध्ये आणि विशेषत: विदर्भामध्ये आणीबाणी सदृश्य परिस्थिती निर्माण करण्यात आली. गेले 8 दिवस नागपूर शहर हे दहशतीच्या वातावरणाखाली होते. ही दहशत कशी असते हे वणी येथे गोळीबार करुन पोलिसांनी दाखवून दिलेले आहे. लोड-शेडिंगच्या बाबतीत शेतक-यांनी रास्तारोको आंदोलन केले, शेतक-यांवर लाठीचार्ज करण्यात आला. दोन शेतक-यांचे मृत्यू झाले.

सभापती : सन्माननीय विरोधी पक्षनेते श्री. पांडुरंग फुंडकर यांना मी सांगू इच्छितो की, जेव्हा या विषयाच्या अनुषंगाने चर्चा होईल त्यावेळी आपणाला सविस्तरपणे बोलता येईल. आता हा विषय नियम 289 अन्वये घेणे कसे महत्वाचे आहे ते आपण सांगावे.

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, या विषयाला किती तातडी आहे हेच मी सांगण्याचा प्रयत्न करतोय. पोलिसांनी लाठीचार्ज सुरु केल्यानंतर पोलिसांच्या धाकाने विलास इंदोवार या 38 वर्षाच्या तरुणाचा विहिरीत पडून मृत्यू झाला. इतकी ही दडपशाही चाललेली आहे. विदर्भाच्या मातीमध्ये हे अधिवेशन सुरु असताना शेतक-यांचे मुडदे पाडण्याचे काम होत आहे. म्हणून या विषयी तातडीने चर्चा करण्यासाठी मी नोटीस दिलेली आहे. माझी आग्रहाची मागणी आहे की, सभागृहाचे सर्व कामकाज बाजूला ठेवून शेतक-यांची हत्या करणा-या आणि शेतक-यांना आत्महत्या करायला लावणा-या या सरकारासंबंधी सभागृहामध्ये तातडीने चर्चा करावी.

श्री. मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, सन्माननीय विरोधी पक्षनेते श्री. पांडुरंग फुंडकर यांनी वणीमध्ये झालेला गोळीबार आणि परिणामी एका शेतक-याचा झालेला मृत्यू आणि तेथील एकूणच परिस्थिती यासंबंधी वर्णन केले. या विदर्भामध्ये अधिवेशन भरविण्याची काही कारणे आहेत. विदर्भातील लोकांना न्याय मिळावा, येथील लोकांना सर्व सवलती मिळाव्यात, त्यांच्या समस्या दूर व्हाव्यात हा उदात्त हेतू त्यामागे आहे. हे प्रश्न सोडविण्याचे काम बाजूलाच राहिले. मुडदे पाडण्याचे काम हे सरकार करीत आहे हे निषेधार्ह आहे. सभापती महोदय,पोलिसांनी कार्बाइनमधून गोळीबार करुन एकाचा बळी घेतला. या प्रस्तावाला तातडी आहे, गांभीर्य आहे. ही घटना विदर्भामध्ये घडलेली आहे, म्हणून आपणाला एवढीच विनंती आहे की, आपण हा प्रस्ताव स्वीकारावा आणि आजचे सभागृहापुढील कामकाज बाजूला ठेवून या प्रस्तावावर चर्चा घ्यावी.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जयंत प्र. पाटील : सभापती महोदय, वणीमध्ये शेतक-यांवर गोळीबार झालेला आहे. गोळीबाराचे नियम आहेत. पोलिसांनी केलेल्या गोळीबारामध्ये त्या तरुणाच्या छातीला गोळी लागून तो मृत्यूमुखी पडला. तसेच गोळीबारामध्ये एस.टी.मधील प्रवासी देखील जखमी झालेले आहेत. म्हणजे गृह खात्याचा अधिका-यांवर कंट्रोल नाही असे दिसते. राज्यामध्ये भयावह परिस्थिती निर्माण झालेली आहे. विदर्भात्ील शेतक-यांच्या असंतोषाने परिसीमा गाठलेली आहे. केन्द्र शासनाच्या हमी भावाने शेतक-यांचा कापूस शासन घेत आहे. त्यामध्ये राज्य शासनाचे काहीही योगदान नाही. शेतक-यांनी कापूस संकलन केन्द्रावर आणलेला कापूस खरेदी करण्यामध्ये कोणती अडचण आहे? या विषयाला अतिशय तातडी आहे. म्हणून सभागृहापुढील आजचे सर्व कामकाज बाजूला ठेवून या महत्वाच्या प्रश्नावर चर्चा घडवून आणावी अशी माझी मागणी आहे.

श्री. गुरुनाथ कुलकर्णी : सभापती महोदय, सन्माननीय विरोधी पक्षनेते श्री. पांडुरंग फुंडकर यांनी नियम 289 अन्वये एका महत्वाच्या प्रश्नासंबंधी नोटीस दिलेली आहे. सभागृहाचे कामकाज बाजूला ठेवून महत्वाच्या विषयावर चर्चा व्हावी अशी जी त्यांना सूचना केलेली आहे तिला आमची देखील संमती आहे. 8 तारखेला वणी येथे दुर्दैवी घटना घडली. एका शेतक-याचा त्याठिकाणी मृत्यू झाला. अत्यंत खेदजनक अशी ही घटना आहे. सत्ताधारी पक्षाचे सर्व सन्माननीय सदस्य या प्रश्नावर तेवढेच गंभीर आहेत. तेव्हा या विषयावर नियम 289 अन्वये चर्चा सुरु केली तर सत्ताधारी पक्षाची देखील त्यास सहमती राहील.

...नंतर श्री. भोगले...

अप्रधारित प्रत / परिषदेपुरती नाही

श्री.छगन भुजबळ (सार्वजनिक बांधकाम मंत्री) : सभापती महोदय, हा विषय गंभीर आहे हे शासनाने कबूल केलेले आहे. विशेषत: विधानसभेत सभा तहकूब करण्यास परवानगी दिलेली आहे. त्याचबरोबर प्रश्नोत्तराचा तास आणि कागदपत्रे सभागृहासमोर सादर केल्यानंतर सभा तहकूब करुन चर्चा घ्यावी असे निर्देश माननीय अध्यक्षांनी दिलेले आहेत. विधानपरिषदेत काय करायचे हे आपण ठरवावे. या सभागृहामध्ये सभा तहकुबीचा प्रस्ताव मांडता येत नाही. परंतु चर्चा करायला हरकत नाही. चर्चा केव्हा घ्यायची हे आपण ठरवावे.

सभापती : माझ्याकडे नियम 289 अन्वये तीन प्रस्ताव आलेले आहेत. सर्वश्री पांडुरंग फुंडकर, मधुकर सरपोतदार, नितीन गडकरी, दिवाकर रावते, मधुकर चव्हाण, डॉ.दीपक सावंत यांची "यवतमाळ जिल्हयातील वणी येथे पोलिसांनी शेतकऱ्यांवर केलेला गोळीबार" या विषयावरील नियम 289 अन्वये दिलेली सूचना मला सकाळी 8.30 वाजता प्राप्त झाली. सर्वश्री जयंत पाटील, प्रा. शरद पाटील, कपिल पाटील यांची याच विषयावरील नियम 289 अन्वये दिलेली सूचना सकाळी 8.31 वाजता प्राप्त झाली. डॉ.नीलम गोऱ्हे, श्री.गोपीकिसन बाजोरिया यांची याच विषयावरील नियम 289 अन्वये दिलेली सूचना सकाळी 9.41 वाजता प्राप्त झाली. त्याच पध्दतीने मला नियम 289 अन्वये सदनाचे आजचे कामकाज तहकूब करुन नियम 93 अन्वये दिलेली सूचना स्वीकारावी असे तीन प्रस्ताव प्राप्त झालेले आहेत. पहिला प्रस्ताव सर्वश्री नितीन गडकरी, पांडुरंग फुंडकर, विनोद तावडे, केशवराव मानकर यांनी दिलेला आहे. दुसरा नियम 93 अन्वये सर्वश्री नितीन गडकरी, पांडुरंग फुंडकर, जगदीश गुप्ता, पाशा पटेल, गुरुमुख जगवानी, मधुकर चव्हाण, सागर मेघे, संजय केळकर, रामनाथ मोते, प्रतापराव सोनावणे यांचा दुसरा प्रस्ताव सकाळी 8.55 वाजता प्राप्त झाला आहे. तिसरा प्रस्ताव डॉ.नीलम गोऱ्हे, सर्वश्री गोपीकिशन बाजोरिया, सुरेश जेथलिया, परशुराम उपरकर याचा सकाळी 9.25 वाजता प्राप्त झाला आहे.

दिनांक 8 डिसेंबर, 2006 रोजी वणी, जि.यवतमाळ याठिकाणी घडलेली घटना ही अत्यंत गंभीर घटना आहे. दुर्दैवाने या घटनेमध्ये एका शेतकऱ्याचा गोळीबारामध्ये मृत्यू झालेला आहे. ही घटना नुकतीच घडलेली घटना आहे. नियम 289 च्या अनुषंगाने असणारी जी तरतूद आहे ती विचारात घेता आजच्या कामकाजामध्ये किंवा कामकाजपत्रिकेमध्ये हा विषय अंतर्भूत नसल्यामुळे नियम 289 अन्वये दिलेली सूचना मी तांत्रिकरित्या स्वीकारु शकणार नाही. मात्र ही घटना तातडीची आहे, गंभीर आहे आणि नुकतीच घडलेली आहे. ज्यामुळे एका शेतकऱ्याचा मृत्यू

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सभापती.....

झालेला आहे. त्या अनुषंगाने नियम 93 अन्वये जो प्रस्ताव दिलेला आहे तो प्रस्ताव मी स्वीकारायचे अपेक्षित केलेले आहे. हा प्रस्ताव स्वीकारीत असताना आजच्या कामकाजपत्रिकेमध्ये पुरवणी मागण्यांचा सुध्दा अंतर्भाव आहे हे मी सभागृहाच्या निदर्शनास आणू इच्छितो. नियम 230(2) मध्ये असणारी तरतूद अशी आहे की, पुरवणी मागण्या ज्या दिवशी सभागृहात चर्चेला येतात त्यावेळी अन्य कोणतेही प्रस्ताव सभागृहाच्या कामकाजामध्ये स्वीकारण्याचे संकेत नाहीत. एक अपवाद म्हणून नियम 93 अंतर्गत मी चर्चा स्वीकारायचे ठरविले आहे. त्याचबरोबर ही चर्चा झाल्यानंतर आजच्या कामकाजपत्रिकेमध्ये असणाऱ्या पुरवणी मागण्या आणि विधेयके चर्चेला घेण्याचे मी ठरविले आहे. आजच्या नियम 93 अन्वये घेण्यात येणाऱ्या चर्चेला सुरुवात करण्यापूर्वी राज्यातील अनेक प्रश्नांच्या अनुषंगाने.....

(नंतर श्री.जुन्नरे...

अधिकृत मत / प्रसिद्धीसाठी नाही

सभापती .....

प्रश्नोत्तराच्या तासाचे महत्वाचे स्थान आहे. प्रश्नोत्तराच्या माध्यमातून अनेक महत्वाचे प्रश्न सुटत असतात. म्हणून आजची चर्चा ही नियम 93 अन्वये स्वीकारण्यात आलेली आहे. नियम 289 हा अपवाद म्हणून स्वीकारण्याचे ठरविण्यात आलेले आहे. आजचा प्रश्नोत्तराचा तास झाल्यानंतर लगेच नियम 93 अन्वयेच्या चर्चेला सुरुवात करण्यात येईल. या चर्चेला दोन तासापर्यंतचा मर्यादीत वेळ ठेवण्यात आलेला आहे. या चर्चेनंतर सदनासमोरील पुरवणी मागण्या व विधेयकावर चर्चेला सुरुवात करण्यात येईल. आज लक्षवेधी तसेच अन्य कामकाज होणार नाही. शासकीय कामकाज असल्यामुळे पुरवणी मागण्या चर्चेला घेण्यात येतील. त्यानंतर शासकीय कामकाज पूर्ण करण्यात येईल. आता प्रश्नोत्तराच्या तासाला सुरुवात करण्यात येत आहे.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, मी पॉईंट ऑफ प्रोसिजरच्या मुद्याद्वारे माझे विचार मांडण्यासाठी उभा आहे. वणी येथे शेतक-यांवर झालेल्या गोळीबाराच्या संदर्भातील चर्चा घेण्यास मान्यता दिल्याबद्दल मी आपले आभार मानतो, धन्यवाद देतो. नागपूर येथे हिवाळी अधिवेशन चालू असतांना ही घटना घडलेली आहे. शेतक-यांवर गोळीबार झालेल्या संवेदनशील विषयावर चर्चा होऊ शकते हे अधिका-यांना माहिती होते. असे असतांना "खास बाब म्हणून ही चर्चा स्वीकारण्यात येत आहे" असे आपल्याला सांगावे लागलेले आहे. शेतक-यावर झालेल्या गोळीबाराच्या संदर्भातील चर्चा आजच्या कामकाजामध्ये दाखविण्यात आलेली नाही. काल शुक्रवारी माननीय पणनमंत्री सभागृहात कापसाच्या संदर्भात विचार मांडत असतांना त्याचवेळेस वणी येथे शेतक-यावर गोळीबार झालेला आहे. आज आपण प्रश्नोत्तराच्या तासानंतर या चर्चेला सुरुवात करणार आहोत व त्यानंतर पुरवणी मागण्यांवर चर्चा केली जाणार आहे असे आपण निदेश दिलेले आहेत. आम्ही आपल्या सूचनेचा नेहमीच आदर ठेवीत आलेलो आहेत. त्यामुळे पुरवणी मागण्यावरील चर्चा आज न ठेवता मंगळवार दिनांक 12 डिसेंबर,2006 रोजी घेतली असती तर पुरवणी मागण्यांना न्याय मिळाला असता एवढेच मला या निमित्ताने सांगावयाचे आहे.

सभापती : दिनांक 7 डिसेंबर, 2006 रोजी झालेल्या कामकाज सल्लागार समितीच्या बैठकीनुसार आज 11 डिसेंबर, 2006 रोजी पुरवणी मागण्यावरील चर्चा ठेवण्यात आलेली आहे. असे असले तरी सभागृहापुढील आजचे कामकाज बदलावयाचे असेल तर कामकाज सल्लागार

....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सभापती .....

समिती या संदर्भात निर्णय घेऊ शकते किंवा सभागृहाच्या दोन्ही बाजूने यासंदर्भातील कामकाज बदलवू शकते. त्यानुसार आता प्रश्नोत्तराच्या तासानंतर या चर्चेला सुरुवात करण्यात येईल.

श्री. पांडुरंग फुंडकर : माननीय सभापती महोदय, खरे म्हणजे गोळीबाराच्या गंभीर घटनेच्या संदर्भातील चर्चेला सुरुवात प्रश्नोत्तराचा तास न घेता सुरुवात व्हावयास पाहिजे होती. परंतु तरी सुध्दा प्रश्नोत्तराच्या तास झाल्यानंतर कुठल्याही प्रकारचे कामकाज न घेता, कागदपत्रे सभागृहासमोर सादर न करता या चर्चेला सुरुवात करावी अशी माझी विनंती आहे.

सभापती :प्रश्नोत्तराचा तास झाल्यानंतर कागदपत्रे सभागृहासमोर सादर न करता चर्चेला सुरुवात करण्यात येईल. नियम 93 च्या चर्चेनंतर कागदपत्रे सभागृहासमोर ठेवण्यात येतील व त्यानंतर पुरवणी मागण्या व शासकीय विधेयके चर्चेला घेण्यात येतील. आता प्रश्नोत्तराच्या कामकाजाला सुरुवात करण्यात येत आहे.

....3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पुणे शहरापासून 30 ते 35 किलोमीटर अंतरावर उभारण्यात येत असलेल्या सायलेंट व्हॅली आणि रिव्हरडेल या फार्म हाऊस प्रकल्पात गुंतवणूक केलेल्या हॅपी होम लँड स्केप डेव्हलपमेंट कंपनीने केलेली फसवणूक

(1) * 20480 श्री. सुधाकर गणगणे , श्री. संजय दत्त , श्रीमती सुधा जोशी , श्री.राजन तेली : सन्माननीय उप मुख्य मंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) पुणे शहरापासून 30 ते 35 किलोमीटर अंतरावर उभारण्यात येत असलेल्या सायलेंट व्हॅली आणि रिव्हरडेल या फार्म हाऊस प्रकल्पात गुंतवणूक करणाऱ्या दोन हजाराहून अधिक ग्राहकांची हॅपी होम लँड स्केप डेव्हलपमेंट या कंपनीने कोट्यावधी रुपयांची फसवणूक केल्याचे माहे जुलै, 2006 रोजी वा त्या दरम्यान आढळून आले आहे, हे खरे आहे काय,

(2) असल्यास, ग्राहकांनी या प्रकरणी पुणे येथील सहआयुक्त यांचेकडे दिनांक 21 जुलै, 2006 रोजी निवेदन दिले आहे, हे ही खरे आहे काय,

(3) असल्यास, या प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय,

(4) असल्यास, या प्रकरणातील दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(5) अद्याप कोणतीच कारवाई केली नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत?

श्री.सिध्दाराम म्हेत्रे, श्री.आर.आर.पाटील यांच्याकरिता: (1) प्रस्तुत प्रकरणी पोलीस आयुक्त व पोलीस अधिक्षक यांच्या कार्यक्षेत्रात घटना घडली नाही व त्याबाबत गुन्हा दाखल नाही.

(2),(3),(4) व (5) प्रश्न उद्भवत नाही.

श्री. सिध्दाराम म्हेत्रे : सभापती महोदय, मी आापल्या परवानगीने उत्तरामध्ये सुधारणा करु इच्छितो. "अशा फसवणूकीबाबात दि. 9.12.2006 रोजी चतु:श्रृंगी पोलीस स्टेशन येथे गुन्हा रजिस्टर नंबर 546/06 भादंवि कलम 406,420,34 प्रमाणे गुन्हा दाखल केला असून तपास सुरु आहे असे वाचावे."

श्री. संजय दत्त : सभापती महोदय, अजूनपर्यंत आम्हाला सुधारित उत्तर मिळालेले नाही. अद्यापपावेतो पिजनहोलमध्ये सुध्दा सुधारित उत्तर आलेले नाही. सुधारित उत्तर सदस्यांना मिळणे हा आमचा अधिकार आहे. या ठिकाणी माननीय मंत्रीमहोदयांनी माहिती दिली आहे की, 9 तारखेला गुन्हा दाखल झालेला आहे.

यानंतर श्री. अजित.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.20480.....

श्री.संजय दत्त.....

त्या अगोदर तक्रार दाखल करण्याचा रेकॉर्ड माझ्याकडे आहे. तेव्हा या संदर्भात तक्रार नोंदविण्यास दिरंगाई का झाली ?

श्री. सिध्दाराम म्हेत्रे : सभापती महोदय, श्री.सनपुरा यांनी तक्रारअर्ज दिला होता. पोलीस स्टेशनचे पी.आ.यांनी त्यांना बोलावून त्यांच्यात समेट घडवून आणला होता. त्यांना फ्लॅट बांधून द्यावा किंवा त्यांचे पैसे परत करावेत असा समेट घडवून आणण्यात आला होता. म्हणून तक्रार नोंदविण्यास दिरंगाई झालेली आहे.

श्री.मधुकर चव्हाण : सभापती महोदय, नंतर गुन्हा दाखल करण्यात आला याचा अर्थ गुन्हा झालेला आहे. ज्यांच्यावर गुन्हा दाखल झालेला आहे ते सध्या पोलीस कस्टडीत आहेत की जामिनावर सुटलेले आहेत ? त्यांची नावे काय आहेत ? त्यांच्यावर किती रकमेचा गुन्हा नोंदविण्यात आलेला आहे ?

श्री.सिध्दाराम म्हेत्रे : सभापती महोदय, हॅपी होमचे माजी मॅनेजिंग डारेक्टर श्री.मनोहर रेड्डी,राहणार बंगलोर, सध्याचे मॅनेजिंग डारेक्टर श्री.प्रेमचंद्र, एंजट श्री.लक्ष्मीकांत, यांच्यावर 9 तारखेला गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे आणि त्याबाबत तपास सुरु आहे.

श्री.मधुकर चव्हाण : सभापती महोदय, कोट्यावधी रुपयांची फसवणूक केल्याचा उल्लेख प्रश्नामध्ये आहे. त्याबाबत मंत्रिमहोदय आम्हाला मार्गदर्शन करणार आहेत काय ?

श्री.सिध्दाराम म्हेत्रे : सभापती महोदय, या संदर्भात एकाच व्यक्तीने तक्रार दाखल केलेली आहे. त्यामध्ये त्यांनी 2 लाख 55 हजार इतक्या रकमेचा उल्लेख केलेला आहे. अशाच प्रकारच्या तक्रारी 500-600 लोकांच्या असतील असा अंदाज आहे. म्हणून ती रक्कम मोठी दिसते. या संदर्भात चौकशी सुरु आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

नागपूर ते अमरावती या भागाचे चौपदरीकरण प्रकल्पातील
तळेगांव ते अमरावतीच्या कामाच्या निविदा

(२) * २२१७८ श्री. राजेंद्र जैन , श्री. जितेंद्र आव्हाड : दिनांक १७ जुलै, २००६ रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या दिनांक १५ जुलै, २००६ रोजीच्या यादीतील तारांकित प्रश्न क्रमांक १७४४१ ला दिलेल्या उत्तराच्या संदर्भात : सन्माननीय सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर-अमरावती या रस्त्याचे चौपदरीकरण करण्याच्या प्रकल्पातील तळेगाव ते अमरावती या कामाच्या प्रकल्पाच्या प्राप्त झालेल्या निविदांची केंद्र शासनाकडून करण्यात येत असलेली छाननी पूर्ण झाली आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रश्नी केलेल्या छाननीचे थोडक्यात स्वरुप काय आहे व त्यानुसार पुढे कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे तसेच सदरचे काम लवकरात लवकर पूर्ण होणेसाठी कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(३) उक्त प्रश्न भाग (१) मधील प्रकरणी करण्यात येत असलेली कार्यवाही अपूर्ण असल्यास, त्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत?

श्री.छगन भुजबळ : (१) होय. तथापि या निविदा चौपदरीकरणाच्या कामाच्या नसून सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्याच्या कामाच्या आहेत. राष्ट्रीय महामार्ग क्र.६ च्या तळेगाव ते अमरावती या भागाच्या चौपदरीकरण कामाचा सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करणे या कामाच्या प्राप्त निविदांची केंद्र शासनाकडून छाननी पूर्ण झाली आहे.

(२) या कामाचा शक्याशक्यता अहवाल तयार करुन विस्तृत प्रकल्प अहवाल तयार करण्याचे काम मे.कावरे आणि जावडे प्रोजेक्टस प्रायव्हेट लिमीटेड नागपूर यांना देण्यात आले आहे. या कामासाठी दिनांक २६/६/२००६ पासून १० महिन्यांचा अवधी कंत्राटदारास देण्यात आला आहे. प्रकल्प अहवाल तयार करण्याचे काम पूर्ण झाल्यानंतर प्रत्यक्ष चौपदरीकरणाचे काम सुरु करण्यासाठीच्या निविदा मागविण्यात येतील.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

(सन्माननीय सदस्य अनुपस्थित)

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

राष्ट्रीय महामार्ग क्रमांक 6 च्या नागपूर ते अमरावती या भागाचे चौपदरीकरण करणे

(3) * 20522 श्री. वसंतराव खोटरे , प्रा. बी. टी. देशमुख , श्री. व्हि. यू. डायगव्हाणे , श्री. जी. एल. अैनापूरे : **तारांकित प्रश्न क्रमांक 9282 ला दिनांक 8 डिसेंबर, 2005 रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** : सन्माननीय सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) राष्ट्रीय महामार्ग क्रमांक सहाचा भाग असलेल्या नागपूर-अमरावती रस्त्याचे चौकपदरीकरण करण्याच्या कामाची सद्य:स्थिती काय आहे,

(2) या प्रकल्पाच्या नागपूर ते तळेगाव या लांबीच्या कामाच्या निविदा अंतिम करण्यात आल्या असून प्रत्यक्ष कार्याला सुरुवात झालेली आहे हे खरे आहे काय,

(3) खरे असल्यास, कार्यपूर्तीसाठी कंत्राटदाराला किती मुदत देण्यात आली आहे,

(4) राष्ट्रीय राजमार्ग विकास प्रकल्प टप्पा 3 ए अंतर्गत येणाऱ्या या रस्त्याच्या तळेगांव ते अमरावती या भागाच्या चौपदरीकरणाचे काम हाती घेण्याच्या प्रश्नाची सद्य:स्थिती काय आहे?

श्री. छगन भुजबळ : (1) राष्ट्रीय महामार्ग क्र.6 चा भाग नागपूर-तळेगांव-अमरावती या लांबीतील नागपूर ते तळेगांव या भागाचे चौपदीकरण प्रगतिपथावर आहे. तळेगांव ते अमरावती या भागाच्या चौपदरीकरणाच्या कामाचा सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्यात येत आहे.

(2) नागपूर ते कोंढाळी या भागाचे कार्यरंभ आदेश दिनांक 5/6/2006 रोजी दिला असून कामाची मुदत 30 महिने आहे.

तसेच कोंढाळी ते तळेगांव या भागाचा कार्यरंभ आदेश दिनांक 5/9/2006 रोजी दिला असून कामाची मुदत 30 महिने आहे.

(4) तळेगांव ते अमरावती या भागाचे चौपदरीकरणाचे काम राष्ट्रीय विकास टप्पा 3 ए मध्ये घेंण्यात आले नसून ते 3 बी मध्ये घेण्यात आले आहे. या भागाच्या चौपदरीकरणाच्या कामाचा सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्यात येत आहे.

श्री.वसंतराव खोटरे : सभापती महोदय, दिनांक 8 डिसेंबर 2005 रोजी विचारला होता, त्यावेळी मंत्रिमहोदयांनी उत्तर देताना सांगितले होते की, "राष्ट्रीय महामार्ग क्रमांक 6 चा भाग नागपूर-तळेगांव-अमरावती या लांबीतील नागपूर ते तळेगांव या भागाचे चौपदरीकरण प्रगतिपथावर आहे." आता प्रश्न क्रमांक 4 चे उत्तर देण्यात आलेले आहे की,"..... या भागाच्या चौपदरीकरणाच्या कामाचा सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्यात येत आहे." माझा मंत्रिमहोदयांना प्रश्न आहे की, हा प्रकल्प अहवाल किती दिवसांत पूर्ण होणार आहे ?

श्री.छगन भुजबळ : सभापती महोदय, राष्ट्रीय महामार्गाचे हे काम आहे. हे काम केंद्र शासनाच्या अखत्यारितील आहे. भारत राज्यमार्ग प्राधिकरण यांचेमार्फत हे काम करण्यात येत आहे. नागपूर-कोंढाळी-अमरावती या भागाचे चौपदरीकरणाचे काम राष्ट्रीय विकास टप्पा क्रमांक 3 ए

..4..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 20522.....

श्री.छगन भुजबळ.....

मध्ये घेण्यात आलेला आहे. या कामाची वर्क ऑर्डर झाली असून कामास सुरुवात झालेली आहे. डीपीआर तयार करण्याच्या दृष्टीने टेंडर फायनालाईस केलेले आहे. त्याचा अभ्यास करण्याचे काम कावरे ॲन्ड गौज प्रोजेक्ट यांचेकडे दिलेले आहे.

यानंतर श्री.पुरी...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.जोगेंद्र कवाडे : सभापती महोदय, नागपूर-अमरावती व नागपूर-कोंढाळी-तळेगाव-तिवसेपर्यंतच्या रस्त्यांची फारच दुरावस्था झालेली आहे. याबाबतीत माझी माननीय मंत्रिमहोदयांना विनंती आहे की, हा राजमार्ग जरी केंद्र शासनाच्या कक्षेत येत असला तरी याबाबतीत राज्य शासनाने पाठपुरावा करुन हा खराब झालेला रस्ता लवकरात लवकर पूर्ण करण्याच्या दृष्टीने राज्य शासन प्रयत्न करणार आहे का ?

श्री.छगन भुजबळ : सभापती महोदय, रस्त्याच्या दुरावस्थेबाबत सन्माननीय सदस्यांची जी तक्रार आहे, ती योग्य आहे. याबाबत आपण केंद्र शासनाच्या निदर्शनास आणले असून परत मी स्वत: याबाबत लक्ष घालतो. या रस्त्याच्या मेंटनन्सचे काम केंद्र सरकारने नेमलेल्या कंत्राटदाराचे आहे. परंतु याबाबतीत पाठपुरावा करण्यात येईल व रस्ता चांगल्यारितीने ठेवण्याचा प्रयत्न केला जाईल.

श्री.वसंतराव खोटरे : सभापती महोदय, अमरावती-अकोला रस्ताही फारच खराब झालेला असून त्या रस्त्याचेही चौपदरीकरण करण्याच्या दृष्टीने आपण काही योजना आखली आहे काय ? असल्यास, त्याबाबत आपण अहवाल तयार केला आहे काय ?

श्री.छगन भुजबळ : सभापती महोदय, यासंदर्भातील जी संस्था आहे त्यांनी नागपूर-अमरावती व नागपूर-रायपूरपर्यंतच्या रस्त्याच्या कामाचा कार्यक्रम आखलेला आहे. नागपूर-वैनगंगा-छत्तीसगडच्या बॉर्डरच्या एनएसपी 3 च्या ऐवजी एनएचपी 3 (अ) ताबडतोब करण्यासंदर्भात यश मिळालेले आहे. बाकीचा जो अमरावती-नागपूरच्या रस्त्याचा भाग आहे त्याचा पाठपुरावा करण्यात येईल व सन्माननीय सदस्यांनी विचारल्याप्रमाणे, हा कार्यक्रम लवकरात लवकर करण्याच्या दृष्टीने पाहण्यात येईल.

डॉ.एन.पी.हिराणी : सभापती महोदय, संपूर्ण विदर्भातील रस्त्यांची अवस्था फारच वाईट झालेली आहे. नागपूर-अमरावती महामार्गावर आजपर्यंत बराच खर्च करुनही या रस्त्यांची अवस्था फारच वाईट झालेली आहे. या रोडची क्वॉलिटी फारच खराब आहे. त्यामुळे याठिकाणी माझा माननीय मंत्रिमहोदयांना एवढी माहिती द्यावी की, या रोडवर आत्तापर्यंत किती खर्च केला ? आणि केंद्र शासनाचा जो आता रोड होऊ घातला आहे, त्याच्या क्वॉलिटीच्या बाबतीत विशेष लक्ष केंद्रित करुन या रस्त्याच्या गुणवत्तेबाबत आपण सहकार्य देणार का ?

..2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.छगन भुजबळ : सभापती महोदय, हा रस्ता केंद्र सरकारचा आहे. केंद्र सरकारने मंजूरी दिल्यानंतर त्या रस्त्याच्या मेंटनन्सचे काम हे वेळोवेळी केले जाते. रस्त्याच्या चौपदरीकरणाचे काम कंत्राटदाराने वेळेवर न केल्यामुळे त्या रस्त्याची परिस्थिती गंभीर आहे. याबाबतीत राज्य शासनाने केंद्र शासनाला कळविले आहे. याबाबतीत पाठपुरावा करण्यात येत असून या रस्त्याचे काम कंत्राटदाराकडून लवकरात लवकर करुन घेण्यात यावे, असे आपण कळवलेले आहे. या कामाचा पाठपुरावा आपण वेळोवेळी करीत आहोत. या रस्त्यावर आत्तापर्यंत किती खर्च आला यासंदर्भात सन्माननीय सदस्यांना एकूण किती वर्षांची माहिती हवी आहे, ते त्यांनी सांगावे, त्याप्रमाणे त्यांना माहिती उपलब्ध करुन दिली जाईल.

डॉ.एन.पी.हिराणी : 10 वर्षांपर्यंतची खर्चाची माहिती द्यावी.

श्री.छगन भुजबळ : सभापती महोदय, सदरची माहिती केंद्र सरकारकडून घेऊन ती देण्याचा आम्ही प्रयत्न करु.

नंतर श्री.रोझेकर...

अप्रमाणित प्रत / प्रतिक्षेसाठी नाही

मुंबई पुणे राष्ट्रीय महामार्गावर असलेल्या चौक (जि.रायगड) गावाजवळील धावरी नदीवरील पुलाचे बांधकामाबाबत

(४) * २२०५७ श्री. लक्ष्मण जगताप , श्री. जितेंद्र आव्हाड , प्रा. फौजीया खान , श्री.भास्कर जाधव : तारांकित प्रश्न क्रमांक १८८९९ ला दिनांक २१ जुलै, २००६ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात : सन्माननीय सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) मंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई पुणे राष्ट्रीय महामार्गवरील चौक गावाजळील धावरी नदीवरील पुलाचे बांधकाम पूर्ण झाले आहे काय,

(२) अद्याप काम अपूर्ण असल्यास, त्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत,

(३) उक्त प्रश्न भाग (१) मधील प्रकरणी पुलाचे काम लवकरात लवकर पूर्ण करावे यासाठी कोणता पाठपुरावा केला वा करण्यात येत आहे ?

श्री.अनिल देशमुख : (१) होय.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) मुंबई-पुणे राष्ट्रीय महामार्ग क्र.४ चे चौपदरीकरण व मजबुतीकरण करणे भाग कि.मी.२०/४०० ते १३१/२०० या प्रकल्पाचे काम चौक गावाजवळील धावरी नदीवरील पुलाच्या बांधकामासह सप्टेंबर २००६ मध्ये पूर्ण करण्यात आले आहे.

श्री.भास्कर जाधव : सभापती महोदय, या ठिकाणी ज्या हेतूने हा प्रश्न विचारला होता तो हेतू व ते काम पूर्ण झाले आहे. माझा प्रश्न असा आहे की, या कामाला एकूण खर्च किती आला आहे आणि हे काम किती कालावधीमध्ये पूर्ण करण्यात आले आहे ?

श्री.अनिल देशमुख : सभापती महोदय, या कामावर जवळ जवळ 280 कोटी रुपये खर्च आला आहे. हे काम 2 वर्षात पूर्ण करण्याबाबतचा करार होता त्याऐवजी हे काम 2 वर्षे 1 महिन्यात पूर्ण झालेले आहे.

...2.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ठाणे जिल्ह्यात मिरा-भाईंदर येथे चार दिवसात आठ घरफोडीची प्रकरणे घडल्याबाबत

(५) * २०६२० श्री. मुझफ्फर हुसेन सय्यद , श्री. संजय दत्त , मेजर सुधीर सावंत : सन्माननीय उप मुख्य मंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे जिल्ह्यातील मिरा-भाईंदर येथे चार दिवसात आठ घरफोडीची प्रकरणे घडली आहेत असे माहे आक्टोंबर, २००६ च्या सुमारास निदर्शनास आले आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी दोषी असलेल्यांवर कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे, केलेल्या कार्यवाहीचे स्वरुप काय आहे,

(३) अद्यापपर्यंत कोणतीच कारवाई केली नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.सिध्दाराम म्हेत्रे, श्री.आर.आर.पाटील यांच्याकरिता : (१) ठाणे जिल्ह्यात मिरा-भाईंदर येथे ऑक्टोबर, २००६ मध्ये बारा घरफोडी चोरीचे गुन्हे घडलेले आहेत.

(२) व (३) सदर गुन्ह्यापैकी उघडकीस आलेल्या ४ गुन्ह्यात ५ आरोपीतांस अटक करण्यात आली आहे. उर्वरीत उघडकीस न आलेल्या गुन्ह्याचा सर्वतोपरी तपास करण्यात येत आहे.

श्री.संजय दत्त : सभापती महोदय, प्रश्नाच्या उत्तरात दिलेल्या माहितीच्या अनुषंगाने ऑक्टोबर महिन्यामध्ये 12 घरफोडी या परिसरामध्ये झालेल्या आहेत. त्यापैकी 4 घरफोडयांमधील गुन्हे उघडकीस आलेले आहेत. ज्या आरोपींना अटक करण्यात आली त्यांना कोणती कलमे लावण्यात आली आहेत ? सदर आरोपींवर यापूर्वी गुन्हे नोंदविलेले आहेत काय ? असल्यास हे गुन्हे कोणत्या स्वरुपाचे आहेत. उघडकीस आलेल्या 4 गुन्हयांमध्ये किती रकमेचा माल हस्तगत करण्यात आला आहे ?

श्री.सिध्दाराम म्हेत्रे : सभापती महोदय, एकूण 12 घरफोडयापैकी 4 घरफोडयातील गुन्हे उघडकीस आले आहेत. घटना क्रमांक 1 मध्ये गुन्हा रजिस्टर क्रमांक 109 असून फिर्यादी विजयकुमार गौतम यांचा मोबाईल फोन चोरीला गेला होता. या गुन्हयातील बाबुलाल कोळी या आरोपीस पकडण्यात आले आहे. हा आरोपी गुन्हा करतांनाच मिळालेला आहे. दुसरा गुन्हा नोंदणी क्रमांक 113/6 मध्ये ऑफीसमधील 27 हजार रुपये चोरतांना आरोपी विश्वकर्मा व आरोपी खडक्या कोळी या दोघांना दिनांक 31/10/2006 रोजी अटक करण्यात आली आहे. यामध्ये 3,743 रुपयांचा ऐवज हस्तगत करण्यात आला आहे. घटना क्रमांक 3 मध्ये गुन्हा क्रमांक 363/6, दिनांक 17/10/2006, अरोपी अजय छैनी हा बालगुन्हेगार आहे. 15 हजार रुपयांच्या

..3.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

<u>ता.प्र.क्र.20620 पुढे सुरु</u>.....

श्री.सिध्दाराम म्हेत्रे.....

सोन्याच्या 2 बांगडया या आरोपीकडून हस्तगत करण्यात आल्या आहेत. घटना क्रमांक 4 मध्ये गुन्हा रजिस्टर क्रमांक 365/6, दिनांक 17/10/2006 रोजी भरत सावळा या आरोपीस गुन्हा करतांना अटक करण्यात आलेली आहे.

श्री.रामनाथ मोते : सभापती महोदय, ठाणे जिल्हयातील मिरा-भाईंदर या परिसरातील घरफोडयांविषयीचा हा प्रश्न आहे. याच परिसरातील पोलीस फोर्ससंबंधी यापूर्वी सभागृहात चर्चा झालेली आहे. त्या ठिकाणी असणारा स्टाफ अपूरा आहे, हा वाढविण्याची आवश्यकता असून तो वाढविला जाईल अशा प्रकारचे आश्वासन यापूर्वी सभागृहात देण्यात आलेले आहे. आता त्या ठिकाणी प्रत्यक्षात पोलीस स्टाफ किती आहे आणि तो पुरेसा आहे काय ? नसल्यास स्टाफ देण्याबाबतची कार्यवाही किती दिवसात पूर्ण होणार आहे ?

श्री.सिध्दाराम म्हेत्रे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी सांगितल्याप्रमाणे त्या ठिकाणी स्टाफ कमी आहे. 11 हजार पोलीस कर्मचारी भरण्याबाबतचा जो निर्णय शासनाने घेतला आहे ती प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर त्यामधून या ठिकाणी स्टाफ देण्याबाबत शासन निश्चित विचार करेल.

श्री.भास्कर जाधव : सभापती महोदय, मंत्रीमहोदयांनी सांगितले की, 12 गुन्हयांपैकी 4 गुन्हयांचा तपास लागलेला आहे व 4 घटनेतील आरोपी पकडण्यात आले आहेत. मंत्रीमहोदयांचे उत्तर शांतपणे ऐकले तर आपल्या असे लक्षात येईल की, 4 पैकी 3 घटनेतील गुन्हेगार गुन्हा करतांनाच पकडले आहेत. म्हणजे या गुन्हेगारांना पोलिसांनी पकडलेले दिसत नाही तर स्थानिक लोकांनीच पकडले असावे. त्यामुळे पोलिसांनी किती गुन्हेगार पकडले ? तसेच, या गुन्हयातील आरोपी एकमेकांशी संबंधित आहेत की वेगवेगळे आहेत ? ज्या आरोपींना पकडण्यात आलेले आहे ते सध्या अटकेत आहेत की जामिनावर सुटलेले आहेत ? याचा खुलासा मंत्रीमहोदय करतील काय ?.

यानंतर श्री.बोरले.....

अप्रमाणित प्रत / प्रमाणित प्रत नाही

ता.प्र.क्र.20620.....

श्री.सिध्दाराम म्हेत्रे : सभापती महोदय, मी मघाशी उत्तर दिले की, या लोकांना पोलिसांनी पकडलेले आहे. आजुबाजूच्या लोकांनी दिलेल्या माहितीवरुन पोलिसांनी कारवाई केलेली आहे. पोलिसांनीच हे गुन्हे उघडकीस आणलेले आहेत आणि पोलिसांनीच त्यांना पकडलेले आहे.

श्रीमती मंदा म्हात्रे : सभापती महोदय, ठाणे जिल्हयामध्ये नेहमीच दरोडे आणि घरफोडी होत असतात. काही दिवसापूर्वी नवी मुंबईतील ऐरोली येथील बँक दरोडयामध्ये एक पोलीस अधिकारी मारला गेला आणि एक जखमी झाला. नवी मुंबई ठाणे जिल्हयामध्ये येते. माझा प्रश्न असा आहे की, पाम बीच मार्गावर नेहमी दरोडे आणि घरफोडी होत असतात. तेथे सिडकोने पोलीस कार्यालयासाठी भूखंड आरक्षित केलेला आहे. हा भूखंड आपण केव्हा ताब्यात घेणार आणि तेथे पोलीस चौकी केव्हा बांधण्यात येणार आहे ?

श्री.सिध्दाराम म्हेत्रे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्या श्रीमती मंदा म्हात्रे यांनी सांगितल्याप्रमाणे राज्यामध्ये ब-याच ठिकाणी पोलीस स्टेशनची मागणी आहे. त्यासंदर्भात शासन सविस्तर धोरण आखत आहे. त्या धोरणानुसार कार्यवाही केली जाईल.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

मराठवाडा विकासासाठी शासनाने जाहीर केलेले पॅकेज

(6) * 21510 श्री. दिवाकर रावते , डॉ. निलम गोऱ्हे , श्री. अरविंद सावंत , श्री. सुरेश जेथलिया , श्री. अनिल परब , श्री. रणजितसिंह मोहिते-पाटील , प्रा. फौजीया खान , श्री. जितेंद्र आव्हाड : सन्माननीय नियोजन मंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) दिनांक 18 व 19 सप्टेंबर, 2006 रोजी औरंगाबाद येथे झालेल्या राज्यमंत्री मंडळाच्या बैठकीत मराठवाड्याच्या विकासासाठी शासनाने सुमारे 1153 कोटी रुपयांचे पॅकेज जाहिर केले हे खरे काय,

(2) असल्यास, गेल्यावर्षीच्या मंत्रीमंडळाच्या बैठकीत शासनाने 2,671 कोटी रुपयांचे पॅकेज जाहिर केले होते हे खरे आहे काय,

(3) असल्यास, सदर दोन वर्षासाठी असलेल्या या रक्कमेतील सुमारे 1265 कोटी रुपये हे शासनाच्य तिजोरीतून व सुमारे 1402 कोटी रुपये (बीओटी) खाजगी क्षेत्रातून येणार आहेत हे खरे काय,

(4) असल्यास, 1265 कोटी रुपयांपैकी 610 कोटी रुपये गतवर्षी द्यावयाचे होते त्यापैकी फक्त 594 कोटी रुपये शासनाने दिले हे खरे काय,

(5) असल्यास, 1402 कोटी रुपये हे खाजगी (बीओटी) क्षेत्रातून गुंतविले जाणार होते तशी गुंतवणूक बीओटीद्वारे झाली आहे काय,

(6) नसल्यास, त्यांची काय कारणे आहेत ?

डॉ.सुनील देशमुख, श्री.जयंत पाटील यांच्याकरिता : (1) औरंगाबाद येथे झालेल्या बैठकीत रु.1087.92 कोटीच्या मराठवाडा विकास कार्यक्रम 2006 ला मंत्रिमंडळाने मान्यात दिली आहे.

(2) व (3) होय.

(4) मराठवाडा एकत्मिक विकास कार्यक्रमासाठी सन2005-06 मध्ये रु.610 कोटीचा अतिरिक्त नियतव्यय उपलब्ध केला आहे.

(5) व (6) इतर स्त्रोतातील रु. 1402 कोटीपैकी रस्त्यांच्या कामासाठी रु.711 कोटी खाजगी क्षेत्रातून (बीओटी तत्वावर) गुंतवणूक अपेक्षीत आहे. पैकी 10 कोटीची खाजगी गुंतवणूक झाली आहे. व रु.390 कोटी खाजगी गुंतवणुकीच्या निविदा मंजूर झाल्या आहेत.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, समाधान झाले आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

राज्यात जैविक बहुविध विकास मंडळ स्थापन करण्याबाबत

(7) * 20700 प्रा. शरद पाटील , श्री. जयंत पाटील , श्री. सुरेश जेथलिया : तारांकित प्रश्न क्रमांक 19040 ला दिनांक 19 जुलै, 2006 रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात : सन्माननीय वने मंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) महाराष्ट्रात जैव विविधता मंडळ स्थापनेचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे हे खरे आहे काय,

(2) असल्यास, याबाबत शासनाने निर्णय घेतला आहे काय, त्याचे स्वरुप काय आहे,

(3) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.बबनराव पाचपुते : (1) होय, हे खरे आहे.

(2) केंद्र शासनाच्या जैविक विविधता अधिनियम 2002 नुसार राज्यात जैविक विविधता मंडळाची स्थापना व जैविक विविधता नियमांचे प्रारुप तयार करण्यात आले असून, अधिसुचना जारी करण्यासाठी मान्यता देण्याची प्रक्रिया शासन स्तरावर सुरु आहे.

(3) प्रश्न उद्‌भवत नाही.

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, जैविक विविधता मंडळाच्या नियमांचे स्वरुप काय आहे ? आणि यासंबंधीची अधिसूचना केव्हा निघणार आहे ?

श्री.बबनराव पाचपुते : सभापती महोदय, राज्य शासनाने जैविक विविधता मंडळ स्थापन करण्याचा निर्णय घेतलेला आहे. या मंडळाची स्थापना करीत असतांना दिनांक 5 जून, 1992 रोजी युनायटेड नेशनच्या बायलॉजिकल डायव्हर्सिटी कन्व्हेन्शनमध्ये भारत सहभागी झालेला आहे. त्यानुसार दिनांक 29 डिसेंबर, 1993 मध्ये आपण प्रत्यक्षात कव्हेन्शन लागू केलेले आहे आणि बायलॉजिकल रिसोर्सेस हक्क आपण मान्य केलेले आहेत. उद्देश असा आहे की, जैविक विविधता जैविक वनस्पती असतील, प्राणी आणि सूक्ष्म जंतू यांचे संवर्धन करावयाचे आहे, जतन करावयाचे आहे. यासाठी आवश्यक त्या प्रमाणात कायद्याचा वापर करुन बोर्डाला तसे अधिकार देण्यात येणार आहेत. बोर्ड स्थापन करण्याचा निर्णय शासनाने घेतलेला आहे. बोर्ड स्थापन झाल्यानंतर काम सुरु होणार आहे. प्रत्येक ग्रामपंचायतीमध्ये समित्या तयार होणार आहेत आणि त्या समित्यांच्या मार्फत हे काम केले जाणार आहे. याबाबतचे नियम खूप कडक आहेत. जी व्यक्ती भारतीय नागरिक नाही, भारतामध्ये वास्तव्य करीत नाही, बाहेरची व्यक्ती येथे येऊन काही संशोधन करीत आहे किंवा येथून काही खनिज बाहेर घेऊन जात आहे, एखादी कंपनी किंवा संस्था येथे येऊन खनिज प्रदेशामध्ये संशोधन करीत आहे किंवा या वनस्पतींचे संशोधन करुन याचे पेटन्ट

.....4

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

तारांकित प्रश्न क्रमांक 20700.....

श्री. बबनराव पाचपुते ....

मिळविण्याचा प्रयत्न करते त्यांच्यासाठी या सर्व परवानगीची आवश्यकता लागणार आहे. राज्यातील जैविक विविधता राखण्यासाठी या मंडळाचा अत्यंत काटेकोरपणे उपयोग होईल आणि यासाठी लागणारे पैसे केंद्र सरकार देणार आहे. राज्य शासनाचा देखील त्यामध्ये हिस्सा असणार आहे. लवकरात लवकर आपण या मंडळाची स्थापना करणार आहोत.

यानंतर श्री.सुंबरे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 20700 ....

डॉ. नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, ही एक अतिशय व्यापक अशी मोहीम लोकांनी चालविल्यानंतर 1 जुलै 2004 मध्ये आपल्या राज्य सरकारला हा अधिकार प्राप्त झालेला आहे हे खरे आहे आणि मग त्यानंतर संपूर्ण वर्ष दीड वर्षे या कामामध्ये दिरंगाई का झाली ? यामध्ये हे बोर्ड स्थापन केल्याशिवाय ग्रामपंयायती, नगरपरिषदांना देखील काही कार्य करता येणार नाही. तसेच 5 कि.मी.च्या परिसरामध्ये संपूर्ण रोजगार देण्याच्या बाबतीत हे बोर्ड आणि नगरपरिषदा मार्फत कार्य होणार आहे. तेव्हा या विशेष महामंडळावर विधीमंडळ सदस्य तसेच संसद सदस्य देखील राहणार आहेत काय ?

श्री. बबनराव पाचपुते : सभापती महोदय, आपण हे महामंडळ स्थापन करण्याचा निर्णय घेतलेला आहे अर्थात यामध्ये उशीर झालेला आहे ही गोष्ट खरी आहे. परंतु एकूणच संपूर्ण देशात प्रत्येक राज्याने हे महामंडळ स्थापन करण्याचा निर्णय घेतलेला असून महाराष्ट्राने त्यात पुढाकार घेतला आहे. या संदर्भात मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली एक बैठक होऊन प्रारूप तयार होणार आहे आणि त्यामध्ये यासंबंधीचे नियम काय असावे, संपूर्ण नगरपालिका, महापालिकांची समिती स्थापन करावी वगैरे बाबतीत विचार होणार आहे. हे महामंडळ स्थापन होत नाही तोपर्यंत त्या अध्यक्षाला काय अधिकार आहेत, ती व्यक्ती कोण असावी ? वगैरे ठरविता येणार नाही. तरीही त्याबाबत माहिती घेऊन हे नवीन महामंडळ असल्याने यासंबंधात अगोदरच उशीर झालेला असला तरी यापुढे दिरंगाई होणार नाही या दृष्टीने आम्ही काम करणार आहोत.

***

..... सीसी 2 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सिंधुदुर्ग जिल्ह्यातील देवगड तालुक्यातील मिठमुंबरी, तारामुंबरी खाडीवरील पूल व मिठमुंबरी कुणकेश्वर समुद्राच्या काठाने नविन रस्ता तयार करण्याबाबत

(8) *23936 श्री.परशुराम उपरकर, श्री. अरविंद सावंत, डॉ. दीपक सावंत, डॉ. निलम गोऱ्हे : तारांकित प्रश्न क्रमांक 4953 ला दिनांक 8 एप्रिल, 2005 रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात : सन्माननीय सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) देवगड तालुक्यातील (सिंधुदुर्ग) मिठमुंबरी, तारामुंबरी खाडीवर पूल व मिठमुंबरी कुणकेश्वर असा समुद्राच्या काठाने नविन रस्ता तयार करण्याबाबत तेथील ग्रामस्थांनी मागील 25 वर्षापासून सातत्याने केलेल्या मागणीमुळे शासनाने मिठमुंबरी, तारामुंबरी पुलाचे काम केंद्र शासनाकडून केंद्रीय मार्ग निधीतून (सीआरएफ) मंजूर होण्यासाठीचा व आर्थिक निधी मिळावा म्हणून 20 कोटीचा प्रस्ताव राज्य शासनाने दिनांक 15 जुलै, 2003 अन्वये पाठविला आहे हे खरे आहे काय,
(2) असल्यास, सदरहू प्रस्तावास केंद्र शासनाकडून अद्यापी मंजूरी मिळालेली नाही हे खरे आहे काय,
(3) असल्यास, सदरहू प्रस्तावास केंद्र शासनाकडून लवकरात लवकर मंजूरी मिळावी व या पुलाचे काम तातडीने हातात घेऊन तातडीने पूर्ण करण्यासाठी शासनाने कोणते खास प्रयत्न केले आहे ?

श्री. रविशेठ पाटील, श्री. छगन भुजबळ यांच्याकरिता : (1) होय.
(2) होय.
(3) पुलाचे नकाशाला छाननी समितीची मंजूरी घेण्यात आली असून त्यानुसार कामाचे सविस्तर अंदाजपत्रक तयार करण्याचे काम सुरु आहे. सदर अंदाजपत्रक केंद्र शासनास पाठविल्यानंतर केंद्र शासनाचे मान्यतेनंतर कामाचा समावेश अर्थसंकल्पात करण्याचे प्रयत्न राहतील.

श्री. परशुराम उपरकर : सभापती महोदय, या रस्त्याबाबत गेली 25 वर्षे ग्रामस्थ मागणी करीत आहेत आणि आता गेल्या 3 वर्षापूर्वी केंद्र सरकारला आपण प्रस्ताव पाठविला आहे. या कामाचे रिवाईज एस्टिमेट करून नवीन अंदाजपत्र करण्याचे काम चालू आहे असे यात म्हटले आहे तर मग हे काम केव्हा पूर्ण होईल आणि केंद्र सरकारकडून त्यास केव्हा मंजुरी मिळेल ?

श्री. रविशेठ पाटील : सभापती महोदय, हा प्रस्ताव आपण केंद्र सरकारकडे 17.7.2003 ला पाठविला आहे आणि केंद्र सरकारकडे त्याबाबत पाठपुरावा चालला आहे. केंद्र सरकारची यासाठी मान्यता आल्यानंतर या रस्त्याचे काम अर्थसंकल्पामध्ये समाविष्ट करून घेऊ. या रस्त्याची लांबी 200 मीटर अगोदर दिली होती. ती नंतर 200 पेक्षा जास्त केल्याने छाननी समितीची त्यास मंजुरी पाहिजे. म्हणूनच ती मंजुरी घेण्याचे काम नाशिकला पाठविले आहे आणि ती आल्यानंतर प्रस्ताव पुन्हा पाठविला जाईल. ..... सीसी 3 ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. परशुराम उपरकर : यासाठी किती कालावधी लागणार आहे ?

श्री. रविशेठ पाटील : सभापती महोदय, लवकरात लवकर मंजूर करण्याचे प्रयत्न आम्ही करू.

***

अप्रधारित पत्र / परिपत्रकासाठी नाही

अहमदनगर शहरातील काही व्यक्तींकडे बनावट नोटा आढळल्याबाबत

(9) * 20767 श्री. धनाजी साठे , श्री. सुधाकर गणगणे , श्री.राजन तेली , श्री. रमेश निकोसे , श्री. संजय दत्त : दिनांक 21 जुलै, 2006 रोजी उत्तरीत झालेल्या तारांकित प्रश्न क्रमांक 19842 ला दिलेल्या उत्तराच्या संदर्भात : सन्माननीय उपमुख्य मंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) अहमदनगर शहरात दिनांक 26 जुलै, 2006 रोजी वा त्यादरम्यान कांही व्यक्तींकडे बनावट नोटा आढळून आल्या, हे खरे आहे काय,
(2) असल्यास, याबाबत चौकशी करण्यात आली आहे काय,
(3) असल्यास, बनावट नोटा बाळगणाऱ्या व्यक्तींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(4) अद्याप, कोणतीच कारवाई केली नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत?

श्री. सिद्धाराम म्हेत्रे, श्री.आर.आर.पाटील यांच्याकरिता : (1) होय.
(2), (3) व (4) दि.26.7.2006 रोजी मिळून आलेल्या तीनही ओपीचा संबंध यापूर्वी दि.13.5.2006 रोजी दाखल असलेल्या तोफखाना पोलीस स्टेशन, गु.र.नं. 113/06 या गुन्ह्याशी असल्याने क्रि.प्रो.को.क. 173 (8) नुसार सदर गुन्ह्याचा तपास करुन 3 आरोपींना अटक करण्यात आली व नंतर तपासात अटक करण्यात आली असून त्यांचेकडून रु.500/- दराच्या 8, रु.100/- दराच्या 8 बनावट नोटा व बनावट नोटा फाडलेल्या कागदाचे तुकडे जप्त करण्यात आले आहेत. अटक आरोपीविरुध्द पुरावा गोळा करुन दोषारोपपत्र पाठविण्यात आलेले आहे.

श्री. संजय दत्त : सभापती महोदय, माझे या संदर्भात दोन प्रश्न आहेत. एक म्हणजे अहमदनगर येथे बनावट नोटा कोठून आल्या ? त्या अनुषांगाने तपास करण्यात आलेला आहे काय? आणि दुसरे म्हणजे गेल्या वर्षभरामध्ये राज्यामध्ये अशा बनावट नोटांच्याबाबतीतील किती गुन्हे घडले आहेत ?

श्री. सिद्धाराम म्हेत्रे : सभापती महोदय, या बनावट नोटा नारायण यादव वाघमुळे, रा. तालुका नेवासा याने स्कॅनरवर बनविल्या होत्या आणि त्या बाजारात वटवित असताना तो पकडला गेला होता. त्यासंबंधात गुन्हा दाखल झालेला आहे. राज्यामध्ये या संबंधातील 2005 मध्ये 104 गुन्हे दाखल झालेले असून सप्टेंबर 2006 पर्यंत 87 गुन्हे दाखल झालेले आहेत.

श्री. मधुकर चव्हाण : सभापती महोदय, गेल्या 5-6 महिन्यातील बातम्या आपण वाचल्या असतील त्यामध्ये बनावट नोटांच्याबाबतीतील काही प्रकरणे उघडकीस आलेली आहेत. या बनावट नोटा पाकिस्तानमध्ये छापल्या जाऊन दुबईमार्गे त्या भारतात येतात असेही बातम्यातून वाचनात

..... सीसी 5 ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर चव्हाण (पुढे चालू....) ता.प्र.क्र.20767...

आलेले आहे. या बनावट नोटा अकुशल कंत्राटी कामगार आहेत त्यांना दिल्या जातात. अगोदरच त्यांचा पगार वा रोजगार हा दीड-दोन हजार रूपये असतो आणि त्यातील अर्धे पैसे या बनावट नोटांच्या स्वरूपात दिले जात असतील तर त्यांच्या हाती किती पैसे पडणार आहेत ? तेव्हा शासनाने पोलीस खात्यात आर्थिक गुन्ह्यांच्याबाबतीत जसा वेगळा विभाग निर्माण केला आहे त्याप्रमाणे बनावट नोटांचा शोध घेण्यासाठी वेगळा विभाग सुरू करणार आहे काय ? किमान या साठी वेगळा विभाग सुरू करवा असे शासनाला वाटते आहे का ?

श्री. सिद्धाराम म्हेत्रे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांची सूचना चांगली आहे, त्याबाबत जरूर विचार करण्यात येईल.

***

(यानंतर श्री. सरफरे ..... डीडी 1 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 20767...

श्री. मधुकर चव्हाण...

म्हणून शासनाने आर्थिक गुन्हे विभागामध्ये वेगळा विभाग केला आहे, त्याप्रमाणे बनावट नोटांचा शोध घेण्यासाठी पोलीस खात्यामध्ये वेगळा विभाग करावासा आपल्याला वाटतो काय?

श्री.सिध्दाराम म्हेत्रे : माननीय सदस्यांची सूचना चांगली असून त्याबाबत विचार करता येईल.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ MHM/ KGS/

मालाड (मुंबई) येथील आक्सा बीचवरील जुरासिक पार्क हॉटेलमध्ये

एका तरुणीवर २ व्यक्तिंनी केलेला बलात्कार

(१०) * २३०८० श्री. प्रकाश शेंडगे , श्री. विनोद तावडे , श्री. मधुकर चव्हाण , श्री. प्रतापराव सोनवणे : सन्माननीय उप मुख्य मंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दिनांक २० सप्टेंबर,२००६ रोजी वा त्यासुमारास मालाड (मुंबई) येथील जवळील आक्सा बीचवरील जुरासिक पार्क हॉटेलमध्ये एका तरुणीवर २ व्यक्तिंनी बलात्कार केल्याची तक्रार सदर तरुणीने खार पोलीस स्टेशन येथे व खार पोलिस स्टेशनने नंतर मालवणी पोलीसांकडे नोंदविली हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर गुन्ह्याचा तपास पूर्ण झाला आहे काय, असल्यास दोषी व्यक्तिविरुध्द काय कारवाई करण्यांत आली वा येत आहे नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. सिध्दाराम म्हेत्रे, श्री.आर.आर.पाटील यांच्याकरीता : (१) होय, तथापि सदर घटना दिनांक १९.९.०६ रोजी घडली आहे.

(२) सदर प्रकरणी फिर्यादीने दिलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने दिनांक २१.९.०६ रोजी मालवणी पोलीस ठोणेस गु.र.क्र.२०५/०६,भा.दं.वि.कलम ३७६ (२) (ग),३२३,३४२,५०६ (२) अन्वये गुन्हा नोंदविण्यात आला आहे. गुन्ह्यातील दोन्ही आरोपींना अटक करण्यात आली असून दोन्ही आरोपी सध्या न्यायालयीन कोठडीत आहेत. गुन्ह्याचा तपास चालू आहे.

श्री. प्रकाश शेंडगे : सभापती महोदय, हे प्रकरण गंभीर आहे. बलात्काराची घटना घडल्यानंतर बलात्कारीत तरुणी एखाद्या पोलीस स्टेशनमध्ये गेल्यानंतर त्या पोलीस स्टेशनकडून सदरहू गुन्हा या पोलीस स्टेशनच्या कार्यक्षेत्रामध्ये येत नसल्यामुळे आपण दुसऱ्या पोलीस स्टेशनमध्ये जाऊन गुन्हा नोंदवावा अशाप्रकारे सांगितले जाते. ही युवती खार पोलीस स्टेशनमध्ये तक्रार नोंदविण्यास गेल्यानंतर तिची तक्रार नोंदवून घेण्यास खार पोलीस स्टेशनकडून नकार देण्यात आला काय? खार पोलीस स्टेशनकडून त्या युवतीला अशाप्रकारचे उत्तर दिले गेले असेल तर ते योग्य आहे काय? एखाद्या पोलीस स्टेशनच्या अखत्यारीत गुन्हा घडला नसला तरी त्या गुन्हयाचे गांभीर्य ओळखून तात्पुरत्या स्वरुपामध्ये गुन्हा नोंदवून तो दुसऱ्या पोलीस स्टेशनकडे ट्रान्सफर करण्यासंबंधी आपण सर्व पोलीस स्टेशनला स्थायी आदेश देणार आहात काय?

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सिध्दाराम म्हेत्रे : सभापती महोदय, सदरहू युवतीवर झालेला अत्याचाराचा गुन्हा मालवणी पोलीस स्टेशनच्या हद्दीमध्ये घडला होता. त्या युवतीचे घर हे खार पोलीस स्टेशनजवळ होते. म्हणून त्या युवतीच्या बहिणीने आणि डिसोझा नावाच्या दुसऱ्या एका व्यक्तीने खार पोलीस स्टेशनमध्ये जाऊन गुन्हा नोंदविला. त्यावेळी खार पोलीस स्टेशनने शून्य नंबरवर गुन्हा दाखल करुन घेऊन तो मालवणी पोलीस स्टेशनकडे पाठविला. त्यामुळे खार पोलीस स्टेशनने गुन्हा नोंदविण्यास नकार दिला हे खरे नाही. कोणताही गुन्हा संबंधित पोलीस स्टेशनच्या हद्दीमध्ये जर नोंदविला गेला नसेल तर तो शून्य नंबरवर दाखल करुन संबंधित पोलीस स्टेशनकडे ट्रान्सफर करण्याची पध्दत पोलीस खात्यामध्ये आहे.

डॉ.नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, या गुन्हयात पकडण्यात आलेल्या आरोपींची नावे काय आहेत? या गुन्हयाला 20 डिसेंबरला 3 महिने पूर्ण होत आहेत. या कालावधीत जर चार्जशीट दाखल करण्यात आली नाहीतर हा गुन्हा लॅप्स होईल. तेव्हा 20 डिसेंबरपूर्वी आपण चार्जशीट दाखल करणार काय?

श्री. सिध्दाराम म्हेत्रे : या आरोपींची नावे 1) श्री. तुकाराम स्वामी, वय 45 वर्षे, 2) निखील नारायण राजवडकर असून त्यांच्यावर 20 डिसेंबरपूर्वी चार्जशीट दाखल करण्यात येईल.

श्री. केशवराव मानकर : सभापती महोदय, आजच्या वर्तमानपत्रामध्ये एका आदिवासी मुलीवर बलात्कार झाल्याचे वृत्त प्रसिध्द झाले आहे हे खरे आहे काय? तसेच, त्या मुलीला नागपूरच्या वैद्यकीय महाविद्यालयामध्ये भरती करण्यात आले आहे काय?

सभापती : हा विषय वेगळा आहे, माननीय सदस्यांचा प्रश्न उपस्थित होत नाही.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ MHM/ KGS/

तुळजापूर (जि.उस्मानाबाद) येथे भाविकांनी श्रध्देपोटी श्री तुळजाभवानी मातेला वाहिलेल्या ६२५ साड्या कळसी व समई या साहित्याची तसेच देवस्थानच्या दानपेटीतील ३ लक्ष रुपयांची चोरी झाल्याबाबत

(११) * २०८३३ श्री. गोविंदराव आदिक , श्री. संजय दत्त , श्री. सुधाकर गणगणे , श्री.राजन तेली , श्री. रमेश निकोसे , श्री. यशवंतराव गडाख , श्री. रणजितसिंह मोहिते-पाटील , श्री. जितेंद्र आव्हाड , प्रा. फौजीया खान , श्रीमती मंदा म्हात्रे : सन्माननीय उप मुख्य मंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) तुळजापूर (जि.उस्मानाबाद) भाविकांनी श्रध्देपोटी श्री. तुळजाभवानी मातेला वाहिलेल्या ६२५ साड्या, कळसी व समई या साहित्याची दिनांक ३ ऑगस्ट,२००६ रोजी वा त्या दरम्यान तसेच १ नोव्हेंबर, २००६ रोजी देवस्थानाच्या दानपेटीतील ३ लक्ष रुपयांची चोरी झाल्याचे उघडकीस आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार गुन्हेगारांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) अद्याप, कोणतीच कारवाई केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. सिध्दाराम म्हेत्रे, श्री.आर.आर.पाटील यांच्याकरीता : (१) होय.

(२), (३) व (४) दि.१.८.०६ रोजी श्री.तुळजाभवानी मंदिर धार्मिक कार्यालयातील स्टोअररुमध्ये झालेल्या चोरीच्या घटनेबाबत पोलीस ठाणे तुळजापूर येथे गु.र.नं.१३७/०६ कलम ४०८,४०९ भा.दं.वि.प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला या गुन्ह्याच्या तपासात २ संशयीत आरोपींना अटक करुन गुन्ह्याचा तपास करण्यात आला. परंतु गुन्ह्यासंबंधात अद्याप पुरावा हस्तगत झालेला नाही.

दि.१.११.०६ रोजी देवस्थानाचे दानपेटीतील २ ते ३ लक्ष रु.च्या चोरी प्रकरणी पोलीस ठाणे तुळजापूर येथे गु.र.नं.१९२/०६ कलम ४५७,३८० भा.दं.वि.प्रमाणे गुन्हा दाखल केला या गुन्ह्याच्या तपासाकरीता २ आरोपीना अटक करुन तपास करण्यात आला. तपासात चोरीस गेलेल्या ऐवजापैकी धातुचे पाऊल, जोडवे, मोरणी असा एकूण ८४,१६०/- रु.चा ऐवज आरोपीच्या ताब्यातून हस्तगत करण्यात आला.

सदर गुन्हा अधिक पुरावा करणेवर पोलीस तपासावर आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. २०८३३...

श्री. संजय दत्त : सभापती महोदय, असे प्रकार वारंवार घडत असल्याचे दिसून येतात. म्हणून माझा स्पेसिफिक प्रश्न आहे की, मंदिरातील सुरक्षा व्यवस्था कडक करण्यासाठी कोणती कारवाई करण्यात आली आहे?

श्री. सिध्दाराम म्हेत्रे : सभापती महोदय, मंदिराची सुरक्षा व्यवस्था कडक करण्याबाबत सक्त सूचना देण्यात आल्या आहेत?

डॉ.नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, तुळजापूरची देवी महाराष्ट्राचे रक्षण करते असे म्हटले जाते. यापूर्वी देखील साडया चोरण्याचे प्रकार अनेक वेळा घडले आहे. त्या मंदिरामध्ये २४ तास व्हिडिओ शूटींग चालू असते. त्या व्हिडिओ शूटींगच्या कॅसेट कोण बघते? याचे कारण असे की, चोरीचे प्रकार वारंवार होत असल्यामुळे त्या कॅसेटमध्ये काही लोक वारंवार दिसतात काय? त्याबाबतची तपासणी करण्यात येते काय? दुसरा प्रश्न असा की, तुळजापूरच्या मंदिरामध्ये जे लोक येऊन गेले आहेत त्यांच्यावर यापूर्वी गुन्हा दाखल झाला आहे काय? ज्यांनी देवीच्या मंदिरामध्ये चोरी केली आहे तेच लोक मंदिराच्या व्यवस्थेमध्ये सहभागी आहेत काय?

(यानंतर श्री. किल्लेदार)

अप्रधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 20833 (पुढे सुरू...

श्री.सिध्दाराम म्हेत्रे : जोपर्यन्त तुळजामातेचे दर्शन चालू असते, तोपर्यन्त त्या ठिकाणचे व्हीडिओ शुटिंग चालू असते. पैशाची चोरी ही 12 ते 5 या दरम्यान झालेली आहे. या प्रकरणी चोरांना अटक केलेली आहे, त्याच्याकडून माल हस्तगत करण्यात आलेला आहे.

श्री.रामनाथ मोते : या प्रश्नामध्ये दोन घटनांचा उल्लेख करण्यात आलेला आहे. पहिली चोरीची घटना ऑगस्ट 2006 मध्ये घडलेली आहे आणि दुसरी घटना नोव्हेंबर 2006 मधील आहे. नोव्हेंबर 2006 रोजी घडलेल्या घटनेच्या संदर्भात काही आरोपींना अटक केली. इतकेच नाही तर त्यांच्याकडून काही माल जप्त करण्यात आलेला आहे. त्याची किंमत 84 हजार रुपये आहे. या घटनेमधील आरोपी पकडलेले आहेत, त्या आरोपींचा पहिल्या घटनेशी काही संबंध आहे काय, या संबंधाने पोलिसांनी चौकशी केलेली आहे काय ? तिसरा प्रश्न असा आहे की, प्रत्यक्षात आरोपी सापडले, त्यांच्याकडून मुद्देमाल सापडला, असे असताना पुढे असे म्हटलेले आहे की, "गुन्हा अधिक पुरावा करणेवर पोलीस तपासावर आहे." म्हणजे नक्की काय म्हणायचे आहे ?

श्री.सिध्दाराम म्हेत्रे : पहिली घटना वेगळी आहे आणि दुसरी घटना वेगळी आहे. पहिल्या घटनेमध्ये 625 साड्या चोरीला गेलेल्या आहेत. जे पुजारी साड्यांची मोजदाद करत होते त्यांनीच 625 साड्यांचा अपहार केलेला आहे, असे आढळून आल्यानंतर मंदिर समितीने त्या पुजाऱ्याला काढून टाकलेले आहे. दुसऱ्या घटनेमध्ये रात्री 12-00 ते पहाटे 5-00 च्या दरम्यान चोरी केलेली आहे त्यामध्ये 84 हजाराचा माल जप्त करण्यात आलेला आहे. त्याबद्दल अजूनही तपास चालू आहे.

श्री.धोंडीराम राठोड : 625 साड्यांची चोरी करण्यासाठी मोठा वेळ लागतो. त्याच्या बरोबर आणखी काही पुजारी असतील, मित्र असतील त्याबाबत पोलिसांनी तपास केलेला आहे काय ?

श्री.सिध्दाराम म्हेत्रे : पहिल्या घटनेमध्ये 625 साड्यांची चोरी झालेली आहे. साड्या काऊंट करणारे त्यांनीच साड्यांचा अपहार केलेला आहे. दुसऱ्या घटनेमध्ये..

श्री.धोंडीराम राठोड : एकाच माणसाने चोरी केलेली आहे काय ?

श्री.सिध्दाराम म्हेत्रे : त्याचाच तपास चालू आहे.

श्री.प्रकाश शेंडगे : ही घटना ऑगस्ट महिन्यामध्ये घडली. या संबंधात गुन्ह्याचा तपास करून आरोपी पकडे, परंतु ते जामिनावर सुटले . सहा महिने झाले पोलिसांना पुरावा सापडत नाही, त्यामुळे संबंधितांवर गुन्हा दाखल करू शकत नाही. बऱ्याच प्रकारणामध्ये असेच घडते. मग

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ KGS/ MHM/

ता.प्र.क्र.20833 (पुढे सुरू.....

श्री.प्रकाश शेंडगे (पुढे सुरु....

पोलीस खाते काय करते ? या संबंधाने संबंधित पोलीस अधिकाऱ्यांवर आपण काही कारवाई करणार आहात काय ?

श्री.सिध्दाराम म्हेत्रे : पोलिसांनी आरोपींना पकडण्याची कारवाई केलेली आहे. त्या आरोपींना माननीय न्यायालयाने जामिनावर सोडले तर पोलिसांचा यामध्ये काय दोष आहे? पुरावा सापडल्यानंतर न्यायालयात चार्जसीट दाखल करणार आहोत.

3....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ KGS/ MHM/

वन विकास महामंडळ, यावळ (जि.जळगाव) शासनाने बंद करण्याचा निर्णय घेतल्याबाबत

(12) * 24149 श्री.अरुणलाल गुजराथी , श्री. जितेंद्र आव्हाड , श्री. गुरुनाथ कुलकर्णी : सन्माननीय वने मंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) वन विकास महामंडळ, यावळ (जि.जळगाव) शासनाने बंद करण्याचा निर्णय घेतला आहे हे खरे आहे काय,

(2) असल्यास, त्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत,

(3) उक्त महामंडळातील कर्मचाऱ्यांची कोणती पर्यायी व्यवस्था करण्यात येत आहे ?

श्री.बबनराव पाचपुते : (1) वन विकास महामंडळ, यावल (जि.जळगांव) वन प्रकल्प विभाग बंद करण्याचा प्रस्ताव शासनाने मान्य केलेला नाही.

(2) व (3) प्रश्न उद्‌भवत नाही.

श्री.गरूनाथ कुलकर्णी : सभापती महोदय, वन मंत्र्यांना उत्तरामध्ये काही दुरुस्ती करावयाची आहे काय ?

श्री.बबनराव पाचपुते : नाही.

श्री.गुरूनाथ कुलकर्णी : सभापती महोदय, माझे समाधान झालेले असल्यामुळे मला प्रश्न विचारावयाचा नाही.

यानंतर श्री.बरवड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

अमरावती शहर एकात्मिक रस्ते विकास योजनेची कामे अंतिम टप्प्यात आलेली असतांना स्ट्रिट लाईटच्या कामाला अजूनही सुरुवात न होणे

(१३) * २०९२१ प्रा. बी. टी. देशमुख , श्री. व्हि. यू. डायगव्हाणे , श्री. वसंतराव खोटरे , श्री. जी. एल. अैनापूरे : सन्माननीय सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) मंत्री पुढील गोष्टीचा खुलासा करतील काय :-

(१) अमरावती शहर एकात्मिक रस्ते विकास योजनेची कामे अंतिम टप्प्यात आलेली असतांना सहा रस्त्यांच्या बाबतीत स्ट्रिट लाईटची कामे व सर्वच रस्त्याच्या बाबतीत स्ट्रिट फर्निचर, सायनेजेस व सिग्नल व्यवस्थेच्या कामाला सुरुवात झालेली नाही हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने काय कार्यवाही केली आहे,

(३) अद्याप कारवाई केलेली नसल्यास याबाबत होणाऱ्या विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. अनिल देशमुख : (१) होय.

(२) पथदिवे, रोड मार्किग पट्टा,पेंटींग,साईन व कॉशन बोर्डाच्या कामांसाठी निविदा प्रक्रिया सरु आहे.

(३) उपरोक्त क्र.२ प्रमाणे आवश्यक प्रक्रिया पूर्ण न झाल्याने कामे सुरु झाली नाही.

श्री. वसंतराव खोटरे : सभापती महोदय, अमरावती शहर एकात्मिक रस्ते विकास योजनेची कामे जवळपास अंतिम टप्प्यामध्ये आलेली आहेत. त्या ठिकाणी अतिशय चांगले रस्ते झालेले आहेत. त्याबद्दल मी शासनाला धन्यवाद देतो. परंतु आता त्यामध्ये हत्ती गेला आणि शेपूट राहिले या पध्दतीने काही कामे राहिलेली आहेत. पथदिवे, रोड मार्किंग पट्टा, पेंटींग, साईन व कॉशन बोर्डाच्या कामांसाठी निविदा प्रक्रिया सुरु आहे त्याला एवढा उशीर का लागला ? आपल्या अधिकाऱ्यांना सूचना देऊन ही निविदा प्रक्रिया ताबडतोब करुन उपरोक्त कामे एक महिन्याच्या आत पूर्ण करणार काय ?

श्री. अनिल देशमुख : अमरावती शहर सुंदर व्हावे यादृष्टीने एकात्मिक रस्ते विकास प्रकल्प आमच्या खात्याच्या माध्यमातून हाती घेतला. त्याची कामे अंतिम टप्प्यामध्ये आहेत आणि अमरावती शहरामध्ये अतिशय चांगली कामे या प्रकल्पाच्या माध्यमातून झालेली आहेत. त्यामुळे संपूर्ण शहर बदलून गेलेले आहे अशी परिस्थिती आहे. स्ट्रीट लाईट, प्लास्टींक पेंटींग वगैरे अंतिम टप्प्यामधील कामे बाकी आहेत. त्या कामांचे टेंडर झालेले आहेत आणि संपूर्ण टेंडर्स फायनल होऊन फेब्रुवारी महिन्यामध्ये कामे करुन ही कामे लवकरात लवकर पूर्ण करण्यात येतील.

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सिंधुदुर्ग जिल्ह्यातील कणकवली ते शिवडाव-दारिस्ते ह्या कि.मी.२/० ते ३/०, ५/० ते ३/० मधील आवश्यक वळण दुरुस्ती कामाच्या सद्य:स्थितीबाबत

(१४) * २३८४२ श्री. अरविंद सावंत , श्री. गुरुनाथ कुलकर्णी : सन्माननीय सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सिंधुदुर्ग जिल्ह्यातील कणकवली ते शिवडाव-दारिस्ते ह्या कि.मी.२/० ते ३/०, ५/० ते ३/० मधील आवश्यक वळण दुरुस्ती हे विशेष दुरुस्ती कार्यक्रमात अंतर्भूत असलेले काम पूर्ण झाले आहे काय,

(२) रस्त्याचे उपरोक्त काम पूर्ण होण्याच्या दृष्टीने किती रुपये निधीची आवश्यकता आहे शासनाने नोव्हेंबर २००६ अखेर किती निधी उपलब्ध करुन दिलेला आहे,

(३) उपरोक्त काम अद्याप हाती घेतले नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. छगन भुजबळ : (१) नाही.

(२) व (३) उपरोक्त काम करण्यासाठी रु.५.० लक्ष अनुदानाची आवश्यकता आहे. काम मंजूर नसल्याने कामाला निधी उपलब्ध झालेला नाही.

श्री. गुरुनाथ कुलकर्णी : सभापती महोदय, पाच लाखाचे हे वळण काढण्याचे काम आहे. हे काम लवकर करावे अशी विंनती आहे.

श्री. छगन भुजबळ : हे काम ताबडतोब करण्यात येईल.

..3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ KGS/ MHM/

मौजे सांगवे (ता.कणकवली, जि.सिंधुदूर्ग) येथील तेलंगवाडीतील ५०० मीटर रस्त्याचे काम डोंगरी विकास योजनेतून करण्यातावत

(१५) * २०९७८ मेजर सुधीर सावंत , श्री. सुधाकर गणगणे , श्री. संजय दत्त , श्रीमती सुधा जोशी : सन्माननीय सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे सांगवे (ता.कणकवली, जि.सिंधुदूर्ग) येथील तेलंगवाडीतील ५०० मीटर रस्त्याचे काम डोंगरी विकास योजनेतून करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक ८ डिसेंबर, २००५ रोजी मा. महसूल मंत्री यांना निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत कोणत्या स्वरुपाची कार्यवाही करण्यात आली आहे काय,

(३) असल्यास, कामाची सद्य:स्थिती काय आहे,

(४) अद्याप कार्यवाही करण्यात आली नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत?

श्री. छगन भुजबळ : (१) सा.बां. विभागाकडे निवेदन प्राप्त नाही.

(२) (३) व (४) सदर कामाचे अंदाजपत्रकास मंजूरीसाठी जिल्हाधिकारी ,सिंधुदुर्ग यांचेकडे पाठविले असून कामास मंजूरी मिळाल्यानंतर उपलब्ध निधीच्या अधिन राहून काम हाती घेण्यात येईल.

श्री. संजय दत्त : हे काम कधी करण्यात येईल ?

श्री. छगन भुजबळ : हे काम ताबडतोब केले जाईल.

श्री. संजय दत्त : सभापती महोदय, माननीय मंत्रिमहोदयांच्या उत्तरामुळे माझे समाधान इ ाालेले आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ KGS/ MHM/

सावकारपुरा अंजनगाव (जि.अमरावती) येथे श्री.ओमप्रकाश नर्सिंगदास सारडा गेले असता त्यांना पोलीस निरीक्षक श्री.मोहन क्षीरसागर यांनी मारहाण केल्याबाबत

(१६) * २२९१५ श्री. जगदीश गुप्ता , श्री. पांडुरंग फुंडकर , श्री. नितीन गडकरी : सन्माननीय उप मुख्य मंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) श्री.ओमप्रकाश नर्सिंगदास सारडा, रा.सावकारपूरा, अंजनगांव (सुर्जी) जि.अमरावती हे दिनांक १५ ऑक्टोबर, २००६ ला पोलीस अंजनगांव सुर्जी येथे गेले असतांना त्यांना पोलीस निरीक्षक श्री.मोहन क्षीरसागर यांनी अतिशय क्रुरपणे मारहाण केली, उक्त घटनेची तक्रार त्यांच्या वडिलांनी जिल्हा पोलीस अधिक्षकाकडे दिनांक १६ सप्टेंबर, २००६ रोजी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास,उक्त प्रकरणी काय चौकशी केली वा करण्यात येत आहे,

(३) असल्यास, दोषींवर काय कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय ?

श्री.सिध्दाराम म्हेत्रे, श्री. आर.आर.पाटील यांच्याकरिता : (१) दि.१६ सप्टेंबर, २००६ रोजी श्री.ओमप्रकाश सारडा आणि त्यांचा मुलगा पवन सारडा यास झालेल्या मारहाणीची चौकशी व्हावी अशा आशयाची तक्रार पोलीस अधिक्षक, अमरावती यांच्याकडे केली आहे.

(२), (३) व (४) सदर तक्रारीच्या अनुषंगाने पोलीस ठाणे, अंजनगाव येथे श्री.क्षीरसागर यांच्याविरुध्द असंज्ञेय गुन्हा क्र.८७९/०६, कलम ३२३ भा.दं.वि.प्रमाणे नोंदविण्यात आला आहे. सदर तक्रारीची चौकशी अपर पोलीस अधीक्षक, अमरावती करीत आहे.

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, श्री. ओमप्रकाश सारडा आणि त्यांचा मुलगा श्री. पवन सारडा हे 15 सप्टेंबर, 2006 ला अंजनगावसुर्जी पोलीस स्टेशनमध्ये तक्रार दाखल करण्यासाठी गेले असता तेथील पोलीस निरीक्षकाने त्यांना 16 तारखेला मारहाण केली. 15 तारखेला ज्यांना मारहाण झाली ते तक्रार देण्यासाठी आले असता त्यांनाच मारहाण केली. याबाबत त्यांनी तक्रार केली. तक्रार केल्यानंतर त्यासंदर्भात उत्तरामध्ये असे म्हटले आहे की, श्री. क्षीरसागर यांच्याविरुध्द असंज्ञेय गुन्हा क्र. 897/06, कलम 323 भा.दं.वि. प्रमाणे नोंदविण्यात आला आहे. सदर तक्रारीची चौकशी अपर पोलीस अधीक्षक, अमरावती करीत आहेत. ही चौकशी किती दिवस चालणार ? सप्टेंबर महिन्यामध्ये घटना घडलेली आहे. यामध्ये एक मारणारा आणि दुसरा मार खाणारा आहे याच्या पलीकडे दुसरी काय चौकशी करणार आहात ? या चौकशीला विलंब लागण्याचे कारण काय ? ही चौकशी किती दिवसात पूर्ण करणार ?

श्री. सिध्दाराम म्हेत्रे : ही चौकशी लवकरात लवकर म्हणजे एक महिन्याच्या आत पूर्ण करण्यात येईल.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ KGS/ MHM/

नवी मुंबई व मुंबईतील डोगरी विभागात हजार व पाचशे रुपयांचा बनावट नोटा जप्त केल्याबाबत

(१७) * २०९९९ श्री. संजय दत्त , श्री. यशवंतराव गडाख , श्री. गोविंदराव आदिक , श्री. धनाजी साठे : सन्माननीय उप मुख्य मंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नवी मुंबई व मुंबईतील डोगरी विभागात दिनांक ७ सप्टेंबर,२००६ रोजी वा त्या दरम्यान हजार व पाचशे रुपयांचा बनावट नोटा जप्त करण्यात आल्या आहेत ,हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या घटनेची चौकशी करण्यात आली आहे काय,

(३) असल्यास, बनावट नोटा चलनात वापर करणाऱ्याविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) अद्याप, कोणतीच कारवाई केली नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. सिध्दाराम म्हेत्रे, **श्री.आर.आर.पाटील यांच्याकरिता** : (१) दिनांक २८.८.०६ रोजी नवी मुंबई पोलीसांनी छापा टाकून ४ इसमांना पकडून त्यांच्याकडून ५०० रुपयाच्या १० नकली नोटा जप्त करण्यात आल्या.

डोंगरी पोलीस ठाण्यामध्ये बनावट नोटाबाबत गुन्हा घडलेला नाही.

(२) (३) व (४) सदर घटनेबाबत नेरुळ पोलीस ठाणे येथे गु.र.नं.३०४/०६ भा.दं.वि.सं.कलम ४८९(ब), ४८९ क, (४), ४२०क, ४७१,३४ अन्वये दि.२८.८.०६ रोजी गुन्हा नोंदविण्यात आला आहे. तपासामध्ये सदरच्या नोटा ह्या दुबई येथे राहणारा केरळ राज्यातील भारतीय नागरीक यांना पाठविलेल्या असल्याचे निष्पन्न असून आहे. सदर प्रकरणी १२ इसमाना अटक करण्यात येऊन त्यांच्याकडून ५०० व १००० रु.च्या ८९,५०० रु.मुल्य असलेल्या १६४ नकली नोटा जप्त करण्यात आल्या आहेत. अद्याप चार आरोपी फरार असून गुन्ह्याचा तपास चालू आहे.

श्री. संजय दत्त : उत्तरामध्ये असे म्हटले आहे की, तपासामध्ये सदरच्या नोटा ह्या दुबई येथे राहणारा केरळ राज्यातील भारतीय नागरिक यांना पाठविलेल्या असल्याचे निष्पन झाले आहे. या कटात विदेशात धागेदोरे सापडल्याचे निष्पन्न झाले आहे काय ?

श्री. सिध्दाराम म्हेत्रे : या प्रकरणाची तपासणी झालेली आहे त्यामध्ये असे घागेदोरे आतापर्यंत निष्पन्न झालेले नाहीत. परंतु ते लवकरात लवकर निष्पन्न होण्याची शक्यता आहे.

सभापती : प्रश्नोत्तराचा तास संपलेला आहे. आज सभागृहातील दोन्ही बाजूच्या सन्माननीय सदस्यांनी सहकार्य केल्यामुळे 17 प्रश्नांची चर्चा पूर्ण केलेली आहे. अशीच परंपरा ठेवली तर पाच सहा प्रश्नांवरुन बारा चौरा प्रश्नांपर्यंत आपण सहज जाऊ. त्याकरिता सन्माननीय सदस्यांनी मला जरुर असेच सहकार्य करावे.

यानंतर श्री. शिगम... j

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी.: वणी (जि.यवतमाळ) येथील कृषी उत्पन्न बाजार समितीच्या यार्डामध्ये पोलिसांनी केलेल्या गोळीबारात शेतक-याचा झालेला मृत्यू

मु.शी.: वणी (जि.यवतमाळ) येथील कृषी उत्पन्न बाजार समितीच्या यार्डामध्ये पोलिसांनी केलेल्या गोळीबारात शेतक-याचा झालेला मृत्यू या विषयावर सर्वश्री नितीन गडकरी, पांडुरंग फुंडकर, विनोद तावडे, केशवराव मानकर, जगदीश गुप्ता, पाशा पटेल, गुरुमुख जगवानी,मधुकर चव्हाण, सागर मेघे, संजय केळकर, रामनाथ मोते, प्रतापराव सोनवणे, श्रीमती (डॉ.) नीलम गो-हे, सर्वश्री गोपीकिशन बाजोरीया, सुरेश जेथलिया आणि परशुराम उपरकर, वि.प.स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

सभापती : सन्माननीय सदस्य सर्वश्री नितीन गडकरी, पांडुरंग फुंडकर, विनोद तावडे, केशवराव मानकर, जगदीश गुप्ता, पाशा पटेल, गुरुमुख जगवानी, मधुकर चव्हाण, सागर मघे, संजय केळकर, रामनाथ मोते, प्रतापराव सोनवणे, डॉ. नीलम गो-हे, सर्वश्री गोपीकिशन बाजोरीया, सुरेश जेथलिया आणि परशुराम उपरकर, वि.प.स. यांनी "वणी (जि.यवतमाळ) येथील कृषी उत्पन्न बाजार समितीच्या यार्डामध्ये पोलिसांनी केलेल्या गोळीबारात शेतक-याचा झालेला मृत्यू" या विषयावर नियम 93 अन्वये प्रस्तावाची सूचना दिली आहे व मी त्यास अनुमती दिली आहे. माननीय सदस्यांनी प्रस्ताव मांडावा.

श्री. पांडुरंग फुंडकर (विरोधी पक्षनेता) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने माझा प्रस्ताव मांडतो.

"ज्याअर्थी, यवतमाळ जिल्ह्यातील वणी येथे कृषी उत्पन्न बाजार समितीच्या यार्डामध्ये गेल्या दोन दिवसापासून हजार ते पंधराशे कापसाने भरलेल्या बैलबंड्या उभ्या असून, आणि

ज्याअर्थी, दररोज साधारणत: 400 ते 500 बैलबंड्यांची मोजणी करणे आवश्यक असतना पणन महासंघाचे ग्रेडर केवळ 20 ते 25 बैलबंड्या मोजण्याकरिता घेत असल्यामुळे शेतक-यांचा मानसिक व शारीरिक छाळ होणे, आणि

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. पांडुरंग फुंडकर...)

ज्याअर्थी, कृषी उत्पन्न बाजार समितीच्या यार्डात कापूस ठेवण्याकरिता जागा नसल्याचे कारण सांगून शेतक-यांचा कापूस मोजण्यास नकार देणे, आणि

ज्याअर्थी, पणन महासंघाचे झोनल मॅनेजर, श्री. कोहारकर व कृषी उत्पन्न बाजार समितीचे सचिव, श्री. लडके आणि सी.सी.आय.चे श्री. शुक्ला यांच्याशी शेतक-यांनी चर्चा् केल्यानंतर कोणताही तोडगा न निघाल्यामुहे शेतक-यांचा असंतोष उफाळून येणे, आणि

ज्याअर्थी, वणी (जि. यवतमाळ) येथे दिनांक 8 डिसेंबर, 2006 रोजी दुपारी 12.30 वाजता शेतक-यांवर पोलिसांनी केलेला गोळीबार, त्यामध्ये श्री. पांडुरंग गोविंद जुमनाके (रा. सेलू, ता. वणी) या शेतक-याला गोळी लागून गंभीररित्या जखमी होणे, आणि,

ज्याअर्थी, त्याच दिवशी दुपारी 3.30 वाजता पोलिसांनी पुनश्च शेतक-यांवर केलेल्या गोळीबारात दोन शेतकरी अत्यंत गंभीर जखमी होणे आणि श्री. दिनेश तुकाराम घुगुल (रा. मेंढोली, ता. वणी) या शेतक-याच्या छातीला गोळी लागून घटनास्थळीच मृत्यू पावणे, आणि

ज्याअर्थी, शेतक-यांचे आंदोलन आटोक्यात आणण्यासाठी लाठीमार, अश्रुधूर यांचा वापर करुन परिस्थिती नियंत्रणात येणे शक्य असताना पोलीस अधिक्षकांनी गोळीबाराचे दिलेले आदेश, आणि

ज्याअर्थी, वणी शहरामध्ये पोलिसांनी लावलेली संचारबंदी आणि त्यामुळे निर्माण झालेले तणावाचे वातावरण

या विषयावर चर्चा करण्यासाठी हे सभागृह तीव्र चिंता व्यक्त करते."

...नंतर श्री. गागरे...

अप्रुव्हीत प्रत / प्रतिक्षेसाठी नाही

सभापती : नियमाप्रमाणे या विषयावरील चर्चेसाठी दोन तास दिलेले आहेत. या दोन तासात सर्व सन्माननीय सदस्यांची भाषणे व त्यावरील मंत्री महोदयांचे उत्तर हे पूर्ण झाले पाहिजे. त्यातून जर वेळ राहिला तर ज्यांनी चर्चा उपस्थित केली त्या विरोधी पक्षाच्या सदस्यांना प्रश्न उपस्थित करता येतील व मंत्री महोदय त्याला उत्तर देऊ शकतील. परंतु ही सर्व प्रक्रिया दोन तासात पूर्ण होणे आवश्यक आहे. त्यानंतर या प्रस्तावावर या सदनात मतदान घेण्यात येईल.

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, इतक्या गंभीरपणे आपण इतर कामकाज बाजूला सारुन या ठिकाणी चर्चा करण्यासाठी परवानगी दिली त्याबद्दल आभारी आहे. पण सरकार किती गंभीर आहे याचाही विचार केला पाहिजे. आमच्या प्रस्तावानुसार दोन विभागाचा त्याच्याशी संबंध आहे. ही घटना घडल्यानंतर त्यावर चर्चा करताना पणन मंत्री सभागृहात उपस्थित नसतील तर चर्चा कशासाठी करायची ? कापूस खरेदी हे मूळ कारण आहे असे पणन मंत्री सभागृहात बोलले आहेत. आम्ही कशासाठी चर्चा करायची ? कापसाच्या खरेदीच्या प्रश्नाबाबत ज्यावेळी सभागृहात सर्व विषय बाजूला सारुन चर्चा होते त्यावेळी पणन मंत्र्यांनी सभागृहात उपस्थित राहीले पाहिजे, त्यांनी कापसाची खरेदी केली पाहिजे, म्हणून अशा गंभीर विषयावरील चर्चेच्या वेळी पणन मंत्री सभागृहात उपस्थित राहिले नाहीत तर वांझोटी चर्चा होईल.

श्री.अनिल देशमुख : सभापती महोदय, याच विषयावर खालच्या सभागृहात चर्चा सुरु आहे, संबंधित मंत्री महोदय ती चर्चा संपल्यानंतर या सभागृहात येतील.

श्री.मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, खालच्या सभागृहात चर्चा चालू असताना या सभागृहाकडे दुर्लक्ष करावे असा काही नियम आहे का ?

सभापती : त्या चर्चेचा संबंध नाही. आपण टिपणे लिहून घ्यावीत. सदरहू प्रश्नाचे उत्तर देण्यासाठी संबंधित मंत्री महोदय येतील, त्यावेळी उत्तर देण्यासाठी या टिपणाचा उपयोग होईल.

श्री.पांडुरंग फंडकर : ही निंदनीय बाब आहे, हे सर्वोच्च सभागृह आहे. शेतकऱ्यांवर इ ाालेल्या गोळीबाराच्या चर्चेच्या वेळी उपमुख्यमंत्री उपस्थित राहात नाही, पणनमंत्री उपस्थित राहात नाही. गोळीबारावर मात्र चर्चा सुरु होत आहे. एकही संबंधित मंत्री येथे उपस्थित नाही. पणनमंत्री नसतील तर उपमुख्यमंत्री यांनी येथे उपस्थित राहून उत्तर देणे गरजेचे आहे. काल उपमुख्यमंत्री वणीला जाऊन आले, आम्ही सोबत होतो. ते उपस्थित असणे आवश्यक आहे नाही तर या चर्चेला अर्थ राहणार नाही. 2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सभापती : पणनमंत्री किंवा उपमुख्यमंत्री यापैकी कोणीतरी या महत्वाच्या चर्चेकरीता येथे उपस्थित राहण्यासाठी प्रयत्न करावा.

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, हे सरकार शेतकऱ्यांच्या प्रश्नाबद्दल किती उदासीन आहे, हे यावरुन लक्षात येत आहे. ही गंभीर घटना वणीसारख्या गावामध्ये घडली, त्या ठिकाणी शेतकऱ्यांना गोळया मारल्या जातात, त्यांची हत्या केली जाते. विधीमंडळाचे अधिवेशन चालू असताना ही घटना घडते. या अधिवेशनात सभागृहात चर्चा सुरु असताना मंत्री महोदय अनुपस्थित राहतात या पेक्षा विदर्भातील शेतकऱ्यांचे दुसरे दुर्दैव असू शकत नाही. सभापती महोदय, वणी झोन मध्ये सर्वात जास्त कापसाचे उत्पादन व खरेदी होत असते. सर्वात मोठी कापसाची आवक असताना त्या ठिकाणी पणन महासंघाच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांकडून दुर्लक्ष केले गेले. धनत्रयोदशीला किंवा दिवाळी झाल्यानंतर कापूस खरेदी सुरु करावयास पाहिजे.

.... यानंतर श्री.सोनावणे

अप्रधारित प्रत / प्रारूपासाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर...

नागपूर मध्ये अधिवेशन सुरु आहे म्हणून दोन कापूस खरेदी केंद्रे सुरु करावी लागली. या वणी केंद्राची कॅपेसीटी कमी आहे. त्या ठिकाणी 4 फॅक्टरी आहेत त्या 4 फक्टरीपैंकी एक फॅक्टरी सुरु केली, 4 फॅक्टरीपैकी आणखी दोन फॅक्टरी सुरुवात केल्यानंतर वणी येथील बाजार खऱ्या अर्थाने कापूस पिकविणाऱ्या पट्यात असताना त्या ठिकाणी केंद्र सुरु केले नाही. कापसाच्या गाडया वाढल्या गेल्या 20 ते 25 दिवसात पणन महासंघाच्या भावा बरोबरच व्यापाऱ्यांचे भाव आल्यामुळे आणि सीसीआयने सुध्दा आपला हात आखडता घेतल्यामुळे शेतकरी पणन महासंघाला कापूस विकण्यासाठी आल्याने त्यातून आवक वाढली. वणी येथील 3 केंद्रांवर खरेदी सुरु असल्यामुळे सीसीआयने एकच फॅक्टरी उघडली त्याचा परिणाम आवक वाढण्यामध्ये झाला. त्याप्रमाणे शेतकऱ्यांच्या गाडयांची मोजणी झाली. एका बाजूला शेतकऱ्यांच्या गाडयांची संख्या वाढून ती दीड ते दोन हजार झाली. कृषी उत्पन्न बाजार समितीला दोन ते सव्वादोनशे पेक्षा अधिक गाडया सोडू नका असे आदेश देण्यात आले. त्यातून कृषी उत्पन्न बाजार समितीने सव्वादोनशे गाडयांना टोकन देणे सुरु केले गाडया रिकाम्या न झाल्यामुळे त्यांची संख्या वाढत चालली एकीकडे आठ-आठ दिवस गाडया रांगेत उभ्या होत्या. थंडीचे दिवस सुरु आहेत आठ दिवस गाडया एकाच ठिकाणी उभ्या असल्यामुळे बैल देखील त्याच जागेवर उभे होते बैलांना खायला चारा नाही, प्यायला पाणी नाही. अशा परिस्थिती शेतकरी आपल्या बैलांना चारा आणू शकत नाही. त्यातून मग असंतोष वाढत गेला. 8 डिसेंबराला सकाळी खरेदी सुरु झाली. त्या ठिकाणी सीसीआयच्या ग्रेडरने कापसाच्या गाडीच्या लाईनमध्ये जाऊन गाडीतील कापूस तपासायला सुरुवात केली. कापसामध्ये मॉईश्चर असल्याचे पाहून त्या ग्रेडरने एकाही गाडीमधील कापूस घेतला नाही. पणन महासंघाच्या वतीने 25 गाडयांना टोकन देण्यात आले. ही बातमी कळल्यानंतर शेतकऱ्यांमध्ये कुजबूज सुरु झ ाली. मग मागणी केली गेली की, सव्वादोनशे गाडयांचा लॉट सोडावा परंतु महासंघाच्या अधिकाऱ्यांनी ती मागणी मान्य केली नाही. सीसीआयला मी दोष देत नाही. पणन महासंघाचे अधिकारी याला जबाबदार आहेत. पणन महासंघाचे अधिकारी कृषी उत्पन्न बाजार समितीच्या कार्यालयात गेले असता शेतकऱ्यांनी आमचा कापूस घ्यावा अशी मागणी केली. काही वेळात तेथे जमाव वाढला. वास्तविक शेतकऱ्यांबरोबर चर्चा करणे आवश्यक असताना ती केली गेली नाही व अधिकांऱ्यांनी पोलिसांना फोन लावला ताबडतोब पोलिसांची गाडी आली.

श्री. पांडुरंग फुंडकर...

पोलिसांनी मध्यस्थी करण्याचा प्रयत्न न करता कृषी उत्पन्न बाजार समितीच्या इमारतीमधून जे शेतकरी मैदानावर उभे होते, बाजार समितीच्या आवारात उभे होते व कापूस खरेदी करण्याबाबत मागणी करीत होते त्यांच्याकडे लक्ष दिले नाही. 2700 रुपये भाव द्यावा अशी त्यांनी मागणी केली नव्हती. आठ दिवस त्यांच्या बैलांना प्यायला पाणी नाही, खायला चारा नाही अशा परिस्थितीत त्यांनी फक्त आमचा कापूस विकत घ्या एवढीच मागणी केली होती. परंतु पणन महासंघाच्या अधिकाऱ्यांनी त्यांच्याशी चर्चा न करता पोलिसांना बोलाविले व शेतकऱ्यांवर गोळीबार करण्यात आला. यामध्ये मला असा संशय येतो की, नागपूर अधिवेशन ज्या दिवशी सुरु झाले त्या दिवशी खैरलांजी प्रकरणाच्या निषेधार्थ दलित नेत्यांनी मोर्चा काढावयाचे ठरविले होते. ज्या पध्दतीने त्यांनी मार्चा काढावयाचा प्रयत्न केला त्या मोर्चाला परवानगी नाकारण्यात आली. नागपूर मध्ये प्रत्येक अधिवेशनाच्या वेळेस असंख्य मोर्चे निघत असतात परंतु कोणत्याही मोर्चाला परवानगी नाकाराण्याचे शक्यतो प्रयत्न केले जात नाही. मात्र शासनाने पोलीस दलाचा वापर करुन दलित नेत्यांना अटक करण्याचे धाडस केले व दहशत निर्माण केली याचे अनुकरण यवतमाळच्या एसपीने केले. पोलिसांनी तेथे आल्यानंतर शेतकऱ्यांची मागणी विचारात घेतली नाही. कापूस विक्रीसाठी खरेदी केंद्रावर उभ्या असलेल्या गाडया मोजून घेऊ.....

यानंतर श्री. भोगले....

अप्रधारित प्रत / प्रतिक्षेपणी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर.....

असे आश्वासन द्यायलाही पणन महासंघाचे अधिकारी तयार नव्हते. त्यांनी पोलिसांना बोलावले. गोळ्या झाडल्या. दुपारी 12.30 वाजता पहिला गोळीबार झाला. त्यामध्ये पांडुरंग जुमनाके हा सेलू येथे राहणारा शेतकरी, याच्या पायाला गोळी लागली. तो जखमी झाल्यानंतर तेथील जमाव पांगला. शेतकरी घाबरले आणि पळायला लागले. पोलिसांनी पहिल्यांदा गोळीबार गेला. मग लाठ्या हातात घेतल्या आणि पळणाऱ्या शेतकऱ्यांना मारण्यास सुरुवात केली. कृषि उत्पन्न बाजार समितीच्या आवाराबाहेरील मैदानावर शेतकरी जमले होते. ते आपला मौल्यवान माल, कष्ट करुन, आपला घाम गाळून त्यांनी आपल्या वर्षाच्या पोटाच्या भाकरीचे साधन म्हणून जो माल पिकविला होता तो तिथेच सोडून शेतकरी सैरावैरा पळायला लागले. ते शहराच्या दिशेने पळायला लागले. पोलीस, एसआरपीचे जवान त्यांचे मागे आणि पुढे शेतकरी असे चित्र निर्माण झाले. ही बातमी एस.पी.ना समजली. त्यांना सांगण्यात आले की, दगडफेक झाली आहे. कोणत्याही ॲक्शनची रिॲक्शन ही होत असते. काही गुन्हा नसताना तुम्ही जर गोळ्या झाडणार असाल तर शेतकरी नक्की एक दगड तरी मारणारच. त्या गोळीबाराची चीड म्हणून छोट्या प्रमाणात दगडफेक सुरु झाली. त्या दगडफेकीचे निमित्त करुन पुन्हा 3.00 ते 3.30 च्या सुमारास तेथील एस.पी.श्री.अब्दुल रेहमान तेथे आले. या व्यक्तीचे कर्तृत्व काय आहे हे चंद्रपूरवासियांनी पाहिले आहे. तीन महिन्यातच त्यांची तेथून यवतमाळला बदली झाली. यवतमाळमध्ये कोणकोणते अवैध धंदे चालू आहेत याचा मंत्रीमहोदयांनी गुप्तचर विभागामार्फत शोध घ्यावा. ते कोणत्या पध्दतीने आपले कर्तव्य बजावत आहेत याचा तपास करावा. जातीय सलोखा बिघडविण्याचे काम हा अधिकारी करीत आहे. हे एस.पी. महोदय घटनास्थळी 3.30 वाजता पोहोचले. त्यांनी त्या ठिकाणी कोणतीही चर्चा केली नाही. एस.पी.ची गाडी कृषि उत्पन्न बाजार समितीच्या इमारतीमध्ये आली. तेथून त्यांनी आदेश दिली आणि पुन्हा गोळीबार करण्यात आला.

सभापती महोदय, आपले आयुष्य राजकारणात गेले आहे. आपण स्वत: या राज्याचे गृहमंत्रीपद सांभाळलेले आहे. ज्यावेळी गोळीबाराचा आदेश दिला जातो त्यावेळी महसूल विभागाच्या उपविभागीय अधिकाऱ्यांची परवानगी घ्यावी लागते. काय बिकट परिस्थिती निर्माण झाली आहे?कशामुळे परिस्थिती निर्माण झाली आहे? यासंबंधी महसूल विभागाच्या उपविभागीय अधिकाऱ्यांचे मत घेतले जाते. त्यानंतर ते परिस्थिती पाहून आदेश काढतात आणि मगच पोलीस

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर.....

गोळीबार करतात. परंतु अशा प्रकारे आदेश दिल्यानंतर देखील तो गोळीबार कमरेखाली करण्याचा असतो. वन बोअरच्या बंदुकीमधून गोळीबार केला जातो. सभापती महोदय, काल माझ्यासोबत सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते देखील होते. आम्ही घटनास्थळी भेट देऊन माहिती घेण्याचा प्रयत्न केला. आम्हाला असे आढळून आले की, गोळीबार वन बोअरच्या बंदुकीमधून करण्यात आला नव्हता. आज अतिमहत्वाच्या व्यक्तींसाठी जे सुरक्षा रक्षक तैनात केले जातात त्यांच्याकडे जी कार्बन असते, तशा प्रकारच्या कार्बनमधून गोळीबार करण्यात आला. या कार्बनचे बटण दाबले की असंख्य गोळ्या बाहेर पडतात. कार्बनमधून गोळीबार कोणावर केला जातो? शेतकरी हे अतिरेकी नव्हते. सीमेवर युध्द सुरु आहे आणि शत्रू राष्ट्राचे सैन्य समोर असेल तर त्यांच्यावर मशिनगनमधून, कार्बनमधून गोळीबार केला जातो. परंतु याठिकाणी तशी परिस्थिती नव्हती. पोलिसांनी कार्बनमधून 32 राऊंड फायर केले. शेतकऱ्यांना पळण्याची संधी मिळाली नाही. पायावर गोळीबार केला नाही. दिनेश घुगुल हा 40 वर्षाचा शेतकऱ्याचा मुलगा त्याच्या बंडीवर बसला होता. त्याचा दोष काय होता? तो दगडफेकीमध्ये सामील नव्हता. हिंसक कारवाईमध्ये सहभागी नव्हता. आपल्या मालाचे संरक्षण करता यावे म्हणून तो कापसाने भरलेल्या बंडीवर बसला होता. त्याला नेम धरुन त्याच्या छातीवर गोळी झाडण्यात आली.

(नंतर श्री.जुन्नरे...

अप्रधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर .....

सभापती महोदय, बैल-बंडीवर बसलेल्या शेतक-यावर पोलिसांनी गोळीबार केलेला आहे. या गोळीबारामध्ये मृत पावलेल्या दिनेश घुगुल या शेतक-याच्या घरी मी काल गेलो होतो. दिनेशच्या घरची परिस्थिती अत्यंत दयनीय आहे. या घरातील एकुलता एक कमवता,कर्ता मुलगा पोलिसांच्या गोळीबारात मृत झालेला आहे. या मुलाचे वडील आणि आई अंध असून त्याला चार बहिणी आहेत. या चार बहिणींपैकी 3 बहिणींचे लग्न झालेले असून एक मुलगी घरात आहे. दिनेशला लहान एक लहान मुलगा व एक मुलगी आहे. या मुलाचे लग्न झालेले नाही. काल माननगीय गृहमंत्री दिनेशच्या घ्यरातून निघून गेल्यानंतर मी पाच मिनिटात तेथे पोहचलो. मला पाहिल्यानंतर घरातील 8-10 वर्षाची छोटी मुलगी मुर्छीत होऊन पडली. या घरात आता कोणतीही कमवती व्यक्ती राहिलेली नाही. आता या घराला आधार कोण देणार आहे हा माझा आपल्याला सवाल आहे? दिनेशच्या वडीलांचा म्हतारपणातील आधार निघून गेलेला आहे. वणी येथील गोळीबारात पोलिसांनी नेम धरुन, पाखरांना मारतात तसे शेतक-यांना टिपलेले आहे. दिनेश घुगुळच्या छातीतून गोळी निघुन दुस-या बैल-बंडीवर बसलेल्या धनराजच्या हाताला लागून त्याचा हात फ्रॅक्चर झालेला असून तो जखमी झ ाालेला आहे. त्यामुळे मी या घटनेचा धिक्कार करतो. या गोळीबारामध्ये दरवाजामध्ये उभी असलेली प्रेगनंन्ट गीता जैन हिच्या हाताला गोळी लागून ती जखमी झालेली आहे. गीता जैन या महिलेच्या घरी सन्माननीय सदस्य डॉ. नीलम गो-हे जाऊन आलेल्या आहेत. नराधमाला शोभणार नाही, औरंगजेबाला मान खाली घालावी लागली असती असा गोळीबार एस.पी. अब्दूल रहमान याने केलेला आहे. त्यामुळे या प्रकरणाची न्यायालयीन चौकशी होण्याची आवश्यकता आहे. कापूस पिकविणा-या शेतक-याचा मुडदा एस.पी. अब्दूल रहमान याने पाडलेला आहे त्यामुळे या एास.पी. वर तुम्ही कोणती कारवाई करणार आहात? या गोळीबाराची न्यायालयीन चौकशी झाली पाहिजे अशी माझी मागणी आहे. सभापती महोदय, दिवाळीमध्ये आपण कापसाच्या खरेदीला सुरुवात करीत असतो. सभापती महोदय, मी कोरडवाहू कापूस उत्पादक शेतक-याचा मुलगा आहे. 1972 मध्ये माननीय यशवंतराव मोहिते यांनी मोहित्यांची मंजुळा म्हणून एकाधिकार कापूस खरेदी योजना सुरु केली होती. ही योजना कापूस उत्पादक शेतक-याला पैसा देणारी योजना होती. परंतु आपण ही योजना मोडीत काढून केंद्रशासनाच्या हमी भावाप्रमाणे तीन वर्षापासून शेतक-यांचा

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर.....

कापूस खरेदी करीत आहात. या योजनेमध्ये शेतक-याला कोणत्याही प्रकारे बोनस दिला जात नाही. हमी भावानुसार आपण शेतक-यांचा कापूस खरेदी करीत आहात. सभापती महोदय, एका बाजूला बाजारामध्ये वस्तुंचे भाव वाढत असतांना आपण केंद्रीय हमी भावाप्रमाणे कापसाची खरेदी करीत आहात. एका भागातील शेतक-याला एक न्याय आणि दुस-या भागातील शेतक-याला आपण दुसरा न्याय देत आहात. ऊसाला आपण 1500 रुपये टन भाव देत आहात तर दुस-या बाजूला आपण कापूस पिकविणा-या शेतक-याच्या कापसाला 1500 ते 1700 रुपये क्विंटल भाव देत आहात. ऊस उत्पादक शेतक-याच्या ऊसाला कमी भाव द्या असे म्हणावयाचे नाही परंतु ऊस उत्पादक शेतकरी 50-60 टन एकरी ऊस काढून लाख दीड लाख रुपये एकरी मिळवित आहे तर दुस-या बाजूला कापूस पिकविणारा शेतकरी 1700 ते 1800 रुपये एक क्विंटलला घेत आहे. आपण एका भागातील शेतक-याला झुकते माप देत आहात तर दुस-या भागातील कापूस पिकविणा-या शेतक-याला उद्ध्वस्त करीत आहात.

यानंतर श्री. अजित.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर.....

उपाशी ठेवत आहात. शासानाने मागील तीन वर्षे केंद्र सरकारच्या हमी भावाप्रमाणे खरेदी करण्याचे मान्य केले, पण त्यांना अजून पैसे दिलेले नाहीत. कापूस खरेदी केंद्रे सुरु केलेली नाहीत. कापूस एकाधिकार योजनेचा एकेक टप्पा पुढे नेत आहात. कापूस पणन महासंधातील कर्मचाऱ्यांनी व्ही.आर.एस. दिलेली आहे. आज कापूस पणन महासंघातील 80 टक्के कर्मचाऱ्यांनी व्ही.आर.एस. घेतलेली आहे. पणन मंत्र्यांनी घोषणा केली की, "कापूस केंद्र सुरु करण्यात येतील. शेतकऱ्यांचा सर्व कापूस खरेदी करण्यात येईल." मला मंत्रिमहोदयांना विचारावयाचे आहे की, आपण शेतकऱ्यांकडून कापसाची खरेदी कशी करणार आहात ? कारण शेतकऱ्यांकडून कापूस घेण्यासाठी ग्रेडर नाहीत, लिपिक नाहीत, 80 टक्के कर्मचाऱ्यांनी व्ही.आर.एस. घेतलेली आहे. आज जिनिंग प्रेसिंगच्या फॅक्टरी कुठे आहेत ? जिनिंग प्रेसिंगच्या फॅक्टरी व्यापाऱ्यांनी ॲक्वायर केलेल्या आहेत. विभागाने कोठून तरी महंमद तुघलक नावाचा एम.डी.आणला. त्याने जिनिंग प्रेसिंगचे करार मदार बदलून टाकले. आज महाराष्ट्रात जिनिंग प्रेस कुठे आहेत ? या जिनिंग प्रेसला शासनाकडून सहा कोटी रुपये येणे आहे. मग त्या जिनिंग प्रेसिंग इलेक्ट्रीसिटी बील, कर्मचाऱ्यांचा पगार कसा देतील ? यासाठी मी पणन मंत्र्यांना दोनदा भेटलो. त्यांना सांगितले की, विदर्भात जिनिंग प्रेसिंगचे पैसे दिलेले नाहीत. मराठवाड्यातील जिनिंग प्रेसिंगचे पैसे देण्यात आलेले आहेत. मग विदर्भातील जिनिंग प्रेसचे पैसे का देण्यात आले नाहीत याची चौकशी करावी. श्री.वैराळे यांना मराठवाड्यातील लोकांनी कमिशन दिले काय ? सभापती महोदय, आज जिनिंग प्रेसिंगच्या फॅक्टरी नाहीत. कर्मचारी वर्ग नाही. ग्रेडर नाहीत. आज ग्रेडरची भरती कॉन्ट्रॅक्ट पध्दतीवर केली जाते. त्यास तीन-सहा महिने काम दिल्यानंतर सुट्टी दिली जाते. असे प्रकार होत असतील तर शेतकऱ्यांच्या कापसाची मोजमाप कोण करणार ? खरे म्हणजे शेतकऱ्यांचा कापूस खरेदी करण्याची शासनाची इच्छा नाही. शासनाची इच्छा असती तर कापूस हंगाम सुरु होण्या अगोदर दोन महिने जिनिंग प्रेसिंग सुरु केले असते. 80 टक्के कर्मचाऱ्यांनी व्ही.आर.एस. घेतली नसती. परंतु तसे काहीही झाले नाही. याठिक्राणी मंत्रिमहोदयांनी गर्जना करीत सांगितले होते की," आम्ही 200-300 केंद्रे सुरु करीत आहोत." शासनाने जिनिंग प्रेसिंगचे सहा कोटी रुपये दिले नाहीत. माननीय मुख्यमंत्र्यांनी सांगितले की, विदर्भात इंडस्ट्री वाढली पाहिजे. माननीय मुख्यमंत्री फक्त घोषणा करीत आहेत.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर.....

सभापती महोदय, आज शेतकऱ्यांचा कापूस खरेदी केला तरी तो ठेवण्यासाठी जागा नाही. मी माननीय मंत्रिमहोदयांना सांगू इच्छितो की, आज वणी येथे शेतकऱ्यांचे आंदोलन झाले. उद्या अकोला, अकोट, खामगाव, जेथे जेथे कापूस पिकविला जातो तेथे आंदोलन झाले तर काही आश्चर्य वाटणार नाही. आज शेतकऱ्यांमध्ये मोठ्या प्रमाणावर असंतोष खदखदत आहे. सभापती महोदय, या सभागृहात मंत्रिमहोदयांनी सांगितले होते की, आम्ही 500 कोटी रुपयांची तरतूद केली आहे.

यानंतर श्री.पुरी.....

अप्रधारित प्रत / परिशिष्ठासाठी नाही

(सभापतीस्थानी माननीय उपसभापती)

श्री.पांडुरंग फुंडकर...

माननीय श्री.हिराणी साहेबांनी सांगितले की, आपल्याकडे जवळपास 6 हजार कोटींचा माल येणार आहे. आपल्याकडे तरतूद फक्त 500 कोटी रुपयांची असताना व राज्यामध्ये फक्त 138 केंद्रे असताना एवढा माल आपण घेणार आहात का ? आपण याठिकाणी अशाप्रकारचा गोळीबार करुन आपण आपले अपयश महाराष्ट्रातील जनतेला दाखवलेले आहे. आपण सांगितले की, यावर्षी राज्यात कापसाचे 170 लाख क्विंटल उत्पादन होईल, परंतु प्रत्यक्षात 200 लाख क्विंटलपेक्षाही जास्त कापसाचे उत्पादन यावर्षी होणार आहे. त्यापैकी सुमारे 50 लाख क्विंटल कापूस खाजगी व्यापाऱ्यांनी खरेदी केलेला आहे. अशाप्रकारे आज आपण शेतकऱ्यांची मान खाजगी व्यापा-यांच्या हाती दिलेली आहे. 150 लाख क्विंटल कापूस सीसीआयने खरेदी केलेला आहे. याठिकाणी माझा सवाल आहे की, आपण किती कापूस खरेदी केला ? आपण फक्त 3 लाख 81 हजार क्विंटल कापूस खरेदी केला. आज 50 लाख क्विंटल कापसाची खरेदी खाजगी व्यापाऱ्यांनी केली नसती तर आणखी बऱ्याच ठिकाणी आपल्याला गोळीबार करावा लागला असता. खाजगी व्यापाऱ्यांनी कापूस खरेदी केला नसता तर आपल्याला घराच्या बाहेर फिरणेही कठीण झाले असते. आपण कापूस एकाधिकार योजना मोडित काढली. वणीमध्ये हे प्रकरण घडल्यानंतर त्याठिकाणी मी, नितीन भाऊ व श्री.दिवाकर रावते साहेब जाऊन शेतकऱ्यांशी चर्चा केली. आज त्याठिकाणी संचारबंदीची आवश्यकता नसतानाही ती चालू आहे. त्याठिकाणचे संपूर्ण जणजीवन विस्कळती झालेले आहे. आज गल्लीबोळात जाऊन आपले जवान लोकांना विनाकारण झोडपत आहेत व जे लोक आपल्याला मदत करत आहेत, त्यांच्यावरच आपण केसेस दाखल करत आहात, हे योग्य नाही. भारतीय जनता पक्षाचा एक कार्यकर्ता शेतकऱ्यांना शांतता प्रस्थापित करण्यासंबंधी सांगत असताना व पोलिसाच्या गाडीत बसलेला असतानाही त्याच्यावर आपण केसेस दाखल केल्या. अशाप्रकारचे प्रकार आज त्याठिकाणी चालू आहेत. असे केल्यामुळे आपल्याविरुध्द राज्यातील शेतकऱ्यांच्या मनात असंतोष निर्माण होत चालला आहे. या देशाच्या पंतप्रधानांनी शेतकऱ्यांच्या प्रती तीव्र संवेदना व्यक्त केल्या. काँग्रेस पार्टीच्या अध्यक्षा श्रीमती सोनिया गांधी यांनीही शेतकऱ्यांच्या प्रती संवेदना व

..2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर...

तीव्र दु:ख व्यक्त केले. असे असतानाही आपण महाराष्ट्रातील शेतकऱ्यांना गोळया घालण्याचे पाप केलेले आहे.

याठिकाणी मी या चर्चेच्या निमित्ताने दोन-तीन मागण्या करणार आहे. माझी पहिली मागणी अशी आहे की, आपण कापूस पणन महासंघाची 450 केंद्रे सुरु करणार का ? याचे उत्तर माननीय मंत्रिमहोदयांनी द्यावे. तसेच, वणी येथील गोळीबारामध्ये जो श्री.दिनेश घुगुल हा शेतकरी मेला, त्याच्या कुटुंबियांना आपण 10 लाख रुपयांची मदत देणार काय ? ज्यावेळी मृत घुगुलच्या घरी माननीय उपमुख्यमंत्री गेले, त्यानंतर 10 मिनिटांनी आम्ही त्याठिकाणी गेलो. त्यावेळी आम्ही त्याच्या कुटुंबियांना विचारले की, माननीय उपमुख्यमंत्री साहेब किती मदत करणार आहेत, त्यावेळी आम्हाला माहिती मिळाली की, माननीय उपमुख्यमंत्र्यांनी एवढेच सांगितले की, आम्ही आपल्याशी सहानुभूती व्यक्त करतो व मदतीबाबत विचारविनिमय करुन ती किती द्यावयाची ती ठरविण्यात येईल. माननीय आबा, आपण कोणता विचारविनिमय करणार आहात ? आपण उपमुख्यमंत्री आहात, आपण सरकार आहात, मग आपण आणखी कोणता विचारविनिमय करणार आहात ? माननीय उपमुख्यमंत्र्यांनी त्याठिकाणी जाऊन फक्त वेळ मारुन नेलेली आहे. त्याठिकाणी या एस.पी.ने गोळीबार केला, त्याबाबत त्याला आपण का विचारले नाही ? यासंदर्भात माझी स्पष्ट मागणी आहे की, अशाप्रकारे ज्या एस.पी.ने गोळीबार करुन शेतकऱ्यांचा जीव घेतला त्याला ताबडतोब निलंबित करावे व या घटनेची न्यायालयीन चौकशी करण्यात यावी. तसेच, या घटनेमध्ये मृत्यूमुखी पडलेल्या श्री.दिनेश घुगुल याच्या कुटुंबियास 10 लाख रुपयांची मतद करावी. आपण खैरलांजी प्रकरणामध्ये 2-7 लाख रुपयांपर्यंत मदत केलेली आहे, त्यामुळे या घटनेसंबंधी आपण 10 लाख रुपयांची मदत करावी. या घटनेमध्ये मृत्यूमुखी पडलेल्या श्री.दिनेश घुगुल याच्या कुटुंबाला कोणाचाही आधार नाही, त्याचे आई-वडिल आंधळे असल्यामुळे त्याच्या पत्नीस आपण नोकरी दिली पाहिजे, अशी माझी याठिकाणी मागणी आहे.

नंतर श्री.रोझेकर...

अप्रमाणित प्रत / प्रतिलिपी

श्री.पांडुरंग फुंडकर.....

पोलीस विभाग गोळीबारास जबाबदार आहे, कार्बनमधून गोळीबार झालेला आहे. एक पोलिसही त्यामध्ये जखमी झाला. मंत्रीमहोदयांनी असा आरोप केला की, शेतक-यांनी गोळी मारली म्हणून पोलीस जखमी झाला. पोलीस आपला माल विकण्यासाठी बंदुका घेऊन येतात काय ? हा उत्तर प्रदेश किंवा बिहार नाही, हा महाराष्ट्र आहे. पोलीस, पोलिसांच्याच गोळीबारात सापडला आणि त्याच्या पायाला गोळी लागली, मात्र नांव शेतक-यांचे घेतले जात आहे. माझी अशी मागणी आहे की, 10 लक्ष रुपये गोळीबारात मृत्युमुखी पडलेल्या शेतक-याच्या नातेवाईकांना मिळाले पाहिजेत. आणि जे जखमी झालेले आहेत त्यांना 50 हजार रुपयांची मदत झाली पाहिजे. ज्या पणन महासंघाच्या दुर्लक्षामुळे, निष्काळजीपणामुळे ही परिस्थिती उद्भवली त्या महासंघाच्या अधिका-यांवर देखील ताबडतोब कारवाई झाली पाहिजे कारण या परिस्थितीस तुम्ही जबाबदार आहात. एका शेतक-याच्या हत्येस तुम्ही जबाबदार आहात. या हत्येचा दोष सन्माननीय पणन मंत्री, श्री.हर्षवर्धन पाटील यांच्याकडेही जातो म्हणून मंत्रीमहोदयांनी सुध्दा त्यांच्या पदाचा राजिनामा दिला पाहिजे, अशी मागणी या निमित्ताने करतो आणि दोन शब्द पूर्ण करतो.

प्रस्ताव प्रस्तुत झाला.

..2.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

उपसभापती : माझी सूचना अशी आहे की, 4 वाजता ही चर्चा आपल्याला पूर्ण करावयाची आहे. त्यामधील अर्धातास आपल्याला मंत्रीमहोदयांच्या उत्तरासाठी द्यावयाचा आहे. अद्याप ब-याच सन्माननीय सदस्यांना बोलावयाचे आहे तेंव्हा सन्माननीय सदस्यांनी कमीतकमी वेळात आपले म्हणणे मांडावे.

श्री.अरुणलाल गुजराथी (महाराष्ट्र विधानसभा सदस्यांव्दारा निर्वाचित) : सभापती महोदय, एका गंभीर विषयावर माझे वक्तव्य करण्यासाठी मी उभा आहे. 'आत्महत्या ते हत्या' असा हा शेतक-यांचा प्रवास सुरु झाला आहे. बाजारात आपण गेलो तर पिवळं सोनं मिळत नाही आणि ज्या कापसाला पांढर सोनं म्हंटल जात ते विकल जात नाही. एकूणच आपल्या अर्थव्यवस्थेसंबंधी आपल्याला विचार करावा लागणार आहे. अर्थव्यवस्थेसंबंधी विचार करीत असतांना 'शेती' हा केंद्रबिंदु आणि 'शेतकरी' हा आपला मानबिंदु आहे. या चर्चेच्या निमित्ताने मी 5/6 बाबी निदर्शनास आणून देऊ इच्छितो. पूर्वी कापसाचा जो वेचा येत असे त्याची 100 दिवसामध्ये खरेदी-विक्री होऊन प्रक्रिया बंद होत होती. आता हा कालावधी 8/9 महिन्यांचा झाला आहे. ऑक्टोबरपासून जूनपर्यन्त कारखाने चालतात. ज्या दिवसापासून कापसाची सुरुवात होईल त्या दिवशी केंद्र उघडले गेले पाहिजे. बाजारात 50 लक्ष क्विंटल कापुस आल्यानंतर फेडरेशनने 3.41 लक्ष क्विंटल माल घेतला. म्हणजे आपण फक्त 8 टक्के माल घेतला. 92 टक्के माल हा खाजगी व्यापारी आणि सीसीआयने घेतला. कापसाची ही खरेदी केंद्रे लवकर सुरु करण्यासंबंधी काय अडचणी येतात ? सीसीआय केंद्र सुरु करु शकते, खाजगी व्यापारी खरेदी सुरु करु शकतात, तर मग आपल्याला काय अडचण आहे ? माझी मागणी आहे की, ऑक्टोबर महिन्यामध्ये खरेदी केंद्रे सुरु झाली पाहिजे. वणीमध्ये 16 नोव्हेंबर ते 29 नोव्हेंबर या कालावधीत केंद्र सुरु झाले. एका दिवसाची आवक 1800 गाडया, 40 ट्रक्स आणि 37 टेम्पो म्हणजे 18 ते 20 हजार क्विंटल माल कृषि उत्पन्न बाजार समितीमध्ये आला होता. वेळेत खरेदी सुरु झाली असती तर एका दिवसात एवढा माल आला नसता. दुसरा अतिशय महत्वाचा मुद्दा असा आहे की, कापसाची खरेदी करीत असतांनाच शेतक-यांनी घेतलेल्या कर्जाची वसूली आपण त्यामधून करतो. आणि म्हणून हा शेतकरी खाजगी व्यापा-यांकडे किंवा सीसीआयकडे जातो. राज्यात असा एकच प्रकार आहे की, कापसाची खरेदी करतांनाच कर्जाची वसूली केली जाते. बाकी कोणत्याही व्यवहारात आपण अशी कर्ज वसूली करीत नाही. म्हणजेच सरकारची खरेदी आली की सक्तीची कर्जवसूली आली.

यानंतर श्री.बोरले.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अरुण गुजराथी .....

म्हणूनच शासनाने सक्तीची कर्ज वसुली करु नये. कापूस उत्पादक शेतक-यांच्या विदर्भामध्ये आत्महत्या वेगाने होत आहेत. माझी अशी मागणी राहील की, या वर्षी किमान कापसाच्या खरेदीतून कर्जाची वसुली करु नये. आजची परिस्थिती पाहिली तर आज शेतकरी सी.सी.आय.ला माल देतो. कारण सी.सी.आय. चांगला भाव देते. सी.सी.आय. कापूस खरेदी करण्यासाठी मार्केटमध्ये उतरते. शासनाने सी.सी.आय. च्या पद्धतीप्रमाणे बोली लावून ऑक्शनमध्ये माल घेतला पाहिजे. शासनाने खरेदी विक्रीची योजना सुरु केली पाहिजे. ज्याप्रमाणे सी.सी.आय. माल घेते त्याप्रमाणे बाजारात उभे राहून मालाची खरेदी करावी. ज्याला पसंत नसेल, बोनस मिळणार आहे, सप्टेबर महिन्यामध्ये कापसाचे भाव वाढतील असे कोणी म्हणत असेल तरी शासनाने हीच पद्धत सुरु ठेवावी. तसेच कापूस खरेदी केंद्रांची संख्या भरपूर असली पाहिजे. कर्जाची वसुली करता कामा नये. खुल्या बाजारातून माल घेतला पाहिजे या 4-5 मागण्या शासनाने मंजूर केल्या तर वणीमध्ये घडले ते महाराष्ट्रात घडणार नाही. असे 2-3 मुद्दे आहेत. भारनियमनामुळे कापसाचे कारखाने 6-7 तास चालत असतील की नाही, पण भारनियमाचाही परिणाम झाला असेलच. 16 तास लोडशेडींग आहे, असे माननीय सदस्य श्री गडकरी साहेब तुम्ही म्हणत, मी म्हणत नाही. माननीय ऊर्जा मंत्र्यांना विनंती करुन, जिनींग प्रेसिंग फॅक्टरी ही सिझनल फॅक्टरी आहे. किमान 16 तास जिनींग प्रेसिंग फॅक्टरी चालली तर प्रक्रिया लवकर होईल. दोन शिफ्टमध्ये फॅक्टरी चालविता येईल का पहावे.त्यानंतर ग्रेडर बद्दल अन्य लोकांचे काय मत असेल ते विचारण्यात यावे.तसेच ग्रेडरला काढावे. कापसाला मशिनमध्ये टाकून ग्रेड ठरवावी, त्यासाठी जास्त खर्च येणार नाही. अशी परिस्थिती आहे की, ग्रेडर पुढे आणि त्याच्या मागे शंभर लोक फिरत असतात. ज्याप्रमाणे रेल्वेमध्ये टी.सी.च्या मागे प्रवाशी फिरतात त्याच पद्धीतने ग्रेडरच्या मागे शेतकरी फिरत असतात. हे थांबले पाहिजे. म्हणून ग्रेडर ऐवजी मशीनचा वापर करावा. आज अनेक खाजगी व्यापारी मशिनने मोजमाप करतात. तसेच तपासणी सुध्दा मशिनच्या माध्यमातून होते. ग्रेडर हे पद कमी केले पाहिजे. तोलाई मशिनच्या माध्यमातून केली पाहिजे. असे केले तर पुढच्या काळामध्ये आत्महत्या होणार नाहीत. माल ज्यावेळी ज्या क्षणाला विकावयाचा असेल ती खरेदीची संधी राज्य सरकारने, फेडरेशनने घेतली पाहिजे. ज्याला माल विकावयाचा असेल त्याचा माल विकला गेला पाहिजे. दुसरा मुद्दा असा आहे की, माल ताबडतोब विकत घेऊन तो 24 तासात विकला गेला पाहिजे आणि तिसरा मुद्दा

..2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

GRB/ MAP/ SBT/ 14:40

श्री.अरुण गुजराथी .....

असा आहे की, पेमेंट लवकर व्हावयास पाहिजे. 24 ते 48 तासामध्ये खाजगी व्यापारी, सी.सी.आय.कडून पेमेंट दिले जाते. आपली ताकद कमी असेल तर केंद्र शासनाला विनंती करा की, सी.सी.आय. चे 200 केंद्र सुरु करा. सी.सी.आय. निवडक माल खरेदी करते. शेतकरी सी.सी.आय. कडे माल विकण्यासाठी जातो. कारण ते 100 रुपये भाव जास्त देतात आणि शेतक-यांकडून निवडक माल खरेदी करतात. त्यानंतर शेतकरी व्यापा-याकडे जातो ते म्हणतात की, माल व्यवस्थित नसल्यामुळे सी.सी.आय. ने माल खरेदी केलेला नाही, त्यामुळे तुझ्या कापसाची पत कमी आहे.अशा प्रकारे कोणीच माल खरेदी केला नाही तर शेतकरी फेडरेशनकडे जातो.

यानंतर श्री.सुंबरे .....

अप्रधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. गुजराथी .....

ही लास्ट प्रॉयॉरिटी आहे ती फर्स्ट प्रॉयॉरिटी झाली पाहिजे. शेतकऱ्यांनी म्हटले पाहिजे की, माझा कापूस फेडरेशनलाच मी देणार. फेडरेशन घेत नसेल तरच सीसीआय आणि त्यानंतर इतर व्यापारी वा संस्थांना देणार. सभापती महोदय, टीएमसीचे कारखाने आता प्रत्येक ठिकाणी झालेले आहेत. आपण अनेक कारखाने मंजूर करून दिलेले आहेत. ही टीएमसीची योजना ताबडतोब त्यांच्या मालाची मोजमापे करून, त्यात आपण जितका मशिनरीचा उपयोग करून घ्याल तर ते जास्त चांगल्या पद्धतीने होईल. आपण सांगितले की, 24 तासामध्ये शेतकऱ्यांना त्यांच्या मालाचे पैसे देऊ. असे झाले तर महाराष्ट्रातील शेतकरी हा आपल्या फेडरेशनलाच कापूस देईल. तो खाजगी व्यापाऱ्याला वा सीसीआयला देणार नाही. तेव्हा झाला प्रकार अत्यंत दुर्दैवी आहे. कापूस विकणाऱ्या शेतकऱ्याला तेथे आपले प्राण गमवावे लागले आहेत याशिवाय दुसरी कोणती दु:खद घटना असू शकत नाही. तरी या प्रकाराची पुनरावृत्ती महाराष्ट्रात पुन्हा होणार नाही याची दक्षता आपण घ्यावी अशी विनंती करून मी माझे चार शब्द संपवितो.

***

..... पीपी 2 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. नीलम गोऱ्हे (विधानसभेने निवडलेल्या) : सभापती महोदय, माननीय विरोधी पक्षनेता श्री.पांडुरंग फुंडकर यांनी वणी, जिल्हा यवतमाळ येथे कापूस उत्पादक शेतकऱ्यांची जी दुर्दशा झालेली आहे, त्यांच्यावर पोलिसांकडून बेछूट आणि अमानुष असा गोळीबार झालेला आहे आणि त्यात श्री.दिनेश घुग्गल याचा मृत्यू झालेला आहे त्याचबरोबर अनेकजण त्या गोळीबारात जखमी झालेले आहेत त्या बाबतचा सभा तहकूबी प्रस्ताव मांडलेला आहे. या घटनेनंतर माननीय विरोधी पक्षनेता श्री.फुंडकर आणि शिवसेना नेते श्री.दिवाकर रावते यांनी या परिसराला भेट दिली. आदल्या दिवशी वणी येथे कर्फ्यू असताना मी देखील तेथे पोहोचले होते. सभापती महोदय, वणी येथील तहसील कार्यालयासमोर शिवसेना व भाजपा तर्फे शिवसेनेचे विधानसभेतील आमदार श्री.विश्वास नांदेकर यांचेसह अनेकांनी या घटनेसंदर्भात साखळी उपोषण करून जनतेच्या काही मागण्या ठेवल्या आहेत. त्या 7 मागण्या या विधीमंडळा समोर मांडून त्याबाबत शासनाची प्रतिक्रिया काय आहे हे मला समजून घ्यावयाचे आहे. त्यातील पहिली मागणी अशी आहे की, अमानुष व अंधाधुंद गोळीबार करणारे वणीचे ठाणेदार श्री.तडवी आणि जिल्हा पोलीस अधीक्षक श्री.अब्दुर रहेमान यांचेवर भा.द.वि.कलम 302 व 307 खाली गुन्हा दाखल करावा व त्यांना तात्काळ निलंबित करावे अशी स्थानिक जनतेची मागणी आहे. तसेच या गोळीबाराची चौकशी करण्याचे माननीय गृहमंत्र्यांनी जाहीर केले आहे पण ही चौकशी उच्च न्यायालयाचे निवृत्त न्यायमूर्तींकडून त्वरित करावी अशीही तेथील जनतेची मागणी आहे. गोळीबारात मरण पावलेला शेतकरी श्री.दिनेश तुकाराम घुग्गल, रा. मेंढोली यांच्या कुटुंबास 10 लाख रूपयांची रोख नुकसान भरपाई दिली जावी तसेच त्याच्या पत्नीस वा त्यांच्या कुटुंबातील एका व्यक्तीस शासकीय नोकरी द्यावी., गोळीबारातील जखमी शेतकरी व सौ. गीता जैन यांना 50 हजार रूपयांची नुकसान भरपाई द्यावी. यातील सौ. गीता जैन या तर आंदोलनामध्ये देखील नव्हत्या. त्या आपल्या घराच्या दरवाजामध्ये उभ्या होत्या व त्या या गोळीबारात जखमी झालेल्या आहेत. सभापती महोदय, कापूस उत्पादक शेतकऱ्यांची कुचंबणाकरणारे पणन महासंघाचे अधिकारी व सीसीआय यांना तात्काळ निलंबित करावे. त्याचप्रमाणे वणी कृषी उत्पन्न बाजार समिती तात्काळ बरखास्त करून त्यांच्यावर व तेथील सचिव यांच्यावर फौजदारी कारवाई करावी. कपसाला 2020 रूपयांची सरसकट ग्रेड द्यावी व कापूस खरेदी सुटीच्या दिवशी देखील सुरू ठेवावी तसेच पणन महासंघाने त्यासाठी खरेदीकेंद्र सुरू

..... पीपी 2 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. गोऱ्हे .....

करावीत. सभापती महोदय, येथील शेतकरी आणि शिवसेना व भाजपाचे कार्यकर्ते श्री. दिलीप काकडे आणि श्री.अनिल राजूरकर हे तेथे आमरण उपोषणाला बसले आहेत. शिवसेना वणी तालुका प्रमुख श्री.उमेश वैरागडे व भाजपा तालुका प्रमुख श्री.दिनकर वावरे यांनी केलेल्या मागण्या या विधीमंडळात मांडणे हे मी माझे कर्तव्य समजते. सभापती महोदय, खरे तर हे सारे सांगून विधीमंडळाचा उगाचच वेळ घेणे मला प्रशस्त वाटत नाही. पण काल तेथे हा प्रकार घडल्यानंतर अजूनपर्यंत शासनाचे पणन मंत्री तेथे जाऊन आलेले नाहीत अशी माझी माहिती आहे, आणि ती सत्य आहे. मला वाटते त्या ठिकाणी आजही जी परिस्थिती आहे, त्या संदर्भात तेथे माननीय गृहमंत्री श्री.आर.आर.पाटील गेले होते तेव्हा त्यांनी आंदोलनकर्त्यांना समाधानकारक उत्तर दिले की नाही यावर येथे चर्चा होऊ शकते. ...

(यानंतर श्री. सरफरे ..... क्यूक्यू 1..

अप्रमाणित प्रत / प्रतिक्षार्थी नोंदी

डॉ. नीलम गोऱ्हे...

परंतु गाडयांवर बसलेल्या शेतकऱ्यांना गोळया लागून ते जखमी झाल्यानंतर त्यांना जखमी अवस्थेमध्ये हॉस्पिटलमध्ये दाखल केल्यानंतर जाऊन भेटले असता त्यांना चिंता होती की, 24 तास उलटून गेल्यानंतर त्यांच्या गाडया कृषी उत्पन्न बाजार समितीच्या आवारामध्ये होत्या. त्यांच्या गाडयांचा नंबर देखील लागला आहे की नाही हे माहीत नव्हते. अशाप्रकारचा संवेदनाहीन कारभार पहावयास मिळाला. त्याठिकाणी जणू काही पोलीस आणि शेतकरी यांच्यामध्ये युध्द सुरु असल्याची परिस्थिती होती. इतरही जिल्हयातील कापूस खरेदी केंद्रावर शेतकऱ्यांमध्ये अनेक प्रकारचा असंतोष खदखदत असतो. नागपूरमध्ये विधीमंडळाचे अधिवेशन चालू असून या अधिवेशनामध्ये काय होणार आहे? याकडे हजारो शेतकऱ्यांचे डोळे लागले आहेत.याठिकाणी सत्ताधारी पक्षाकडील माननीय सदस्यांमध्ये हसत खेळत गप्पा मारल्या जात आहेत. विरोधी पक्षाचे माननीय सदस्य या प्रश्नासंबंधी काय बोलत आहेत हे ऐकून चेहऱ्यावर वेगवेगळे भाव निर्माण करुन त्यांच्यामध्ये चर्चा सुरु आहे. ज्याप्रमाणे खालच्या सभागृहातील माननीय आमदार श्री. गुलाबराव गावंडे यांनी आत्मदहन करण्याचा प्रयत्न केला त्याप्रमाणे आमदारांवर ती वेळ आल्याशिवाय राहणार नाही. तेव्हा समोर बसलेल्या माननीय सदस्यांनी या गोष्टीचे भान ठेवून संबंधित शेतकऱ्यांना दिलासा दिला पाहिजे. त्याचप्रमाणे माननीय सदस्य डॉ. हिराणी हे सुध्दा फार मोठा गांभीर्याचा आव आणून या गोष्टीकडे बघत आहेत. यवतमाळ जिल्हयातील प्रत्येक गोरगरीब शेतकऱ्याचा अपेक्षाभंग झाला आहे, याची यांना जाणीव आहे काय? अशा वातावरणामध्ये कोणत्याही परिस्थितीत हा शेतकरी नक्षलवादाकडे झुकल्याशिवाय राहणार नाही अशी आम्हाला भीती वाटते. म्हणून कोठेही अशाप्रकारची गोष्ट घडल्यानंतर पोलीस आणि शेतकरी यांच्या हिंसाराचारामध्ये शेतकऱ्यांची कशी चूक होती अशाप्रकारच्या बातम्या मिडियाव्दारे प्रसारीत केल्या जातात. त्या मिडियाकडे कशा जाऊन पोहोचतात हा देखील संशोधनाचा विषय आहे. सांगली येथे दिग्रसच्या घटनेमध्ये शेतकऱ्यांवर याच स्वरुपाचे आरोप करण्यात आले. शेतकऱ्यांकडून पोलिसांवर हल्ला करण्याचे प्रकार कधीही घडलेले नाहीत. कालच्या घटनेमध्ये देखील शेतकऱ्यांकडून पोलिसांवर गोळीबार करण्यात आला असा आरोप करण्यात आला. मला आपल्याला सांगितले पाहिजे की, शेतकऱ्यांनी कोणत्याही प्रकारे गोळीबार केलेला नाही. तशाप्रकारचे प्रतिवेदन शासनाकडून स्पष्टपणे करण्यात आले पाहिजे. नाहीतर आज हे शेतकरी शांततामय मार्गाने न्याय मागत आहेत. त्यांना देखील

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ SBT/ MAP/

डॉ. नीलम गोऱ्हे...

हिंसाचार घडू नये असे वाटते. याची दखल घेऊन शासनाने कापूस खरेदीबाबत वेळीच पावले उचलली पाहिजेत. या गोळीबारामध्ये श्री. पांडुरंग जुमानके हा शेतकरी जखमी झाला आहे, त्या शेतकऱ्याचे नाव पांडुरंग असले तरी हा विठ्ठलाच्या रुपातील शेतकरी जायबंदी झाला आहे, जखमी झाला आहे असे निश्चितपणे वाटते. एवढेच यानिमित्ताने मी याठिकाणी नमूद करु इच्छिते.

अधिकृत पत्र / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. नितीन गडकरी (नागपूर विभाग पदवीधर) : सभापती महोदय, हत्या आणि आत्महत्त्या या दोन्ही विषयावर या सभागृहामध्ये चर्चा झालेली आहे. या यवतमाळ जिल्हयात सर्वात जास्त शेतकऱ्यांनी आत्महत्त्या केल्या आहेत. या आत्महत्त्या आंध्रप्रदेशला लागून असलेल्या जिल्हयात देखील झाल्या आहेत. याचा आपण अभ्यास केला तर कापूस उत्पादक क्षेत्र असलेल्या आंध्र प्रदेश आणि विदर्भाच्या क्षेत्रामध्ये आत्महत्त्या होतात. या आत्महत्तेचे सर्वात मोठे कारण म्हणजे कापसाचे अर्थकारण हे खऱ्या अर्थाने कारण आहे. याठिक्राणी मला नमूद करावेसे वाटते की, आज सर्व वस्तूंचे भाव वाढत चालले आहेत, परंतु कापसाची किंमत कमी होत चालली आहे. खरे म्हणजे माननीय श्री. हर्षवर्धन पाटील साहेब तुम्हाला हे खाते कां दिले हे माझ्या लक्षात येत नाही? मला वाटते कॉग्रेस आणि राष्ट्रवादी कॉग्रेसने विचार केला की, हे शिव्या खाणारे खाते आपल्याकडे न ठेवता ते अपक्षांकडे देऊन त्यामधून आपली सुटका करुन घ्यावी. "मरी गाय ब्राम्हण को दान" अशाप्रकारे हे खाते आहे असे त्यांना वाटते. त्यामुळे मंत्रिमहोदयांना एवढेच माहीत आहे की, कापूस हा फक्त गादीमध्ये टाकावयाचा असतो. त्यांच्याकडे साखर पिकते, ते चांगल्या प्रकारे साखर कारखाना चालवितात. परंतु याठिकाणी दरवर्षी शिव्या खाण्यासाठी आणि गोळीबाराला तोंड देण्यासाठी त्यांना जाणीवपूर्वक उभे करण्यात आले आहे.

सभापती महोदय, राज्यामध्ये एन.डी.ए. चे सरकार होते त्यावेळी कापसाला 3100 रुपये भाव देण्यात आला होता.माननीय सदस्य श्री. अरुण गुजराथी साहेब बोलले.त्यांचा "जाणता राजा" दिल्लीमध्ये आहे. त्यांचा वाढदिवस तुम्ही साजरा करीत आहात. त्यांना जाऊन सांगा की, महाराष्ट्रामध्ये शेतकरी गोळया खात आहेत, सभागृहामध्ये शेतकऱ्यांच्या प्रश्नावर आपण चर्चा करीत आहोत तेव्हा निदान त्यांच्यासाठी काही तरी करा. शेतकऱ्यांचा "जाणता राजा" म्हणून शेतकरी तुमचे कौतुक करतात. तेव्हा तुम्ही क्रिकेटपेक्षा शेतकऱ्यांच्या प्रश्नासाठी थोडा वेळ द्या. आणि शेतकऱ्यांची दु:खे समजून घ्या. आज संपूर्ण महाराष्ट्रामध्ये कापूस एकाधिकार खरेदी योजना सुरु आहे.

(यानंतर श्री. किल्लेदार)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.नितीन गडकरी (पुढे सुरू...

एकाधिकार योजना चालू करण्याचे यांच्या मनामध्ये नाही. कायदेशीर मार्ग अस्तित्वात नाही. कापूस कोणाचा घेतला, हे पहायचे नाही. "काम चालू रस्ता बंद." अशाप्रकारे एकाधिकार योजना बंद केलेली आहे. एकाधिकार योजना उपचार म्हणून ठेवलेली आहे. ही गोष्ट खरी आहे की, ज्या ठिकाणी जास्त भाव असेल त्या ठिकाणी शेतकरी कापूस घालतो. पहिल्यांदा तो सीसीआयला कापूस घालतो, बाहेर व्यापाऱ्यांना घालतो. शेवटी कोणी कापूस घेतलाच नाही तर एकाधिकार खरेदी केंद्रावर कापूस घालतो. महात्मा फुले, बाबासाहेब आंबेडकर यांच्या नावाने राज्य चालवितो. काही दुकाने उघडी ठेवतो. सन्माननीय एन.पी.हिराणी आणि श्री.मनोहर नाईक साहेबांची मलाकिव येते. त्यांची मोठी पंचाईत होते. त्यांना लोकांकडून शिव्या खाण्याची पाळी येते. त्यांचा मित्र तुमच्या हिताचे सांगतो की, तुमच्या हातात काही नाही. तुमच्या हातामध्ये ग्रेडरांची नियुक्ती करण्याचे कामही नाही. तुमच्या हातात फक्त कापूस विकणे, एवढे काम आहे.श्री.हिराणी साहेब पणन महासंघाचे अध्यक्ष आहेत, त्यांच्याकडे मोडकी अँबेसॅडर गाडी आहे. सगळ्या बाजूने त्यांना बदनाम करण्याचेच कारस्थान केलेले आहे. एकाधिकार योजना चालवायची नाही. बाजार समितीच्या परिसरामध्ये 2 हजार गाड्या असताना 40 ते 50 गाड्यांचे ग्रेडेशन केले जाते त्याबाबत आपण कसे समर्थन करता ? आपण छातीवर हात ठेवून सांगावे की, 2 हजार गाडया मोजून त्यांचा कापूस घेण्याची तेवढी क्षमता तरी आहे काय ? माणूस मेल्यानंतर काचेच्या कपाटामध्ये मृहदेह ठेवतात त्याप्रमाणे कापूस एकाधिकार योजनेचे झालेले आहे. सन्माननीय मंत्री श्री.हर्षवर्धन पाटील यांच्या मागे लागलो की, एकाधिकार योजनेची मुदत वाढवून घ्या, ती पुढे लागू करा. परंतु ती पुढे लागू केली नाही. आपल्याला खरेदी केंद्रे बंद करावयाची नाहीत, एवढेच आपल्याला करावयाचे आहे. आपण गुजरात सरकारच्या नावाने खडे फोडत असतो.परवा गुजरातचे मुख्यमंत्री माननीय श्री. नरेंद्र मोदी नागपूरला आले होते, ते सांगत होते की, 49 हजार कोटी रुपयाचे कृषी मधून उत्पन्न मिळालेले आहे. यापासून 85 टक्के ग्रोथ रेट वाढलेला आहे. चीनमध्ये गुजरात राज्याने 29 हजार कोटी रुपयाचा कापूस निर्यात केलेला आहे. आपण चीनमध्ये कापूस निर्यात केला, त्या कापसाच्या गाठीमध्ये चपला, जोडे निघाले, यामुळे महाराष्ट्राचे कापूस फेडरेशन बदनाम झाले हे मी जबाबदारीने सांगतो.शेतकरी ग्रेडर साहेब, कापूस उत्पादक शेतकरी ग्रेडर साहेब माझा कापूस घ्या, म्हणून त्याच्या मागे लागलेले असतात. ग्रेडर साहेब सांगत असतात की, एक हजार द्या, मग तुमच्या कापसाची खरेदी करतो. सन्माननीय श्री.अरुण गुजराथी साहेब हे त्यांच्या

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ SBT/ KGS/ MAP/ MHM/

श्री.नितीन गडकरी (पुढे सुरू....

राष्ट्रवादी पक्षाचे अध्यक्ष आहेत. त्यांनी छातीवर हात ठेवून सांगावे की, निवडणुकीमध्ये 2700 क्विंटल भाव देण्याबाबत मान्य केलेले होते की नाही ? ते त्यावेळेला कदाचित त्यांच्या पक्षाचे अध्यक्ष नसतील ते पक्षात होते, एकत्रित जाहीरनामा तयार केलेला होता.

यानंतर श्री.शिंगम....

अप्रमाणित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अरुण गुजराथी : कापसाला 2700 रु. भाव देण्याचे आश्वासन आघाडी सरकारने आपल्या जाहीरनाम्यामध्ये दिलेले होते ही वस्तुस्थिती आहे. या पूर्वीही मी दोन वेळा सांगितलेले आहे की, जर एखादे आश्वासन सरकार पाळू शकत नसेल तर त्यांनी जनतेसमोर गेले पाहिजे आणि जनतेला सांगितले पाहिजे की, या या कारणांमुळे आम्ही आश्वासन पाळू शकत नाही. सन्माननीय मंत्री महोदयांनी सभागृहामध्ये आश्वासन दिल्यानंतर ते पूर्ण होऊ शकले नाही तर चार-पाच महिन्याने किंवा वर्षांनी संबंधित मंत्री महोदय सभागृहाला सांगतात की, मी आश्वासन दिले होते परंतु अमूक अमूक कारणामुळे मी आश्वासन पाळू शकलो नाही. मी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचा प्रदेश अध्यक्ष झाल्यानंतर एकदा मुंबईमध्ये आणि एकदा विदर्भामध्ये असे दोन वेळा स्पष्टपणे सांगितलेले आहे की, सरकार जी आश्वासने पाळू शकलेले नाही त्याची कारणे सरकारने प्रामाणिकपणे जनतेसमोर सांगितली पाहिजेत.

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, या सभागृहामध्ये सन्माननीय उपमुख्यमंत्री श्री.आर.आर.पाटील यांनी सांगितले की, आम्ही 5 वर्षात भाव देऊ. सन्माननीय सदस्य श्री. अरुण गुजराथी यांना मी यासाठी हे सांगत आहे की, काँग्रेस पक्षाच्या प्रदेशाध्यक्षा म्हणतात की, ही प्रिंटींग मिस्टेक आहे. सन्माननीय पणनमंत्री श्री. हर्षवर्धन पाटील हे कोणत्याच पक्षामध्ये नसल्यामुळे तसे काही म्हणण्याची त्यांना सोय नाही. सभापती महोदय, आज कापूस एकाधिकार योजना अस्तित्वात नाही. मी या ठिकाणी पणन मंत्र्यांना असे विचारु इच्छितो की, तुमची कापूस खरेदी करणारी यंत्रणा चांलगी आहे काय ? आज 30-35 लाख क्विंटल कापूस खरेदी करता येत नाही. उद्या 200 लाख क्विंटल कापूस कसा काय खरेदी करणार? मी असे सांगितलेले आहे की, एक पुरके आणि बाकीचे सर्व भुरके. आमच्या विदर्भाच्या हातात काय आहे ? सन्माननीय मंत्रीमहोदय श्री. अनिस अहमद यांच्याकडे गायी-म्हशीचे शेण आणि बकरीच्या लेंड्या... वित्त मंत्री तिकडचे आहेत, सहकार मंत्री देखील तिकडचेच आहेत. पणन मंत्री श्री. हर्षवर्धन पाटील यांच्याकडे कापसाच्या गाठी बघण्या शिवाय काही काम राहिलेले नाही. या कापसाच्या प्रश्नाकडे हे सरकार गंभीरतेने बघत आहे काय ? शेतकरी आत्महत्या करीत आहेत. दोन-दोन हजार गाड्या कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये आहेत. एका दिवशी फक्त 40-50 गाड्यांचेच तुम्ही ग्रेंडिंग करु शकता. मी नांदेड परभणी, संभाजीनगर या भागात फिरलो. दोन दिवस मी तिकडेच होतो. परभणी जिल्ह्यातील

..2..

(श्री. नितीन गडकरी...)

प्रत्येक गावातील कापूस संकलन केन्द्रावर तीनशे-चारशे गाड्यांच्या रांगा लागलेल्या होत्या. जिनिंग प्रेसिंग फॅक्टरीज आपल्याकडे आहेत काय ? तुम्ही एकदा शेतक-यांना कापूस घेणार नाही असे तरी सांगा आणि एकदाची ही खरेदी बंद करुन मोकळे व्हा. कमीत कमी शेतकरी तुमच्याकडे येणार तरी नाही. व्यापारी कापूस घ्यायला तयार नाही. सीसीआय कापूस घ्यायला तयार नाही, ग्रेडर एक हजार रु. घेतल्या शिवाय कापसाची मोजणी करीत नाही.

...नंतर श्री. घागरे...

अप्रमाणित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.नितीन गडकरी ..... (पुढे सुरु)

शेतकऱ्यांना मालाला भाव मिळत नाही, तेव्हा हे शेतकरी कोठून कर्ज फेडणार आहेत ? जिल्हा बँकेचे व्याजाचे दर 13 ते 14 टक्के आहेत. किती गंभीर परिस्थिती आहे ? तुम्ही शेतकऱ्यांच्या आत्महत्या व हत्या करीत आहात. शेतकऱ्यांच्या हत्या करुन वाढदिवस साजरा करणारे तुमचे असंवेदनशील सरकार आहे. वाढदिवस साजरा करण्यासाठी स्पेशल विमानाने तुम्ही दिल्लीला चालले आहात. आमच्या राज्यातील जनतेला तुम्ही निरोप द्या. विदर्भातील शेतकरी आत्महत्या करीत आहेत. 4-4 दिवस कापूस खरेदी केली जात नाही. कापसाला 3100 रुपये दर देण्याऐवजी 1700 व 1800 रुपयापेक्षा जास्त दराने तो घ्यायला सरकार तयार नाही. शेतकरी कर्जबाजारी आहेत, नापिकीची परिस्थिती आहे आणि आपण या परिस्थितीमध्ये वाढदिवस साजरे करीत आहात. या करीता बिल्डर्स, इरिगेशन कॉन्ट्रक्टरकडून कमिशन घेतले जात आहे. यातून होर्डींग्ज व कटआऊटद्वारे जाहिराती करत आहात. सन्माननीय सदस्य श्री.अरुणभाई गुजराथी यांना हे आवडणार नाही असे मला वाटते, त्यांना या बाबीचे दु:ख आहे परंतु त्यांना सहन होत नाही आणि सांगताही येत नाही, अशी त्यांची अवस्था झालेली आहे.

श्री.अरुणभाई गुजराथी : सन्माननीय सदस्यांनी त्यांच्याबद्दलच बोलावे, विषयांतर करु नये, अशी मी त्यांना विनंती करतो.

श्री.नितीन गडकरी : श्री.मुंडे साहेबांचा उद्या वाढदिवस आहे, त्यांनी आम्हाला सांगितले की, शेतकऱ्यांच्या आत्महत्या होत असल्याने यावेळी माझा वाढदिवस साजरा करु नका. कोणीही माझ्याकडे पुष्पहार घेऊन येऊ नका.

श्री.गुरुनाथ कुलकर्णी : एन.डी.ए. सरकारने विविध जाहिरातीसाठी कोटयावधी रुपये खर्च केलेले आहेत.

श्रीमती उषाताई दराडे : एन.डी.ए. सरकारने जनतेच्या पैशातून हा खर्च केलेला आहे.

श्री.मधुकर चव्हाण : केलेल्या कामाची माहिती देण्यासाठी व प्रसार करण्यासाठी अशा प्रकारे खर्चाची तरतूद आहे का ?

.....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

PNG/ KGS/ MHM/

श्री.नितीन गडकरी : सरकारी पैसा खर्च करुन निवडणुकीच्या आधी प्रचार केला जात आहे. शेतकऱ्यांच्या आत्महत्या होत असताना स्पेशल विमानाने मंत्री महोदय दिल्लीला चालले आहेत. या सरकारच्या जाहिरातीच्या बजेटची चौकशी करण्यात यावी अशी मी मागणी करतो. देशाचे कृषी मंत्री महाराष्ट्रातील आहेत तरीही विदर्भातील शेतकऱ्यांच्या आत्महत्येचा प्रश्न गांभीर्याने घेतला जात नाही. आपल्या देशात काय चालू आहे ? भारताचे कृषी मंत्री महाराष्ट्रातील असताना व विदर्भातील शेतकऱ्यांच्या आत्महत्या होत असताना त्यांच्या वाढदिवस साजरा करण्यासाठी आमचे मंत्री स्पेशल विमानाने दिल्लीला जात आहेत. आमच्या शेतकऱ्यांना गोळया मारा, त्यांच्या हत्या करा, त्यांना आत्महत्येस प्रवृत्त करा.

(सभापतीस्थानी : तालिका सभापती डॉ.वसंत पवार)

.....यानंतर श्री.भोगले

अधिकृत पत्र / प्रतिलिपीसाठी नाही

श्री.नितीन गडकरी.....

सभापती महोदय, या गंभीर स्थितीमध्ये या विदर्भातील शेतकऱ्यांना कोण दिलासा देणार आहे? हजार-हजार गाड्या एका-एका कापूस संकलन केंद्रावर उभ्या आहेत. कापूस संकलन केंद्रावर रांगा लागल्या आहेत. दोन-चार दिवस केंद्रावर उभे राहायचे असेल तर बैलांचा खर्च, ट्रॅक्टरच्या भाड्याचा खर्च आणि कापसाचे पैसे नाहीत. तीन-तीन, चार-चार दिवस शेतकरी रांगेत उभा राहणार असेल तर खाणार काय? ट्रॅक्टरचे भाडे कोण देणार? 2100 रुपये भावाऐवजी तुम्ही 1600 रुपये भावात कापूस घेणार व तो पैसा देणार नाही. जी रक्कम मिळावयाची आहे त्यातून कर्जाची कपात करणार. एका-एका एकरामध्ये 3800 रुपये खर्च करुन 13 टक्के व्याजाचे कर्ज काढतो त्या शेतकऱ्याचा या राज्यामध्ये मसिहा कोण आहे? यावर मार्ग निघणार आहे की नाही? एकाधिकार खरेदी योजना आज अस्तित्वात नाही. नावापुरते सोंग उभे केले आहे. मी आज सन्माननीय मंत्री श्री.हर्षवर्धन पाटील यांना विचारु इच्छितो, हेक्टरी किती मदत करणार आहात? 50 किंवा 100 कोटी रुपये शेतकऱ्यांच्या तोंडावर फेकणार. खरे म्हणजे बोलू नये, परंतु ज्याप्रमाणे कुत्र्याला बिस्किटाचा तुकडा फेकतो, पावाचा तुकडा फेकतो आणि हाकलून देतो, तसे 5-50 कोटी रुपये देऊन तुम्ही मुंबईला जाणार. शेतकऱ्यांना 50 कोटी रुपये दिले तरी चालतील अशा समजुतीत तुम्ही आहात. सभापती महोदय, बेसिक प्रश्न आहे. आज गुजराथमध्ये कापूस एकाधिकार खरेदी योजनेतील शेतकरी आत्महत्या करीत नाही. महाराष्ट्रात शेतकरी का आत्महत्या करतो? गुजराथमध्ये 45 टक्के कापूस निर्यात का होत नाही? गुजराथमधील शेतकऱ्यांना चांगला भाव मिळतो. महाराष्ट्रातील शेतकऱ्यांना तो का मिळत नाही? गुजराथमध्ये एका एकरामध्ये 8 ते 10 क्विंटल कापूस पिकतो. महाराष्ट्रात असे का घडत नाही? याला कोण जबाबदार आहे? कधीतरी याचा विचार करणार की नाही? सभापती महोदय, एक गोष्ट खरी आहे. जे काही करायचे असेल तर ते मनापासून करावे नाही तर सोडून द्यावे. मी सन्माननीय सदस्य श्री.अरुणभाई गुजराथी यांच्या बोलण्याशी सहमत आहे. जे जमते त्याला हो म्हणा, नाही त्याला नाही म्हणा. माझे सन्माननीय मंत्री श्री.हर्षवर्धन पाटील यांना आव्हान आहे, त्यांनी सांगावे, 2000 गाड्या कापूस विकण्यासाठी उभ्या आहेत. त्या मोजण्याची यंत्रणा आमच्याजवळ आहे, त्यांचे पैसे द्यायला आमच्याकडे पैसा आहे. सभापती महोदय, किती तरतूद केली? वित्त विभागाने पैसा दिला आहे का? अर्थमंत्री श्री.पाटील यांना निधी देत नाहीत. हे चकरा मारुन मारुन

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.नितीन गडकरी.....

थकतात. अनुशेषाबाबत विदर्भ भागातील आमचे लोकप्रतिनिधी प्रा.बी.टी.देशमुख बोलून बोलून दवाखान्यात गेले. मी त्यांची भेट घेतली. त्यांना मी सांगितले, तुम्ही भावनाविवश होऊ नका. आपल्याला मोठा संघर्ष करायचा आहे. आमची कामे होऊ नयेत म्हणून शासनाकडून रोज नवीन नवीन जी.आर. काढले जातात. कापूस घ्यायला पैसा नाही. आज या आठवडयात कमीत कमी आम्हाला बोलण्याची संधी तरी मिळणार आहे. पुढचे चार आठवडे तोंड दाबून मुक्क्याचा मार सहन करावा लागणार आहे. कोणी कापूस घेणार नाही. मागच्या वर्षी थंडीमध्ये यवतमाळ जिल्हयात बंडीवर बसलेला शेतकरी थंडीत गारठून मेला. सभापती महोदय, सन्माननीय मंत्री श्री.हर्षवर्धन पाटील यांना मी तीन प्रश्न विचारु इच्छितो. विदर्भातील कापूस संकलन केद्रांवर जेवढ्या गाड्या उभ्या आहेत त्या सर्व गाड्यांची तीन दिवसाच्या आत मोजणी होईल आणि सर्व कापूस उत्पादक शेतकऱ्यांना आठ दिवसाच्या आत त्यांचा पैसा मिळेल हे ते आज सांगू शकतात का? माझे मित्र सन्माननीय सदस्य डॉ.हिराणी याठिकाणी बसलेले आहेत. कोणाच्या खांद्यावर कोणाचे ओझे? मित्र म्हणून सन्माननीय मंत्री श्री.मनोहर नाईक यांना पण सांगा. गोळीबार यांनी करायचा. कापसाची ऐसीतैशी यांनी करायची, जनतेचा विश्वासघात करायचा आणि तुमच्यासारख्यांचा संबंध नाही त्यांना बळीचा बकरा म्हणून पुढे उभे करायचे. तुम्ही तिथे जाता, लोकांची बोलणी ऐकायची. ही शुध्द फसवणूक आहे. सी.सी.आय.ला यांना बोलावले पाहिजे. सी.सी.आय.हे केंद्र सरकारचे महामंडळ आहे. त्यांनी वणीचा हा प्रश्न का निर्माण केला? त्यांनी खरेदी बंद केली. व्यापाऱ्यांनी खरेदी बंद केली का? यांनी का बंद केली? वर्ल्ड मार्केटमध्ये कापसाचे भाव वर-खाली होत आहेत. त्यामुळे आता कापूस खरेदी करायला खाजगी व्यापारी आणि सी.सी.आय.नकार देत आहे. तुम्ही मात्र दुकान उघडून बसला आहात. सी.सी.आय.ही खाजगी दुकानासारखी आहे. ते चिंता करीत नाहीत. केंद्रातील कृषिमंत्री काय करीत आहेत? त्यांनी सांगितले पाहिजे, दिल्लीमध्ये आमचे सरकार आहे, तुम्ही खरेदी बंद करायची नाही. कापूस घ्या. केंद्रीय कृषिमंत्र्यांनी सी.सी.आय.ला सांगावे, शेतकऱ्यांचा कापूस तुम्ही घेतला पाहिजे.

(नंतर श्री.जुन्नरे....

श्री. नितीन गडकरी ...

एका बाजूला तुम्ही कापूस खरेदी केंद्र बंद करीत आहात. त्यामुळे केंद्रसरकारने सीसीआयला काूपस खरेदी करण्याच्या संदर्भात सूचना दिल्या पाहिजेत. परंतु कापूस खरेदी करण्याची तुमची ताकद नाही. कापूस खरेदी करण्याच्या संदर्भात तुम्ही व्यापा-यांवर बंधन टाकू शकत नाही. शासन आणि सीसीआय मिळून कापूस खरेदी केंद्रे सुरु करुन कापसाची खरेदी सुरु केली पाहिजे. आपण कापसाला प्रती क्विंटल 2700 रुपये भाव देऊ अशी घोषणा करुन सत्तेवर आलेला आहात, लाल दिव्याच्या गाडया मिळविलेल्या आहेत. आता तुम्ही कितीही सांगितले की, प्रिंटिंग मिस्टेक झालेली आहे परंतु आता त्याचा काही एक उपयोग होणार नाही तर हेच आश्वासन देऊन तुम्ही सत्तेवर आलेला आहात. आता तुम्हाला यासंदर्भात क्षमा मागून चालणार नाही. आपण दलितांना फसविले, शेतक-यांना फसविलेले आहे. तुमच्यामुळेच आज शेतकरी आत्महत्या करीत आहेत, तुमच्यामुळेच आज शेतक-यांवर गोळीबार होत आहे, तुमच्यामुळेच आज दलितांवर गोळीबार होत आहे. आता तुम्हाला "आय एम सॉरी म्हणून चालणार नाही", सॉरी म्हणून पहिल्यांदा का झक मारली ? असे मला विचारावयाचे आहे.

ॲड. गरुनाथ कुलकर्णी : सभापती महोदय, "झक मारली" हा असंसदीय शब्द आहे तो कामकाजातून काढून टाकण्यात यावा.

तालिका सभापती (डॉ.सवंत पवार) : सन्माननीय सदस्यांनी उच्चारलेले शब्द कामकाजातून काढून टाकण्यात येतील.

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, "झक मारली" हा असंसदीय शब्द नाही. विदर्भामध्ये हा शब्द वापरला जात असतो.

तालिका सभापती : असे जरी असले तरी आपल्या सारख्या सन्माननीय सदस्यांच्या तोंडी हा शब्द शब्द शोभत नाही.

श्री. मधुकर चव्हाण : सभापती महोदय, मराठी कोषामध्ये "झक मारणे" याचा अर्थ "मासे मारणे असा केलेला आहे.

तालिका सभापती : ठीक आहे. सर्व मजकूर तपासून शब्द काढण्यात येईल.

...2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, "झक मारणे" हा जर असंसदीय शब्द असेल तर माझे शब्द मी मागे घेतो.

श्री. भास्कर जाधव : सन्माननीय सभापती महोदय, या चर्चेला नियम 93 अन्वये सुरुवात करण्यात आलेली आहे. ज्यावेळेला ही चर्चा स्वीकारली होती त्यावेळेस माननीय सभापती महोदयांनी सांगितले होते की, या चर्चेला दोन तासाचा अवधी असून या दोन तासामध्ये माननीय मंत्रीमहोदयांच्या उत्तरासाठी अर्ध्या तासाची वेळ देण्यात येईल. सर्वसाधारण चर्चेचा नियम असा आहे की, दोन तासाच्या चर्चेमध्ये अर्धा वेळ विरोधी पक्षाला असतो व अर्धा वेळ मंत्रीमहोदयांच्या उत्तरासह सत्ताधारी पक्षाला दिला जातो. सत्ताधारी पक्षाच्या बाजूने आतापर्यंत केवळ एकाच सन्माननीय सदस्याने विचार मांडलेले आहेत तर बाकीचा पूर्ण वेळ विरोधी पक्षाने घेतलेला आहे. त्यामुळे सत्ताधारी पक्षाला या चर्चेच्या निमित्ताने विचार मांडण्याची संधी मिळावी अशी माझी आपल्याला विनंती आहे.

तालिका सभापती : दुपारी 3.30 वाजता या चर्चेवरील उत्तराला माननीय मंत्री महोदय सुरुवात करणार आहे.

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, अशा प्रश्नाच्या निमित्ताने आपण चर्चेसाठी वेळ वाढवून देत असतो. सन्माननीय सदस्य श्री. भास्करराव जाधव यांनी या चर्चेच्या निमित्ताने आपले विचार व्यक्त करुन कापूस पिकविणा-या शेतक-याच्या मालाला भाव वाढवून देण्याच्या संदर्भात आपले योगदान दिले तर ते चांगलेच होईल. सभापती महोदय, या चर्चेवर उत्तर देतांना माननीय मंत्रीमहोदयांनी कापूस पिकविणा-या शेतक-याच्या कापसाला कमीतकमी 2700 रुपये प्रती क्विंटल भाव दिला जाईल अशी घोषणा करावी. अशी जर घोषणा केली तर विदर्भामध्ये अधिवेशन घेण्यात काही तरी जिज झाले असे म्हणता येईल. अशी जर घोषणा केली नाही तर टराटरा तुमचा बुरखा फाडला जाईल, तुम्ही या निमित्ताने शेतक-यावर गोळया घालीत आहात, तुमच्या मुळेच शेतकरी आत्महत्या करीत आहेत असाच मॅसेज पूर्ण महाराष्ट्रभर जाईल. गोळीबार मृतपावलेल्या दिनेश घुगुळ या शेतक-याच्या घरी सन्माननीय विरोधी पक्ष नेते श्री. फुंडकर साहेब तसेच सन्माननीय

....3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. नितीन गडकरी...

सदस्य श्री. दिवाकर रावते जाऊन आलेले आहेत. त्यामुळे यासंदर्भात माझी आपल्याला विनंती आहे की, आपण शेतक-याच्या कापसाला 2700 रुपये क्विंटल भाव द्यावा, खरेदी केंद्र सुरु करुन सर्व कापूस खरेदी करुन शेंतक-याला न्याय मिळवून द्यावा अशी विनंती करुन मी माझे दोन शब्द पूर्ण करतो.

यानंतर श्री. अजित.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पाशा पटेल (महाराष्ट्र विधानसभा सदस्यांद्वारा निर्वाचित) : सभापती महोदय, वणी येथे शेतकऱ्यांवर जो गोळीबार झाला, लाठीहल्ला झाला त्यामुळे मी स्वत: चिंतेत आहे. ज्या परिस्थितीमध्ये हा गोळीबार व लाठीहल्ला झाला ती परिस्थिती अशी आहे की, जवळपास दोन हजारांवर बैलगाड्यामध्ये आणि 200 ट्रॅक्टर्समध्ये असलेल्या कापसाची अतिशय संथगतीने मोजणी सुरु होती. त्यामुळे शेतकरी अस्वस्थ झाला होता म्हणून त्यांच्यावर गोळीबार झालेला आहे. मी सभागृहाच्या एक निदर्शनास एक गोष्ट आणून देऊ इच्छितो की, काल एका दिवसामध्ये 1722 बैलगाड्या आणि 118 टॅक्टर्सची मोजणी झाली. तर मग गेल्या आठ-दहा दिवसांमध्ये 50-60 बैलगाड्या मोजण्याचा खेळ का चालू होता ? याचा अर्थ सी.सी.आय. आणि फेडरेशनला कापूस खरेदी करायचा नव्हता. शेतकऱ्यांना व्यापाऱ्यांच्या जबड्यात ढकलावयाचे होते असे माझे मत आहे. सभापती महोदय, हे सर्व संगनमताने झालेले आहे. कारण कापसाला भाव देण्यासाठी शासनाने एक उपसमिती नेमलेली आहे. ही उपसमिती या अधिवेशनामध्ये कापसाचा भाव जाहीर करणार आहे. मला पणन मंत्र्यांना प्रश्न विचारावयाचा आहे की, तुम्ही शेतकऱ्यांना व्यापाऱ्यांकडे ढकलून कापसाला जादा भाव दिला तर ते व्यापारी शेतकऱ्यांना जादा भाव वाढवून देणार आहेत काय ? आपण अशाप्रकारचा खेळ करीत असाल तर महाराष्ट्रातील जनता तुम्हाला कधीही माफ करणार नाही.

सभापती महोदय, मी काल वणी येथे जाऊन आलो. त्याठिकाणी 2.5एकरचे मैदान आहे. तेथे शेतकऱ्यांना पिण्याच्या पाण्याची व्यवस्था नाही. जनावरे गटारातील पाणी पित होते. जनावरांना चरण्यासाठी चारा नव्हता. अशा परिस्थिती शेतकरी तेथे कापूस घेऊन दिवस काढत उभे होते. त्यांना साधे पिण्यासाठी पाणी नव्हते. पणन महासंघ करतो काय ? मार्केट कमिटी करते काय ? दोन दिवसांपूर्वी माननीय मंत्रिमहोदयांनी उत्तर देताना ज्या पध्दतीने हावभाव केले होते त्यावरुन मला वाटते की, हे कार्यक्षम मंत्री आहेत, पण नेमके त्याच्या उलट घडले. सभापती महोदय, जर वेळेवर मोजमाप झाले असते त्या गरीब शेतकऱ्याचा गोळीबारात मृत्यू झाला नसता. गेल्या वर्षी एकेका फेडरेशनवर तीन कि.मी.पर्यंत बैलगाड्यांच्या रांगा लागल्या होत्या. यावर्षी सरकारने सांगितले की, यंदा कापसाचे उत्पादन मोठ्या प्रमाणावर झालेले आहे. असे होते तर मग सरकारने

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पाशा पटेल.....

काटे का वाढविले नाहीत ? सरकार शेतकऱ्यांची मस्करी का करीत आहे ? यवतमाळ येथे सर्वात लांब धाग्याचा कापूस तयार होतो. सर्वात शुभ्र कापूस यवतमाळ येथे होतो, सर्वात चांगल्या प्रतीचा कापूस यवतमाळ येथे तयार होतो, सर्वात जास्त आत्महत्या यवतमाळ जिल्ह्यात होत आहेत. आमचा कापूस घ्या असे सरकारला मोठ्या प्रमाणावर कोण सांगत असेल तर तो यवतमाळ जिल्ह्यातील शेतकरी आहे. जो शेतकरी गोळीबारात मरण पावला तो कापसास जादा भाव मिळावा म्हणून नव्हे तर त्याचा कापूस खरेदी करा यासाठी आला होता. सभापती महोदय, ग्रामीण भागात अशी प्रथा आहे की, ग्रामदेवतेला खूष करण्यासाठी कोणाचा तरी बळी द्यावा लागतो. या सरकारला सुध्दा अशाचप्रकारच्या बळीची आवश्यकता लागत आहे. सरकार अशा किती शेतकऱ्यांचा बळी घेणार आहे ? सभापती महोदय, जे शेतकरी त्यांनी पिकविलेला कापूस देण्यासाठी आले होते त्यांच्यावर शासनाने 307 चे कलम लावले. माझा सरकारला प्रश्न आहे की, ते कुणाचा खून करण्यासाठी आले नव्हते. स्वत:च्या शेतात पहाटे पाचपासून रात्रौ बारा वाजेपर्यत मेहनत करुन जे पीक आले ते विकण्यासाठी तो आला होता. महिन्याभरात महाराष्ट्रात जेथे जेथे आंदोलने झाली तेथील शेतकऱ्यांवर सरकारने कलम 307 लावण्याचे पाप केले आहे.

यानंतर श्री.पुरी.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पाशा पटेल....

अशाप्रकारे आपण कलम 307 लावून लोकशाहीच्या आड लपून हुकुमशाही आणण्याचे पाप तर हे सरकार करीत नाही ना ? अशी शंका आमच्या मनात येत आहे. आज शेतकरी आपल्या हक्कासाठी लढले म्हणून त्यांच्यावर आपण गोळया झाडत आहात, हे कुठेतरी थांबले पाहिजे. मी आज सकाळी वणीमध्ये जाऊन आलो. त्याठिकाणी असे चित्र आहे की, रात्री 11.00 वाजता श्री.पांडुरंग उकिनकर, श्री.विलास घुगुल, श्री.शेखर पारखी व श्री.राजूरकर या शेतकऱ्यांनी ट्रॅक्टर, टॅम्पो व बैलगाडयामध्ये कापूस आणला होता. परंतु त्याठिकाणच्या लोकांनी त्यांना सांगितले की, आता खरेदी बंद झालेली आहे, आता खरेदी सुरु होणार नाही. त्याठिकाणी मी गेल्यानंतर सगळया शेतकऱ्यांनी मला सांगितले की, आम्हाला कापूस घेणार नाही असे सांगितले आहे. त्यावेळी मी जिल्हाधिकाऱ्यांना विचारले की, कापूस खरेदी बंद झाली आहे काय ? त्यावर जिल्हाधिकाऱ्यांनी "नाही" असे उत्तर दिले. परंतु आपल्या खालच्या अधिकाऱ्यांनी शेतकऱ्यांना खोटी माहिती दिली, हे योग्य नाही. आज आपण शेतकऱ्यांच्या कापसाला कोणता भाव देत आहात ? सीसीआयचा दर 2,020/- रुपये असून त्यापैकी शेतकऱ्यांच्या हातात रुपये 1980-/ ते 1990/- पैकी फक्त 1944/- रुपये येतात, त्यामध्ये व्यापारी शेतकऱ्यांना 1911/- रुपयांचा दर देतो. तसेच आपण एका बैलबंडीचे जवळपास 120 रुपये कमी करता. तिकडे असलेले आपल्या पणन महासंघाचे अधिकारी श्री.टी.जे.कोहाडकर, झोनल मॅनेजर यांनी ग्रेडरला आदेश दिले आहेत की, प्रत्येक बंडीसाठी कमीत कमी 200 रुपये घेण्यात यावेत. आज एका बाजूला शेतकरी मरत असताना आपले अधिकारी अशाप्रकारे मानसिक त्रास शेतकऱ्यांना देत आहेत, हे योग्य नाही. यवतमाळ येथील एका शेतकऱ्याने आपला कापूस विकला जाऊ शकत नाही, त्याला भाव मिळणार नाही, त्याची मोजणी होणार नाही म्हणून 4 दिवसांपूर्वीच जाळून घेतले. अशाप्रकारे आज शेतकरी विष पिऊन, फाशी घेऊन आत्महत्या करीत असताना आपले अधिकारी मात्र सुधारण्यास तयार नाहीत. " जसा राजा तशी प्रजा," राजा सुधारल्याशिवाय प्रजा सुधारणार नाही. माझी विनंती आहे की, शेतकऱ्यांच्या बाबतीत अशाप्रकारचा जो खेळखंडोबा चालला आहे, त्याबाबतीत आपण विचार करणार आहात की नाही ? आपल्याला कापूस खरेदी करावयाचा नसेल तर आपण तसे सांगावे. आपल्या शेतामध्ये काय पिकवायचे ते शेतकरी ठरवतील. सभापती महोदय, याठिकाणी घोषणा करण्यात येते की, आम्ही एवढा भाव देणार आहोत, तेवढा भाव देणार आहोत. परंतु याबाबतीत

..2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पाशा पटेल...

आपली उप समिती कधी बसणार आहे ? ती आपण लवकर बसवा. मला आताच उडत उडत एक माहिती मिळाली आहे की, आणखी एक शेतकरी गोळी लागल्यामुळे मेलेला आहे, ही बातमी खरी आहे की अफवा आहे, ते मला माहीत नाही. याबाबतत आपण नेमकी खातरजमा करुन घ्यावी. आज कापूस केंद्रावर शेतकऱ्यांच्या एक ते दीड किलो मिटर लांब रांगा लागलेल्या आहेत. माननीय मंत्रिमहोदय आपण याबाबतीत आपले कतृत्व पणाला लावावे व आज शेतकऱ्यांवर अशाप्रकारची जी वेळ आलेली आहे ती आपण आपल्या डोळयांनी पाहू नये, कारण आपण असे जर केले तर एक दिवस आपल्यावरही ती वेळ आल्याशिवाय राहणार नाही, एवढेच मी सांगून आपली रजा घेतो.

..3...

अप्रधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.जोगेंद्र कवाडे (नामनियुक्त) : सभापती महोदय, आजकाल प्रत्येक समस्यांचे प्रश्नाचे उत्तर बंदुकीने देण्याची वाईट गोष्ट सुरु झाली आहे, हे कृपा करुन थांबले पाहिजे, अशी माझी विनंती आहे. आज विदर्भातील शेतकरी पांढरे सोने पिकवतो, ज्याला आपण कापूस म्हणतो. आज वणीसारख्या ठिकाणी गोळीबार होऊन त्याठिकाणच्या कापसाचा पांढरा रंग लाल झालेला आहे, ही अत्यंत दुर्दैवी बाब आहे.

नंतर श्री.रोझेकर...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

या शेतक-यांच्या भावना समजून न घेता 8/10 दिवस शेतकरी वाट बघत असतात, अधिकारी वर्ग त्यांना दाद देत नाही त्यामुळे संतापून शेतकरी जाब विचारण्यासाठी जातो. या शेतक-यांच्या प्रश्नाचे उत्तर मात्र बंदुकीच्या गोळयांनी दिले जावे, ही अत्यंत दुर्देवी बाब आहे. ज्या अधिका-यांनी शेतक-यांना 8 दिवस ताटकळत ठेवले, अशी परिस्थिती निर्माण केली, त्या अधिका-यांना पोलिसांनी दंडुका मारण्याचे धाडस दाखविले नाही. ज्या अधिका-यांनी त्रास दिला त्यांना पोलिसांनी काही केले नाही. अशा परिस्थितीमध्ये अश्रुधुर, लाठीमार न करता एकदम गोळीबार करुन कापूस उत्पादक शेतक-याचा बळी घेण्यात आला, ही अत्यंत दु:खद, दुर्देवी, महाराष्ट्राला लाजविणारी गोष्ट आहे. मला या निमित्ताने एवढेच म्हणावयाचे आहे की, यवतमाळ जिल्हयात आत्महत्या करणारे जास्त शेतकरी आहेत. सन्माननीय ज्येष्ठ सदस्य, श्री.अरुणभाई गुजराथी यांनी सांगितले की, 'आत्महत्या ते हत्या' असा शेतक-यांचा प्रवास सुरु झाला आहे, ते अगदी बरोबर आहे. आत्महत्यांचे कुणीही समर्थन करणार नाही. परंतु, आमच्या डोळयादेखत न्यायहक्कासाठी लढणा-यांच्या अशा हत्या केल्या जात असतील तर ते शासनाला शोभनीय नाही. विरोधी पक्षनेत्यांनी मागणी केली की, जे शेतकरी पोलीस गोळीबारात ठार झाले त्यांना 10 लक्ष रुपयांची मदत शासनाने दिली पाहिजे, जे जखमी झालेले आहेत त्यांना देखील भरपूर मदत दिली गेली पाहिजे, या मागणीशी मी देखील सहमत आहे. तसेच, त्यांच्या विधवांना शासकीय नोकरी मिळाली पाहिजे. मी या विषयाच्या तांत्रिक बाबींमध्ये जाणार नाही. परंतु, मंत्रीमहोदयांना विनंती आहे की, अशा प्रकारे कापुस उत्पादक शेतक-यांची कोंडी केली जाते तर मग राज्यामध्ये कापूस एकाधिकार योजना सुरु आहे किंवा नाही ? हा महत्वाचा प्रश्न आहे. सीसीआयकडून कापूस घेतला जात असेल, खाजगी व्यापा-यांकडून घेतला जात असेल तर आपल्या यंत्रणेकडून जी शेतक-यांची कोंडी केली जात आहे ती थांबविण्याचा प्रयत्न झाला पाहिजे, अशी माझी विनंती आहे. वैतागलेल्या, संतापलेल्या, गर्भगळीत झालेल्या कापूस उत्पादक शेतक-यांचे सांत्वन करण्याऐवजी, त्यांना मदत करण्याऐवजी त्यांच्यावर गोळीबार करुन त्यांची हत्या करणे हे महाराष्ट्राच्या परंपरेला शोभणारे नाही. दलितांचे जे आंदोलन झाले त्यामध्ये देखील असेच झाले. हे सर्व काय सुरु आहे ? हे थांबले पाहिजे, एवढीच विनंती या निमित्ताने करतो.

..2.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयंत प्र.पाटील (महाराष्ट्र विधानसभा सदस्यांव्दारा निर्वाचित) : सभापती महोदय, आज या विषयावर दोन नियम 03 अन्वये प्रस्ताव देण्यात आलेले आहेत. एक प्रस्ताव सन्माननीय विरोधी पक्षनेते, श्री.पांडुरंग फुंडकर यांनी दिलेला आहे व दुसरा प्रस्ताव मी स्वत:, सन्माननीय सदस्य, श्री.शरद पाटील व श्री.कपील पाटील यांनी दिलेला आहे. स्थगन प्रस्ताव स्वीकारल्यानंतर वेळेचे वाटप करतांना मात्र याबाबतचा विचार झालेला नाही.

तालिका सभापती (डॉ.वसंतराव पवार) : आपण दोन मिनिटात आपले म्हणणे मांडावे.

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, दोन मिनिटात आम्ही आमचे विचार कसे मांडावयाचे ? या ठिकाणी वेळेचे वाटप करतांना याबाबतचा विचार होणे गरजेचे होते.

सभापती महोदय, पणन महासंघाबाबत आणि कापूस खरेदीबाबत काही सन्माननीय सदस्यांनी आपले विचार मांडले आहेत. माझी मागणी अशी आहे की, वणी येथे शेतक-यांवर गोळीबार करण्याची ऑर्डर कोणत्या अधिका-यांनी दिलेली आहे ? गोळीबार करण्याची परिस्थिती का निर्माण झाली ? गोळीबार करीत असतांना एकदा गोळीबार केला हे मी समजू शकतो. परंतु, 2 दिवसात 3 वेळा गोळीबार करण्यात आलेला आहे. सकाळी गोळीबार झाला, दुपारी डी.एस.पी.आल्यानंतर 4 वाजता पुन्हा गोळीबार झाला आणि पुन्हा सकाळी गोळीबार झाला. जो गोळीबार झाला तो केवळ शेतक-यांवर करण्यात आला असे नाही तर एस.टी.मधून प्रवास करणा-या प्रवाश्यांवर देखील गोळीबार झालेला आहे. त्यामुळे सरकारकडून उत्तर देत असतांना पहिल्यांदा गृह खात्याच्या मंत्रीमहोदयांनी याबाबतचा खुलासा करण्याची आवश्यकता आहे. गोळीबार करतांना प्रथम हवेत गोळीबार करावयास हवा, नंतर पायांवर गोळीबार करावयास हवा, अशा प्रकारचे नियम आहेत.

यानंतर श्री.बोरले.....

अप्रुव्हीत पेज / प्रिव्हीलेज नही

श्री.जयंत प्र.पाटील .....

कमरेच्या खाली गोळी मारली पाहिजे. परंतु या ठिकाणी छातीमध्ये गोळी मारण्यात आली. सभापती महोदय, वेळ अपुरा असला तरी शासनाकडून उत्तर देतांना प्रथम गृह विभागाकडून उत्तर मिळाले पाहिजे. कापूस खरेदी कशा प्रकारे करण्यात येते, हे आम्ही माननीय पणन मंत्री श्री.हर्षवर्धन पाटील यांच्याकडून मागच्या 4-5 वर्षापासून सभागृहामध्ये एकेतो. ज्या एस.पी.ने गोळीबार केला, ज्या अधिका-याने गोळीबार करण्याची ऑर्डर दिली त्याला निलंबित करुन या घटनेची सी.बी.आय.कडून चौकशी झाली पाहिजे, अशी मी मागणी करतो. शासनाकडून उत्तर देतांना प्रथम गोळीबार का करावा लागला याचे उत्तर प्रामुख्याने मिळाले पाहिजे, अशी मी विनंती करतो.

श्री.हर्षवर्धन पाटील (पणन मंत्री) : सभापती महोदय,.....

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, माननीय श्री.हर्षवर्धन पाटील गृह विभागासंबंधी बोलणार आहेत काय ? माझ्या नियम 93 च्या प्रस्तावामध्ये मी ही मागणी सुरुवातीलाच केलेली आहे.

तालिका सभापती : सन्माननीय सदस्य श्री.जयंत पाटील आपण प्रथम माननीय श्री.हर्षवर्धन पाटील यांचे उत्तर होऊ द्यावे.

श्री.हर्षवर्धन पाटील : सभापती महोदय, अत्यंत महत्वाची चर्चा सभागृहामध्ये उपस्थित करण्यात आलेली आहे. या विषयावर सभागृहामध्ये आता पर्यंत जी भाषणे झाली ती निश्चितपणे सभागृहाला आणि राज्य सरकारला विचार करायला लावणारी आहेत. जे प्रकरण घडलेले आहे ते निश्चितपणे दुर्दैवी आणि अतिशय गांभीर्याने विचार करण्यासारखे आहे.

(सभापतीस्थानी माननीय उपसभापती)

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. स्थगन प्रस्ताव आणि नियम 93 ची सूचना आहे यामध्ये दोन भाग आहेत. गोळीबाराची परिस्थिती का पद्भवली, यामध्ये पणन महासंघ येतो. गोळीबार का करण्यात आला ? गोळीबाराचे आदेश कोणी दिले ? गोळीबार करण्यासारखी परिस्थिती निर्माण झाली होती काय ? गोळीबारामध्ये मृत्यू झालेल्या शेतक-याच्या कुटुंबाला मदत जाहीर करणार की नाही ? ही माहिती गृह विभागाच्या माध्यमातून आली पाहिजे. पणन विभागाने कापसासंबंधी माहिती द्यावी आणि गृह विभागाने गोळीबारासंबंधी माहिती द्यावी, अशी माझी विनंती आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(विरोधी पक्षाच्या काही सन्माननीय सदस्यांनी सभागृहामध्ये कापडी फलक लावले.)

श्री.हर्षवर्धन पाटील : सभापती महोदय, गृह विभागाकडून गोळीबारासंबंधी माहिती देण्यात येईल. जी घटना घडलेली आहे ती वणीच्या कापूस खरेदी केंद्रावर घडलेली आहे. वणीच्या कापूस खरेदी केंद्रावर जी घटना घडली त्या घटनेसंबंधी माननीय विरोधी पक्ष नेते श्री.पांडुरंग फुंडकर, सन्माननीय सदस्य श्री.नितीन गडकरी व अन्य सन्माननीय सदस्यांनी काही मुद्दे उपस्थिती केले. त्या मुद्यांचा खुलासा होणे आवश्यक आहे. राज्य शासनाच्या माध्यमातून आपण कापूस खरेदीचे धोरण स्वीकारलेले आहे. केंद्र शासनाने ठरवून दिलेल्या हमी भावाप्रमाणे राज्य शासनाने यावर्षी कापूस खरेदी करण्याचे धोरण स्वीकारलेले आहे.

यानंतर श्री.सुंबरे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.हर्षवर्धन पाटील ...

या संदर्भातील धोरण आपण स्वीकारले आणि आज ज्या दिवशी ही घटना घडली त्या दिवशी मराठवाडा, विदर्भ आणि खानदेशमध्ये एकंदर 138 कापूस खरेदी केंद्रे सुरू आपण केली होती. परंतु वणी येथे हा प्रकार घडला. सभापती महोदय, माझ्याकडे या सर्व केंद्रांची आकडेवारी आहे आणि ती मी माननीय सदस्यांना देण्यास तयार आहे. वणी येथील केंद्रावर सीसीआय कडून खरेदी चालू होती. सीसीआय कडून केल्या जाणाऱ्या खरेदीमध्ये एक तर कर्जाची कपात केली जात नाही तसेच त्यांचेकडील पेमेंटही आपल्यापेक्षा लवकर दिले जाते म्हणून जवळपास 300 ते 400 बैलगाड्या तेथे उभ्या होत्या. श्री.शुक्ल नावाचे सीसीआयचे अधिकारी तेथे होते त्यांनी सांगितले की, 50 गाड्यांच्या पुढे मी खरेदी करू शकणार नाही आणि त्यामुळे तेथे खऱ्या अर्थाने वादाला सुरूवात झाली. त्यानंतर काही शेतकरी पुढे आले आणि त्यांनी सांगितले की, तुम्हाला आमचा कापूस घ्यावाच लागेल. तेथे जिनिंग प्रेसिंगची दोन युनिटस् सुरू होती, बाकी युनिटस् मात्र चालू नव्हती. तेथे शेतकरी एकत्र आले त्या नंतर ही जी घटना घडली आहे ती साऱ्या जगाला आता माहिती झाली असल्याने तिचे वर्णन मी येथे करू इच्छित नाही. परंतु ज्या कर्मचारी व अधिकाऱ्यांच्या माध्यमातून चुका झालेल्या आहेत त्या कोठल्याही अधिकारी वा कर्मचाऱ्याला सोडले जाणार नाही, त्यांच्यावर आम्ही निश्चितपणे कारवाई करू. कारण तेथील अधिकारी-कर्मचाऱ्यांनीच तेथील परिस्थिती हाताळणे गरजेचे होते व आहे. सीसीआयच्या अधिकाऱ्यांनी देखील, कारण सीसीआयची योजना ही केंद्र सरकारची असली तरी या झाल्या घटनेच्या संदर्भात मी केंद्रीय वस्त्रोद्योग मंत्र्यांशी बोललो आहे, तेव्हा त्यातील अधिकाऱ्यांना देखील आम्ही सांगितले आहे. सभापती महोदय, सीसीआयची एकंदर 58 केंद्रे आहेत आणि सीसीआयच्या माध्यकमातून आतापर्यंत 6 ते 7 लाख क्विंटल कापूस खरेदी करण्यात आलेला आहे. ही गोष्ट खरी आहे, ती मी प्रांजळपणे कबूल करू इच्छितो की, राज्यातील शेतकरी कापूस पणन महासंघाकडे कापूस विकण्यासाठी जाण्यापेक्षा प्रथमत: सीसीआयकडे जातो कारण त्यांच्याकडून दिल्या जाणाऱ्या खरेदीच्या पेमेंटमधून शेतकऱ्याच्या कर्जाच्या रकमेची कपात केली जात नाही. मात्र आपल्याकडे याबाबतीत असलेल्या नियमानुसार कापूस खरेदीच्या पैशातून 50 टक्के कर्जाची कपात केली जाते. त्यामुळे मोठ्या प्रमाणत शेतकरी सीसीआय च्या केंद्रावर कापूस देण्यास इच्छुक होते. हे केंद्र आपल्या कृषी उत्पन्न बाजार समिती वणी या परिसरामध्येच असल्यामुळे तेथे पाहिजे तेवढ्या सुविधा कृषी उत्पन्न बाजार

..... 3ए 2 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.हर्षवर्धन पाटील ....

कमिटीकडून करण्यात आल्या नाहीत ही वस्तुस्थिती नाकारून चालणार नाही. सभापती महोदय, तेथे जे काही घडले आणि जी काही परिस्थिती आहे ते सांगणे मी माझे नैतिक कर्तव्य समजत असल्याने मी हे सांगत आहे. तर या सर्व परिस्थितीमुळे शेतकऱ्यांमध्ये असंतोष निर्माण झाला. तेथील सीसीआयचे केंद्र बंद झाले होते त्यामुळे तेथील अधिकारी मार्केट कमिटीमध्ये बसून राहिले होते. कारण त्यांनाही भीती वाटत होती की, हा मॉब आता आपल्याला सोडणार नाही. मार्केट कमिटीमध्ये गेल्यानंतर तेथील अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी एका खोलीमध्ये थांबले आणि तेथून त्यांनी पोलिसांना फोन केला की, या ठिकाणी अशी अशी परिस्थिती निर्माण झालेली आहे, असा असा मॉब जमला आहे. त्यामुळे पोलीस तेथे आले आणि त्यानंतर काय घडले ते पोलीस विभागाकडून येथे सांगण्यात येईलच. मी त्याबाबत काही सांगत नाही. सभापती महोदय, या संदर्भात वास्तविक पाहता कापूस महासंघाच्या माध्यमातून साडेचार लाख क्विंटल कापूस खरेदी केला गेलेला आहे. या ठिकाणी चर्चेमध्ये 3-4 प्रश्न उपस्थित करण्यात आले. एक म्हणजे सर्व खरेदी केंद्रे सुरू करणार काय म्हणून. मी आपल्याला सांगू इच्छितो की, घडलेली घटना ही अत्यंत दुर्दैवी आहे आणि अशा प्रकारची घटना कोठल्याही कापूस खरेदी केंद्रावर घडणार नाही अशी खबरदारी आमच्या विभागाच्या माध्यमातून यापुढे घेतली गेली आहे व घेतली जाईल. काही ठिकाणी गरज पडलीच तर असुविधा केंद्रेसुद्धा सुरू करण्याचा निर्णय आपण घेतलेला आहे. त्यामुळे खरेदी केंद्रांच्या बाबतीत कोणतीही अडचण येणार नाही. सभापती महोदय, येथे स्टाफच्या बाबतीतसुद्धा प्रश्न उपस्थित केला गेला. ग्रेडर्सच्या बाबतीत मुद्दा उपस्थित केला. जरूर या सगळ्या प्रकरणामध्ये कोणते ग्रेडर आहेत, कोणते अधिकारी आहेत, कोणते झोनल अधिकारी आहेत, त्या विभागातील कर्मचारी जे शेतकऱ्याला अशा पद्धतीने अडवतात, त्यांची चौकशी आम्ही सुरू केली आहे आणि जे कोणी यामध्ये दोषी सापडतील त्यांना कोणालाही आम्ही सोडणार नाही. ....

(यानंतर श्री. सरफरे .....3बी 1 ..

अधिकृत वृत्त / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. हर्षवर्धन पाटील...

आवश्यकता पडली तर कडक कारवाई करण्यामध्ये कोणतीही अडचण येणार नाही. सभापती महोदय, कापसाच्या प्रश्नाच्या संदर्भात विदर्भ, खानदेश आणि मराठवाडयातील शेतकऱ्यांच्या भावना तीव्र आहेत, लोकप्रतिनिधींच्या भावना तीव्र आहेत. त्यामध्ये दोन गोष्टी महत्वाच्या आहेत. याठिकाणी विचारले जाते की, राज्यातील सर्व कापूस राज्य सरकार खरेदी करणार आहे काय? कारण खाजगी व्यापाऱ्यांकडून कमी भाव दिला जात आहे. डोमॅस्टीक आणि इंटरनॅशनल मार्केटमध्ये भाव उतरले आहेत. त्यामुळे लोकांना चिंता वाटत आहे की, आमचा कापूस शेतकरी घेणार आहे की नाही? मी शासनाच्या वतीने सदनाला सांगू इच्छितो की, या राज्यामध्ये जेवढा कापूस शेतकरी सेंटरवर आणतील तो सर्व कापूस खरेदी करण्याची व्यवस्था विभागाच्या माध्यमातून करण्यामध्ये कोणतीही अडचण येणार नाही.मात्र आम्हाला सेंटरवाईज कार्यक्रम तयार करावा लागेल. एका सेंटरवर किती कापूस खरेदी करावा. त्याठिकाणी किती वजनापर्यंत खरेदी करण्यात येणार आहे? जिनिंग व प्रेसिंग किती करण्यात येणार आहे? ग्रेडेशन कितीचे करण्यात येणार आहे? याची वर्गवारी विभागाच्या माध्यमातून करावयास सुरुवात केली आहे. त्याप्रमाणे वर्तमानपत्रामध्ये आम्ही कार्यक्रम प्रसिध्द करणार आहोत. त्यात प्रत्येक केंद्रावर किती कापूस खरेदी केला जाईल, ते सेंटर किती दिवस चालणार आहे, जादा कापूस किती दिवस खरेदी केला जाणार आहे, आणि खरेदी केलेल्या कापसाची विल्हेवाट कशी लावण्यात येणार आहे.जोपर्यंत आपण जिनिंग आणि प्रेसिंगबाबत पुढील कार्यक्रम करीत नाही तोपर्यंत पूर्ण कापूस खरेदी करुन चालणार नाही, कारण तो कापूस ठेवावयास आपल्याकडे जागा उपलब्ध होणार नाही. म्हणून ही सर्व व्यवस्था विभागाच्या माध्यमातून करण्याचे आम्ही ठरविले आहे.

सभापती महोदय, दुसरा महत्वाचा मुद्दा मांडला गेला की, जिनिंग व प्रेसिंग संघटनेच्या काही तक्रारी आल्या होत्या. त्यांची देय रक्कम बाकी होती. त्यामध्ये मराठवाडयातील रक्कम दिली आहे] व विदर्भातील पैसे दिले गेले नाही असा मुद्दा मांडण्यात आला. याबाबत काल अधिकाऱ्यांबरोबर बैठक घेण्यात आली असून अधिकाऱ्यांना सूचना देण्यात आल्या आहेत. या सभागृहामध्ये पणन महासंघाचे माननीय अध्यक्ष उपस्थित आहेत. गेल्या वर्षीचे ज्यांचे ज्यांचे या संदर्भातील जे हिशेब असतील ते करुन देण्याबाबत कालच अधिकाऱ्यांना सांगितले आहे. आणि त्यांच्या इतर मागण्या आल्या आहेत त्याबाबत सुध्दा आम्ही लवकरच बैठक घेऊन या संदर्भात काही अडचण असेल तर ती दूर करण्याच्या संदर्भात निर्णय घेतला आहे. सी.सी.आय. बाबत

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ KTG/ KGS/

श्री. हर्षवर्धन पाटील...

याठिकाणी सांगण्यात आले. आज सी.सी.आय. मार्फत रोज 1 लाख क्विंटल कापूस खरेदी करण्याची व्यवस्था केली आहे. तसेच, त्यांनी 5 ते 10 दिवसात शेतकऱ्यांना कापसाचे पेमेंट करण्याचे मान्य केले आहे. राज्य सरकारच्या वतीने हमी भावाचे पेमेंट 15 दिवसात करावे असे सांगितले असले तरी 15 दिवसाच्या अगोदर कमीत कमी कालावधीत पेमेंट करण्यात येईल काय? या संदर्भात आणि पैश्याच्या संदर्भात प्रश्न उपस्थित करण्यात आला. यामध्ये शासनाने 2 हजार कोटी रुपयांची व्यवस्था केली आहे.मार्केटमध्ये आपल्याला 400 कोटी रुपये मिळणार आहेत.आणि ओपन मार्केटमधून नॅशनलाईज बँक आणि एम.एस.सी.बी. कडून 8 टक्के दराने 100 कोटी रुपये उपलब्ध झाले आहेत. अशाप्रकारे 500 कोटी रुपये शेतकऱ्यांच्या पेमेंटसाठी उपलब्ध आहेत. जिनिंग प्रेसिंगच्या बाबतीत सुध्दा आवश्यकता पडली तर सरकार थकित हमी देऊन ओपन मार्केटमधून पैसे उपलब्ध करुन देण्यामध्ये आपल्याला अडचण येणार नाही. महत्वाचा मुद्दा असा की, लोड शेडींगमुळे जिनिंग आणि प्रेसिंगच्या कामाबाबत माननीय सदस्य श्री. अरुण गुजराथी आणि माननीय सदस्य श्री. नितीन गडकरी यांनी मुद्दा उपस्थित केला. लोड शेडींगमुळे जिनिंग आणि प्रेसिंगचे काम थांबते. या कामाकरीता विशेष बाब म्हणून 16 तास वीज देण्यासंबंधी ऊर्जा विभागाला विनंती केली आहे. माननीय ऊर्जा मंत्र्यांशी देखील या संदर्भात बोलणे झाले आहे.आणि लवकरच निर्णय घेऊन आपल्याला जिनिंग व प्रेसिंगचे काम दोन शिफ्टमध्ये 24 तास करावे लागणार आहे. जिनिंग व प्रेसिंगचे काम झाल्याशिवाय गाठी तयार होऊ शकत नाही. त्या तयार झाल्यानंतर खरेदीची प्रक्रिया सुरु करता येते. म्हणून ही सर्व कामे पूर्ण करण्यात येणार आहेत. याबाबतीत कृषी उत्पन्न बाजार समितीने एक फतवा काढला आहे.मार्केट कमिटी 75 पैसे सेस कशासाठी घेत आहे? शेतकऱ्यांच्या बैलाला पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करणे, शेतकऱ्यांना निवाऱ्याची व्यवस्था करणे,आणि त्यांच्या लाईटची व्यवस्था करणे हे कृषी उत्पन्न बाजार समितीचे काम आहे. प्रत्येक मार्केट कमिटीच्या बोर्डामध्ये असिस्टंट रजिस्ट्रार हे मेंबर सेक्रेटरी म्हणून नियुक्त करण्यात आले आहेत. त्याचप्रमाणे डिस्ट्रिक्ट लेव्हलवर डी.डी.आर. आहेत . त्याबाबत शासनाने असे परिपत्रक काढले आहे की, मार्केट कमिटीच्या परिसरामध्ये जेवढे सेंटर सुरु केले आहेत त्या सर्व सेंटर्सना त्यांनी भेटी दिल्या पाहिजेत व त्याठिकाणी नियोजन केले पाहिजे.

(यानंतर श्री. किल्लेदार)

अरुणाचल पत्र / प्रतिलिपी नाही

श्री.हर्षवर्धन पाटील (पुढे सुरु...

कापूस पणन महासंघामध्ये यापूर्वी प्रशासकीय मंडळ होते, आता पहिल्यांदा लोकप्रतिनिधींचे संचालक मंडळ निवडून आलेले आहे. त्या भागातील संचालक आणि सदस्य असतील त्यांनी सगळ्या कापूस खरेदी केंद्रावर भेटी देऊन त्या ठिकाणचे नियोजन करण्याबाबातचा निर्णय घेतलेला आहे. हे सगळे अधिकाऱ्यांवरच सोपवून चालणार नाही. या पणन विभागाचा मंत्री म्हणून मी आणि राज्य मंत्री महोदय, निश्चितपणे काही केंद्रावर भेटी देणार आहोत. त्या ठिकाणी प्रत्यक्षात काय अडचणी आहेत, त्या जाणून घेऊन त्या सोडविण्याचा सातत्याने प्रयत्न करतो आहोत. पहिला निर्णय घ्यावा लागणार आहे की, केंद्रावर कापूस आल्यानंतर पहिल्यांना बैलगाडीतील कापूस घ्यावा लागणार आहे. त्यानंतर टॅक्ट्रर, मेटॅडोअरमधील कापूस घ्यावा लागणार आहे. बैलगाड्या टॅक्टर, इत्यादीमधील कापसाचे वजन गेल्याशिवाय त्यामधील कापूस काढू शकत नाही. याबाबतची व्यवस्था देखील पणन महासंघाच्या माध्यमातून करत आहोत. शेतकऱ्यांना वाटते की, डिसेंबरनंतर कापसाचे भाव 200 रुपयांनी कमी होतील. या निमित्ताने शेतकऱ्यांना मी आवाहन करु इच्छितो की, डिसेंबरमध्ये भाव पडतील अशातला भाग नाही. एकदम कापूस सेंटरवर कापूस आला तर नियोजन करणे अवघड होणार आहे. 3-3, 4-4 दिवसामध्ये किती कापसूस घेतला जाईल, याची वर्तमानपत्रामध्ये माहिती दिली जाईल. त्या भागातील लोकप्रतिनिधी असतील त्यांच्या माध्यमातून कापूस किती कापूस घ्यायचा याची माहिती दिली जाईल. शेवटी कापूस घेण्याची आमची पूर्ण तयारी आहे परंतु या संबंधात नियोजन करुन त्या संदर्भातील धोरण ठरविणे यामध्ये कोणतीही अडचण येणार नाही. कापसाच्या भावाच्याबाबतीमध्ये चर्चा झाली. या संदर्भाने समिती गठीत झालेली आहे. कापसाचे भाव वाढवून देणार आहोत काय, अनुदान देणार आहोत काय ? याबाबतीतील प्रश्न उपस्थित करण्यात आले.

उपसभापती : 4-00 वाजल्यानंतर मतदान घेता येणार नाही. म्हणून माननीय मंत्री महोदयांनी आपले भाषण आटोपते घ्यावे. आता 3 वाजून 52 मिनिटे झालेली आहेत, आठ मिनिटे बाकी आहेत. यानंतर उत्तराचे भाषण होणार आहे.

श्री.नितीन गडकरी (बसून) : आम्ही मतदान मागत नाही. वेळ वाढवून घ्यावा.

उपसभापती : ठीक आहे. मंत्रीमहोदयांनी त्यांचे भाषण पुढे सुरू ठेवावे.

2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ KGS/ KTG/

श्री.हर्षवर्धन पाटील (पुढे सुरू...

श्री.हर्षवर्धन पाटील : कापसाच्या भावाच्या संबंधाने समिती गठीत झालेली आहे. या समितीमध्ये पणन मंत्री म्हणून मी अध्यक्ष आहे आणि विदर्भ, मराठवाडा विभागातील मंत्री सदस्य आहेत. आज संध्याकाळी दुसरी बैठक बोलाविलेली आहे. या बैठकीमध्ये निश्चितपणे निर्णय घेणार आहोत. त्याबाबतचा प्रस्ताव उप समितीकडून मंत्री मंडळाच्या मान्यतेसाठी घेऊन जाऊन अधिवेशन संपण्यापूर्वी त्याबाबतचे धोरण जाहीर होईल. मला सदनाला सांगावयाचे आहे की, सन्माननीय श्री.गडकरी साहेबांनी मुद्दा उपस्थित केला की, गुजरातमधील कापूस मोठ्या प्रमाणात चीनला निर्यात झाला आणि आपण निर्यात केलेलेल्या कापसामध्ये अडचणी आलेल्या आहेत. त्यांना जी काही माहिती मिळालेली आहे ती चुकीची आहे. आपण सन 2005-2006 मध्ये 6 हजार कापसाच्या गाठी या साऊथ आफ्रिकेला पाठविलेल्या आहेत. त्याला उत्तम भाव मिळालेला आहे. वास्तविकपणे कापसाचे सगळे प्रोसेसिंग केल्यानंतर कापसाच्या गाठी तयार केल्या जात नाहीत.

यानंतर श्री.बरवड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. हर्षवर्धन पाटील .....

माल एक्स्पोर्ट करावयावचा म्हटला तर त्याचे सर्टिफिकेशन केले जाते आणि सर्टिफिकेशन केल्यानंतर तो माल एक्स्पोर्ट केला जातो. या सगळ्या प्रोसेसमध्ये ग्रेडरच्या संदर्भात सातत्याने बोलले जाते. व्ही.आर.एस. संबंधीचा प्रश्न उपस्थित करण्यात आला. मी त्या विभागाचा प्रमुख म्हणून व्ही.आर.एस.ची योजना आणली. एकूण 4800 कर्मचारी कॉटन फेडरेशनमध्ये काम करीत होते. माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी तसेच माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते साहेबांनी पणन मंत्री म्हणून त्या ठिकाणी काम केलेले आहे. तेथील आस्थापना खर्च 82 कोटी रुपये होता. आम्ही त्याबाबत निर्णय घेतला. यामध्ये जेवढा अनावश्यक आस्थापना खर्च होता तो कमी करण्याचा प्रयत्न केला. यामध्ये तोटा सरकारचा आहे. परंतु कोणीही यावयाचे आणि सरकारला लुटावयाचे असे चालणार नाही. यामध्ये कडक भूमिका आणण्याचा प्रयत्न केला. व्ही.आर.एस.ची 135 कोटी रुपयांची योजना आणली. त्यामध्ये 4 हजार कर्मचाऱ्यांनी व्ही.आर.एस. घेतली. 800 कर्मचाऱ्यांनी या फेडरेशनचे नियोजन केले. काही बाबी आऊट सोर्सींगच्या माध्यमातून करण्याचा प्रयत्न करीत आहोत. काही खर्च रेट कॉन्ट्रॅक्टच्या माध्यमातून करण्याचा प्रयत्न करीत आहोत. यामध्ये खाजगी जिनिंग-प्रेसिंगला परवानगी दिली. कापूस एकाधिकार खरेदीच्या ॲक्टला 2001 साली मुदतवाढ मिळाली. या ठिकाणी कापूस एकाधिकार चालू आहे की, नाही याबबात टीका करण्यात आली. 2001 साली या ॲक्टला मुदतवाढ मिळाली. ही मुदतवाढ 2006 पर्यंत मिळालेली आहे. त्या ॲक्टची अंमलबजावणी करीत असताना या राज्यामध्ये आपण हे धोरण गेल्या तीन वर्षापासून स्वीकारलेले आहे की, आपली जर एकट्याची खरेदी असेल आणि शेतकऱ्याला जर दुसऱ्या बाजूला माल विकावयाचा असेल तर तो विकू शकत नाही अशी आपल्या ॲक्टमधील तरतूद आहे.

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. या सभागृहाचे कामकाज नियमानुसार चालते. या शासनाचे कामकाज नियमानुसार चालते. कापूस एकाधिकार खरेदीचा जो कायदा होता त्याला आपण मुदतवाढ दिली नाही. आज तो कायदा अस्तित्वात नाही. जर तो कायदा अस्तित्वात नसेल तर मग एकाधिकार खरेदी योजना अस्तित्वात कशी ? जर एकाधिकार खरेदी योजना अस्तित्वात आहे आणि ती योजना कायद्याप्रमाणे चालू आहे तर हा कायदा जिवंत आहे असे माननीय मंत्रिमहोदयांनी सांगावे.

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ SBT/ KTG/ KGS/ MAP

श्री. हर्षवर्धन पाटील : सभापती महोदय, शासनाने जी.आर. काढलेला आहे. कापूस खरेदी हंगाम 2004-05, कापूस खरेदी हंगाम 2005-05, कापूस खरेदी हंगाम 2006-07 यासंदर्भात जी मुदतवाढ केंद्र सरकारने आपल्याला दिली त्याबाबत या सदनामध्ये यापूर्वीही चर्चा झालेली होती. यामध्ये काही बदल सुचविले म्हणून जो मूळ ॲक्ट आहे त्यामध्ये काही सुधारणा....

श्री. नितीन गडकरी : माझा हरकतीचा मुद्दा आहे. हा कायदा अस्तित्वात नाही.

श्री. हर्षवर्धन पाटील : सभापती महोदय, या ॲक्टच्या संदर्भात काही सुधारणा करण्याकरिता विधि व न्याय खात्याकडे प्रस्ताव दिला आहे आणि त्यासंदर्भात...

श्री. नितीन गडकरी : त्याला किती वर्षे लागणार ?

श्री. हर्षवर्धन पाटील : या राज्यामध्ये खरेदी सुरु केलेली आहे...

श्री. पांडुरंग फुंडकर : माझा हरकतीचा मुद्दा आहे. गेल्या तीन अधिवेशनांपासून आम्ही राज्याच्या माननीय पणन मंत्र्यांना विचारत आहोत की, एकाधिकार खरेदी योजना अस्तित्वात आहे काय ? कायदा अस्तित्वात आहे काय ? हे बिल केव्हा आणणार ? माननीय मंत्रिमहोदय तीन वर्षे हेच सांगत आहेत की, कायदा खात्याकडे तपासणीसाठी पाठविले आहे. केंद्राने या कायद्याला 2006 पर्यंत मुदत दिलेली आहे. सन 2006 हे वर्ष संपल्यानंतर मुदत संपणार आहे. शासनाने सभागृहात बिल आणलेले नाही. आज माननीय मंत्रिमहोदय सांगत आहेत की, कायदा खात्याकडे दिलेले आहे. आपण समोरच्या सन्माननीय सदस्यांना इतके मूर्ख समजता काय ? आम्ही एकाधिकार खरेदी योजना बंद केलेली आहे असे आपण सांगावे. एकाधिकार खरेदी योजना चालू आहे असे सांगून या ठिकाणी सभागृहाची दिशाभूल केली जात आहे.

श्री. नितीन गडकरी : माझा हरकतीचा मुद्दा आहे. आम्हाला आपल्याकडून संरक्षण पाहिजे. या सभागृहाचे कामकाज नियमाप्रमाणे चालणार आहे की नाही ? याबाबत आपण निर्णय द्यावा. मागच्या दोन अधिवेशनात माननीय मंत्रिमहोदय श्री. हर्षवर्धन पाटील सांगतात की, आता अध्यादेश काढतो. हे सांगितले की नाही ? मागच्यावेळी सभागृहात गोंधळ झाला होता. महाराष्ट्र कॉटन मोनापली ॲक्ट तीनवर्षापूर्वीच संपलेला आहे. कोणत्याही प्रकारचा कायदा अस्तित्वात नाही. त्यामुळे एकाधिकार खरेदी योजना अस्तित्वात नाही.

यानंतर श्री. शिगम...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. नितीन गडकरी...)

ती मेलेली आहे. तरी ती जिवंत आहे, चालू आहे असे सांगितले जाते. कोणत्या आधारे आणि कोणत्या कायद्याप्रमाणे ही योजना चालू आहे असे आपण सांगता ? याठिकाणी सभागृहाची दिशाभूल केली जात आहे. सन्माननीय सदस्य श्री. अरुणलाल गुजराथी यांचा सल्ला मला पटला. त्यांनी सांगितले की, असत्य आश्वासने देऊ नका. जे जमेल तेच सांगा. त्यांचे गांधीवादी विचार ऐकून गांधीगिरी करा. भामटेगिरी करु नका. मंत्री महोदयांनी सरळ सांगावे की, कायदा अस्तित्वात नाही केवळ शेतक-यांच्या हिताकरिता हे मेकॅनिझम आपण चालवित आहात.

श्री. मधुकर सरपोतदार : सन्माननीय सदस्य श्री. नितीन गडकरी यांनी मांडलेल्या हरकतीच्या मुद्याला पाठिंबा देण्यासाठी मी उभा आहे. आम्ही अध्यादेश काढतो असे गेल्या तीन वर्षापासून या सभागृहामध्ये सांगितले जात आहे. पहिला अध्यादेश संपूण तीन वर्षे झाली. प्रत्यक्षात कायदा तयार केलेला नाही. तसेच याबाबतीत पर्यायी व्यवस्था देखील केलेली नाही. या पार्श्वभूमीवर कापूस एकाधिकार योजना चालू आहे असे सांगितले जाते. आज शेतकरी मारले जात आहेत. कोणत्या कायद्याच्या आधारे ही योजना चालू आहे, हे मंत्री महोदयांनी सांगावे.

श्री. हर्षवर्धन पाटील : 2001 ते 2006 या कालावधीसाठी या कायद्याला केन्द्र सरकारने मुदतवाढ दिली. 1995 आणि 1996 या दोन वर्षी देखील मुदतवाढ दिलेली नसताना ही योजना आपण चालू ठेवली. 2001 ते 2006 अशी 5 वर्षे या कायद्याला केन्द्र सरकारने मुदतवाढ दिली. तीन वर्षापूर्वी मंत्रिमंडळाने निर्णय घेतलेला आहे. कापूस एकाधिकार खरेदी योजनेअंतर्गत फक्त आपणच कापूस खरेदी करीत होतो. कायद्याच्या कलम 17 (1) आणि 19 (अ)मधील बदलाचा उपयोग करुन ही कापसाची खरेदी आपणच करण्याऐवजी इतरांनाही ती परवानगी द्यावी, असा धोरणात्मक निर्णय मंत्रिमंडळाने घेतलेला आहे.....(अडथळा) ... दरवर्षी कापूस खरेदीचे धोरण मंत्रिमंडळासमोर मांडले जाते. राज्य सरकार अमूक पध्दतीने कापूस खरेदी करील असा निर्णय राज्य सरकार घेत असते. त्यासाठी मार्जिन-मनी देखील उपल्ब्ध करुन दिला जातो. ही कापूस एकाधिकार खरेदी योजना आपण चालू ठेवलेली आहे. या योजनेमध्ये आपण बदल करीत आहोत. फक्त आपल्या खरेदी बरोबरच आपण सीसीआयची खरेदी आणि इतर व्यापा-यांच्या माध्यमातून होणारी खरेदी, खाजगी लोकांच्या माध्यमातून होणारे जिनिंग प्रेसिंग यास परवानगी द्यायची अशा

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. हर्षवर्धन पाटील...

पध्दतीचा जी.आर. काढून आपण हे काम सुरु केलेले आहे. 2006 पर्यन्त या कायद्याला केन्द्र सरकारने मान्यता दिलेली आहे. या संदर्भात विधी व न्याय विभागाच्या दोन बैठकाही झालेल्या आहेत. कायद्यामध्ये जे काही बदल करायचे आहेत त्याबाबतीत चर्चा चालू आहे. त्या सुधारणेसहीत या कायद्याला मुदतवाढ मिळण्यासाठी आपण केन्द्र सरकारकडे जाणार आहोत.

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. मी गेली 20 वर्षे या सभागृहाचा सदस्य आहे. मुख्य विषयाला बगल देऊन ज्या गोष्टी सांगण्याची गरज नाही तेच मंत्री महोदय सांगत आहेत. आज 11 डिसेंबर 2006 अशी तारीख आहे. बरोबर 20 दिवसांनी केन्द्र सरकारची परवानगी संपेल. या कायद्यामध्ये दुरुस्ती केल्यानंतर नवीन बिल सभागृहामध्ये आणले नाही. दोन वर्षे विधी व न्याय विभागामध्ये यावर चर्चा सुरु आहे. त्यांच्या तीन बैठका झाल्या.

...श्री. गागरे....

अप्रमाणित प्रत / प्रतिक्षेसाठी नोंद

श्री.नितीन गडकरी ..... (पुढे सुरु)

विधानपरिषेदतील कारपेटचा रंग लाल असावा असे नियमात लिहिलेले आहे. राज्यपाल आल्यानंतर कोणी किती फुटावर उभे राहावे यासंबंधीही नियम आहेत. या राज्यामध्ये कापसाच्या बाबतीत कापूस एकाधिकार खरेदी कायद्याला स्थगिती मिळाली आहे, तो अस्तित्वात नाही. हे आपले कायदे मंडळ आहे, आपण कायदे करणारे आहोत. आपण मला सांगावे की, कापूस एकाधिकार कायद्यामध्ये सुधारणा करुन नवीन कायद्याला सभागृहाने मंजूरी दिली आहे का ? जर आपण कायदा केला नसेल तर या संदर्भात राज्यपालांकडून दुरुस्तीचा अध्यादेश तरी काढला आहे का ? तो काढला नाही तर मग हा कायदा अस्तित्वात नाही. तरी कापूस एकाधिकार कायदा जीवंत कसा आहे.? हा वैधानिक प्रश्न आहे. मंत्री महोदय, उत्तराला बगल देत आहेत. उपसभापती महोदय, मी हरकतीच्या मुद्दयावर बोलत आहे, आता तुम्ही आमचे समाधान करा. हा कायदा अस्तित्वात नसेल तर मंत्री महोदयांचे हे नियमबाहय वर्तन आहे, यावर आपण काही कारवाई करणार आहात ? मी जबाबदारीने सांगतो की, अध्यादेश निघाला नाही. नवीन दुरुस्तीचे बील मंजूर झाले नाही, मंत्रीमंडळासमोर केलेली दुरुस्ती विधीमंडळासमोर आणलेली नाही, हे कायद्याचे उल्लंघन सुरु आहे. नाही तर तुम्ही असे तरी बोला की, मी कायद्याला धरुन बोलत नाही. मी माननीय पणन मंत्र्यांना प्रश्न विचारला तेव्हा सांगितले होते की, आता करतो. तसेच त्यांनी सांगितले की, अधिवेशन संपण्याच्या आत अध्यादेश काढतो. परंतु अद्याप अध्यादेश काढला नाही. सभागृह कायद्याने चालत आहे असे दिसत नाही. सभापती महोदय, या सभागृहाचे सभापती म्हणून आपली जबाबदारी आहे. या सदनाचे पावित्र्य आहे, अशा प्रकारे उत्तर दिल्यामुळे या सभागृहाचे पावित्र्य नष्ट होत आहे. मंत्री महोदयांची ही भूमिका कायदेशीर आहे काय ? हे आपण सांगावे, कारण या सभागृहाची दिशाभूल होत आहे, आपण या बाबतीत खुलासा आपण करावा. आम्हाला संरक्षण देण्यात यावे.

उपसभापती : माननीय मंत्री महोदयांनी आताच सांगितले आहे की, एकाधिकार कापूस खरेदीच्या योजनेला 2006 पर्यत मुदतवाढ दिली आहे.

श्री.हर्षवर्धन पाटील : मी या सदनाला स्पष्ट माहिती देत आहे, कापूस एकाधिकार खरेदी योजनेला 2001 ते 2006 पर्यत मुदतवाढ मिळाली आहे. 2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर : मंत्री महोदयांना या संबंधीचे विधेयक या सभागृहात आणून मंजूर करुन घेतले आहे का ? हा प्रश्न आहे.

श्री.हर्षवर्धन पाटील : एकाधिकार कापूस खरेदी योजनेस मुदतवाढ मिळाल्यानंतर या राज्यामध्ये गेले तीन वर्ष खरेदी सुरु होती. या योजनेत इतरांनाही कापूस खरेदीला परवानगी देण्याची अट होती. या संदर्भात मंत्रीमंडळामध्ये या विषयावर चर्चा झाली होती. त्यावेळी कापूस खरेदीचे धोरण आपण स्वीकारावे असा निर्णय मंत्रीमंडळाने घेतला आहे व त्याप्रमाणे कापूस खरेदीचे धोरण आपण स्वीकारले आहे. कापूस खरेदीच्या योजनेमध्ये आपण 2006 मध्ये बदल केलेला आहे.

..... यानंतर श्री.सोनवणे

अप्रधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. हर्षवर्धन पाटील : सन 2006 पर्यंत यासंदर्भामध्ये आपल्याला मुदत वाढ मिळालेली आहे. यासंदर्भामध्ये कापूस खरेदीचे जे धोरण आहे त्या धोरणाप्रमाणे आपण ही खरेदी चालू केली आहे.

उप सभापती : आता मी माझा निर्णय देणार आहे.

श्री.नितीन गडकरी : दोन प्रश्न आहेत, मंत्रीमंडळाच्या बैठकीत चर्चा केल्यानंतर त्या कायद्याचे प्रारुप विधानमंडळासमोर आणले काय ? नसेल आणले तर दुसरा कॉन्स्टीटयुशनल अधिकार आहे, त्यानुसार अध्यादेश काढला का ? दोन्हीचे उत्तर नाही असे आहे. याचा अर्थ तो कायदा अस्तित्वात नाही. सन्माननीय सदस्य श्री. हर्षवर्धन पाटील हे माझे मित्र आहेत. पण कळत न कळत सरकारकडून कायद्याची पायमल्ली होत आहे. वैधानिक पध्दतीने पायमल्ली होत आहे. सत्य जे असेल ते सांगून टाका. एकाधिकार वगैरे सगळे बंद आहे. शेतकऱ्यांसाठी आम्ही एवढे करतो हे तरी सांगून टाका, खरेदी सुरु आहे काय ? अध्यक्ष महाराज खरे सांगावयाचे नाही आणि जे सत्य आहे ते पुढे येऊ द्यावयाचे नाही. प्रश्न विचारला तर बाकीच्या विषयावर भाषण द्यावयाचे, अशाप्रकारे सभागृहाला कात्रजच्या घाटात नेणे असा हा प्रकार आहे. तुम्ही जरी पुणे जिल्हयातील असलात आणि बारामतीच्या जवळ राहत असलात तरी बारामती आणि तुमच्यात फरक आहे.

उपसभापती : पहिली गोष्ट म्हणजे या विषयावर खूप चर्चा झाली आहे. मी आपले हरकतीचे मुद्दे ऐकून घेतले आहेत. कायदा अस्तित्वात नसला तरी प्रशासकीय आदेशान्वये एखादी योजना चालविण्यास काहीच हरकत नाही त्यात बेकायदेशीर असे काही नाही. कायदा न करताही बऱ्याच बाबी प्रशासकीय आदेशान्वये करता येतात आणि त्या अनुषंगाने त्यांनी केलेल्या आहेत त्यामुळे हरकतीचा मुद्दा मी या ठिकाणी थांबवितो.

श्री. हर्षवर्धन पाटील : विदर्भामध्ये क्रॉपींग पॅटर्नच्या बाबतीत आपल्याल बदल करणे आवश्यक आहे.

श्री. पांडुरंग फुंडकर : अध्यक्ष महाराज.....

उप सभापती : मी माझा निर्णय दिलेला आहे. सन्माननीय मंत्री महोदयांना त्यांचे उत्तर पूर्ण करण्याची संधी द्यावी.

3G-2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. हर्षवर्धन पाटील : वणीला जी घटना घडली ती घटना या राज्यामध्ये पुन्हा घडणार नाही. किंबहूना या राज्यामध्ये सर्व शेतकऱ्यांचा कापूस खरेदी करण्यामध्ये कुठल्याही प्रकारची अडचण येणार नाही. अशाप्रकारची आम्ही या ठिकाणी व्यवस्था केलेली आहे.

श्री. नितीन गडकरी : माझी सन्माननीय सदस्यांना एवढीच विनंती आहे की, या विषयावर सभागृहाचे सभापती म्हणून या सभागृहाचा सन्मान, आपला सन्मान आणि सभागृहाचे पावित्र्य कायदे मंडळात रहावे म्हणून अशी प्रोव्हीजन आहे की, ज्या ज्यावेळी असा वैधानिक प्रसंग निर्माण होतो आणि लिगल पॉईंट निर्माण होतो त्यावेळेला आपण ॲडव्होकेट जनरलचे किंवा लिगल विभागाचे मत मागवितो. एकाधिकार खरेदीच्या कायद्याचा प्रश्न सध्या गैर कायदेशीर आहे. कायद्यात दुरुस्ती केली तर सभागृहाला माहिती द्यावयाला पाहिजे होती. सभागृहापासून माहिती लपविली गेली आहे. माझी आपल्याला एवढीच विनंती आहे की, हे जे घडलेले आहे याबाबतीत पूर्णपणे कॉन्स्टीटयुशनल लॅपसेस आहेत, नियमांचे लॅपसेस आहेत तेव्हा विधी विभागाचे मत घेऊन आपण या संबंधी निर्णय द्यावा आणि एकदा आपण ही बाब तपासून घ्यावी अशी माझी विनंती आहे.

उप सभापती : मी या विषयावर निर्णय दिलेला आहे. आपण तो निर्णय मान्य केला. आता आपली विनंती मी मान्य करतो की याच्यावर मी ओपिनियन घेईन आणि आपल्याला जरुर सांगेन.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. आर. आर. पाटील (उपमुख्यमंत्री) : अध्यक्ष महाराज, या सदनाचे सन्माननीय विरोधी पक्षनेते श्री. फुंडकर साहेब यांनी जो नियम 93 अन्वये प्रस्ताव आणलेला त्यावर सदनाच्या सन्माननीय सदस्यांनी चर्चा केलेली आहे आणि काही प्रश्न उपस्थित केलेले आहेत, त्यांना उत्तर देण्यासाठी आणि शासनाची मते व्यक्त करण्यासाठी मी उभा आहे. वणी येथे घडलेली धटना ही मी निश्चितच मी दुर्देवी मानतो. ही घटना घडली नसती तर अधिक चांगले झाले असते पण अनेकवेळा नाईलाज असतो. इच्छा नसताना सुध्दा on the spot काही निर्णय पोलिसांना घ्यावे लागतात. घटना घडते आणि मग त्या घटनेवर सदनामध्ये चर्चा होते.

यानंतर श्री. भोगले....

अप्रमाणित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.आर.आर.पाटील.....

सभापती महोदय, पोलीस दलाचे पहिले काम आहे, लोकांच्या जीविताचे आणि मालमत्तेचे रक्षण करणे. गेल्या वर्षभरात पाहिले तर एसईझेडच्या विरोधात शेतकरी संघटनेने केलेली विविध आंदोलने, इरिगेशनच्या पाण्याच्या संदर्भात झालेली आंदोलने, गेल्या वर्षभरात अनेक शेतकऱ्यांनी आंदोलने केली आणि ती संख्या पाहिली तर आंदोलनांची संख्या विक्रमी आहे. सभापती महोदय, वृत्तपत्रातून सुध्दा माझ्यावर टीका केली गेली की, एका बाजूने जाळपोळ होते. कारखानेच्या कारखाने बंद पडतात, शेतकरी रस्ते अडवून ज्या लोकांना रस्त्यावरुन जाण्याचा हक्क आहे त्यांना त्यापासून वंचित ठेवतात, आठ-आठ तास हायवे बंद राहतात आणि पोलीस मात्र बघ्याची भूमिका घेतात. सभापती महोदय, जाहीरपणाने मी या संदर्भात स्टेटमेंट केली. त्या त्यावेळी वृत्तपत्रात ती छापून आली. या बाबतीत माझ्या भूमिका मी उघडपणाने स्पष्ट केल्या. एक तर न्याय मिळण्याच्या बाबतीत शेतकरी नेहमीच पाठिमागे राहतो. तो न्याय मिळण्यासाठी पुढे येत असेल, आंदोलन करीत असेल तर त्याचे आंदोलन केवळ पोलीस बळाच्या आधाराने मोडून काढणे मी योग्य मानत नाही. संबंधित विभागाने पुढाकार घेतला पाहिजे आणि चर्चेने प्रश्न सुटले पाहिजेत अशा प्रकारची उघड भूमिका या सगळया शेतकरी आंदोलनाच्या बाबतीत गेल्या वर्षभरात घेतल्या गेलेल्या आहेत. याचा परिणाम म्हणून अनेक ठिकाणी शेतकरी संघटनेचे लोक असतील, अन्य शेतकऱ्यांची आंदोलने असतील, प्रशासनाला शेतकऱ्यांनी जास्तीत जास्त सहकार्य करण्याची भूमिका या महाराष्ट्रामध्ये घेतली गेली. त्याचा परिणाम म्हणून राज्यामध्ये एक सामंजस्याचे वातावरण राहिले. संबंधित यंत्रणेने पुढाकार घेतला आणि शेतकऱ्यांचे काही प्रश्न राज्यामध्ये मार्गी लागले. सभापती महोदय, या सदनाच्या माध्यमातून मी सुरुवातीलाच विश्वास देऊ इच्छितो. कोणत्याही परिस्थितीत हातात केवळ शस्त्रे आहेत, त्या शस्त्रांच्या जोरावर कोणाच्या न्याय्य मागण्या दडपून टाकण्याची भूमिका गृहमंत्री म्हणून माझी नाही, शासनाची नाही. आजपर्यंत झालेल्या पोलीस दलातील अनेक बैठकांमध्ये स्पष्टपणाने मी कल्पना दिलेली आहे. तशा पध्दतीच्या लेखी सूचनाही दिलेल्या आहेत. एवढी सगळे करीत असताना सुध्दा काही वेळेला दुर्दैवी प्रकार घडतात. ज्याचा उल्लेख मला करावा लागेल. आजपर्यंत राज्यामध्ये किती वेळा गोळीबार झाले आणि त्यामध्ये किती नागरिकांचे बळी गेले हे जर बारकाईने पाहिले तर मी आकडेवारीनिशी एक गोष्ट सिध्द करुन देईन की, कोणत्याही परिस्थितीत कंट्रोल्ड ॲक्शन्स पोलीस दलाने घेतल्या आहेत. पोलीस फायरिंगचे प्रमाण

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.आर.आर.पाटील.....

दिवसेंदिवस आपल्या राज्यात कमी होत चालले आहे. सगळी आकडेवारी माझ्याकडे आहे, परंतु मी सगळी आकडेवारी देत नाही. 1994 साली 38 केसेसमध्ये फायरिंग झाले आणि 15 नागरिक मारले गेले. त्यामध्ये नागरिक ज्यावेळी मारले गेले त्यावेळी सगळे काही आंदोलनकर्ते नव्हते. काही गुन्हेगारी स्वरुपाची पार्श्वभूमी असलेले, नक्षलवादी काम करणारे लोक होते. परंतु पोलीस गोळीबारामध्ये मृत्यू पावलेल्या नागरिकांची संख्या 1995 साली 15 होती. 1996 साली 53 वेळा पोलिसांना फायरिंग करावे लागले आणि 42 नागरिक मारले गेले. 1997 साली 100 वेळा पोलिसांना फायरिंग करावे लागले आणि 84 नागरिक मारले गेले. 1998 साली 86 वेळा पोलिसांना फायरिंग करावे लागले आणि 48 लोक मारले गेले. 1999 साली 113 वेळा पोलिसांना फायरिंग करावे लागले आणि 117 लोक मारले गले. 2000 साली 129 वेळा पोलिसांना फायरिंग करावे लागले आणि 124 लोक मारले गेले. 2001 साली 135 वेळा पोलिसांना फायरिंग करावे लागले आणि 118 लोक मारले गेले. 2002 साली 107 वेळा पोलिसांना फायरिंग करावे लागले आणि 89 लोक मारले गेले.

(नंतर श्री.जुन्नरे....

अप्रधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.आर.आर.पाटील.....

सन 2003 साली 62 वेळा फायरींग झाले असून त्यामध्ये 51 लोक मारले गेलेले आहेत. सन 2004 मध्ये 43 वेळा फायरींग झाली असून त्यात 22 लोक मरण पावले आहेत हे मी मुद्दाम आपल्या निदर्शनास आणून देऊ इच्छितो. सन 2005 मध्ये 63 वेळा फायरींग झाली असून त्यामध्ये 19 लोक मरण पावले आहेत. सन 2006 मध्ये 67 वेळा फायरींग झाली असून त्यामध्ये 25 लोक मरण पासवले असून त्यामध्ये जवळ जवळ 20 नक्षलवादी मारले गेलेले आहेत. एकंदर परिस्थिती पाहता एका बाजूला आंदोलने जास्त होत आहेत, संघटना निर्माण होत आहेत आणि दुस-या बाजूला पोलीस गोळीबारामध्ये मृत्यूपावलेल्या सिव्हीलियन्सचे प्रमाण निश्चितपणे कमी झालेले आहे. गोळीबार झाला म्हणून विधानसभेचे किंवा विधान परिषदेचे प्रोसिडींग काढून बेंधुद गोळीबाराच्या संदर्भात निष्कर्ष काढने हे योग्य नाही. ज्योवळेस पोलीस चुकतात त्यावेळी त्यांच्यावर कठोर कारवाई झाली पाहिजे या मताचा मी देखील आहे. मी विनयशील पणे सदनाच्या लक्षात आणून देऊ इच्छितो की, वर्ष भरामध्ये महाराष्ट्राच्या इतिहासात जास्तीत जास्त आयपीएस अधिका-यांना सस्पेंड करण्याची भुमिका घेण्यात आलेली आहे. डीजी लेव्हलच्या अधिका-यावर सुध्दा कारवाई करण्यात आलेली आहे. पीएसआय, पीआय, डीवायएसपी यांच्यावरही कडक कारवाई केलेली आहे. या वरिष्ठ अधिका-याना सेवेतून काढून टाकणे, जे काम करतांना चुकले त्यांच्यावर कठोर कारवाई करण्यात आलेली आहे. जे कर्मचारी पोलीस दलात राहणे हिताचे नाही त्यांना पाठीशी घालण्याची भूमिका शासनाने कधीही घेतलेली नाही. अशा अधिका-यांना आणि कर्मचा-यांना सस्पेंड करण्याचे आणि सेवेतून काढून टाकण्याची भूमिका आपल्या राज्याने घेतलेली आहे. एका बाजूने ही भूमिका घेत असतांना पोलिसांनी कुठलेही काम केले तरी पोलिसांना आरोपीच्या पिंज-यात उभे करणे, त्यांना डीमॉरेलाईझ करणे हे राज्याच्या पोलीस दलाच्या दृष्टीने योग्य नाही एवढे मी सदनाच्या लक्षात आणून देऊ इच्छितो. काल वणी येथे जो प्रकार घडला त्या ठिकाणी मी स्वत: तीन साडे तीन तास भेट दिलेली आहे. तसेच या घटनेच्या संदर्भातील मी संपूर्ण माहिती घेतलेली आहे. असे असतांना या प्रकरणाच्या निष्कर्षापर्यंत येणे योग्य नाही. एकंदर या ठिकाणची परिस्थिती बघितली तर या ठिकाणी शासनाच्या काही तृटी राहिलेल्या आहेत, ही गोष्ट मला प्रांजळपणे कबूल करावीच लागेल. कोणाच्याही चुकाना पाठीशी घालण्याची मुळीच आवश्यकता नाही हे मला येथे सांगावेसे

....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. आर.आर.पाटील.....

वाटते. एक तर त्या दिवशी ढगाळ वातावरण होते 27 नोव्हेंबर ते 1 डिसेंबर पर्यंत कापसाची खरेदी बंद करण्याचे घोषित करण्यात आले होते. तसेच शनिवार आणि रविवार या जोडून सुट्टया आलेल्या होत्या. तसेच 4 तारखेपर्यंत पणन महासंध, सीसीआय यांनी कापसाची खरेदी बंद करण्याचा निर्णय घेतला होता. मी काल त्या परिसरात गेलो असतांना तेथील कापसाच्या शेतीला सुध्दा मी भेटी दिलेल्या आहेत. या परिसरात यावर्षी कापसाचे विक्रमी पीक आलेले आलेले असतांना तेथील कापूस खरेदी केंद्रे बंद होती. दुस-या बाजूला चंद्रपूर, कोरपना, राजूरा कोरपना या ठिकाणी कापूस विक्रीला गेला असता परंतु या ठिकाणचे केंद्रही बंद होते. वणीच्या केंद्रावर जवळ जवळ 1800 बैलगाडया तसेच अनेक ट्रॅक्टर कापूस विक्रीसाठी उभे होते. या केंद्रावर 3-3 दिवस मालाची खरेदी होत नव्हती ही वस्तुस्थिती आहे. या केंद्रावर कापूस घेऊन आलेल्या शेतक-यांना कोणत्याही निवा-याशिवाय थंडी-वा-याला तोंड द्यावे लागत होते. या ठिकाणची परिस्थिती बघितल्यानंतर माननीय पणन मंत्र्यांना मी सुचवले की, जी मार्केट कमिटी लोकांकडून सेस घेते त्यांनी शेतक-यांना सुविधाही दिल्या पाहिजेत. या ठिकाणी कापूस घेऊन आलेल्या शेतक-यांच्या जनावरांना चा-याची, पाण्याची कोणतीही व्यवस्था केलेली नव्हती. तसेच शेतक-यांसाठी सुध्दा कोणत्याही प्रकारची सुविधा नव्हती. त्यामुळे अशा प्रकारे ज्या मार्केट कमिटया सेस घेत असतील त्यांच्यावर कारवाई झाली पाहिजे अशा प्रकारच्या सूचना मी कालच माननीय पणन मंत्र्यांना दिलेल्या आहेत.

यानंतर श्री. अजित.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.आर.आर.पाटील.....

त्यावर मार्केट कमिटीमार्फत निश्चित स्वरुपाची कार्यवाही केली जाईल. पणन महासंघाने सुध्दा कापसाचे आलेले विक्रमी पीक लक्षात घेऊन दरवर्षी सेंटर्स वाढविली पाहिजेत. पीक विक्रमी आले असेल तर सेंटर्समध्ये आणखी भर टाकली पाहिजे. शेतकऱ्यांची गैरसोय होऊ नये म्हणून मार्केट कमिटी व फेडरेशनला उपाययोजना करण्याच्या सूचना दिलेल्या आहेत.

सभापती महोदय, कधी कधी धोरणात्मक निर्णय घेतले जातात, पण त्यामुळे उद्भवणाऱ्या भविष्यातील अडचणी लक्षात येत नाहीत. गेल्या वर्षीची कापूस खरेदी पाहिली तर असे लक्षात येते की, मार्केट कमिटीपेक्षा बाहेर कापसाला जास्त भाव होता म्हणून कापूस खरेदी केंद्रावर शेतकरी आले नाहीत. तेथील कर्मचाऱ्यांना कोणत्याही प्रकारचे काम नव्हते. माशा मारत बसले होते. यावर्षी बाहेर कापसाचे भाव पडले त्यामुळे शेतकऱ्यांना कापूस खरेदी केंद्रावर कापूस घेऊन यावे लागले. पण केंद्र सुरु नाहीत. दुसरे म्हणजे महाराष्ट्र फेडरेशन केंद्रावर कापूस दिला तर शेतकऱ्यांच्या कर्जात कपात केली जाते, त्यांना पैसे मिळत नाहीत. सभापती महोदय, आम्हाला लोकांनी सांगितले की, ग्रेडरला पैस दिल्याशिवाय चांगली खरेदी मिळत नाही. जवळपास 300 ते 500 रुपये एका बैलगाडीमागे घेतले जातात. मी लोकांसमोर ॲन्टी करप्शनच्या अधिकाऱ्यांना सूचना दिलेल्या आहेत की, दिवसाढवळ्या, जगजाहीरपणे लाच घेतली जात असेल तर ते लोक कायद्याच्या कचाट्यात सापडले पाहिजेत. त्यासाठी लोकांनी तक्रारी केल्या पाहिजेत. प्रत्येक सेंटरवर ॲन्टी करप्शनच्या अधिकाऱ्यांचे लक्ष राहील याची ग्वाही मी देतो. सभापती महोदय, दुसऱ्या बाजुला सी.सी.आय.खरेदीमध्ये दोष होता. जर 50 बैलगाड्या असतील तर त्यातील फक्त दोनच बैलगाड्या सिलेक्ट व्हायच्या. बाकीच्या 48 बैलगाड्या रिजेक्ट व्हायच्या. त्यामुळे जवळच असलेले व्यापारी 100-150 रुपये कमी भाव देऊन कापूस खरेदी करायचे आणि प्रत्यक्ष कापूस नेल्यावर तो खराब आहे असे सांगून आणखी भाव कमी देत होते. एका बाजुला शेतकऱ्यांकडे कापूस होता, तो खरेदी केला जात नव्हता. तर दुसऱ्या बाजुला शेतकऱ्यांना तातडीने पैशाची गरज होती. कारण डिसेंबर महिन्याच्या पुढे खरेदी गेली तर सेंकड पीक म्हणून त्यास कमी भाव मिळाला असता यासाठी शेतकऱ्यांची घाई सुरु होती. एका बाजुला ही परिस्थिती असताना दुसऱ्या बाजुला सी.सी.आय.शेतकऱ्यांच्या मागणीप्रमाणे काम करीत नव्हते. यामुळे तेथील अधिकारी श्री.शुक्ला

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.आर.आर.पाटील.....

यांच्यात आणि शेतकऱ्यांमध्ये वाद झाला. शेतकऱ्यांनी छोट्या प्रमाणावर आक्रमक होण्याची भूमिका घेतली. मार्केट कमिटीने मागणी केल्याप्रमाणे त्यांना दोन पोलीस कर्मचारी देण्यात आले होते. सकाळी 11.30 च्या सुमारास डी.वाय.एस.पी.ना फोन करुन सांगण्यात आले की, गडबड होण्याची शक्यता आहे, तेव्हा आणखी जास्त पोलीस कर्मचारी पाठविण्यात यावे. या आंदोलनाची पोलिसांना कल्पना आली नाही. पोलिसांचा असा समज झाला की, यापूर्वी तेथे रास्ता रोको वगैरे आंदालने इ ाली होती, त्याच्यापुढें कास्तकार जात नाहीत. त्यांना वाटले आंदोलन छोटे असेल म्हणून त्यांनी 7 पोलीस कर्मचारी पाठविले. त्यामध्ये दोन पोलीस अधिकारी होते. ही कुमक त्याठिक्राणी पोहोचली त्यावेळी दगडफेकीस सुरुवात झाली होती. तेव्हा पोलिसांनी स्वत:चा बचाव करण्यासाठी मार्केट कमिटीतील हॉलचा आडोसा घेतला. मला लोकांकडून आणि पोलीस अधिकाऱ्यांकडून माहिती मिळाली की, सुरुवातीला शेतकरी आक्रमक नव्हते. चार हजारांच्या आसपास मॉब होता. या संदर्भातील व्हिडिओ फिल्म मी माननीय विरोधी पक्ष नेत्यांना पाहण्यासाठी देतो.

यानंतर श्री.पुरी.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

त्याबाबतीत आपण खात्री करावी. मार्केट कमिटी जळत असताना, जाळणारे जे लोक आहेत ते जीन्स पँट घातलेले आहेत, ते चांगल्या वेषभूषातील आहेत. मी शेतकऱ्यांना डोळयांनी पाहिलेले असून त्यांच्याशी मी बैलगाडीत बातचित केलेली आहे. पहिल्या पाहणीमध्ये ती माणसे वेगळी आहेत, असे निष्पन्न होऊ शकेल, त्या सगळयांना ओळखले जाईल. ही माणसे कोणाची होती ? ती त्याठिकाणी कशासाठी आली होती ? मार्केट कमिटी जाळण्यामध्ये शेतकरी होते का ? त्यामध्ये बाहेरची माणसे किती होती ? हा सगळा तपासाचा भाग आहे. त्याठिकाणी एक गोष्ट स्पष्ट होते की, धुराचे लोट उठून आग लागलेली होती, त्या मार्केट कमिटीमध्ये 6 कर्मचारी व 8 पोलीस असे चौदाजण वर अडकून पडले होते. तेथूनच त्यांनी एस.पी., डी.वाय.एस.पी., यांना फोन करुन सांगितले की, आम्ही येथून निघू शकणार नाही, बाहेर आलो तर दगडफेक चालू आहे व खाली यावयाचे असेल तर खाली मोठयाप्रमाणात जाळ सुरु आहे व आम्ही ज्या खोलीमध्ये बसलो आहोत, त्यामध्ये धूर भरत आहे. घाबरलेल्या अवस्थेमध्ये हे सर्व कर्मचारी तिथे बसले होते. त्याठिकाणी इन्स्पेक्टर पुन्हा 7-8 लोकांचा स्टाफ घेऊन आले. सगळाच गोळीबार अंदाधूंद होता, असे नाही. त्याठिकाणी 26 राऊंड फायर झाले होते, त्यामध्ये एका शेतकऱ्याला गोळी लागली हे मला मान्यच करावे लागेल. परंतु दोघांना गोळीतील उडालेले छरे लागले व ते सगळे सुखरुप आहेत. अशाही स्थितीमध्ये गोळीबार केला नसता तर कदाचित 14 माणसे जळून मेल्याचा वेगळया विषयाचा स्थगन प्रस्ताव याठिकाणी चर्चेसाठी आला असता. याठिकाणी 6 मार्केट कमिटीच्या लोकांचा व 8 पोलिसांचा विषय आला असता. आज त्याठिकाणची सगळी मार्केट कमिटी जळून भस्मसात झालेली आहे. त्यामध्ये 14 पोलीस जखमी झालेले असून पोलिसांच्याबाबतीत निष्कर्ष काढला तर त्यामध्ये कोणाचे दात पडले आहेत तर कोणाचे डोळे बाजूला झालेले आहेत. पणन महासंघाच्या कर्मचाऱ्यांनी चांगल्या प्रकारचे काम केले असते तर हा प्रकार झाला नसता. यामध्ये कोण दोषी आहे, हा सगळा तपासाचा भाग आहे. आमची सगळी यंत्रणा योग्य पध्दतीने कार्यरत राहिली असती तर हा पुढचा प्रकार थांबू शकला असता. कापूस घेण्याबाबत महाराष्ट्र शासनाचे स्पष्ट आदेश असतानाही तीन दिवसांमध्ये केवळ 400 क्विंटल कापूस घेतला गेला व हा प्रकार घडल्यानंतर एका दिवसामध्ये 1800 क्विंटल कापूस त्याच यंत्रणेनी घेतला. तसेच, हा आताचा कापूस पहिल्याच काढणीचा असल्यामुळे त्याला ग्रेड लावण्याची आवश्यकता नव्हती, परंतु वेळ

..2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.आर.आर.पाटील...

काढूपणा केल्यामुळे ही घटना घडली. या गोष्टीचे मलाही दु:ख आहे. या सगळया प्रकरणात केलेला गोळीबार हा अनावश्यक होता का ? यातील चौकशीतून जे निष्कर्ष येतील त्याप्रमाणे कारवाई केली जाईल. एकंदरित परिस्थिती पाहिल्यानंतर याबाबतीत शेतकऱ्यांकडून, राजकीय कार्यकर्त्यांकडून, खाजगी लोकांकडून माहिती घेतलेली आहे. या सगळया परिस्थितीमध्ये कधी-कधी नाईलाजास्तव गोळीबार करावा लागतो. शस्त्रांचा कमीतकमी वापर केला पाहिजे, हेच गृह खात्याचे धोरण आहे. आंदोलनेही संयमाने केली पाहिजेत, आगाऊ कल्पना देऊन केली तर शासनाला सुध्दा पर्याय ठेवता येऊ शकतो. हीच आगाऊ कल्पना दिली असती तर त्याठिकाणी पाण्याचे फवारे ठेवले असते, अश्रुधूराच्या कांडया ठेवता आल्या असत्या, पोलिसांची संख्या वाढवता आली असती परंतु अचानकपणे तेथे आंदोलन झाले. अशा पध्दतीने आंदोलन सुरु झाल्यामुळे व पोलिसांचे संख्याबळ अत्यंत कमी असल्यामुळे बचावात्मक भूमिकेतून पोलिसांना आपली पुढची कारवाई करावी लागते. याबाबतीत शेतकऱ्यांवर सूड उगवायचा होता का ? त्यांचे आणि पोलिसांचे काही वाकडे होते का ? याचीही मी माहिती घेतली.

नंतर श्री.रोझेकर...

अप्रधारित पत्र / प्रतिलिपीसाठी नाही

श्री.आर.आर.पाटील.....

मी ही माहिती घेंतली की त्या ठिकाणी पोलीस दलात शेतकरी कुटुंबातील किती लोक आहेत. पोलीस दलातील 80 टक्के कर्मचारी हे शेतकरी कुटुंबातील आहेत. त्यांची शेतीशी असलेली नाळ अजून तुटलेली नाही. त्यांचेही कुणीतरी कुटुंबीय अजून शेती करीत आहेत. बरेचसे कर्मचारी त्याच परिसरातील आहेत. अशा स्थितीमध्ये केवळ नाईलाजाचा मार्ग म्हणून तेथील सिच्युएशन लक्षात घेऊन केलेली ही कारवाई प्रथमदर्शनी दिसते. आमचे वरिष्ठ अधिकारी अधिक खोलात जाऊन तपास करीत आहेत. या गोळीबाराची आवश्यकता होती काय ? याबाबत दंडाधिकारीय चौकशी आपण सुरु केलेली आहे. या राज्यातील आंदोलने दडपण्यास निघालो आहोत, असे कुठेही नाही. पण आज गृह विभाग दोन्ही बाजूने मार खातो आहे. एका बाजूने जाळपोळ होते आहे, मालमत्तेचे नुकसान होत आहे, गप्प बसण्याची भूमिका घेत आहोत, असे म्हटले जाते तर दुस-या बाजूने कारवाई केली तर दलितांच्या विरुध्द, कास्तकारांच्या विरुध्द, कामगारांच्या विरुध्द पोलीस भूमिका घेतात, असे म्हटले जात आहे. पोलिसांनी नेमकी कारवाई तरी कोणती करावयाची ? हे जर सदन सांगत असेल तर तसे होणे शक्य नाही. जगातील कुठल्याही राजवटीला ते शक्य नाही. पोलिसांच्या हातामध्ये बंदुका ठेवू नका असे म्हणत असाल तर राज्यामध्ये एकही गुन्हा घडणार नाही, अतिरेकी कारवाई घडणार नाही त्या दिवशी पोलिसांच्या हातात शस्त्र ठेवण्याची, सरकार म्हणून जे कुणी असतील त्यांना आवश्यकता राहणार नाही. समाजाच्या अधिक हितासाठी, अधिक भल्यासाठी कठोरपणे कारवाई करावी लागते, टिकाही सहन करावी लागते. ही गोष्ट खरी आहे की, ज्या शेतक-याचा मृत्यू झाला आहे त्याच्या घरात गेल्यानंतर त्याच्या कुटुंबियांकडे बघितल्यानंतर, लहान मुले, वृद्ध आईवडिल यांच्याकडे बघितल्यानंतर आजपर्यन्तचे सर्व नियम, जे नियम आतापर्यन्त पाळले जात होते, ते नियम बाजूला ठेवून 2 लक्ष रुपयांची मदत शासनामार्फत घोषित करण्यात आली आहे. शासनाने आणखी मदत वाढवून दिली तर ती आणखी वाढवून मागितली जाते. आतापर्यन्त मुख्यमंत्री फंडातून सर्वात जास्त मदत खैरलांजी प्रकरणात देण्यात आलेली आहे आणि बाकीची मदत समाजकल्याण विभागाच्या विविध स्किममधून देण्यात आलेली आहे. या प्रकरणी मुख्यमंत्री फंडातून 2 लक्ष रुपयांची मदत दिलेली आहे. परंतु या कुटुंबाची अडचणीची परिस्थितीत बघितल्यानंतर ही मदत

..2.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.आर.आर.पाटील.....

कमी आहे असे वाटले. म्हणून माझे सहकारी, श्री.मनोहरराव नाईक यांना विनंती केली की, तुमच्या ट्रस्टमार्फत मदत द्यावी. त्यांनी देखील 1 लक्ष रुपयांची मदत घोषित केली आहे. मार्केट कमिटीने 1 लक्ष रुपयांची मदत घोषित केली आहे. विरोधी पक्षनेत्यांनी मृत शेतक-याच्या कुटुंबियांपैकी एकाला नोकरी द्यावी, अशी मागणी केली आहे. शैक्षणिक पात्रता लक्षात घेऊन कुटुंबातील 1 माणसाला नोकरी देण्याचा विचार सुध्दा सहानुभूतिने केला जाईल. मयत झालेला कास्तकार हा राज्याचा एक भाग होता. कधी कधी दोषी माणसावर कारवाई करीत असतांना निरपराध माणसाला चुकून गोळी लागते. यामुळे त्या कुटुंबाला ज्या व्यथा झालेल्या आहेत त्यामध्ये मी सहभागी आहे. त्या कास्तकारावर गोळी झाडण्यामध्ये पोलिसांचा नक्की दोष नसावा, कुठेतरी कठोर कारवाई करतांना निरपराध माणुस अडचणीत येतो. यापुढच्या काळामध्ये आंदोलनकर्त्यांनी आगाऊ सूचना दिली तर योग्य बंदोबस्त ठेवणे शक्य होईल. म्हणून या सदनाच्या वतीने आणि सदनाच्या मार्फत अशी विनंती करतो की, अलिकडे आंदोलन करणे म्हणजे सार्वजनिक मालमत्ता उद्ध्वस्त करणे असे चालले आहे. जळालेल्या इमारती, जळालेल्या एस.टी. कुणाच्या आहेत ? अशा प्रकारे सार्वजनिक मालमत्तांचे नुकसान होत असेल तर अशी आंदोलने समर्थनीय आहेत काय ? आंदोलनाच्या बाबतीत शासनाने कोणती भूमिका घेतली पाहिजे यावर व्यापक विचार करण्याची आवश्यकता आहे.

यानंतर श्री.बोरले.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

खरे तर हे विचार मी अधिक चांगल्या पद्धतीने मांडू शकलो असतो. परंतु अलिकडे माझा प्रत्येक शब्द नव्या वादाला तोंड फोडत आहे. सभापती महोदय, 21 व्या शतकाला सामोरे जात असतांना कोटयावधी रुपयांची मालमत्ता जाळली जात असेल तर राज्याच्या दृष्टीने ही गोष्ट लाभदायी नाही. कधी कधी भावना अनावर होतात त्यामुळे शांत स्वभावाची माणसे देखील आक्रमक होतात. त्याला बंधन असले पाहिजे. आज काही ठिकाणी ही बंधने तोडली जात आहेत. एवढया वेळा गोळीबार केला म्हणून तुमचे नाव गोळीबार मंत्री का ठेवावयाचे नाही, असे खालच्या सभागृहामध्ये विचारण्यात आले. सभापती महोदय, मी मागची आकडेवारी सांगू शकतो. त्यावरुन हे नाव कोणाला शोभून दिसेल, हे आपल्याला कळेल. रायट कन्ट्रोलिंगमध्ये किती लोक मयत झाले याची मी आकडेवारी देऊ शकतो. आज जवेढे लोक मयत झाले त्या पेक्षा जास्त लोक त्यावेळी रायट कन्ट्रोलिंगमध्ये मारले गेले गेले आहेत. मी सभागृहाला आकडे वाचून दाखवितो. सन 1996 मध्ये 7, 1997 मध्ये 30, 1998 मध्ये 12 लोक रायट कन्ट्रोलिंगमध्ये मयत झालेले आहेत. त्यानंतर 7, 30 आणि 12 वरुन आपण खाली आलो. पोलीस दलाची माणसे मारण्याची भूमिका कधीही राहत नाही.

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय, माननीय गृहमंत्री महोदयांनी कोणत्या वेळची तुलना केली. माननीय श्री.छगन भुजबळसाहेब आजकाल शांत राहतात. माननीय गृहमंत्री श्री.आर.आर.पाटील तुलना करुन माननीय श्री.छगन भुजबळसाहेबांना कमी लेखण्याचा प्रयत्न का करीत आहेत ? श्री.भुजबळसाहेब तुमच्याच पक्षाचे आहेत. आपण त्यांच्यावर अशा प्रकारे टीका करु नका.

श्री.आर.आर.पाटील : सभापती महोदय, बोललो तर खूप काही बोलण्यासारखे आहे. परंतु मला बोलून वाद वाढवावयाचे नाहीत. सभापती महोदय, मी जास्त बोलणार नाही. घडलेल्या प्रकाराची मॅजेस्ट्रीयल इन्क्वॉयरी करण्यात येईल आणि त्यांच्या निष्कर्षाप्रमाणे कारवाई करण्यात येईल.

...2/-

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, माननीय मंत्री महोदयांनी एका गोष्टीचा खुलासा केला पाहिजे. तीन वेळा गोळीबार झाला. पहिल्या वेळचा गोळीबार का झाला, कसा झाला हे मला कळले. परंतु दुपारी आणि दुस-या दिवशी पुन्हा सकाळी गोळीबार झाला त्यावेळची परिस्थिती काय होती ? याचा खुलासा माननीय मंत्री महोयांकडून आलेला नाही.

यानंतर श्री.सुंबरे .....

अप्रमाणित प्रत / परिपृच्छेसाठी नाही

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने माननीय मंत्री महोदयांना विनंती करतो आहे. यामध्ये असे आहे की, हे स्पॉन्टेनियस म्हणजे उत्स्फुर्त असे आंदोलन होते. ते काही परवानगी घेऊन झालेले नव्हते तसेच ते अगदी नेतृत्त्वविहीन असे आंदोलन होते. तो एक असंतोषातून निर्माण झालेला उद्रेक होता. असे होते तेव्हाच अशा घटना घडत असतात. या निमित्ताने आपल्याला एक विनंती आहे. आपण श्रीमती सुलेखा कुंभारे यांच्यासारख्या नेत्यावर 307 कलम लावता आणि येथे शेतकऱ्यांवर देखील 307 कलम लावता. इतकेच काय पण असे काही घडू नये म्हणून कोणी कार्यकर्ता भोंगा लावून आवाहन करीत होता तर त्यांच्यावर देखील आपण 307 कलम लावता, जे कलम गुन्हेगारांवर लावायचे ते आपण अशा लोकांवर लावता आहात. हे योग्य नाही. ठीक आहे, काही चुका झाल्याही असतील, पण आपण 307 कलम हे दलित आंदोलनातील लोकांवर देखील लावता. समाजामध्ये प्रसंगी असे उद्रेक होणार, उत्स्फूर्त आंदोलने होणारच आहेत. आता त्या संबंधात आपण जे काही स्पष्टीकरण केले वा जे काही सांगितले त्याबद्दल मला काही म्हणावयाचे नाही. पण हे सगळे सांभाळत असताना आपण अशा प्रकारे एकदम टोकाची भूमिका कृपा करून घेऊ नये. अशा प्रसंगी 307 कलम आपण लावू नये आणि लावले असतील तर ते मागे घ्यावे, कमीत कमी ती बाब तपासून तरी पहावी.

श्री. पाशा पटेल : सभापती महोदय, मी गेली 30 वर्षे आंदोलने पाहतो आहे. पण या वर्षामध्ये ऊस आणि कापसाच्या आंदोलनामध्ये सज्जन माणसांवर देखील पोलिसांनी 307 कलम लावलेले आहे. हे मी यापूर्वी केव्हाही पाहिले नव्हते.

श्री. आर.आर.पाटील : सभापती महोदय, मी त्या मार्केट कमिटीमध्ये जाऊन आलो आहे. तेथे खालचा एक मजला आणि त्याच्यावर आणखी एक मजला व त्या ठिकाणी एक खोली असे आहे. त्या वरच्या मजल्यावरील खोलीमध्ये 14 कर्मचारी अडकून पडले होते आणि जमलेला मॉब तेथे जाळ लावत होता. पोलिसांनी गोळीबार केला तरी मॉब हटत नव्हता. या घटनेला 307 सोडून कोणते कलम लागते हे आता वकिलालाच विचारावे लागेल. या मॉबने त्या 14 लोकांना आत कोंडून त्या इमारतीला आग लावली असती म्हणूनच त्यांच्यावर 307 कलम लावले गेले. तरीही आपली सूचना मला मान्य आहे. तेथे असलेले सारे शेतकरीच होते का ? त्या फिल्ममध्ये पाहून माझी पक्की खात्री पटली आहे की, जे तेथे जाळ लावत होते त्यांचा आणि तेथे असलेल्या बैलगाड्यांचा काहीही संबंध नव्हता. माझ्या हेही लक्षात आले आहे की, अवैध धंदे वगैरे बंद

..... 3एन 2 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

केल्यामुळे, पोलिसांवर राग काढण्यासाठी पोलिसांवर वेगळ्या अशा मार्गाने दबाव टाकता आला, त्यातून त्यांना बदनाम करता आले तर ते करावे म्हणून असे उद्योग करण्याच्य उद्देशाने तेथे कोणी घुसले असेल, ज्यांचा शेतीशी आणि तेथील कापसाशी काहीही संबंध नव्हता असे जे लोक तेथे दगड फेकताना, आग लावताना फिल्ममध्ये दिसेल त्यांचेवर निश्चितपणे 307 कलम लावले जाईल आणि जे लोक तेथे केवळ शेतकरी म्हणूनच आलेले आहेत त्यांच्याबाबतीत ते कलम मागे घेण्याबाबत सहानुभूतीने विचार केला जाईल.

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, या ठिकाणी दोन मंत्र्यांनी येथे उत्तर दिले आहे. त्यामध्ये पहिल्यांदाच माननीय पणन मंत्र्यांनी चूक कबूल केली आहे आणि माननीय गृहमंत्र्यांनी देखील प्रामाणिकपणे सांगितले की, यंत्रणा ही चुकलेली आहे. यंत्रणा चुकल्यामुळे हा प्रकार घडला असा अर्थ निदान आम्ही तरी त्यांच्या एकंदर भाषणातून काढला आहे वा आम्हाला तसा अर्थ समजला आहे. ही गोळीबार करण्याची परिस्थिती येणारच नव्हती. पण 2-3 दिवसापूर्वीच तेथे शेतकऱ्यांमध्ये असंतोष निर्माण झालेला होता. त्यावेळेसच कलेक्टर वगैरे अधिकाऱ्यांनी तेथील परिस्थिती नीटपणे हाताळली असती, ... काल एका दिवशी 1800 गाड्यांचे मोजमाप पणन महासंघ करू शकतो तर आपण याच गतीने यापूर्वीही काम केले असते तर हा प्रकार निश्चितपणे घडला नसता, असंतोष निर्माण झाला नसता. परंतु याबाबतीत जाणीवपूर्वक दुर्लक्ष केले गेले. शेतकऱ्यांच्या गाड्या थांबविल्या गेल्या त्यामुळे ही परिस्थिती निर्माण झाली. आपण चौकशी करून कारवाई करू असे म्हटले असले तरी आपण यामध्ये काय चौकशी करणार आहात ? ज्या अधिकाऱ्यांनी या बाबतीत दुर्लक्ष केले आहे, वणी हा सबझोन आहे, आणि असे असताना तेथै आपला झोनल मॅनेजर फिरकून पहात नसेल तर त्या झोनल मॅनेजरवर आपण कडक कारवाई केली पाहिजे. माणूस मेला असतानाही सरकार अशा अधिकाऱ्यांवर कारवाई करण्यास कचरत असेल तर मग काही न्याय राहणार नाही. माननीय गृहमंत्र्यांचे वक्तृत्त्व फार चांगले आहे आणि ते अभ्यास करून आलेले आहेत. पण आजचा हा विषय अत्यंत सीमित आहे. जो काही गोळीबार झाला आहे त्यामध्ये सापडलेल्या लोकांना मदत मिळाली पाहिजे. आपण गोळीबाराचे समर्थन केले. तेथे इमारत पेटविण्याचा प्रयत्न झाला असे आपण सांगितले. पण आम्ही जी माहिती घेतली आहे त्यानुसार .....

(यानंतर श्री. सरफरे ....3ओ 1 ..

श्री. पांडुरंग फुंडकर...

पहिला गोळीबार झाल्यानंतर तो जमाव होता त्यापेक्षा जास्त संतप्त झाला. पहिला गोळीबार करण्यात आल्यानंतर जमावाने जाळपोळ करावयास सुरुवात केली. प्रश्न असा आहे की, याठिकाणी असे सांगण्यात आले की, एक जीन पँट घातलेल्या तरुणाने जाळपोळ करण्याचा प्रयत्न केला. माझ्याकडे संपूर्ण माहिती आहे. त्याठिकाणी जीन पँट घातलेले लोक कोठून आले? बैल बंडीवर बसेलेले श्री. घुग्गुळ या शेतकऱ्यांना गोळी मारण्याचे कारण काय? सर्व शेतकरी आपापल्या बैल बंडीवर बसलेले होते. आणि संतप्त जमाव हा वेगळया पध्दतीचा होता. बैलबंडीवर बसलेल्या शेतकऱ्यांना जाणीवपूर्वक गोळया मारण्याचे कारण काय? ज्या अधिकाऱ्यांनी गोळी घालून मारण्याचे आदेश दिले त्यांच्यावर आपण काय कारवाई करणार आहात? जीन पँट घालणारी व जाळपोळ करणारी माणसे ही त्या गावातील असून ते जर आपला संताप एस.पी. च्या विरोधात व्यक्त करीत असतील तर शेतकऱ्यांनी त्यांचे काय केले होते? ज्या सहा लोकांना गोळया लागल्या ते सर्व शेतकरी आपल्या बैलबंडीवर बसले हेाते. त्यामध्ये एका शेतकऱ्याच्या हातातून आरपार गोळी निघून गेली. अशाप्रकारे बंडीवर बसलेल्या शेतकऱ्यांना तुमच्या अधिकाऱ्यांनी गोळया घातल्या. ते अधिकारी एस.पी. आहेत. त्यांचे आपण समर्थन करु नका. त्या एस.पी.ना तीन महिन्यात चंद्रपूरहून हाकलण्यात आले. अतिशय क्रिमिनल पध्दतीने हा आय.पी.एस. अधिकारी वागत असेल तर त्याची आपण चौकशी केली पाहिजे. त्याचप्रमाणे ज्या अधिकाऱ्यांमुळे ही दंगल घडविली गेली त्या अधिकाऱ्यांवर कारवाई झाली पाहिजे.

सभापती महोदय, माननीय पणन मंत्र्यांकडून एकच उत्तर अपेक्षित आहे की, वणीसारखी परिस्थिती संपूर्ण विदर्भामध्ये आहे. तिल्हारी, अकोट, खामगाव याठिकाणी देखील हीच परिस्थिती आहे. आपल्या पणन महासंघाकडे 800 कर्मचारी वर्ग असतांना आपण संपूर्ण महाराष्ट्रामध्ये सेंटर सुरु करणार आहोत असे सांगत आहात. एकेकाळी साडे आठ हजार कर्मचारी वर्ग असलेल्या पणन महासंघाकडे आता फक्त 800 कर्मचारी राहिले आहेत. तरीसुध्दा आपण केंद्रे सुरु करण्याची घोषणा केली आहे.मराठवाडा आणि विदर्भातील सेंटरवर शेतकऱ्यांनी आणलेला कापूस दोन-तीन दिवसात उचलला गेला पाहिजे. वणी येथील गाडया आपण ज्या गतीने उचलल्या आणि एका दिवसात 1400 गाडयांचे मोजमाप करुन त्या बाहेर काढल्या. त्याच गतीने तीन-चार दिवसापूर्वी आपल्या झोनल मॅनेजरने काम केले असते तर हा गोळीबार झाला नसता, आणि शेतकऱ्यांचा बळी गेला नसता. याकरीता आपण पणन महासंघाची कार्यक्षमता वाढविली पाहिजे अशी माझी मागणी

श्री. पांडुरंग फुंडकर...

आहे. विदर्भ,मराठवाडा व खानदेश येथील सर्व केंद्रांवर वणीची पुनरावृत्ती होऊ नये असे आपणास वाटत असेल तर साचलेल्या गाडयांचे मोजमाप करण्यासाठी अधिक गती देण्याची आवश्यकता आहे. ती आपण देणार आहात की नाही? त्याठिकाणी आपण जिनिंगची व्यवस्था कशी करणार आहात? तुमच्याकडे जिनिंग फॅक्टरी नाही. जिनिंग आणि प्रेसिंगचे एक वर्षाचे बील आपण दिले नाही. तरीही तुम्ही कापूस खरेदी केंद्र कसे सुरु करणार? जिनिंग आणि प्रेसिंगची बिले सी.सी.आय. ने अडकविली आहेत. त्यामुळे विदर्भामध्ये कुणीही जिनिंग करुन देण्यास तयार होत नाही. अशा परिस्थितीत आपण सर्व केंद्रे सुरु करण्याची घोषणा करीत आहात. या गाडया किती दिवसात उचलल्या जातील? ज्या शेतकऱ्यांचा कापूस खरेदी करण्यात आला आहे, त्या कापसाचे मोजमाप करुन त्यांना ताबडतोब पैसे कसे दिले जातील याचे उत्तर आपण दिले पाहिजे.

(यानंतर श्री. किल्लेदार)

अप्रधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.हर्षवर्धन पाटील : वणी येथील कापूस खरेदी केंद्राच्या प्रकरणाच्या बाबतीत माझ्या विभागामार्फत चौकशी करण्यात येईल.

श्री.पांडुरंग फुंडकर : आता काय चौकशी करणार आहात ? 1200 गाडयांची एका दिवसात मोजदाद केली. त्याप्रमाणे इतर केंद्रावरसुध्दा गाड्यांचे मोजमाप झाले पाहिजे. दुसरे म्हणजे त्या इ ोनल मॅनेजरला आपण सस्पेंड करणार आहात काय ?

श्री.हर्षवर्धन पाटील : या प्रकरणी ज्यांनी कोणी हलगर्जीपणा केला असेल तर त्यांच्यावर निश्चितपणे कारवाई केली जाईल. आता जवळपास 200 सेंटर्स उभी केलेली आहेत. कोणत्याही सेंटरवर अशाप्रकारची घटना घडणार नाही, याची पूर्णपणे खबरदारी घेतली जाईल. जिनिंग, प्रसिंगच्या संबंधाने मुद्दा उपस्थित करण्यात आला. 7 ते 8 दिवसामध्ये याबाबतचे नियोजन करणार आहोत. शेतकऱ्यांना आवाहन आहे की, मोठयाप्रमाणात कापसाची आवक ज्या सेंटरवर होते त्या सेंटरवर वजन, ग्रिडींगची व्यवस्था केलेली आहे. या संबंधातील पूर्णपणाने दक्षता घेतलेली आहे.

उपसभापती : सभागृहाने प्रस्तावावर विचार केला आहे. आता मी मध्यंतरासाठी सभागृहाची बैठक, अर्ध्यातासासाठी स्थगित करीत आहे.

(सभागृहाची बैठक 4 वाजून 55 मिनिटांनी अर्ध्यातासाकरिता स्थगित झाली.)

--

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(मध्यंतरानतर)

(सभापतीस्थानी माननीय उपसभापती)

पृ.शी.: लेखी उत्तरे

मु.शी.: तारांकित प्रश्नासंबंधी अधिक माहिती सभागृहासमोर ठेवणे.

श्री. रविशेठ पाटील (सार्वजनिक बांधकाम राज्यमंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने "झोपडपट्टी मुक्त फुटपाथ आणि वेगवान वाहतुकीसाठी मुंबई शहरात येत्या दीड वर्षात सहा नवे उड्डाणपूल होणार असल्याची माहिती सार्वजनिक बांधकाम मंत्री यांनी जाहीर केल्याबाबत" या विषयावरील सर्वश्री गोविंदराव आदिक, संजय दत्त व रमेश निकोसे यांच्या दिनांक 21.7.2006 रोजी उत्तरित झालेल्या तारांकित प्रश्न क्रमांक 17794 ची अधिक माहिती सभागृहासमोर ठेवतो.

उपसभापती : अधिक माहिती सभागृहासमोर ठेवण्यात आली आहे.

(प्रेस : येथे सोबत जोडलेली अधिक माहिती छापावी)

..2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी./मु.शी.: कागदपत्रे सभागृहासमोर ठेवणे

श्री. धर्मरावबाबा आत्राम (परिवहन राज्यमंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने महाराष्ट्र राजकोषीय उत्तरदायित्व व अर्थसंकल्पीय व्यवस्थापन अधिनियम, 2005 च्या कलम 6(1) नुसार सन 2006-07 च्या अर्थसंकल्पाच्या संदर्भात जमा आणि खर्च यांचा कल कसा आहे याचा दर तीन महिन्यांनी घेतलेल्या आढाव्याचा निष्कर्ष सभागृहासमोर ठेवतो.

उपसभापती : महाराष्ट्र राजकोषीय उत्तरदायित्व व अर्थसंकल्पीय व्यवस्थापन अधिनियम, 2005 च्या कलम 6(1) नुसार सन 2006-07 च्या अर्थसंकल्पाच्या संदर्भात जमा आणि खर्च यांचा कल कसा आहे याचा दर तीन महिन्यांनी घेतलेल्या आढाव्याचा निष्कर्ष सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

श्री. धर्मरावबाबा आत्राम : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने महाराष्ट्र राज्य वखार महामंडळाचा सन 2005-06 चा 48 वा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

उपसभापती : वार्षिक लेखा अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी./मु.शी. : सार्वजनिक उपक्रम समितीचा अहवाल सादर करणे

श्री. सदाशिवराव पोळ (समिती सदस्य) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सार्वजनिक उपक्रम समितीचा सहावा अहवाल सभागृहाला सादर करतो.

उपसभापती : सार्वजनिक उपक्रम समितीचा सहावा अहवाल सभागृहाला सादर झाला आहे.

पृ.शी./मु.शी. : रोजगार हमी योजना समितीचा अहवाल सादर करणे

श्री. रामनाथ मोते (समिती सदस्य) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने रोजगार हमी योजना समितीचा दहावा व अकरावा अहवाल सभागृहाला सादर करतो.

उपसभापती : रोजगार हमी योजना समितीचा दहावा व अकरावा अहवाल सभागृहाला सादर झाला आहे.

..4..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सभागृहाच्या कामकाजासंबंधी

प्रा. शरद पाटील : सभापती महोदय, आजच्या दिवसाच्या कामकाज पत्रिकेत "जादूटोणा व अनिष्ट व अघोरी प्रथा यांचे समूळ उच्चाटन विधेयक " दाखविलेले आहे. हे विधेयक आजच पारित करावे अशी माझी विनंती आहे. कारण अंधश्रध्दा समितीचे अध्यक्ष श्री. नरेंद्र दाभोळकर हे लातूरमध्ये गेल्या सहा दिवसांपासून उपोषण करीत आहेत. हे अत्यंत महत्वाचे विधेयक आहे. आजच्या कामकाजामध्ये दाखविलेले हे विधेयक जर आपण चर्चेला घेतले आणि मंजूर केले तर त्यांचे उपोषण संपेल आणि महाराष्ट्रात या महत्वाच्या विधेयकाबाबतचा निर्णय आपल्या सभागृहाने केला असे होईल. आपण हे महत्वाचे विधेयक आजच्या कामकाजामध्ये दाखविलेले आहे. हे विधेयक चर्चेला घेण्यात यावे अशी माझी विनंती आहे.

उपसभापती : अनुक्रमे जसे विषय आहेत तसे घेऊ. यासंदर्भात सुप्रीम कोटाच्या आदेशाचेही काही दाखले देण्यात आलेले आहेत. कामकाजाचा जो अनुक्रम आहे त्याप्रमाणे आपण कामकाज घेऊ.

यानंतर श्री. शिगम...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

<u>औचित्याच्या मुद्यासंबंधी</u>

श्री. विनोद तावडे : उपसभापती महोदय, मी या सदनामध्ये एक औचित्याचा मुद्दा उपस्थित करु इच्छितो. याबाबत मी सकाळी माननीय सभापतींची परवानगी घेतली होती. छत्रपती शिवाजी महाराज हे महाराष्ट्राचे आराध्य दैवत आहे. त्यांच्या विषयी सर्वांच्या मनात नितांत आदर आहे.गुजरात सरकारने "जाणता राजा"चे प्रयोग गुजरात राज्यामध्ये केले आणि त्याला अभूतपूर्व असा प्रतिसाद मिळाला. गुजरात विधानसभेचे विरोधीपक्ष नेते श्री. अर्जुन कोटवाडिया हे काँग्रेस पक्षाचे आहेत. श्री. अर्जुन कोटवाडिया यांना छत्रपती शिवरायांविषयी किती माहिती आहे याची मला कल्पना नाही. त्यांनी "शिवाजी हे लुटेरा होते" असा शब्दप्रयोग केला आणि बाकीच्यांनी राजकीय वक्तव्य केले. उपसभापती महोदय, या सभागृहाच्या भावना गुजरात विधानसभेच्या विरोधी पक्षनेत्यांना कळविल्या पाहिजेत. श्री. अर्जुन कोटवाडिया हे ज्या काँग्रेस पक्षाचे आहेत त्या काँग्रेस पक्षाच्या प्रतिनिधींनी अशा प्रकारच्या निषेधार्ह वक्तव्या बद्दल त्यांच्याकडून माफी मागून घेतली पाहिजे. छत्रपती शिवरायांनी सुरत लुटली म्हणून त्यांना लुटारु म्हणत असतील तर... एनसीपी सदस्यांचा त्यामध्ये सहभाग नव्हता. गुजरात मधील काँग्रेसचे विरोधी पक्षनेते श्री. अर्जुन कोटवाडिया हे आता इस्लमीलायझेशन ऑफ पॉलिटिक्स, अफझलची सुटका, सच्चर कमिशन अशा गोष्टी करीत आहेत आणि त्यामध्ये त्यांनी छत्रपती शिवरायांना लुटेरा असे म्हटलेले आहे. या सभागृहातील काँग्रेस पक्षाच्या सदस्यांना छत्रपती शिवरायांविषयी नितांत आदर आणि प्रेम असेल तर त्यांनी गुजरात विधानसभेचे विरोधी पक्षनेते श्री. अर्जुन कोटवाडिया यांच्याकडून बिनशर्त माफी मागावी. त्यांनी व्यक्त केलेली दिलगिरी संपूर्ण महाराष्ट्रासमोर आली पाहिजे. उपसभापती महोदय, या सभागृहाच्या माध्यमातून आपल्या भावना आपण सर्वांना कळविल्या पाहिजेत.

डॉ. वसंत पवार : उपसभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. विनोद तावडे यांनी मांडलेल्या मुद्याला मी पाठिंबा देण्यासाठी उभा आहे. शिवशाहीर श्री. बाबासाहेब पुरंदरे यांनी "जाणता राजा" हे महानाट्य तयार केलेले असून ते अतिशय उत्कृष्ट असे आहे. संपूर्ण महाराष्ट्राला स्वाभिमान वाटावा असे हे नाटय आहे. छत्रपती शिवरायांबद्दल प्रत्येकाला आदर आहे. जर कोणी छत्रपती शिवरायांना लुटारु म्हणत असेल तर त्याचा आपण निषेध करायला पाहिजे या सन्माननीय सदस्यांच्या मताशी मी सहमत आहे.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. नितीन गडकरी : उपसभापती महोदय, हा अतिशय गंभीर असा विषय आहे. त्यांनी गुजराती भाषेमध्ये काढलेले उद्‌गार मी भाषांतरित करुन घेतलेले आहेत. कॅबिनेट मंत्र्याचा दर्जा असलेले गुजरात विधानसभेतील कॉंग्रेस पक्षाचे विरोधी पक्षनेते श्री. अर्जुन कोटवाडिया यांनी छत्रपती शिवाजी महाराजांना लुटारु म्हणावे ? मराठी, हिंदी, इंग्रजी अश सर्व भाषांमध्ये शिवाजी महाराजांचे जीवनचरित्र छापलेले आहे. त्यांच्याबद्दल अशा प्रकारचे उद्‌गार त्यांनी काढावेत ? राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाचे सन्माननीय सदस्य डॉ. वसंत पवार यांचा मी आभारी आहे. त्यांनी सन्माननीय सदस्य श्री. विनोद तावडे यांच्या मुद्याचे समर्थन केले. हा विषय इतका गंभीर आहे की, या विषयावर माननीय मुख्यमंत्र्यांनी निवेदन केले पाहिजे आणि अशा प्रकारच्या वक्तव्याचा निषेध करुन गुजरात विधानसभेच्या विरोधी पक्षनेत्यांना आपल्या भावना कळविल्या पाहिजेत. तेव्हा उपसभापती महोदय, आपण या संदर्भात माननीय मुख्यमंत्र्यांना ताबडतोबीने निवेदन करायला सांगावे अशी माझी मागणी आहे.

...नंतर श्री. गागरे...

अप्रमाणित प्रत / प्रतिक्षेसाठी नाही

श्री.मधुकर सरपोतदार (महाराष्ट्र विधानसभा सदस्यांद्वारा निर्वाचित) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.विनोद तावडे यांनी सांगितले की, गुजरातचे विरोधी पक्ष नेते श्री.अर्जून कोटवाडिया यांनी छत्रपती शिवाजी महाराजांबद्दल काही उद्‌गार काढले आहेत. छत्रपती शिवाजी महाराज हे महाराष्ट्रातील असे एक व्यक्तीमत्व आहे की, ज्यांच्याविषयी महाराष्ट्रातील प्रत्येक नागरिकाला अभिमान व आदर आहे, त्यांना लुटारु म्हणणे हा आपल्या देशाचा अपमान आहे. छत्रपती शिवाजी महाराज नसते तर असे वक्तत्व करणाराची सुंता झाली असती. परंतु श्री.अर्जून कोटवाडिया हे आपल्या धर्मात राहून विरोधी पक्ष नेते होऊ शकले आहेत. खरोखरच अत्यंत गलिच्छ असे आरोप करणाऱ्या गुजरातच्या विरोधी पक्ष नेत्याचा आम्ही सभागृहात निषेध करत आहोत. सदरील घटनेबद्दल काँग्रेस पक्षाच्या सदस्यांनी व माननीय मुख्यमंत्र्यांनी सभागृहात यावे व त्यांची माफी सदनामध्ये सादर करावी अशी मी आमच्या पक्षातर्फे विनंती करतो.

उपसभापती : सन्माननीय सदस्य श्री.विनोद तावडे यांनी माहिती दिली आहे की, गुजरातमधील विरोधी पक्ष नेते श्री.अर्जून कोटवाडिया यांनी छत्रपती शिवाजी महाराजांचा अनादराने उल्लेख केला आहे. त्याबद्दल संपूर्ण सभागृहाने आपल्या भावना व्यक्त केलेल्या आहेत. छत्रपती शिवाजी महाराज हे केवळ महाराष्ट्राचेच नव्हे तर राष्ट्राचे राष्ट्रपुरुष म्हणून आपण मानत आलेलो आहोत. त्यांचा अपमान किंवा त्यांच्याबद्दलच्या अनादराच्या भावना या निश्चितपणे एका राष्ट्रपुरुषाचा अपमान आहे. त्यामुळे आपण सर्वांनी गुजरातचे विरोधी पक्ष नेते श्री.अर्जून कोटवाडिया यांचा निषेध केलेला आहे. सदरहू प्रकरणात सत्य काय आहे हे जाणून घेण्याची व माननीय मुख्यमंत्र्यांनी सभागृहात निवेदन करावे अशी आपण विनंती केलेली आहे सन्माननीय सदस्य श्री.विनोद तावडे यांनी सदरहू प्रकरणाबाबत माहिती दिलेली आहे, श्री.विनोद तावडे यांनी जी माहिती दिलेली आहे, ती वर्तमानपत्रात छापून आली आहे. त्यामुळे ही माहिती खरी आहे की खोटी आहे हे तपासून पहावे. मी त्याच्या फार खोलात जाणार नाही, कारण सभागृहात सांगितलेली माहिती निश्चितपणे सत्य असावी असे आपण गृहीत धरुन चालतो. त्यांनी सांगितलेल्या माहितीवर विश्वास ठेवण्यात यावा. छत्रपती शिवाजी महाराजांबद्दल आपणा सर्वांना आदर आहे, राष्ट्रपुरुष म्हणून संपूर्ण राष्ट्राने त्यांचा गौरव केलेला आहे, त्यांच्याबद्दल अशा प्रकारचे वक्तव्य कोणत्याही पक्ष किंवा व्यक्तीने

.....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

PNG/ MAP/ KGS/ ..... यापूर्वी श्री.शिगम

श्री.मधुकर सरपोतदार.....

काढणे हे निश्चितपणे निषेधार्ह आहे. सभागृहाच्या भावना आपण निश्चितपणे गुजरात राज्य सरकारला कळविल्या पाहिजेत. या संदर्भात मी स्वत: माहिती घेणार आहे व त्यांच्याशी त्यांच्याशी बोलणार आहे. आपण सर्वांनी व मी याबाबत निषेध व्यक्त केला आहे, तसेच सन्माननीय सदस्य डॉ.वसंत पवार यांनीही निषेध व्यक्त केला आहे.

श्री.नितीन गडकरी (नागपूर विभाग पदवीधर) सभापती महोदय, मी आपल्याला विनंती करतो की, या गंभीर विषयावर सरकारतर्फे खुलासा होऊन निर्णय होण्याची आवश्यकता आहे. गुजरातचे मुख्यमंत्री श्री.नरेंद्र मोदी हे माझ्याशी व श्री.विनोद तावडे यांच्याशी फोनवर बोलले. यानंतर मी व श्री.विनोद तावडे यांनी सर्व माहिती फॅक्सवरुन मागविली आहे. सदरहू कागद गुजराती भाषेत असल्याने त्याचे भाषांतर करुन घेतले आहे. "ज्याप्रमाणे छत्रपती शिवाजी महाराजांनी सुरत लुटली, म्हणून ते लुटेरे होते, तशा प्रकारे गुजरातचे मुख्यमंत्री श्री.नरेंद्र मोदी गुजरात लुटत आहेत" असे त्यांचे स्टेटमेंट होते. यामध्ये छत्रपती शिवाजी महाराजांचा उल्लेख केलेला आहे. या सभागृहामध्ये सरकारतर्फे आम्ही काही बोलू शकत नाही. ही घटना एवढी तीव्र आहे की, राष्ट्रवादी काँग्रेसच्या सदस्यांनी या घटनेचा त्यांनी निषेध केला आहे. मात्र काँग्रेसचे सदस्य अजून निषेध करताना दिसत नाहीत. या घटनेचा निषेध केवळ सभागृहाने न करता महाराष्ट्र सरकारनेही निषेध केला पाहिजे व चौकशी केली पाहिजे.

..... यानंतर श्री.भोगले

अधिकृत पत्र / प्रतिलिपी नाही

टेप ओरीजनल :

श्री.मधुकर सरपोतदार ( ) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.विनोद तावडे यांनी सुरतमधील गुजरातमधील विरोधी पक्षनेत्यांनी जे काही उद्‌गार काढले आहेत. महाराष्ट्रातील असे एक व्यक्तीमत्व आहे की, ज्यांच्याविषयी महाराष्ट्रातील प्रत्येक नागरिकाला अभिमान आहे, आदर आहे. अशा बद्दल त्यांना लुटारु म्हणणे हा आपल्या देशाचा अपमान आहे. जर महाराज झाले नसते तर हे जे कोणी आज वक्तव्य करतात त्यांची सुंता झाली असती. पण आज ते विरोधी पक्ष नेते होऊ शकले आणि आपल्या धर्मात विरोधी पक्ष नेते होऊ शकले, खरोखरच अत्यंत गलिच्छ असे आरोप करणाऱ्या नेत्यावर, त्यांचा निषेध आम्ही या सभागृहात करतो, अशा प्रकारची घटना घडलेली आहे त्याबद्दल काँग्रेस पक्षाने, माननीय मुख्यमंत्र्यांनी सभागृहात यावे, त्यांच्याशी बोलावे त्यांची माफी त्यांनी या सदनामध्ये सादर करावी अशी मी सर्व आमच्या पक्षातर्फे विनंती करतो.

उपसभापती : सन्माननीय सदस्य श्री.विनोद तावडे यांनी छत्रपती शिवाजी महाराजांच्या संदर्भात गुजरातमधील विरोधी पक्ष नेत्यांच्या नावाचा उल्लेख आपण केला. श्री.अर्जून कोटवाडिया यांनी त्यांच्याबद्दल जे अनुउद्‌गार काढले, त्याबद्दल आपणच नाही तर संपूर्ण सभागृहाने या ठिकाणी भावना व्यक्त केलेल्या आहेत. छत्रपती शिवाजी महाराज हे केवळ महाराष्ट्राचेच नव्हे तर राष्ट्राचे राष्ट्रपुरुष म्हणून आपण मानत आलेलो आहोत. त्यांचा अपमान किंवा त्यांच्याबद्दलच्या अनादराच्या भावना या निश्चितपणे एका राष्ट्रपुरुषाचा अपमान आहे. त्यामुळे या संदर्भात आपण सर्वांनी, हे वक्तव्य ज्यांनी केले त्यांच्याबद्दल आपण या ठिकाणी निषेध केलेला आहे. या प्रकरणी सत्य काय आहे हे जाणून घेण्याची आपण विनंती केलेली आहे. आपण सांगितले आहे की, सन्माननीय मुख्यमंत्र्यांनी या ठिकाणी निवेदन करावे. या ठिकाणी माझे स्पष्ट म्हणणे आहे की, श्री.विनोद तावडे यांनी जी माहिती दिलेली आहे, ती वर्तमानपत्रात छापून आली आहे, ते सभागृहाचे सन्माननीय सदस्य आहेत. त्यामुळे ही माहिती खरी आहे की खोटी आहे हे तपासून पहावे. याच्या फार खोलात जाणार नाही, कारण त्यांनी या ठिकाणी जे सांगितले ते निश्चितपणे सत्य असावे असे आपण धरुन चालतो. त्यांनी सांगितलेल्या माहितीवर विश्वास ठेऊन- छत्रपती शिवाजी महाराजांच्या बद्दल आपणा सर्वांना आदर आहे. राष्ट्रपुरुष म्हणून संपूर्ण राष्ट्राने त्यांचा गौरव केलेला आहे, त्यांच्याबद्दल अशा प्रकारचे वक्तव्य, पक्ष कोणताही असो, व्यक्ती कोणतीही असो, अशा प्रकारचे वक्तव्य करणे हे निश्चितपणे निषेधार्ह आहे, आणि म्हणून सभागृहाच्या भावना आपण निश्चितपणे गुजरात राज्य सरकारला कळवून या संदर्भात मी स्वत: माहिती घेतो. मी त्यांच्याशी बोलतो. आपण निषेध व्यक्त केला, मी देखील निषेध व्यक्त केला. या ठिकाणी डॉ.वसंत पवार यांनी निषेध व्यक्त केला. एक गोष्ट नक्की

श्री.नितीन गडकरी (नागपूर विभाग पदवीधर) : सभापती महोदय, मी आपल्याला एकच विनंती करतो की, आपण या घटनेचा खरं म्हणजे या गंभीर विषयावर सरकारतर्फे खुलासा होऊन

अप्रमाणित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

यावर निर्णय होण्याची आवश्यकता आहे. गुजरातचे मुख्यमंत्री श्री.नरेंद्र मोदी हे माझ्याशी व श्री.विनोद तावडे यांच्याशी फोनवर बोलले. नंतर मी व तावडे यांनी सर्व माहिती फॅक्सवरुन बोलावली. गुजराती न समल्यामुळे त्याचे ट्रान्सलेशन करुन घेतले. जशी शिवाजी महाराजांनी सुरत लुटली ते लुटेरे होते. तशा प्रकारे मोदी गुजरात लुटत आहेत, असे त्यांचे स्टेटमेंट होते. आणि शिवाजी महाराजांचा उल्लेख केला, माझी विनंती आहे की, काही झाले तरी आम्ही या सभागृहामध्ये सरकारतर्फे काही बोलू शकत नाही. ही घटना एवढी तीव्र आहे की, राष्ट्रवादी काँग्रेसच्या सदस्यांनी या घटनेचा त्यांनी निषेध केला. काँग्रेसचे सदस्य अजून निषेध करताना दिसत नाहीत. याचा निषेध केवळ सभागृहाने नाही तर महाराष्ट्र सरकारने निषेध केला पाहिजे व चौकशी केली पाहिजे.

..... यानंतर श्री.भोगले

अप्रसारित पत्र / प्रसिद्धीसाठी नाही

मूळ :

श्री.मधुकर सरपोतदार : सन्माननीय सदस्य श्री.विनोद तावडे यांनी माहिती दिली की, गुजरातमधील विरोधी पक्ष नेत्याने छत्रपती शिवाजी महाराजांबद्दल जे गैरउद्‌गार काढले आहे,

छत्रपती शिवाजी महाराज हे असे एक व्यक्तिमत्व आहे की, ज्यांच्याबद्दल महाराष्ट्रातील प्रत्येक नागरिकाला अभिमान आहे, आदर आहे. त्यांना लुटारु म्हणणे हा या देशाचा अपमान आहे. जर महाराज आले नसते तर हे जे कुणी वक्तव्य केले असते व त्यांची सुंता झाली असती, पण आज ते विरोधी पक्ष नेते होऊ शकले आहेत. आपल्या धर्मात राहून विरोधी पक्ष नेते होऊ शकले आहेत. छत्रपती शिवाजी महाराजांना लुटारु म्हणणा-यांचा मी निषेध व्यक्त करतो. अशा प्रकारची घटना घडली त्याबद्दल माननीय मुख्यमंत्र्यांनी सदनात यावे, त्यांच्याबद्दलचे त्यांचे मत त्यांनी सदनात सादर करावे अशी मी त्यांना पक्षातर्फे विनंती करतो.

उपसभापती : सन्माननीय सदस्य श्री.विनोद तावडे यांनी सांगितले की, छत्रपती शिवाजी महाराजाबद्दल गुजरातचे विरोधी पक्ष नेते श्री.अर्जून कोटवाडीया यांनी गैरउद्गार काढले आहेत. या बाबत संपूर्ण सभागृहाने आपल्या भावना व्यक्त केलेल्या आहेत. छत्रपती शिवाजी महाराज हे आमचे राष्ट्रपुरुष आहेत. त्यांचा आम्हा सर्वांना अभिमान आहे. गुजरातमध्ये त्यांच्याबद्दल व्यक्त इ ाालेल्या भावना हया निश्चितपणे राष्ट्रपुरुषाचा अपमान आहे, त्याबद्दल आपण सर्वांनी भावना व्यक्त केलेल्या आहेत. या प्रकरणात सत्य काय आहे, ते तपासण्याची विनंती मी केलेली आहे. माननीय मंत्र्यांनी या ठिकाणी निवेदन केलेले आहे, सन्माननीय सदस्य श्री.विनोद तावडे यांनी माहिती दिलेली आहे, ती माहिती तपासून पाहण्यात येईल, याच्या फार खोलात मी जाणार नाही. श्री.विनोद तावडे यांनी सांगितलेले निश्चितपणे सत्य असावे. छत्रपती शिवाजी महाराजांबद्दल निश्चितपणे सर्वांना आदर आहे. राष्ट्रपुरुष म्हणून संपूर्ण राष्ट्राने त्यांचा गौरव केलेला आहे. अशा महापुरुषाबद्दल गुजरातच्या विरोधी पक्ष नेत्याने गैरवक्तव्य करणे निंदास्पद आहे. याची मी स्वत: निषेध करीत आहे. मी स्वत: या संदर्भात माहिती घेणार आहे.

श्री.नितीन गडकरी : या गंभीर विषयासाठी सरकारतर्फे खुलासा होऊन यावर निर्णय घेण्याची आवश्यकता आहे. गुजरातचे मुख्यमंत्र्यांशी श्री.विनोद तावडे हे दूरध्वनीवरुन बोलले आहेत व त्यांच्या भावना व्यक्त केल्या आहेत. हया घटनेबद्दल राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या सदस्यांनी निषेध व्यक्त केला आहे. काँग्रेसच्या सदस्यांनीही निषेध व्यक्त केला आहे. याचा निषेध केवळ सभागृहात करु नये तर महाराष्ट्र सरकारनेही याचा निषेध केला पाहिजे व चौकशी केली पाहिजे.

.....यानंतर श्री.भोगले

अधिकृत वृत्त / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.नितीन गडकरी.....

आणि या सभागृहात सगळयांनी मिळून गुजराथच्या काँग्रेस पक्षाच्या विरोधी पक्षनेत्यांचा सामुहिक निषेध केला पाहिजे. छत्रपती शिवरायांचा अपमान महाराष्ट्र कधीही सहन करणार नाही हे ठणकावून सांगितले पाहिजे. या निमित्ताने माननीय मुख्यमंत्र्यांना शासनाच्या वतीने निवेदन करण्यास सांगावे अशी माझी विनंती आहे.

श्री.सतीश चतुर्वेदी : सभापती महोदय, छत्रपती शिवरायांच्याबद्दल प्रत्येक राष्ट्रप्रेमी भक्ताला आदर आहे. त्यांच्याबद्दल अपमानजनक उद्‌गार काढणारी व्यक्ती कोणत्याही पक्षाची असो त्याचे समर्थन केले जाणार नाही. 100 टक्के धि:कार केला जाईल. सन्माननीय सदस्यांनी जी माहिती दिली त्या संदर्भात शासनाकडून माहिती घेतली जाईल. आपण जे निर्देश द्याल त्यानुसार माननीय मुख्यमंत्री सभागृहाच्या भावना लक्षात घेऊन निवेदन करतील. सत्य परिस्थिती विचारात घेऊन जर कोणी असे वक्तव्य केले असेल तर ती व्यक्ती कोणत्याही पक्षाची असो, मी छत्रपती शिवरायांच्या बद्दल कोणी अनुद्‌गार काढले असतील तर त्यांच्या बाजूने उभा राहणार नाही. त्यांचा धि:कार करतो ही आमची भूमिका स्पष्ट आहे.

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.विनोद तावडे यांनी जी माहिती दिली ती बाब अतिशय निषेधार्ह आहे. सन्माननीय सदस्य श्री.विनोद तावडे यांनी जी माहिती दिली त्या संदर्भात राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या सन्माननीय सदस्यांनी समर्थन दिले आहे. ज्या छत्रपती शिवरायांना हा महाराष्ट्र आपला मानबिंदू समजतो, नव्हे संपूर्ण देश समजतो त्या छत्रपती शिवरायांबद्दल कोणती व्यक्ती असे वक्तव्य करणार असेल आणि लुटारु म्हणून संबोधणार असेल, त्यांचा अपमान करणार असेल तर ती बाब निषेधार्ह आहे. म्हणून सभागृहाच्या दोन्ही बाजूच्या भावना लक्षात घेऊन माननीय मुख्यमंत्र्यांनी सभागृहात माहिती घेऊन निवेदन करावे अशी मी विनंती करतो.

उपसभापती : मी मघाशी सांगितल्याप्रमाणे सन्माननीय सदस्य श्री.विनोद तावडे यांनी जो औचित्याचा मुद्दा उपस्थित केला त्या संदर्भात मी सांगू इच्छितो की, ज्यांना आपण राष्ट्रपुरुष मानतो त्या आदरणीय छत्रपती शिवाजी महाराजांबद्दल जे अवमानकारक उद्‌गार गुजराथ राज्याच्या विरोधी पक्षनेत्यांनी काढले त्याबद्दल निश्चितपणे विधानपरिषदेतील सर्व सन्माननीय सदस्यांनी एकच भावना

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

माननीय उपसभापती.....

व्यक्त केली. हा राष्ट्रपुरुषाचा अवमान महाराष्ट्र कधीही सहन करणार नाही. त्याचवेळी विरोधी पक्षाकडून अशी मागणी केली गेली की, माननीय मुख्यमंत्र्यांनी निवेदन करावे. या प्रकरणी मी एवढेच निदर्शनास आणू इच्छितो की, या संदर्भात शासनाने माहिती घेऊन निवेदन करावे.

श्री.सतीश चतुर्वेदी : सभापती महोदय, माननीय मुख्यमंत्री उद्या नागपूरमध्ये नाहीत.

उपसभापती : सभागृहाच्या भावना लक्षात घेऊन शासनाने बुधवार सायंकाळपर्यंत याठिकाणी खुलासा करावा. मी वक्तव्याचा आणि वक्तव्य करणाऱ्या व्यक्तीचा निषेध करतो. सभागृहाच्या भावना आपण गुजराथ सरकारच्या निदर्शनास आणू. मी मघाशी म्हटल्याप्रमाणे मी कोणत्याही पक्षाचा नाही. राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष आणि काँग्रेस पक्ष असो, या नाण्याच्या दोन बाजू आहेत.

अप्रधारित पत्र / प्रतिलिपीसाठी नोंद

पृ.शी./मु.शी.: सन 2006-07 च्या खर्चाच्या पूरक मागण्यांवर चर्चा.

उपसभापती : माननीय सदस्यांना हे माहीतच असेल की, पूरक मागण्यांवरील चर्चेसाठी दोन दिवस म्हणजे आज आणि उद्या दिनांक 12 डिसेंबर, 2006 हे दिलेले आहेत. आज कार्यक्रमपत्रिकेवर दाखविलेल्या मागण्यांवर चर्चा व्हावयाची आहे. पूरक मागण्या आणि त्याखालील बाबी यासंबंधीची माहिती सदस्यांना पत्रक भाग-2 द्वारे वेगळी प्रसृत करण्यात आली आहे. प्रत्येक सदस्याने भाषण करताना बाब क्रमांक आणि पूरक विवरणपत्राचा पृष्ठ क्रमांक सांगण्याची कृपा करावी. ही चर्चा संबंधित बाबीपुरतीच मर्यादित असून मूळ मागणीवर चर्चा करता येणार नाही हे सदस्यांना सांगावयास नकोच.

कार्यक्रमपत्रिकेवर दर्शविलेल्या पूरक मागण्यांवरील चर्चा व त्यावरील उत्तर शक्यतोवर आजच पूर्ण करावयाचे आहे हे सदस्यांनी कृपया लक्षात घ्यावे. अन्यथा आज राहिलेल्या पूरक मागण्या व मंगळवार, दिनांक 12 डिसेंबर, 2006 करीता असलेल्या सर्व पुरवणी मागण्यांवरील उद्या दिनांक 12 डिसेंबर, 2006 रोजीच पूर्ण करावी लागेल.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

विविध मंत्र्यांच्या विभागांच्या पूरक मागण्या

उपसभापती : खालील मंत्र्यांच्या विभागाच्या पूरक मागण्या एकत्रितपणे चर्चेस घेण्यात येतील.

1) उपमुख्यमंत्री - मागणी क्रमांक बी-1, बी-4, बी-9, बी-10
2) सहकार, पुनर्वसन व मदतकार्य मंत्री, मागणी क्रमांक - व्ही-2, व्ही-5
3) जलसंपदा (कृष्णा खोरे पाटबंधारे महामंडळ वगळून), लाभक्षेत्र विकास व पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री - मागणी क्रमांक आय-2, आय-3, आय-5,वाय-2
4) सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री- मागणी क्रमांक एच-2, एच-3, एच-5, एच-6, एच-7, एच-8,एच-8, एच-9.
5) वस्त्रोद्योग, माजी सैनिकांचे कल्याण व रोजगार व स्वयंरोजगार मंत्री- मागणी क्रमांक व्ही-2, व्ही-3,झेडए-1
6) पणन, रोजगार हमी योजना, संसदीय कार्य व महिला व बालविकास मंत्री - मागणी क्रमांक ओ-3, व्ही-2,व्ही-5, एक्स-1
7) शालेय शिक्षण, क्रीडा व युवक कल्याण मंत्री मागणी क्रमांक ई-2, ई-3, ई-3ए.
8) पशूसंवर्धन, दुग्धविकास, मत्स्यव्यवसाय व औकाफ मंत्री मागणी क्रमांक डी-4, डी-5, डी-9, डी-10.
9) कृषी, जलसंधारण व खार जमीन मंत्री -मागणी क्रमांक डी-2ए, डी-3, आय-3, एल-7, एल-8.
10) सार्वजनिक आरोग्य व कुटूंब कल्याण मंत्री मागणी क्रमांक -आर-1
11) आदिवासी विकास मंत्री, मागणी क्रमांक-टी-2, टी-5,टी-6,टी-7,टी-8

(तालिका सभापतीस्थानी श्रीमती सुधा जोशी)

...2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जयंत प्र. पाटील (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदया, बाब क्रमांक 29, पृष्ठ क्रमांक 19 गृह खात्याच्या संदर्भात मी माझे विचार व्यक्त करणार आहे. आपल्या ज्या गस्त घालणा-या बोटी आहेत त्यांचे भाडे थकीत आहेत. गस्ती बोटींचा 11 लक्ष रुपये वर्षाचा खर्च असून त्यांची 2 कोटी रुपये रक्कम थकीत आहे. त्यामुळे आतापर्यंत गस्ती बोटींचे किती वर्षाची रक्कम थकित आहे याची माहिती माननीय मंत्रीमहोदयांनी देण्याची आवश्यकता आहे. जर या गस्ती बोटी वापरल्या जात नसतील तर संरक्षण करण्यासाठी ज्या बोटी वापरल्या जातात त्यांचा दर्जा काय आहे यासंदर्भात सभागृहात अनेक वेळा चर्चा झालेली आहे. या गस्ती बोटींचा स्पीड हा कमीतकमी स्मगलर्स, अतिरिकी, ज्या बोटी वापरतात त्यांच्या पेक्षा जास्त असण्याची आवश्यकता आहे. आपल्या गस्ती बोटींचा स्पीड हा 4 नॉटीकल माईल्स असून स्मग्लर्स, अतिरेकी ज्या बोटी वापरतात त्यांचा स्पीड 40 नॉटीकल माईलस असतो. त्यामुळे शासन गस्ती बोटी आधुनिक करण्याच्या संदर्भात काही मदत करणार आहे काय?

सभापती महोदया, मी आता बाब क्रमांक 81, पृष्ठ क्रमांक 50 वरील पशुसंवर्धन, मत्स्य व्यवसायावर माझे विचार व्यक्त करणार आहे. बाळासाहेब सावंत मत्स्य विद्यापीठ अलिबाग येथे स्थापन करण्यासंबंधी शासनकडे मागणी केलेली आहे. अलिबाग तालुक्यात 22 कोळीवाडे असून अलिबाग, मुरुड, पनवेल, ऊरण या परिसरात मोठया प्रमाणात मासेमारी व्यवसाय करणारे मच्छिमार मोठया प्रमाणात आहेत. आधुनिक मासेमारी कशी करावी यादृष्टीने नवीन पिढीला मार्गदर्शन करण्यासाठी मत्स्य महाविद्यालय अलिबाग येथे सुरु करावे अशी माझी विनंती आहे.

सभापती महोदया, बाब क्रमांक 94, पृष्ठ क्रमांक 62, शालेय शिक्षणावर मी विचार मांडणार आहे. कायम विनाअनुदान तत्वावर आज सकाळी चर्चा झालेली आहे. या ठिकाणी टप्प्या टप्प्याने कायम अनुदानाच्या शाळांना मान्यता देण्याचा शासन प्रयत्न करणार आहे असे माननीय मंत्रीमहोदयांनी अशासकीय ठरावाच्या निमित्ताने सभागृहाला माहिती दिलेली आहे. या माहितीचा पुनरुच्चार करुन मला असे सांगावयाचे आहे की, ज्या शाळा विना अनुदानित तत्वावर आहेत त्या परिसरात या शाळा काढल्या नसत्या तर अनुदानित शाळेत विद्यार्थी आले असते आणि तुकडयाही वाढल्या असत्या. त्यामुळे विनाअनुदानित शाळेच्या धोरणात बदल करणे आवश्यक आहे. पहिल्या

...3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जयंत प्र.पाटील.....

टप्प्यात 20 ते 25 तुकडयांना 3 वर्षात परवानगी द्यावी व दुस-या टप्प्यात तिस-या वर्षात अनुदानावर शाळा आणण्याचा प्रयत्न शासनाने करावा अशी माझी मागणी आहे.

सभापती महोदया, बाब क्रमांक 124, पृष्ठ क्रमांक 86, सार्वजनिक बांधकाम खात्यावर मी माझे विचार व्यक्त करणार आहे. सार्वजनिक बांधकाम खात्यातर्फे पुलांची कामे केली जातात. जे पूल तयार झालेले आहेत.

यानंतर श्री. अजित.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयंत प्र. पाटील....

त्या पुलाखालून सागरी वाहतूक करण्यावर बंधने घालण्यात आलेली आहेत. याचे कारण म्हणजे पाच वर्षापूर्वी वसई येथील एका पीलरला धक्का लागून तो कोसळला होता. आता सागरी वाहतूक मोठ्या प्रमाणावर होत आहे. तेव्हा ब्रीजची ऊंची बरोबर आहे की नाही, ब्रिजचे बांधकाम चांगल्याप्रमाणे होते की नाही हे पाहण्यासाठी पर्यटन विभाग आणि सार्वजनिक बांधकाम खाते यांनी उच्च तांत्रिक अधिकाऱ्यांबरोबर एकत्र बसून निर्णय घ्यावा. उच्च न्यायालयाने सागरी वाहतुकीला जे बंधन घातलेले आहे त्याबाबत शासनाने विचार करावा अशी माझी विनंती आहे.

बाब क्रमांक 124, पृष्ठ क्रमांक 86-सार्वजनिक बांधकाम विभाग - वर्सोवा खाडीवर पूल बांधण्याची तरतूद केलेली आहे. यासाठी जवळपास 51 कोटी 86 लाख रुपयांची तरतूद करण्यासाठी आलेली आहे. ही तरतूद अपुरी आहे. त्यामुळे मंजूर झालेली कामे सुरु होत नाही. मंजूर झालेली कामे लवकरात लवकर सुरु होण्याच्या दृष्टीने या पूरक मागण्यांमध्ये भरीव वाढ करावी अशी माझी मागणी आहे.

बाब क्रमांक 129 पृष्ठ क्रमांक 89- सार्वजनिक बांधकाम विभाग - अलिबाग येथे बीएड कॉलेज आहे. या कॉलेजची इमारत धोकादायक झालेली आहे, मोडकळीस आलेली आहे त्याठिकाणी विद्यार्थ्यांना बसण्यासाठी रुम्स नाहीत. त्यामुळे तेथील विद्यार्थ्यांच्या जीवाला धोका निर्माण झालेला आहे. तेव्हा या इमारतीची पुनर्बांधणी करण्यात यावी अशी माझी मागणी आहे.

बाब क्रमांक 147, पृष्ठ क्रमांक 100-सार्वजनिक बांधकाम विभाग - पाली, सुधागड, नागोठणे, महाड, पोलादपूर येथे औद्योगिक प्रशिक्षण संस्थांच्या इमारती आहेत त्याची अवस्था अतिशय वाईट झालेली आहे. त्या इमारतींची योग्य ती दुरुस्ती करण्यात यावी व तेथे प्रशिक्षणासाठी चांगले वातावरण करावे अशी माझी मागणी आहे.

बाब क्रमांक 156, पृष्ठ क्रमांक 122 -मृद व जलसंधारण विभाग- सभापती महोदया, शेतकऱ्यांचे अतिवृष्टीमुळे नुकसान झाले किंवा गारपीठीमुळे नुकसान झाले की कृषि विभागामार्फत त्यांना मदत दिली जाते. समुद्राच्या भरतीमुळे भात शेतीत पाणी शिरते, त्यामुळे शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान होते. ज्या शेतकऱ्याच्या शेतीत हे समुद्राचे पाणी जाते त्यांना किमान तीन वर्षे पीक घेता येत नाही. होळीमध्ये, दत्त जयंती अशा दोन तीन प्रसंगी सर्वात मोठ्या प्रमाणावर

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयंत प्र. पाटील....

समुद्राला भरती येते. बांध बरोबर बांधण्यात आलेले नसल्यामुळे समुद्राचे पाणी मोठ्या प्रमाणावर शेतीत शिरते व त्यामुळे जमीन नापिकी होते. तेव्हा अतिवृष्टीमुळे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना ज्याप्रमाणे नुकसान भरपाई दिली जाते त्याप्रमाणे समुद्राच्या भरतीमुळे शेतीचे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना सुध्दा नुकसान भरपाई देण्यात यावी अशी माझी मागणी आहे. कारण या शेतकऱ्यांना तीन वर्षे भात शेती घेता येत नाही. तेव्हा माझ्या मागणीचा शासनाने विचार करावा अशी विनंती आहे.

यानंतरी श्री.पुरी....

अप्रधारित पत्र / परिपत्रकासाठी नोंद

श्री.जयंत प्र. पाटील...

सभापती महोदय, मी बाब क्रमांक 269, पान क्रमांक 200-सार्वजनिक आरोग्य विभागावर बोलणार आहे. रायगड जिल्हयातील मुरुड तालुक्यात मॅटेर्निटी हॉस्पीटल बंद होते. याबाबतीत मी माननीय राज्यमंत्र्यांना विनंती केली होती व त्यांनीही आश्वासन दिले होते, त्याबाद्दल मी त्यांचे अभिनंदन करतो. त्याठिकाणी त्यांनी डॉक्टर उपलब्ध करुन दिले व ते हॉस्पीटल सुरु करण्याचा प्रयत्न केला. परंतु त्याठिकाणी यंत्रसामुग्री आणि औषधे उपलब्ध नाहीत व पुरेसा स्टाफही नाही. त्यामुळे या पुरक मागण्यांच्या माध्यमातून माझी विनंती आहे की, मॅटेर्निटी हॉस्पीटलमध्ये लेडीज डॉक्टर नाही. त्या भागामध्ये मुस्लीम वस्ती जास्त प्रमाणात असल्यामुळे त्याठिकाच्या महिला त्या हॉस्पीटमध्ये जातात परंतु तेथे लेडी डॉक्टर उपलब्ध नसल्यामुळे फारच अडचणी निर्माण झालेल्या आहेत. यादृष्टीने आपण याबाबतीत लक्ष देऊन ताबडतोबीने पुरेसा स्टाफ उपलब्ध करुन द्यावा आणि महिला डॉक्टर नेमण्याची ताबडतोब सोय करावी की जेणेकरुन तेथील महिलांची सोय होईल.

सभापती महोदय, बाब क्रमांक 346, पान क्रमांक 258-सहकार विभागावर मी माझे विचार मांडणार आहे. सभापती महोदय, आज रायगड जिल्हयातील राज्य भू-विकास बँक बंद आहे. त्या बँकेच्या कर्मचाऱ्यांना पगारही मिळत नाही. बँकेचे फर्निचर विकून कर्मचाऱ्यांचे पगार करण्याचे काम सुरु आहे. त्या बँकेवर श्री.ओसवाल नावाचे चेअरमन असून ते राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे आहेत. आमच्या भागातील बँका सुरु करण्याच्या दृष्टीने शासनाने 200 कोटी रुपयांची नाबार्डला हमी द्यावयाची आहे. 200 कोटी रुपयांचे संरक्षण राज्य बँकेला देण्यास तयार आहे, परंतु राज्य बँक ती हमी घेण्यासाठी तयार नाही. त्या दृष्टीकोनातून आपण भू-विकास बँकेला संरक्षण देण्याची कार्यवाही करावी, अशी माझी मागणी आहे.

सभापती महोदय, बाब क्रमांक 388, पान क्रमांक 282-पाणीपुरवठा व स्वच्छता विभागावर मी बोलणार आहे. सभापती महोदय, ज्या जिल्हा मुख्यालयी नगरपालिका आहेत, तेथील दलित वस्तींसाठी पाणीपुरवठा करण्याकरिता खास बाब म्हणून जिल्हा मुख्यालयी नगरपालिकांना तरतूद करण्याची परवानगी आणि शासनाच्या विविध योजनेतून दलित वस्तींच्या नगरपालिकांसाठी शासकीय निधी मिळावस, अशी मी मागणी करतो व पुरवणी मागण्यांवर माझे विचार मांडण्यासाठी मला संधी दिल्याबद्दल मी आपले आभार मानतो व माझे विचार थांबवतो.

(..2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर चव्हाण (मुंबई प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, प्रथम मी पुरवणी मागण्यासंबंधी एक अतिशय गंभीर बाब आपल्या लक्षात आणून देऊ इच्छितो. गेल्या 5-6 वर्षामध्ये असे लक्षात आले आहे की, मूळ बजेटच्या 35 टक्के खर्च पुरवणी मागण्यांवर होतो. तात्काळ व अर्जंट काम असेल तरच पुरवणी मागण्यांद्वारे खर्च केला जातो. सहकार विभाग, वस्त्रोद्योग विभाग, जलसंपदा विभाग, ऊर्जा व कामगार विभाग, रोजगार व स्वयंरोजगार, सामान्य प्रशासन विभागावर खर्च होतो, परंतु प्रशासनाकडून या आलेल्या योजनांची छाननी होते की नाही ? यामध्ये सहकार व वत्रोद्योग विभागाची मूळ मागणीची रक्कम रु.802.00 कोटी रुपये होती व पुरवणी मागणीची रक्कम रु.3121.71 कोटी एवढी आहे, महसूल व वन विभागाची मूळ मागणीची रक्कम रु.1618.50 कोटी होती व पुरवणी मागणीची रक्कम रु.2474.07 कोटी एवढी आहे. उद्योग, ऊर्जा व कामगार विभागाची मूळ मागणीची रक्कम रु.2153.23 कोटी होती व पुरवणी मागणीची रक्कम रु.2784.81 कोटी एवढी होती. रोजगार व स्वयंरोजगार विभागाची मूळ मागणीची रक्कम रु.212.02 कोटी होती व पुरवणी मागणीची रक्कम रु.151.61 कोटी एवढी होती. सामान्य प्रशासन विभागाची रु.2869.89 कोटी एवढी मूळ मागणीची रक्कम होती व पुरवणी मागणीची रक्कम रु.1357.90 कोटी एवढी होती.

नंतर श्री. रोझेकर...

अप्रधारित प्रत / प्रतिक्षिप्त नाही

श्री.मधुकर चव्हाण.....

वर्षभराच्या अर्थसंकल्पात साधारणपणे 35 टक्के अर्थसंकल्प विधिमंडळात चर्चा न करता मंजूर करावा लागतो, कारण तो खर्च झालेला असतो. गोडबोले समितीने असे सांगितले आहे की, ही परिस्थितीत अतिशय धोकादायक आहे. नोकरशहांकडून आलेल्या पुरवणी मागण्या असतात त्याची छाननी मंत्री स्तरावर करणे आवश्यक आहे. सन 2002-2003 साली मूळ मागणी 64564 कोटी रुपयांची होती, पुरवणी तरतूद 10897 कोटी रुपयांची होती आणि एकूण खर्च 61,664 कोटी रुपयांचा होता. मूळ अर्थसंकल्पात 64 हजार कोटी रुपयांची मागणी होती आणि 61 हजार कोटी रुपयांची पुरवणी मागणी केली होती, खर्च त्यापेक्षा कमी केला होता. सन 2003-2004 मध्ये मूळ मागणी 70140 कोटी रुपयांची होती, खर्च केला होता 71205 कोटी रुपयांचा आणि पुरवणी मागणी मागितली होती 19834 कोटी रुपयांची. सन 2004-2005 मध्ये मूळ मागणी होती 79215 कोटी रुपयांची, खंर्च केला होता 76506 कोटी रुपयांचा आणि पुरवणी मागणी होती 25736 कोटी रुपयांची. या ठिकाणी मुद्दाम हे लक्षात आणून देऊ इच्छितो की, 5/6 खाती अशी आहेत की, आवश्यकता नसतांना पुरवण्या मागण्या या खात्यांकडून केल्या जातात. सन 2003-2004 मध्ये मागण्यांची संख्या होती 57, मूळ मागणी होती 24173 कोटी रुपयांची, पुरवणी मागणी होती 1727 कोटी रुपयांची आणि खर्च झाला होता केवळ 19798 कोटी रुपयांचा. सन 2003-2004 मध्ये मागण्यांची संख्या होती 56, मूळ मागणी 17324 कोटी रुपयांची, पुरवणी मागणी होती, 1574 कोटी रुपयांची आणि एकूण खर्च झाला होता 11707 कोटी रुपयासंचा. सन 2004-2005 मध्ये मागण्यांची संख्या होती 47, मूळ मागणी 24719 कोटी रुपयांची, पुरवणी मागणी 1448 कोटी रुपयांची आणि एकूण खर्च झाला होता 19143 कोटी रुपयांची. या ठिकाणी या सर्व बाबींचे संशोधन करण्याची आवश्यकता आहे. यामधील प्रत्येक मागणी ही सत्ताधारी पक्षाच्या इच्छा-आकांक्षा पूर्ण करण्यासाठी आहेत काय? सार्वजनिक आरोग्य खात्याची सीआयडीमार्फत चौकशी करणे आवश्यक आहे. भ्रष्टाचाराचे सगळयात मोठे कुरण हे सार्वजनिक आरोग्य खाते आहे. सार्वजनिक आरोग्य खात्यामधील 2/3 हेड मी या ठिकाणी वाचून दाखवितो. पान क्रमांक 193, बाब क्रमांक 264, 270, 272, 274 आणि 271 या सगळयांमध्ये साधारणपणे 'रुग्णालयातील विशेष यंत्रसामुग्रीची खरेदी करण्यासाठी होणारा खर्च' असेच लिहिले आहे.

..2.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रमेश निकोसे : सभापती महोदय, ही अतिशय गंभीर बाब असल्यामुळे सभागृहात या खात्याच्या कॅबिनेट मंत्र्यांना उपस्थित राहण्याबाबत आपण सूचना द्याव्यात, अशी माझी नम्र विनंती आहे.

श्री.मधुकर चव्हाण : या विभागाचे डेप्युटी डायरेक्टर, श्री.धोत्रे यांनी गेल्या 2/3 वर्षात 35 कोटी रुपयांचा भ्रष्टाचार केलेला आहे. खालच्या सभागृहात सन्माननीय मुख्यमंत्री महोदयांनी या अधिका-यांना निलंबित करण्याबाबतचे आश्वासन दिले होते. परंतु, या खात्याच्या मंत्र्यांनी केवळ त्यांना मेमो दिलेला आहे. असे करुन मंत्रीमहोदया कुणाला वाचवीत आहेत ? याचे उत्तर सन्माननीय मंत्रीमहोदयांनी दिले पाहिजे. सिव्हिल सर्जन, अकोला, अमरावती येथे एका दिवसात 44 लाख रुपयांचा भ्रष्टाचार झाला आहे. एका ठिकाणी 9 कोटी 70 लाख रुपयांचा भ्रष्टाचार झाला आहे. एका ठिकाणी 17 कोटी रुपयांचा भ्रष्टाचार झाला आहे. बिले 1 हजार रुपयांची आणि चेक काढायचा मात्र 1 लाख रुपयांचा, अशा पध्दतीने भ्रष्टाचार झालेला आहे. 35 कोटी रुपयांची बिले एका दिवसात काढण्यात आली, चेक देखील त्याच दिवशी देण्यात आला आणि त्याच दिवशी पैश्यांचे विड्रावल झाले. या प्रकरणामध्ये तेथील ट्रेझरी कार्यालयातील अधिकारी देखील सहभागी आहेत. महाराष्ट्रामध्ये अनेक रुग्णालयांमध्ये असे प्रकार सुरु आहेत. भारती नावाच्या अधिका-यांने 2 कोटी रुपयांचा भ्रष्टाचार केलेला आहे. आणखी एका ठिकाणी 3 कोटी रुपयांचा भ्रष्टाचार झालेला आहे. परंतु, या अधिका-यांना केवळ मेमो देऊन सोडण्यात आलेले आहे. खरे पाहता या अधिका-यांची जागा जेलमध्ये असावयास हवी होती, परंतु त्यांना मेमो देऊन सोडण्यात आलेले आहे. मला असे कळलेले आहे की, माननीय मुख्यमंत्र्यांनी खालच्या सभागृहात या अधिका-यांना निलंबित करु, असे सांगितले आहे. परंतु, मंत्र्यांनी त्यांना केवळ मेमो देऊन सोडलेले आहे. मग असा प्रश्न पडतो की, मुख्यमंत्री मोठे की, या खात्याच्या मंत्री मोठया ? या ठिकाणी पुरवणी मागण्यांमध्ये 35 टक्के मागण्या या आरोग्य खात्याच्या आहेत. म्हणून माझी अशी मागणी आहे की, गेल्या 2/3 वर्षातील आरोग्य खात्याच्या खरेदीची सी.आय.डी.मार्फत चौकशी करण्यात यावी.

यानंतर श्री.बोरले.....

श्री.मधुकर चव्हाण .....

त्या ठिकाणी उच्च पदस्थांनी का मान्यता दिली ? कशासाठी मान्यता दिली ? माझी अशी माहिती आहे की, श्री.धोत्रे नावाचे अधिकारी विधिमंडळामध्ये सगळीकडे फिरतात आणि सांगतात की, साहेब हे असे करु नका, ते तसे करु नका. त्यातल्या त्यात सुदैवाची व समाधानाची बाब अशी आहे की, सत्ताधारी पक्षातील आणि विरोधी पक्षातील ज्या आमदारांना ते भेटले असतील त्या आमदारांनी त्यांना पाठिंबा दिला नाही. या सभागृहामध्ये कधी लक्षवेधी सूचनेच्या माध्यमातून, कधी अर्धा तास चर्चेच्या माध्यमातून तर कधी प्रश्नोत्तराच्या माध्यमातून वेगवेगळया रुग्णालयांची चर्चा होत असते की, या रुग्णालयामध्ये हे उपकरण नाही, त्या रुग्णालयामध्ये ते उपकरण नाही. मागच्या 2-3 वर्षामधील वर्तमानपत्रातील बातम्या काढा, अतिशय निर्लज्जपणे हा शब्द मी वापरत नाही. पण गेंडयाची कातडी पांघरल्यासारखी थातूरमातूर उत्तरे दिली जातात. जनतेच्या पैशांची लूट चालली आहे. नेहमी असे सांगण्यात येते की, राज्यावर 1 लाख 32 हजार कोटी रुपयांचे कर्ज आहे. त्यातील तुम्ही किती लूट केली आहे ? तुमच्या अधिका-यांनी किती लूट केली आहे ? त्यावर तुमचे नियंत्रण नाही, असा त्याचा सरळ अर्थ आहे. त्याचे दोन अर्थ होतात. एक तर तुमचे नियंत्रण नाही आणि नियंत्रण असेलच तर त्या पापामध्ये तुम्ही सुध्दा सहभागी आहात, असा त्याचा सरळ अर्थ आहे. याचे उत्तर माननीय मंत्री महोदयांनी पुरवणी मागणीच्या उत्तराच्या भाषणामध्ये दिले पाहिजे.

सभापती महोदया, बाब क्र.273 यामध्ये जीवनदायी योजनेकरीता अतिरिक्त तरतूद याकरिता पुरवणी मागणी केलेली आहे. ही बाब देखील तपासून पाहण्याची आवश्यकता आहे. मी माझा मुद्दा पुन्हा पुन्हा मांडत आहे की, आरोग्य विभागाची चौकशी सी.आय.डी.तर्फे किंवा आर्थिक गुन्हे विभागातर्फे केली पाहिजे अशी माझी आग्रहाची मागणी आहे. काही वेळा आम्ही माननीय राज्यमंत्र्यांकडे पत्र पाठवितो. मी सप्टेंबर, ऑगस्ट आणि जुलै महिन्यामध्ये माननीय मंत्री महोदयांना पत्र पाठविले होते. जनतेने निवडून दिलेल्या सदस्यांना जर 2-3 महिने उत्तर दिले जात नसेल तर सामान्य माणूस तुमच्याकडे येणारच नाही. आरोग्य विभागामध्ये टेंडर कसे पास केले जातात, विदाऊट कोटेशन काही गोष्टी कशा केल्या जातात. टेंडरसाठी कोणाचे नातेवाईक कोणाला आधी भेटत असतात, हे सर्व सभागृहामध्ये एक दिवस बोलावे लागेल. समझनेवालेको इशारा काफी है. सभापती महोदया, याची गंभीरपणे नोंद घेणे आवश्यक आहे. मी सभागृहाचा वेळ

...2/-

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर चव्हाण .....

वाचावा म्हणून चार्ट वाचून दाखविलेला नाही. तो गृहीत धरावा आणि ते सर्व रेकॉर्डवर घ्यावे, अशी मी आग्रहाची विनंती करतो. पुरवणी मागण्यांची विधानसभा सभागृहातील आणि विधानपरिषद सभागृहातील सर्व सन्माननीय सदस्यांनी गंभीरपणे नोंद घेण्यासारखी गोष्ट आहे. जलसंपदा विभागाच्या 35 टक्के पुरवणी मागण्या आहेत. वस्त्रोद्योग आणि रोजगार हमी योजना विभागाच्या 35-36 टक्के पुरवणी मागण्या आहेत. सभापती महोदया, मी सभागृहाचा जास्त वेळ घेत नाही. हा चार्ट रेकॉर्डवर घ्यावा, अशी मी आपल्याला विनंती करतो.

सभापती महोदया, मी गृह विभागासंबंधी बोलणार आहे. गुप्त सेवांकरिता संवेदनशील क्षेत्रामध्ये कायदा आणि सुव्यवस्था, ही मागणी अंदाजपत्रकामध्ये असावयास पाहिजे होती. भ्रष्टाचार वाढलेला आहे, अँटी करप्शन विभागाला पैसे द्यावे लागतात. ही काही आकस्मिक मागणी नाही. पृष्ठ क्र.17, बाब क्रमांक 23 गुप्त सेवांकरीता तरतूद याबाबत मला बोलावयाचे आहे. दिनांक 11 जुलै, 2006 रोजी पश्चिम रेल्वेच्या मुंबई उपनगरीय रेल्वेत झालेल्या बॉम्ब स्फोटांच्या मालिकेचा जलद तपास करण्यासाठी दहशतवाद प्रतिबंधक पथक स्थापन करण्याचे ठरविण्यात आले आहे. तुम्ही दहशतवाद प्रतिबंधक पथक स्थापन केले काय ? कोणाला बाहेर काढले ? तुम्हाला काही माहिती मिळाली काय ? काल आम्ही पंतप्रधानांचा निषेध करणारे बॅनर्स लावले. याची आम्ही अगोदरच माहिती दिली होती. अशी माहिती गुप्तचर विभागाला मिळत नाही ? तुम्ही कोटयावधी रुपयांची तरतूद करता. जो बॅनर लिहिला होता तो लोकशाहीला धरुन लिहिला होता. देशाच्या विकासाची फळे मुस्लिमांना प्रथम क्रमांकाने मिळाली पाहिजेत, असे सांगणा-या काँग्रेसच्या पंतप्रधानांचा धिक्कार असो. या देशातील जनता धर्माच्या आधारावर आर्थिक बाबतीत अशा त-हेचे देशांतर्गत दुसरे विभाजन करु देणार नाही. मी श्री.अनामी रॉय साहेबांना बोललो की, साहेब आमचे बॅनर्स रात्रीच्या रात्री काढण्यात आले. त्यांनी सांगितले की, बॅनर्स लावावयाचे नाहीत. बॅनर लावण्याबाबत अगोदर त्यांना कळले. गृह विभागाची किती प्रभावी गुप्तसेवा आहे ? यामध्ये बेकायदेशीर असे काही नाही. माननीय पंतप्रधानांचा योग्य आदर ठेवलेला आहे. मुस्लिमांवर टीकाटीप्पणी केलेली नाही. परंतु तरी देखील बॅनर काढले गेले. 11 जुलै पासून पैशांची तरतूद केली. आपण कोणावर आरोपपत्र ठेवले ? जे पाकिस्तानमध्ये आहेत, जे पाकिस्तानचे नागरिक आहेत, जे कधी सापडणार नाहीत त्यांच्यावर आरोपपत्र ठेवण्यात आले. सभापती महोदया, त्यांना सुप्रीम कोर्टाने जरी शिक्षा दिली तरी हे सर्व केंद्रामध्ये धावतील.

यानंतर श्री.सुंबरे .....

श्री. मधुकर चव्हाण ....

सभापती महोदय, छत्रपती शिवाजी महाराजांच्या संबंधात अपमानास्पद उल्लेख केल्या संबंधातील मुद्दा सन्माननीय सदस्य श्री.विनोद तावडे यांनी सांगिबतला. पण याला सोडा, त्याला सोडा यापेक्षा दुसरे काही झाले नाही. रेल्वे बॉम्बस्फोटामध्ये मृत्यू पावलेल्यांच्या कुटुंबियांचे अश्रू अद्याप पुसले गेलेले नाहीत पण तरीही अजून त्या संबंधात एकावरही आरोप पोलिसांकडून ठेवण्यात आलेले नाहीत. सभापती महोदय, म्हणून या ठिकाणी शेवटी मी दोनच गोष्टींचा उल्लेख करू इच्छितो. आरोग्य खात्याचे आरोग्य केवळ बिघडलेच नाही तर आरोग्य खाते हे आता आयसीयू मध्ये आहे आणि त्याची आपण नीट काळजी घ्यावी. त्याच बरोबर अर्थखात्याचे राज्यमंत्री येथे बसलेले आहेत त्यांना मी सांगेन की, सगळ्या समर्थांनी पुरवणी मागण्यांसंबंधात काही अतिशय चांगले असे लिहिलले आहे. समाजातील ही माणसे अशी आहेत की, त्यांना आमदार-मंत्री होण्याची इच्छा नाही तर आपल्या समाजामध्ये, शासनाच्या कारभारामध्ये काही सुधारणा झाल्या पाहिजेत म्हणून ते लिहित असतात, सूचना करीत असतात. पण त्याला आपल्याकडून कोठल्याही प्रकारे प्रतिसाद मिळत नाहीत, उत्तरे दिली जात नाहीत. गोडबोले समितीच्या शिफारशी तर आपण गुंडाळूनच ठेवल्या आहेत. नेहमीच्या खर्चासाठी पुरवणी मागण्यामधून पैसे मागितले जात नाहीत तर आकस्मिक असे जे खर्च उद्‌भवले जातात, आकस्मिक आपत्तीवर आधारित असे ते खर्च असले पाहिजेत. तेव्हा त्या बाबतीत देखील आपण लक्ष द्यावे अशी विनंती करतो आणि मी या ठिकाणी आरोग्य खात्याबद्दल जे आरोप केले आहेत त्या सगळ्यांना आपण उत्तर द्यावे अशी आग्रही मागणी करतो. सभापती महोदया, आपण या ठिकाणी मला बोलण्याची संधी दिली त्याबद्दल मी आपले आभार मानून माझे भाषण संपवितो.

***

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रमेश निकोसे (नामनियुक्त) : सभापती महोदया, कृषी विभागाची बाब क्रमांक 74, 75 आणि 76, पृष्ठ क्रमांक 48 या संबंधात प्रथमत: मी बोलणार आहे. मी महाराष्ट्र शासनाला धन्यवाद देतो की, त्यांनी बी-बियाणांसंबंधात अनेक वर्षांपासूनची जी सर्व शेतकरी वर्गाची तक्रार होती की, नकली बी-बियाणे विकले जाते आणि त्यामुळे शेतकऱ्याचे मोठे नुकसान होते, त्यांमुळे चांगले पीक घेतले जाऊ शकत नाही. त्याबद्दल येथे चांगला प्रक्रिया सुचविली आहे आणि त्यासाठी निधी मंजूर करण्यात येतो आहे याबद्दल शंका नाही. ही गोष्ट खरी आहे की, शेतकऱ्यांचे अश्रू पुसण्यासाठी महाराष्ट्रातील सर्व पक्षातील मंडळी धावत असतात. प्रत्येकालाच शेतकऱ्याबद्दल जिव्हाळा वाटतो. परंतु एक बाब अशी आहे की, 15 दिवसापूर्वीच एका सर्वेक्षणामध्ये असे समजून आलेले आहे की, 20 वर्षानंतर महाराष्ट्रात पाण्याचा तुटवडा पडणार आहे. पाण्याची पातळी आजच खूप खोल खोल चालली आहे आणि त्यामुळे 400-500 फूटापर्यंत बोअर नेऊनही पाणी लागत नाही. परिणामी आमच्या विदर्भातील, सावनेर वगैरे भागातील साऱ्या संत्र्याच्याबागा सुकून गेल्या आहेत. ज्याप्रमाणे आपल्या राज्यामध्ये वीजेचाप्रश्न मोठ्या स्वरूपात निर्माण झाला आणि मग वीज आता आणायची कोठून म्हणून सर्वांनाच प्रश्न पडला याचे कारण म्हणजे याबाबत आपण वेळीच दक्षता घेतली नाही, उपाय योजना केली नाही म्हणून. तेव्हा उद्या भविष्यात पाण्याच्याबाबतीत देखील अशीच परिस्थिती निर्माण होणार आहे हे लक्षात घेऊन आतापासूनच त्या दृष्टीने आराखडा व योजना तयार करावी अशी माझी आपल्याला सूचना आहे.

सभापती महोदया, त्यानंतर सार्वजनिक आरोग्य विभागाची बाब क्रमांक 263, पृष्ठ 96 संबंधात मी बोलणार आहे. या ठिकाणी सन्माननीय सदस्य श्री.मधु चव्हाण यांनी बरोबर सांगितले की, हा विभाग म्हणजे भ्रष्टाचाराचे आगर आहे. आमच्याकडील सुपर स्पेशालिटी हॉस्पिटलमध्ये कोणी तज्ज्ञ डॉक्टर्स नाहीत, किडनीचे डॉक्टर नाहीत. आता या ठिकाणी आरोग्य विभागाच्या कॅबिनेट मंत्री नाहीत, पण राज्यमंत्री उपस्थित आहेत पण ते केवळ ऐकून घेण्याशिवाय काही करू शकत नाहीत म्हणूनच या ठिकाणी कॅबिनेट मंत्री देखील उपस्थित असले पाहिजेत अशी मागणी मी केली होती. आपल्याकडे तज्ज्ञ डॉक्टर्स नाहीत तेव्हा त्या ठिकाणी डॉ.चौबे यांना ऑनररी सेवा दिली जावी म्हणून मी 10 पत्रे लिहिली. ते स्वत: ऑनररी सेवा आपल्या हॉस्पिटलमधून देण्यास तयार आहेत तेव्हा त्यांना सामावून घ्यावे म्हणून सांगितले पण त्यांना सेवेत घेतले नाही. राज्यातील सुपर स्पेशालिटी हॉस्पिटल्समध्ये किडनी,हार्टचे तज्ज्ञ डॉक्टर्स नाहीत पण नर्सेसची सेवादेखील दिली जात नाही. ... (यानंतर श्री. सरफरे...4ए 1..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रमेश निकोसे...

"अल्लाह की गाय चल रही है, किस दिशा में चल रही है मालूम नाहीं,लेकिन चल रही है ! सभापती महोदया, दुसऱ्या एका बाबीसंबंधी ज्वलंत उदाहरण आपणास सांगतो...

श्री. रणजित कांबळे : सभापती महोदया, माननीय सदस्य हे वैद्यकीय शिक्षण विभागाच्या मागण्यांवर बोलत आहेत..

श्री. रमेश निकोसे : आपण पळण्याचा प्रयत्न करु नका. मी काय बोलतो ते आपण नोंद करुन घ्या. सभापती महोदया, मी बाब क्रमांक 263 आणि पृष्ठ क्रमांक 196 वर बोलत आहे. सक्करदरा याठिकाणी आयुर्वेदीक हॉस्पिटल आहे, तेथील जवळ जवळ 4 ते 5 लोक निलंबित झाले आहेत. त्याठिक्राणी दररोज पाच ते सहा रुग्ण औषध घेण्यासाठी येतात. त्या हॉस्पिटलमध्ये दररोज 40 लिटर दूध येते. सहा लोकांसाठी जेवढे लागते तेवढे ठेवून बाकीचे दूध हे डॉक्टरच्या घरी नेले जाते. त्या हॉस्पिटलमध्ये शिक्षणासाठी विद्यार्थी आहेत. "डरनेकी बात नाही, जो मुझे मालूम है, वह मैं आपको बता रहा हूँ!" शासकीय आयुर्वेद महाविद्यालय, नागपूर येथील प्रपाठक डॉ. प्रमोद साळवे यांच्या निलंबनास एक वर्ष होऊनही त्यांना कामावर घेण्यात आले नाही...

श्री. रणजित कांबळे : सभापती महोदया, माननीय सदस्य हे कोणत्या विषयावर भाषण करीत आहेत हे समजत नाही. ते वैद्यकीय शिक्षण विभागाच्या बाबीवर बोलत आहेत असे मला वाटते. तेव्हा ही बाब आपण त्यांच्या निदर्शनास आणून द्यावी अशी माझी आपणास विनंती आहे.

तालिका सभापती (श्रीमती सुधा जोशी) : माननीय सदस्यांनी एक गोष्ट लक्षात घ्यावी की, आपण ज्या बाबीसंबंधी याठिकाणी आपले मुद्दे मांडीत आहात ती वैद्यकीय शिक्षण विभागाशी संबंधित बाब असून त्यावर आपण उद्या बोलावे.

श्री. रमेश निकोसे : सभापती महोदया, सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण असे याठिकाणी म्हटले आहे...

तालिका सभापती : बाब क्रमांक 263 ही आरोग्याच्या संदर्भातील सार्वजनिक बांधकाम विभागाची आहे. तेव्हा आपण या मागणीवर उद्या भाषण करावे.

श्री. रमेश निकोसे : सभापती महोदया, सार्वजनिक आरोग्य विभागामध्ये हॉस्पिटल येत नाही काय? मंत्रिमहोदय, माननीय सभापतींची दिशाभूल करुन पळण्याचा प्रयत्न करीत आहेत. याठिकाणी जातीय आधारावर आयुर्वेद संचालक वैद्य अब्दुल वहीद व इतर अठरा जणांवर कारवाई

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ MHM/ SBT/

श्री. रमेश निकोसे...

न करता डॉ. साळवे यांना निलंबित करुन शासकीय वैद्यकीय रुग्णालय, नागपूर येथील पुरुष वैद्य लुईस जॉन यांच्याविरुध्द डॉ. शामकुवर यांच्या सादर करण्यात आलेल्या चौकशी अहवालावर शासनाने काहीही कारवाई केली नाही. तेव्हा त्या अहवालाच्या अनुषंगाने चौकशी करण्यात आली पाहिजे. सभापती महोदया, डॉ. विजया मोडक या मागासवर्गीय महिला आहेत. संपूर्ण महाराष्ट्रामध्ये दोन मागासवर्गीय एम.बी.बी.एस. महिला डॉक्टर आहेत. त्यापैकी डॉ. मोडक या जिल्हा हिवताप अधिकारी म्हणून शासकीय सेवेत आहेत.

(यानंतर श्री. किल्लेदार)

अप्रधारित प्रत / प्रतिक्षाधीन नाही

श्री.रमेश निकोसे (पुढें सुरु...

संपूर्ण महाराष्ट्रामध्ये दोनच मागासवर्गीय महिला डॉक्टर आहेत. त्यामध्ये या डॉ.विजया मोडक यांनी स्वातंत्र्य सैनिकांचे पाल्य/प्रकल्पग्रस्त सदराखाली एकूण 11 उमेदवारांना नियुक्त्या दिल्या म्हणून त्यांना निलंबित केले. परंतु रायगड, सिंधूदूर्ग, रत्नागिरी, सांगली, सातारा, जळगाव या ठिकाणच्या अधिकाऱ्यांनी अशाप्रकारची भरती केली परंतु त्यांना कोणालाही निलंबित करण्यात आले नाही. त्या मागासवर्गीय आहेत, म्हणून याबाबतची कोणी नोंद घेणार नाही, याची कल्पना आहे. बाकीच्या विभागाच्या विषयावर मी उद्या बोलेन. धन्यवाद.

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ SBT/ MHM/

श्री.अरविंद सावंत (मुंबई स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, पुरवणी मागण्यांवर चर्चा करताना मी सुरवातीलाच गृह विभागाच्या बाब क्रमांक 27 च्या बाबतीत बोलू इच्छितो. या ठिकाणी पोलिसांच्या गणवेशाच्या संबंधात तरतूद करण्यात आलेली आहे, त्याचे मी स्वागत करतो. पण मला या ठिकाणी जाणूनबुजून सांगावयाचे आहे की, पोलिसांना गणवेश देताना अत्यंत निकृष्ट दर्जाचा गणवेश दिला जातो. या विषयाच्या बाबतीत माझ्याकडे बरेच काही सांगण्यासारखे आहे. विधानभवन परिसरामध्ये जेवढे म्हणून पोलीस आहेत, त्यांना बोलावून विचारले तर ते सांगतील. त्यातील सगळयांचे बूट सारखे दाखविले तर मी माघार घेईन. कोणत्याही पायातील बूट सारखे नाहीत. त्यांच्या मापाचे त्यांना बूट मिळत नाहीत. ते अधिकाऱ्यांवरुध्द बालू शकत नाहीत. ते अधिकाऱ्यांना विचारु शकत नाहीत. इतकी त्यांची अवहेलना केली जाते. वरिष्ठ अधिकाऱ्यांना तो काही सांगू शकत नाही. त्यांना सुमार दर्जाच्या माणसांसारखी वागणूक मिळते. हा गणवेश घ्या आणि निघून जा अशा पध्दतीने त्यांना सांगितले जाते. अधिकारीही जाणूनबुजून करता अशातला भाग नाही. सरकारने दिलेला गणवेश निकृष्ट दर्जाचा असतो. म्हणून पोलीस स्वत: कापड विकत घेऊन खाजगीरित्या गणवेश शिवतात. आज त्यांच्याकडे चांगल्या प्रकारचे बूट नसल्यामुळे ते टिकत नाहीत, ही वस्तुस्थिती आहे. याबाबत कशी सुधारणा करता येईल हे पहावे. गृह विभागाने कर्मचाऱ्यांचे पगार वाढविल्याचे जाहीर केले.. बेसिक 3050 वरुन 3200 केला. कॉन्स्टेबलच्या पगारामध्ये 1031 रुपये वाढ झाली असे सांगण्यात आले. नाईक, पी.एस.आय. यांच्या पगारात किती वाढ झाली ? सुरक्षेच्या दृष्टीकोनातून जे कर्मचारी एस.पी.जी. मध्ये आहेत त्यांना 460 रुपये अलाऊन्स मिळतो तो कमी केला. पगारवाढ झाल्याचे वर्तमानपत्रामध्ये जाहीर केले. पगार घेऊन घरी गेल्यानंतर वहिनींनी त्यांना विचारले की, तुमच्या पगारामध्ये 1031 रुपयाची वाढ झालेली आहे ते पैसे कोठे आहेत ? वर्तमानपत्रामध्ये पोलिसांना पगार वाढ केल्याचे जाहीर करुन त्यांच्या कुटुंबामध्ये भांडणे लावली. वहिनीने पगारामध्ये झालेली वाढ कोठे खर्च केली असा प्रश्न केला. प्रत्यक्षामध्ये पगार वाढ झाली नाही. अशा प्रकारे पोलिसांची अवहेलना केली जाते. प्रत्यक्षात सिनियर पोलिसांच्या पगारामध्ये पगारवाढ झाली नाही.

यानंतर श्री.बरवड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अरविंद सावंत ...

वाढ झाली असेलच तर ती नगण्य आहे. दुर्लक्ष करावी अशी ती वाढ आहे. वर्तमानपत्रांमध्ये मात्र 1031 रुपये वाढ झाली असे जाहीर झाले परंतु पोलीस त्यांच्या घरामध्ये 31 रुपये सुध्दा नेऊ शकले नाहीत. त्यांची संपूर्ण वेतनश्रेणी पुनर्रचित करावी. त्यांना भरघोस पगारवाढ द्यावी. दुसरीकडे त्यांचे हात बरबटणार नाही अशा पध्दतीने त्यांना पगारवाढ द्यावी. दुसरी बाब अशी की, एकाही पोलीस स्टेशनमध्ये स्वच्छतागृहाची अवस्था चांगली नाही. मी एका सिनियर इन्स्पेक्टरला विचारले की तुमच्याकडे स्वच्छतेबाबत काय व्यवस्था आहे ? त्यांनी सांगितले की, त्यांच्याकडे स्वीपरची पोस्ट नाही. ते कोणाला तरी आणतात आणि स्वच्छता करुन घेतात. पोलीस स्टेशनमध्ये स्वच्छता करण्यासाठी कर्मचारी नाही. कॉन्ट्रॅक्ट पध्दतीवर कोणाला तरी ठेवले जाते. त्यांचा पगार शासन देत नाही. ते बिच्चारे मॅनेज करतात ही गोष्ट वेगळी. यामध्ये सुधारणा झाली पाहिजे. या मागण्यांकडे शासनाने दुर्लक्ष करु नये. तेथील वातावरण प्रसन्न असेल तर आऊटपूट चांगला येईल. वातावरण स्वच्छ नसेल तर चांगले काम करण्याची मानसिकता नसते. म्हणून मी ही मागणी करीत आहे. पोलिसांच्या निवासाची अवस्था आपण पहावी. पोलीस कॉन्स्टेबल ज्या निवासस्थानामध्ये राहतात त्या निवासस्थांनांची अवस्था पहावी. घरभाडे भत्ता वाढल्यामुळे जास्त कर्मचारी आता पोलिसांच्या निवासस्थानात राहात नाहीत परंतु जे कर्मचारी राहतात त्यांच्या निवासस्थानाची अवस्था फार वाईट आहे. तेथील टॉयलेट गळतात आणि तेथे अस्वच्छता फार असते. 100-100 वर्षापूर्वी बांधलेल्या चाळी आहेत. लॅमिंग्टन रोड, ग्रॅन्ट रोड या भागातील चाळीमध्ये गेला तर आपल्याला समजेल. त्यासाठी पुरवणी मागणी न आणता बजेटमध्ये तरतूद करावी. पोलिसांचे गणवेष, निवासस्थानाची व्यवस्था आणि वेतनश्रेणी या तीनही गोष्टींमध्ये मूलभूत सुधारणा करण्याची गरज आहे. ती आपण कराल अशी मी अपेक्षा बाळगतो.

सभापती महोदया, यानंतर मी बाब क्रमांक 74, 75 आणि बाब क्रमांक 84 च्या संदर्भात बोलणार आहे. सन्माननीय सदस्य श्री. पाशा पटेल यांनी परवा सांगितल्याप्रमाणे ज्या कंपन्या खराब बियाणे देतील, बोगस बियाणे देतील आणि ज्यामुळे शेतकऱ्यांचे नुकसान होईल अशा बियाणांचा पुरवठा करणाऱ्या कंपन्यांवर फौजदारी गुन्हा दाखल करावा. त्यांच्यावर शिक्षापात्र गुन्हा दाखल करावा. त्याअनुषंगाने कायद्यामध्ये सुधारणा करणारे विधेयक आणावे अशी मी विनंती करतो.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ MHM/ KTG/ SBT

श्री. अरविंद सावंत .....

सभापती महोदया, बाब क्रमांक 84 ही शासकीय दूध योजनेच्या संदर्भात आहे. मी या विषयाच्या संदर्भात लक्षवेधी सूचना दिलेली आहे परंतु ती लक्षवेधी सूचना लागलेली नाही. आमची लक्षवेधी सूचना का लागत नाही हे समजत नाही. नागपूरच्या शासकीय दूध योजनेमधील 110 कामगारांना कायम स्वरुपी सेवेत घेण्याबाबतची अनेक वर्षापासूनची मागणी आहे. माननीय श्री. साबीर शेख हे कामगार मंत्री असताना ती बाब मान्य झाली होती. सर्व कागदपत्रे माझ्याकडे आहेत. माननीय वित्त मंत्र्यांनी सुध्दा मान्यता दिली होती. त्यांची 20-22 वर्षे नोकरी झालेली आहे. आजही त्यांना कायम सेवेत घेतलेले नाही. याबाबत एवढी वेदना आहे की, त्यांच्यातील 3 कर्मचारी रोजंदारीवरच मृत पावले आणि 2 कर्मचारी निवृत्त झाले परंतु ते सेवेत कायम झाले नाहीत. दुग्ध विकास विभागाने तशा पध्दतीच्या प्रस्तावाला मंजुरी दिली परंतु कॅबिनेटने ते नामंजूर केले. या निमित्ताने माझी विनंती आहे की, उरलेल्या 105 कामगारांना त्यांची 22 वर्षे सेवा झालेली असताना सुध्दा शासकीय दूध योजनेमध्ये सेवेत कायम करीत नाहीत. माननीय कामगार मंत्री या ठिकाणी बसलेले आहेत. मागचा प्रस्ताव मी आपल्याला देईन. 105 कामगार शिल्लक आहेत. त्यातील काही कामगार आता सेवानिवृत्त होतील. याचा शासनाने विचार करावा.

सभापती महोदया, यानंतर शालेय शिक्षण विभागाच्या अंतर्गत शालेय पोषण आहाराच्या बाब क्रमांक 89, 90, 91 आणि 92 च्या संदर्भात मी बोलणार आहे. मी निवडणुकीच्या निमित्ताने फिरत असताना काही बालवाड्यांमध्ये आणि शाळांमध्ये गेलो. आपण मुलांना शिजवलेले अन्न देतो. मला दु:ख वाटते. मी एका शाळेमध्ये गेलो आणि सहज विचारले की, आज तुम्ही मुलांना कोणता आहार दिला ? त्या ठिकाणी हिरवे वाटाणे उकडून त्यामध्ये थोडासा मसाला आणि मीठ घालून देत होते. समोर 15 ते 18 विद्यार्थी बसलेले होते पण हजेरीपटावर 40 विद्यार्थी दाखविले होते. मी तोमलाबाद ता. दर्यापूर येथील उदाहरण देत आहे. हा आहार मुले खात नाहीत. शालेय पोषण आहारावर शासन जे पैसे खर्च करते त्याचा लाभ मुलांना मिळाला पाहिजे.

यानंतर श्री. शिगम ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. अरविंद सावंत...)

खाण्यासाठी मुलांना चांगल्या दर्जाचे पदार्थ दिले नाहीत तर ती मुले ते पदार्थ कसे खातील ? तालिका सभापती महोदय, मी महानगरपालिकेच्या शाळेत शिक्षण घेतलेले आहे. त्यावेळी महानगरपालिकांच्या शाळांमधून आम्हाला दूध, चिक्की, चिकू किंवा केळे असे पदार्थ मिळायचे. आज तुम्ही मुलांना 200 एमएल नाही तर निदान 100 एमएल तरी दूध द्या. हे दूध देणे शासनाला परवडेल आणि मुलेही सुदृढ होतील. शासकीय दूध योजनेला देखील त्यामुळे आधार मिळेल. आज मुलांना जे काही पदार्थ खाण्यासाठी दिले जातात त्यापासून मुलांना यत्किंचितही लाभ होत नाही.

तालिका सभापती महोदया, पुणे जिल्हयातील मंचर तालुक्यातील मुरडेवाडी येथील प्राथमिक शाळेच्या बांधकामातील भ्रष्टाचाराचे उदारहरण मी मांडतो. त्या शाळेच्या बांधकामासाठी मुख्याध्यापक आणि सरपंच यांनी हातमिळवणी करुन 180 गोणी सिमेंट खरेदी केले. त्या सिमेंटच्या गोण्यांवर स्पष्टपणे असे लिहिलेले आहे की, "हे सिमेंट बांधकामासाठी वापरु नये". या प्रकरणी मे महिन्यामध्ये रितसर तक्रार केलेली असूनही अजून पर्यन्त कारवाई झालेली नाही. संपूर्ण आंबेगाव तालुक्यातील 13 गावांमध्ये 42 शाळांतील वर्गखोल्या बांधण्यासाठी 71 लाख 72 हजार रु.ची कामे सुरु करण्यात आलेली आहेत. हा सिमेंटचा भ्रष्टाचार अधिका-यांनी मान्य केलेला आहे. तालिका सभापती महोदया, प्रश्न असा आहे की, अशा प्रकारचे कच्चे बांधकाम झाल्यानंतर त्या वर्गामध्ये बसणा-या मुलांचा कोणत्याही क्षणी भिंत कोसळून जीव जाईल. अशा प्रकारचे भयानक काम जी माणसे करीत आहेत त्यांच्यावर तातडीने कारवाई करावी अशी मी सभागृहामध्ये मागणी करीत आहे.

बाब क्रमांक 210, पृ.क्र. 158. तालिका सभापती महोदया, कोकणातील दोन-तीन धरणांची कामे अजून पूर्ण झालेली नाहीत. महमदवाडी हे धरण अजून पूर्ण झालेले नाही. हे काम पूर्ण होईल. परंतु या धरणाच्या संदर्भात शासनाने कालव्यांचे बांधकाम रद्द करण्याचा निर्णय घेतलेला असून वर्तमानपत्रातून तशा बातम्याही प्रसिध्द झालेल्या आहेत. महमदवाडी धरण हे पूर्णत्वाकडे आलेले आहे. जर शासनाने कालव्यांसाठीची तरतूद रद्द केली तर या धरणातील पाणी आपण शेतक-यांना कसे काय देणार ?

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. अरविंद सावंत...)

तालिका सभापती महोदया, कोल्हापूरी बंधा-यांच्या संदर्भात शासनाने धोरणात्मक निर्णय घेण्याची आवश्यकता आहे. मी मागील चार-पाच वर्षापासून सातत्याने यासंबंधी शासनाला सांगत आहे. सिंधुदुर्ग जिल्ह्यातील कणकवली तालुक्यातील कुंबवडे या गावी मी माझ्या आमदार निधीतून कोल्हापुरी बंधारा बांधला. हा बंधारा नंतर नादुरुस्त झाला. या बंधा-याच्या दुरुस्तीसाठी मी गेली 5 वर्षे सातत्याने मागणी करीत आहे. याबाबतीत "तुम्ही पाणी वापर संस्था निर्माण करा" असे मला शासनाकडून उत्तर देण्यात आले. कोल्हापूरी बंधा-यासाठी 50-60 लाख रु. खर्च येतो. आम्ही 10 लाखामध्ये कोल्हापुरी बंधारा बांधला. आमच्या कोकणामध्ये डोंगर उताराची जमीन असल्यामुळे नदीचे पाणी खळखळ वाहत असते आणि त्यामुळे बंधारे टिकत नाहीत. म्हणून या कोल्हापुरी बंधा-यांचे निकष बदलले पाहिजेत.

... नंतर श्री. गागरे...

अप्रधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अरविंद सावंत.....

झिरप्यांना पाणी मिळाले तरी खूप आहे किंवा जनावरांना पिण्याचे पाणी मिळाले तरी खूप आहे, हे पाणी शेतीलाही वापरले जाईल, असा शासनाचा समज आहे, तो कृपया काढून टाकावा. कोकणातील लोकांबाबत भेदभाव करु नका, अशी माझी विनंती आहे. त्यांच्यासाठी तरतूद करावी. हा कोल्हापूर पध्दतीचा बंधारा ताबडतोब दुरुस्त करावा. या करीता पाणी वापर संस्थांचे निकष लावू नका, जे पाणी अडविले जात आहे त्यासाठी तसेच पिण्याचे पाणी मिळण्यासाठी निधी द्यावा अशी मी मागणी करतो.

बाब क्र.284 मध्ये समावेश असलेल्या विविध वैद्यकीय यंत्रसामुग्री व साधनसामुग्री खरेदी करण्यासाठी तरतूद केलेली आहे. मुरुड येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात मी स्वत: जाऊन आलो आहे. शासनाने याबाबत कार्यवाही करण्याचे आश्वासनसुध्दा दिलेले आहे. मुरुड तसे मुंबईच्या जवळ आहे, आणि म्हटले तर ते दूर आहे. मुरुड व परीसरातील 25 गावांना एकच प्राथमिक आरोग्य केंद्र आहे, त्याची अवस्था अत्यंत वाईट आहे. येथील महिलांच्या आरोग्य संदर्भात आश्वासन दिलेले आहे. तेथील महिला डॉक्टरांना घेऊन आल्या नसत्या तर ही मुले दगावली असती. आपण आमची मागणी ऐकून घेतल्याबद्दल धन्यवाद.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रणजितसिंह मोहिते पाटील (सोलापूर स्थानिक प्राधिकारी संस्था) : बाब क्र.282, पान क्रमांक 208, सोलापूर येथील वैद्यकीय महाविद्यालयाची इमारत मोडकळीस आल्यामुळे बांधकामासाठी शासनाने 22.10.2003 रोजी प्रशासकीय मान्यता दिली आहे. 14 कोटीचे अंदाजपत्रक झालेले आहे, सदरहू इमारतीचे भुमीपूजन 7 जून 2006 रोजी झाले, 30 टक्के काम पूर्ण झालेले आहे. 8 कोटी 21 लाख 66 हजार रुपयांचे तरतूद अनुदान प्राप्त झालेले आहे. प्रशासकीय मान्यता आणि सरकारचे कामाचे अंदाजपत्रक यात एक वर्षाचा कालावधी गेल्यामुळे सुधारित अंदाजपत्रक 20 कोटीचे सादर केलेले आहे. सभापती महोदयांच्या माध्यमातून मी विनंती करत आहे की, जनतेच्या व विद्यार्थ्यांचा भावना लक्षात घेऊन उर्वरित रकमेस शासनाने मंजूरी द्यावी.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामनाथ मोते (कोकण विभाग शिक्षक) सभापती महोदया, पुरवणी मागण्यांच्या संदर्भात पान क्र.62 शालेय शिक्षण विभागाची बाब क्र.94 याबाबत मी बोलत आहे. या ठिकाणी महाराष्ट्रातील शैक्षणिक संस्थांना वेतनेत्तर अनुदान देण्यासाठी 90 कोटी 28 लाख रुपयांची तरतूद या ठिकाणी केलेली आहे, याबद्दल मी शासनाचे व शिक्षण मंत्र्यांचे मनापासून अभिनंदन करतो. त्यांनी वित्त विभागाने निर्माण केलेला अडथळा दूर करुन 90 कोटींची रक्कम मिळविली आहे. हे अनुदान संस्थांना देताना सर्वात जुन्या आणि प्रलंबीत अनुदान असलेल्या संस्थांना प्राधान्य देण्यात यावे अशा प्रकारची विनंती करणार आहे. काही संस्थांचे अनुदान देण्याबाबत शासनाकडे पूर्वी काही अधिकाऱ्यांनी वारंवार तक्रारी केल्या आहेत, वारंवार विनंती केली म्हणून काही विशिष्ट संस्थांचे अनुदान 8-10 वर्षांपासून शासनाने राखून ठेवले आहे. जळगाव येथील नुतन मराठी शिक्षण संस्था आहे. माननीय शिक्षण मंत्र्यांच्या दालनामध्ये याबाबत बैठक झाली, माननीय उच्च शिक्षण मंत्री यांनीही त्याबाबत आदेश दिलेले आहेत. सभापती महोदया, या संस्थेचे अनुदान रिलीज करण्यासाठी मी स्वत: या बाबत पत्र पाठविलेले आहे. मी मंत्री महोदयांना वारंवार विनंती करीत आहे. या संस्थेची एक शाळा पुरामध्ये वाहून गेलेली आहे.

..... यानंतर श्री.सोनवणे

अप्रधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रामनाथ मोते....

20 लाख रुपयांचे नुकसान झालेले आहे. गेल्या 10 वर्षापासून एक नया पैसा सुध्दा अनुदान दिलेले नाही. शाळेच्या संदर्भात कोर्ट मॅटर झालेले आहे. म्हणून 30 शाळांचे 3 ते 4 कोटींचे अनुदान रोखून धरलेले आहे ते प्राधान्याने देण्याची व्यवस्था व्हावी.

पान क्रमांक 62 बाब क्रमांक 95 या ठिकाणी 2003-2004 या वर्षामध्ये पायाभूत वाढीव पदे निर्माण झालेली आहेत. रुपये 51.72 लाखाची तरतूद केलेली आहे. 193 पदे आहेत. पूर्ण वेळची 138, अर्धवेळ 55 पदे आहेत त्यांच्या उर्वरित खर्चासाठी 3 महिन्यांचे वेतन मिळाले आहे. उर्वरित खर्चासाठी जवळजवळ 51 लाख 72 हजार रुपयाची पुरवणी मागणी या ठिकाणी केलेली आहे. हे सर्व शिक्षक 2003-2004 मध्ये नियुक्त झालेले आहेत. त्यांना शिक्षण सेवक म्हणून 3 वर्षे पूर्ण झ ाालेली आहेत. ती तरतूद 51.72 लाखाची केलेली आहे. ती शिक्षण सेवकाच्या धर्तीवर म्हणजे् शिक्षकाला 5 हजार आणि अर्धवेळ शिक्षकाला अडीच हजाराचे मानधन गृहीत धरुन तरतूद केलेली आहे. 3 वर्षापेक्षा अधिक कालावधी गेलेला आहे. साडेतीन ते पावणेचार वर्षे होत आहेत. त्यांना शिक्षण सेवक म्हणून मानधन न देता पूर्ण स्केलवर वेतन दिले पाहिजे. तरतूद मात्र मानधनाची केली आहे. शिक्षण सेवकाचा कालावधी पूर्ण झालेला आहे.

पृष्ठ क्रमांक 62, बाब क्रमांक 96 मध्ये 2004-2005 ची पदे आहेत. 318 पदांसाठी तरतूद केलेली आहे. 2003-2004 या दोन वर्षातील 58 पदे शासनाच्या चुकीने म्हणजे मिस इंटरप्रिटेशनने किंवा शासनाच्या निर्णयाचा वा परिपत्रकाचा चुकीचा अर्थ लावून शासकीय अधिकाऱ्यांनी 58 पदे रद्द केली या पदांना 2003-2004 च्या पायाभूत पदांप्रमाणे विचार होणे गरजेचे आहे.

पान क्रमांक 63 बाब क्रमांक 97 या ठिकाणी उच्च माध्यमिक शाळांना शालेय शिक्षण विभागाप्रमाणे जून 2004 पासून 6500 व 7225 ची वेतनश्रेणी देण्याच्या संदर्भात तरतूद केली आहे. उशीरा का होईना 5 वर्षांनी शासनाने ही तरतूद केलेली आहे. 8.45 कोटी रुपयाची तरतूद केलेली आहे त्यापैकी काही रक्कम भविष्यनिर्वाह निधीमध्ये जमा करण्यासाठी आणि काही रक्कम रोखीने देण्यासाठी ही तरतूद आहे. त्याबद्दल पुन्हा एकदा शासनाचे अभिनंदन करतो. त्यांनी मागील थकबाकी दिलेली आहे.

4F-2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रामनाथ मोते....

बाब क्रमांक 95 व 96 मध्ये जो शिक्षक अर्धपोटी काम करीत होता, शिक्षण सेवक म्हणून काम करीत होता त्यांना मात्र मान्यता देताना पूर्वलक्षी प्रभावाने दिलेली आहे. मात्र त्यांचे वेतन दिलेले नाही. संस्था चालकांनी वेतन द्यावे अशी अपेक्षा असून अनुदानित संस्थांमध्ये काम करणाऱ्या शिक्षकांप्रमाणे वेतन दिले जाणार नाही. सन 2003-2004 च्या 193 आणि सन 2004-2005 च्या 318 पदांचे चे 38 महिन्यांचे आणि 2004-2005 चे 28 महिन्यांचे वेतन शासनाने नाकारलेले आहे. पूर्वलक्षी प्रभावाने ग्राम विकास खात्यातील उच्च माध्यमिक शिक्षकांना वेतन दिले. त्याच नैसर्गिक न्याय तत्वावर या शिक्षकांना पूर्वीलक्षी प्रभावाने वेतन देणे आवश्यक आहे. याबाबती तरतूद केलेली याचा सुध्दा विचार होणे आवश्यक आहे.

बाब क्रमांक 98 पृष्ठ क्रमांक 63 या ठिकाणी माहिती आणि दळणवळण योजना या संदर्भात प्रशिक्षण देण्यासाठी शासनाने 13.40 कोटीची योजना सुरु केली आहे. या योजनेच्या माध्यमातून ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना संगणकीय शिक्षणाची सोय शासन करणार आहे. हा फार चांगला उपक्रम आहे त्याबद्दल मी शासनाचे अभिनंदन करतो.

यानंतर श्री. भोगले.....

अप्रधारित प्रत / प्रतिक्षेसाठी नाही

श्री.रामनाथ मोते....

ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना संगणकीय प्रशिक्षण देत असताना ज्या शाळा विनाअनुदान तत्वावर चालतात, खऱ्या अर्थाने तेथील विद्यार्थ्यांसाठी सोय उपलब्ध करुन दिली पाहिजे. अनुदानित शाळांमध्ये आमदार, खासदार निधीतून काही प्रमाणात संगणक मिळालेले आहेत. त्यांच्या प्रशिक्षणाची सोय आहे. विनाअनुदानित शाळांमध्ये कोणी मदत केलेली नाही. अनुदानित शाळांबरोबर विनाअनुदानित शाळांमध्ये शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना या योजनेचा लाभ होणे आवश्यक आहे. या संदर्भात शासनाने आपली भूमिका स्पष्ट करावी.

सभापती महोदया, बाब क्रमांक 101, पृष्ठ क्रमांक-64 वर शासनाने शारिरीक शिक्षण महाविद्यालयांसाठी 100 टक्के अनुदान देण्याकरीता रु.96.28 कोटीची पुरवणी मागणी सादर केली आहे त्याबद्दल धन्यवाद देतो. सन 2004-05 व 2005-06 ची थकबाकी देण्यासाठी पुन्हा एकदा पूर्वलक्षी प्रभावाने तरतूद केली आहे. या कारणासाठी शासन पूर्वलक्षी प्रभावाने तरतूद करु शकते. ग्रामविकास खात्याच्या उच्चमाध्यमिक शिक्षकांना नैसर्गिक न्याय तत्वानुसार पूर्वलक्षी प्रभावाने तरतूद करु शकते. परंतु पायाभूत शिक्षणातील 518 पदांना मान्यता देऊनही त्यांचे 30 महिन्याचे आणि 28 महिन्याचे वेतन न देऊन त्यांच्यावर अन्याय केलेला आहे. याबाबत शासनाने फेरविचार करावा. हे सर्व अनुदानित शाळातील शिक्षक आहेत.

सभापती महोदया, आदिवासी भागातील शाळा आहेत, ज्या तुकडयांना आणि शाळांना अनुदान दिले, अनेक ठिकाणी काही महिन्याचे वेतन दिले. या तुकडया अनुदानित आणि शाळा अनुदानित आहेत. त्यांना 2-3 महिन्याचे अनुदान दिले. पुन्हा बंद झाले. एकदा अनुदान सुरु केले, तुकडया आणि शाळा अनुदानावर आल्या की त्यामध्ये खंड पडता कामा नये. अन्यथा तीन महिने वेतन मिळते आणि सहा महिने प्रतिक्षा करावी लागते. अनेक शाळांना आणि तुकडयांना अनुदान सुरु झाले. 2-3 महिने ते मिळाले व पुढे मिळाले नाही. आदिवासी भागातील शाळा आहेत, तुकडया आहेत. या तुकडयांना अनुदान मिळणे अत्यंत आवश्यक आहे एवढे बोलून मी माझे विचार संपवितो. धन्यवाद.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदया, आपण प्रत्येक सन्माननीय सदस्याचे दोन ते पाच मिनिटे भाषण झाल्यानंतर बेल वाजविता, जेणेकरुन त्यांना वेळेची जाणीव झाली पाहिजे हे मी मान्य करतो. परंतु पुरवणी मागण्या हा एक असा विषय आहे,की त्यात सदनापुढे येणाऱ्या आणि सरकारच्या वतीने चालणाऱ्या कारभाराचे त्यामध्ये दिग्दर्शन असते. सन्माननीय सदस्यांना त्यांचे मुद्दे मांडण्यासाठी काही वेळ निश्चित आवश्यक आहे. या सदनाच्या कामकाजासाठी काही नियम, तरतुदी केलेल्या आहेत. सर्व विषय आपल्याला मांडता येतात, सदस्य आपापल्या भागातील बाबींसंबंधी बोलू शकतात. सदस्यांनी त्यांचे विचार मांडल्यानंतर मंत्रीमहोदय उत्तर देतात आणि पुरवणी मागणी मंजूर करावी अशी विनंती करतात व मागण्या मंजूर होतात. मागण्या मंजूर झ ाल्यानंतर विनियोजन विधेयक येते आणि मंजूर होते. सभागृहाबाहेर गेल्यानंतर मंत्रीमहोदयांचा अविर्भाव असा असतो की, आम्ही सुटलो. सन्माननीय सदस्यांच्या हक्काचे आपण रक्षण केले पाहिजे. सरकारचा चेहरा दाखविण्यासाठी सन्माननीय सदस्यांना आपण मदत केली पाहिजे.

तालिका सभापती (श्रीमती सुधा जोशी) : पुरवणी मागण्या अतिशय महत्वाच्या आहेत याची मला पूर्ण कल्पना आहे. मी जेव्हा बेल वाजविते त्यामधून सूचना अशी असते की, सन्माननीय सदस्यांनी आपले मुद्दे थोडक्यात आटोपते घ्यावेत. परंतु बेल वाजविल्यानंतर देखील सन्माननीय सदस्य 2-4 मिनिटे बोलत असतात.

श्री.दिवाकर रावते : सन्माननीय सदस्य श्री.मधुकर चव्हाण यांनी मांडलेला भ्रष्टाचाराचा मुद्दा अतिशय भयानक आहे.

तालिका सभापती : त्याला मंत्रीमहोदय उत्तर देतील. मी कोणत्याही सन्माननीय सदस्यांला थांबविलेले नाही. परंतु वॉर्निंग देणे आवश्यक असते. अन्यथा सभागृहातूनच सांगण्यात येते की, शेवटी जे सन्माननीय सदस्य बोलण्यासाठी उभे राहतात त्यांच्यावर अन्याय होतो. त्यामुळे प्रत्येक सन्माननीय सदस्याने वेळेने भान ठेवले तर अतिशय चांगले होईल, त्यादृष्टीने विचार करावा.

(नंतर श्री.जुन्नरे..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती फौजिया खान (नामनियुक्त): सभापति महोदय, मैं माननीय सदस्य श्री रावते जी की बात से सहमत हूं. मैं भी यही कहना चाहती हूं कि पूरक मांगों पर माननीय सदस्यों द्वारा रखे गए मुद्दों के बारे में उत्तर देते समय गंभीरता बरती जानी चाहिए, क्योंकि उत्तर देते समय माननीय मंत्रियों की तरफ से बहुत उजलत होती है.

सभापति महोदया, मैं बाब क्रमांक 33 के अन्तर्गत यह कहना चाहती हूं कि होम गार्ड के ड्रेस के लिए करीब 5 करोड़ रुपये की तरतूद की गई है. यह तरतूद जरुरी है. लेकिन इसके साथ ही साथ उनको मानधन देने के बारे में विचार किया जाना चाहिए. क्योंकि सरकार को होम गार्ड की आवश्यकता है. उनके साथ यूज एंड थ्रो वानी नीति नहीं अपनाई जानी चहिए. इसलिए होम गार्ड को मानधन देने के बारे में विचार किया जाना चाहिए.

सभापति महोदया, परभणी में जो पुलिस कर्मचारियों के निवास स्थान है, उनकी हालत बहुत खराब है. उनके निवास स्थान की मरम्मत करना बहुत ही आवश्यक है. उसी प्रकार से उनके निवास स्थान में बिजली, पानी की पर्याप्त सुविधा नहीं है. इसलिए सरकार इस तरफ ध्यान दें.

सभापति महोदया, बाब क्रमांक 30 के अन्तर्गत मैं यह कहना चाहती हूं कि सायबर क्राईम को देखते हुए सायबर क्राईम को रोकने हेतु सायबर क्राईम मुख्यालय बनाने का निर्णय लिया गया था लेकिन उस पर अब तक अमल नहीं हुआ है. इसलिए सायबर क्राईम मुख्यालय बनाने के बारे में ध्यान दिया जाए. दूसरी बात यह है कि परभणी में महिला पुलिस स्टेशन स्थापित किया जाए.

सभापति महोदया, जल सम्पदा विभाग के अन्तर्गत मैं यह कहना चाहती हूं कि लोअर दूधना प्रकल्प का काम जिस गति से चल रहा है, वह देखकर ऐसा लगता है कि इस प्रकल्प का काम 10 साल में भी पूरा नहीं होगा. इसलिए मेरा यह अनुरोध है कि इस प्रकल्प के काम को प्रधानता दी जाए.

सभापति महोदया, सार्वजनिक बांधकाम विभाग के अन्तर्गत मैं बाब क्रमांक 116 के अन्तर्गत नेशनल हाईवे क्रमांक 222 के बारे में यह कहना चाहती हूं कि यह हाईवे परभणी शहर में से जाने वाला है. उसी प्रकार से एमआयडीसी क्षेत्र में दूसरे हाईवे की योजना भी प्रस्तावित है

...2

श्रीमती फौजिया खान....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

यह देखते हुए परभणी के नागरिकों की मांग है कि नेशनल हाईवे को परभणी शहर में से न ले जाए, क्योंकि परभणी शहर में से यह रास्ता बनाते समय वहां की इमारतें तोड़ी जाएगी. इसलिए इस बारे में सरकार ध्यान दें, ऐसा मैं अनुरोध करती हूं.

सभापति महोदय, रोजगार, स्वयं रोजगार के लिए पिछड़े वर्ग एवं सुशिक्षित बेकारों के लिए योजना हेतु 26 लाख रुपये की तरतूद की गई है. लेकिन यह तरतूद पर्याप्त नहीं है. इतनी कम तरतूद से उद्देश्य सफल नहीं होगा. इसलिए तरतूद बढ़ाने की आवश्यकता है. इस योजना में अल्पसंख्यक समाज को भी शामिल करना चाहिए. इस संबंध में सच्चर कमेटी की रिपोर्ट आई है. सच्चर कमेटी की सिफारिशों को ध्यान में रखते हुए राष्ट्रीय नीति बनाई जानी है. लेकिन मैं इस संबंध में यह कहना चाहती हूं कि मौलाना आजाद विकास महामंडल के पास 40 करोड़ रुपये उपलब्ध है लेकिन जाचक अटी की वजह से एक भी लाभार्थी को 40 करोड़ रुपये में से एक भी पैसा नहीं मिल रहा है. इसलिए मेरा अनुरोध है कि इस तरफ भी सरकार ध्यान दें. आज अल्पसंख्यक समाज की आबादी 16 प्रतिशत है, इसलिए इस दिशा में भी विचार करना चाहिए. सभापति महोदय, उर्दू आंगनवाड़ी शुरु करने के बारे में मैंने एक तारांकित प्रश्न दिया था. इस संबंध में सरकार की तरफ से यह उत्तर मिला है कि, भाषा के अनुसार आंगनवाड़ी नहीं दी जा सकती है. मैं सरकार से पूछना चाहती कि भाषा में 4 स्तर होते हैं. लिसनिंग, स्पीकिंग, रीडिंग और राईटिंग. जब आप रीडिंग और राईटिंग को ही शिक्षा कहेंगे और लिसनिंग और स्पीकिंग को को शिक्षा नहीं कहेंगे तो क्या उसके महत्व को नकारेंगे ? शिक्षा शास्त्रियों का मत है कि बच्चों को मातृभाषा में ही शिक्षा दी जानी चाहिए. इस नाते मैं यह समझती हूं कि उर्दू आंगनवाडी की मांग जायज़ है. इसलिए सरकार इस बारे में पुनर्विचार करें. दूसरी बात यह है कि उर्दू माध्यम के स्कूलों के सिलसिले में परमानेंट नो ग्रांट की नीति बदली जानी चाहिए. इसलिए मेरी यह मांग है कि पिछड़े वर्ग एवं अल्पसंख्यक समुदाय के बच्चों का विचार करते हुए परमानेंट नो ग्रांट की नीति बदली जानी चाहिए.

सभापति महोदया, स्टेडियम के लिए 50 करोड़ रुपये की तरतूद की गई है. मैं यह पूछना चाहती हूं कि परभणी में स्टेडियम बनाने के लिए इस वर्ष कितनी धनराशि का प्रावधान किया गया है ?

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सभापति महोदया, सार्वजनिक आरोग्य विभाग के अन्तर्गत मैं यह बताना चाहती हूं कि परभणी में स्थापित महिला अस्पताल के लिए 82 पद मंजूर किए गए हैं, जिनमें से 11 पद भरे गए हैं. लेकिन इन 11 कर्मचारियों को पिछले 6 महीने से वेतन नहीं मिला है. इसलिए मेरा अनुरोध है कि सरकार इस तरफ ध्यान दें.

सभापति महोदया, कृषि विभाग के अन्तर्गत मैं यह कहना चाहती हूं कि हम यहां पर किसानों की आत्म हत्या की घटनाओं की चर्चा करते हैं और किसान आत्म हत्या न करें इसलिए उपाय खोजने की कोशिश कर रहे हैं. सरकार इस समस्या के प्रति बहुत चिन्तित और गंभीर है.मैं इस संबंध में यह कहना चाहती हूं कि हमारे राज्य के कृषि कॉलेजों से हर साल कई विद्यार्थी कृषि स्नातक हो कर निकलते हैं, इन कृषि स्नातकों का इस्तेमाल किसानों का प्रबोधन करने के लिए किया जाए. ये कृषि स्नातक हमारे किसानों को आधुनिक कृषि पध्दति की जानकारी दे सकेंगें. जिस तरह से मेडिकल एज्युकेशन के अन्तर्गत एमबीबीएस होने के बाद प्रत्येक डॉक्टर को इन्टरशिप करनी पड़ती है, उसी तरह से प्रत्येक कृषि स्नातक का भी इस्तेमाल किया जाए. ये कृषि स्नातक 4-5 गांवों को एडाप्ट करें और वहां के किसानों को आधुनिक कृषि पध्दति की जानकारी दें. कृषि को एक उद्योग की तरह करने के लिए कृषि स्नातकों के ज्ञान का फायदा उठाएं तो मेरे ख्याल से यह बहुत फायदेमंद होगा. इसलिए सरकार यूजीसी को इस प्रकार की सिफारिश करें कि कृषि स्नातकों के ज्ञान का फायदा किसानों को हो सके, इसलिए किसानों के प्रबोधन के लिए कृषि स्नातकों का उपयोग करने हेतु विचार किया जाए. इतना कहते हुए मैं अपना भाषण समाप्त करती हूं.

.....

इसके बाद श्रीमती गो-हे का भाषण.

अधीरित पत्र / प्रतिक्षिप्त नहीं

डॉ.नीलम गोऱ्हे (महाराष्ट्र विधानसभा सदस्यांद्वारा निर्वाचित) : सभापती महोदया, आम्हाला जिल्ह्यांचे प्रश्न मांडावे लागतात, महिलांचे प्रश्न मांडावे लागतात, वैद्यकीय प्रश्न मांडावे लागतात, जे विषय कोणी मांडत नाहीत असे विषय देखील आम्हाला मांडावे लागतात. तेव्हा माझी आपणास विनंती आहे की, आपण आम्हाला थोडा वेळ वाढवून द्यावा.

बाब क्रमांक 134 व 135 पृष्ठ क्रमांक पृष्ठ क्रमांक 91- सार्वजनिक बांधकाम विभाग वैद्यकीय सेवा व सार्वजनिक आरोग्य - या दोन्ही बाबींमध्ये इस्पितळे बांधण्याची तरतूद करण्यात आलेली आहे. वेगवेगळ्या जिल्ह्यांसाठी ही तरतूद करण्यात आलेली आहे. त्याबद्दल मी शासनाचे अभिनंदन करते.

सभापती महोदया, काल मी यवतमाळ जिल्ह्यातील वणी येथे गेले होते. त्याठिकाणी मला दिसून आले की, इस्पितळाच्या इमारतीस जोडून एक धर्मशाळा उभारण्यात आलेली आहे. तेथे रुग्णांच्या नातेवाईकांची राहण्याची सोय केली जाते. मला ही व्यवस्था अतिशय चांगली वाटली. अशाप्रकारची व्यवस्था इतर जिल्ह्यांमध्ये असेल असे वाटत नाही. पश्चिम महाराष्ट्रात सुध्दा अशी व्यवस्था दिसली नाही. तेव्हा माझी शासनाला विनंती आहे की, ज्या इस्पितळांत लांबून रुग्ण येतात त्यांच्या नातेवाईकांसाठी अशाप्रकारची इस्पितळाला जोडून धर्मशाळा बांधण्यात यावी. विशेषत:दुर्गम भागांमध्ये अशी व्यवस्था केल्यास रुग्णांच्या नातेवाईकांची राहण्याची गैरसोय होते ती होणार नाही. त्यादृष्टीने सार्वजनिक बांधकाम विभागाने विचार करावा अशी विनंती आहे.

दुसरा मुद्दा कृषि उत्पन्न बाजार समिती संदर्भात आहे. मी वणी येथे गेले होते त्यावेळी आढळून आले की, कापूस केंद्रावर शेतकऱ्यांसाठी पिण्याच्या पाण्याची व्यवस्था नव्हती, स्वच्छतागृहे नव्हती. तेव्हा अशाप्रकारची व्यवस्था करण्याची जबाबदारी कृषि उत्पन्न बाजार समितीची आहे की सार्वजनिक बांधकाम विभागाची आहे हे स्पष्ट करावे.

बाब क्रमांक 148- पृष्ठ क्रमांक 102- मत्स्यव्यवसाय विभाग - समुद्र किनारी चौथरे बांधण्यासाठी तरतूद करण्यात आलेली आहे. सन्माननीय सदस्या श्रीमती मंदा म्हात्रे यांनी मला एक व्यथा सांगितली. ते या सभागृहात नाहीत. त्यांनी आमदार निधीतून एकेठिकाणी चौथरा बांधण्याची परवानगी घेतली होती. सार्वजनिक बांधकाम विभाग आणि वित्त विभाग यांच्या कात्रीत ते काम अडकल्यामुळे त्या कामाची प्रतिपूर्ती करता आलेली नाही. याबाबत सार्वजनिक बांधकाम विभागाने स्पष्टता करावी.

यानंतर श्री.पुरी....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नीलम गोऱ्हे...

सभापती महोदय, बाब क्रमांक 180 यामध्ये सरदार सरोवरच्या प्रकल्पांची खूप मोठी सोय केलेली आहे, परंतु ही सोय अत्यल्प आहे. मला याबाबतीत जलसंपदा मंत्र्यांचे लक्ष वेधावयाचे आहे की, पुणे जिल्हयातील प्रकल्पग्रस्तांसाठी चासकमान कामासाठी तेथील धनणग्रस्तांची मागणी आहे. त्यांनी पर्यायी जमिनीच्या 65 टक्के रक्कम भरावयाची व त्यावर व्याज भरावयाचे. याबाबतीतील निवेदनामध्ये त्यांनी म्हटले आहे की, एक वर्षामध्ये जर या रक्कमेची प्रतिपूर्ती केली नाही त्यावर व्याज भरावे लागणार. याबाबतीतील एक वर्षांचा जो कालावधी आहे तो आपण वाढवावा व या राजगुरु नगरमधील (ता.खेड) येथील शेतकऱ्यांना न्याय द्यावा. तसेच त्यांच्या व्याजमाफीसंबंधीही आपण पुनर्विचार करावा, अशी माझी विनंती आहे.

सभापती महोदय, मी गृह विभागावर बोलणार आहे. गृह विभागाने समुपदेशनच्या न्यायधारणासाठी काही खर्च केलेला आहे, ही अतिशय कौतुकास्पद गोष्ट आहे. समुदपदेशक हे सरकारी अभियोक्त्याचे वाचन करणार आहेत. याबाबतीत आपण त्यांना अपडेट ठेवण्याचा प्रयत्न करीत आहात, हे चांगले आहे. गृह विभागासाठी मांढरदेवी येथील राजन कोचर समितीसाठी तरतूद केली असून ही बाब चांगली आहे. गृह विभागाच्या बाब क्रमांक 41 च्या बाबतीत गृहनिर्माण कल्याण महामंडळासाठी आपण स्वतंत्र तरतूद केली आहे, परंतु त्याठिकाणी पोलिसांसाठी घरे ही फारच तोकडी आहेत. आज आम्हाला जे शेकडो पोलीस भेटतात ते हेच सांगत असतात की, आम्हाला घरांची सोय नाही. एकतर बरेचशे पोलीस हे बरेच लांब राहत असतात. याच विभागामार्फत सेंटर फॉर पोलीस रिसर्चसाठी निधी उपलब्ध करुन दिलेला आहे. सेंटर फॉर पोलीस रिसर्चची फार चांगली इमारत उभी आहे. परंतु त्याठिकाणच्या कॅन्टीनचे कंत्राट खाजगी कंत्राटदाराला दिले असून तो दुसरा तिसरा कोणी नसून एका उच्च पदस्थ पोलीस अधिकाऱ्याचे चिरंजीव आहे. परंतु त्याठिकाणी जेवणाची सोय होत नाही तर त्याठिकाणी ड्रिंकची वगैरे सोय होते, त्यामुळे याबाबतीत माझी मागणी आहे की, आपण याबाबतीत खऱ्याअर्थाने सेंटर फॉर पोलीस रिसर्च करण्याच्या दृष्टीने लक्ष देण्याची आवश्यकता आहे. याबाबतीत माननीय मंत्रिमहोदयांनी या सेंटरला भेट देऊन ते सेंटर व्यवस्थित चालविण्याच्या दृष्टीने पहावे व त्याप्रमाणे आपण अनुदान उपलब्ध करुन द्यावे.

..2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नीलम गोऱ्हे...

सभापती महोदय, बाब क्रमांक 380-पणन रोजगार हमी योजना, संसदीय कार्य आणि महिला बालकल्याण या विषयावर मी बोलणार आहे. यासंदर्भात फारच निराशाजनक बाबी आहेत. महाराष्ट्रामध्ये 26 ऑक्टोबर रोजी कौटोंबिक संरक्षक कायदा लागू झाला. या कायद्यानुसार सर्व जिल्हयामध्ये संरक्षक अधिकारी नेमण्याच्या दृष्टीने व निधीच्या बाबतीत कुठल्याही प्रकारचा उल्लेख यामध्ये नाही. संरक्षक अधिकाऱ्यांसाठीची तरतूद महिला व बालकल्याण विभाग करणार नसेल तर कोण करणार आहे ? ती तरतूद कोणता विभाग करणार आहे ? हे स्पष्ट व्हावे. यासाठी पुरेशी तरतूद पुढच्यावेळी मागण्यांमध्ये करावी, अशी माझी मागणी आहे. आपण बाब क्रमांक 340 नुसार पश्चिम विदर्भातील शेतकऱ्यांना कर्जमाफीचे पॅकेज दिलेले आहे, ही गोष्ट चांगली आहे. आश्चर्य म्हणजे, माननीय पंतप्रधानांनी पश्चिम विदर्भाचा उल्लेख केला, परंतु आपण पूर्व विदर्भाला विसणार आहात का ?

नंतर श्री.रोझेकर...

अप्रधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

तेंव्हा तेच पॅकेज राज्यातील खान्देश किंवा मराठवाडयासारख्या भागांना राज्य शासन स्वत:च्या निधीतून करु शकणार नाही काय ? यासंबंधी विचार झाला पाहिजे. पश्चिम विदर्भालाही पुरेसा निधी मिळालेला नाही, पूर्व विदर्भ आणि मराठवाडयासारखा अविकसित भाग आहे त्यांना देखील कर्जमाफी आणि व्याजमाफी मिळाली पाहिजे.

सभापती महोदया, सहकार, पुनर्वसन आणि मदतकार्य यासंदर्भातील पुरवणी मागणीमध्ये व्याजाची रक्कम माफ केली आहे. किती दिवसात याची प्रतिपूर्ती होणार आहे ?

सभापती महोदया, वस्त्रोद्योग विभागाच्या बाब क्रमांक 344 अंतर्गत खादी ग्रामोद्योग महामंडळासाठी तरतूद करण्यात आली आहे, ही चांगली गोष्ट आहे. 2 कोटी 50 लाख रुपयांचा थकित निधी देण्यात आलेला आहे, अर्थसहाय्य केलेले आहे. मला वस्त्रोद्योग मंत्र्यांच्या लक्षात आणून द्यावयाचे आहे की, खादी ग्रामोद्योग महामंडळाची दुकाने शहरातील जुन्या भागामध्ये आहेत. आपल्याला आवडो किंवा न आवडो आता सगळया शहरांमध्ये मॉल संस्कृती आलेली आहे, विविध महानगरपालिकांनी शॉपिंग कॉम्प्लेक्स उभारले आहेत, अशा ठिकाणी खादी ग्रामोद्योग महामंडळाची दुकाने काढली तर त्यांच्या वस्तुंना चांगले मार्केट मिळू शंकेल, विक्री होऊ शकेल. जी जुनी दुकाने आहेत ती नवीन भागामध्ये आणली तर जो यंग कस्टमर आहे तो या दुकानांमध्ये येऊ शकेल.

सभापती महोदया, आदिवासी विकास विभागाच्या बाब क्रमांक 292 व 336 मध्ये इमारती, साठवण तलाव यासंबंधामध्ये व्यवस्था करण्यात आली आहे. सभापती महोदया आपण महिलांचे हक्क व कल्याण समितीच्या सदस्या आहात, आपण आश्रमशाळांची स्थिती पाहिली आहे. मला मंत्रीमहोदयांचे लक्ष या बाबीकडे वेधावयाचे आहे की, या आश्रमशाळांमध्ये स्वच्छता गृहांसाठी निधीच दिला जात नाही. बाकी सर्व विकास आपण करतो मात्र स्वच्छतागृहांची व्यवस्था होत नाही. मुलींच्या आश्रमशाळांमध्ये बाथरुमची सोय झालेली नाही. आपण काही आश्रमशाळांचे चित्र पाहिले तर आपल्याला असे दिसून येईल की, त्यांनी त्यांच्या अतिरिक्त जागेवर भाजीपाला आणि फळबागा लावल्या आहेत. जेणेकरुन भाजीपाला ठेकेदारावर अवलंबून रहावे लागू नये. त्यामुळे आदिवासी विभागाने आणि सार्वजनिक बांधकाम विभागाने या बाबीकडे लक्ष देऊन आश्रमशाळांमध्ये भाजीपाला व फळबागा लावण्याबाबत कार्यवाही केली पाहिजे.

...2.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नीलम गो-हे.....

सभापती महोदया, सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण यामध्ये यवतमाळ जिल्हा रुग्णालयामध्ये 200 परिचारिकांची पदे रिक्त आहेत त्याचप्रमाणे 200 रेसिडेंट डॉक्टरांच्या जागा रिक्त आहेत. याकडे देखील मंत्रीमहोदयांनी लक्ष द्यावे. नागपूर रुग्णालयासंबंधी एक बातमी प्रसिध्द झालेली आहे. एका शासकीय रुग्णालयातील छोटे बाळ कुत्र्याने 4 महिन्यापूर्वी पळविले आणि त्याबाबत डॉक्टरांवर कारवाई करण्यात आलेली आहे.

श्री.रणजित कांबळे : सभापती महोदया, यवतमाळ व नागपूर रुग्णालयात डिनची पोस्ट आहे. त्यामुळे हा विषय मेडिकल एज्युकेशन विभागांतर्गत येतो आणि आज या विभागाच्या पुरवणी मागण्या नाहीत.

डॉ.नीलम गो-हे : सभापती महोदया, आरोग्य विभागाच्या बाब क्रमांक 274 नुसार मंचर येथे ट्रामा केअर युनिट दिलेले आहे, त्याबद्दल मी आभार मानते. त्या ठिकाणी अद्ययावत प्रसुतीविषयक सुविधा उपलब्ध झाली पाहिजे. मंचर येथील स्थानिकांची मागणी आहे, याचा विचार देखील शासनाने करावा.

सभापती महोदया, शालेय शिक्षण, क्रीडा व युवक कल्याण या विभागाच्या मागण्यांसंबंधी मला असे सांगावयाचे आहे की, सन 2008 मध्ये राष्ट्रकुल युवा खेळासाठी क्रीडा संकुलाची व्यवस्था करण्यात आलेली आहे. परंतु, एकदा हे खेळ संपन्न झाले की, मग या वास्तुचे व्यवस्थापन कोण करणार ? असा प्रश्न उभा राहतो. बालेवाडी येथे 34 मुलींना विषबाधा झाली. आपण निधीची तरतूद केली ही चांगली गोष्ट आहे त्याशिवाय शहराचा विकास होऊ शकत नाही. परंतु, या वास्तुंचे व्यवस्थापन करणारी एखादी यंत्रणा तयार केली पाहिजे, जेणेकरुन या प्रॉपर्टीवर त्यांची देखरेख राहिल व या वास्तुंमध्ये कुत्र्यांचे साम्राज्य येणार नाही.

यानंतर श्री.बोरले.....

अनुधावित पत्र / प्रतिक्षेपार्थ नोंद

डॉ.नीलम गो-हे .....

सभापती महोदय, माझा शेवटचा मुद्दा असा आहे की, अंजली भागवत आणि तेजस्विनी सावंत या दोन नेमबाज महिलांनी तक्रार केली होती. त्यांची अडचण अशी आहे की, त्यांना साधनसामुग्रीसाठी परवानगी आणि निधीची तरतूद होत नाही. माननीय क्रीडा मंत्र्यांनी आश्वासन दिले होते की, त्यांच्या बरोबर बैठक घेऊ आणि त्यांच्या तक्रारींचे निवारण करु. ती बैठक झाली असेल तर त्यासंदर्भात माहिती देण्यात यावी, एवढे बोलून मी माझे दोन शब्द संपवितेे.

...2/-

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.चंद्रकांत रघुवंशी (धुळे तथा नंदुरबार स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, पृष्ठ क्र.232, बाब क्रमांक 300 आदिवासी विकास विभाग. नगरपरिषदांसाठी अत्यल्प तरतूद करण्यात आली आहे. महाराष्ट्रामध्ये आदिवासी विभागाकडून 12 नगरपरिषदांचा समावेश आदिवासी उपयोजना क्षेत्रामध्ये करण्यात आलेला आहे. फक्त 2 लाख 86 हजार रुपयांच्या तरतुदीतून 12 नगरपरिषदांचा विकास कसा काय होईल ? यासाठी जास्तीत जास्त निधी उपलब्ध करुन द्यावा, अशी मी विनंती करतो.

पृष्ठ क्र.252, बाब क्र.336 सहकारी संस्थांचे समभाग खरेदी करण्याकरिता आदिवासींना व्याजकुक्त कर्जे. यासाठी अकोला येथील साखर कारखान्याला रक्कम देण्यात येत आहे. नंदुरबार येथे पुष्प दंतेश्वर सहकारी साखर कारखाना आहे. त्या कारखान्याचा प्रस्ताव शासनाकडे मागच्या 3 वर्षापासून पेंडींग आहे. 87 लाख शेतक-यांच्या समभाग खरेदीसाठी लागणारी जी रक्कम आहे, ती दिली जात नाही. माननीय मंत्री महोदय डॉ.विजयकुमार गावित यांनी त्या कारखान्याला आश्वासन दिले होते. त्या आश्वासनाची पुर्तता झाली पाहिजे. ती रक्कम तात्काळ उपब्ध करुन द्यावी, अशी मी विनंती करतो. एका गोष्टीबद्दल मला शासनाचे आणि आदिवासी विकास विभागाचे आभार मानले पाहिजेत.

पृष्ठ क्र.250, बाब क्र.334 मार्ग व पूल यांवरील भांडवली खर्च. नंदुरबार येथील रस्ते विकास प्रकल्प दीड वर्षापासून बंद पडला होता. त्या प्रकल्पाचे काम अपूर्ण होते. त्यासाठी निधी उपलब्ध करुन दिला त्याबद्दल आपले आणि लोकशाही आघाडी शासनाचे मी आभार मानतो.

पृष्ठ क्र.281, बाब क्रमांक 385, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग. सभापती महोदय, अडचण अशी आहे की, नंदुरबार जिल्हा आदिवासी आणि बिगर आदिवासी विभागामध्ये विभागाला गेला आहे. 65 टक्के लोकसंख्या आदिवासी बांधवांची आहे आणि 35 टक्के लोकसंख्या बिगर आदिवासी बांधवांची आहे. आदिवासी भागाच्या पाणी पुरवठयासाठी नंदुरबार जिल्हापरिषदेकडे पैसे आहेत. परंतु शासनाने जिल्हा परिषदेला पाणी पुरवठयासाठी एक रुपयाचा सुध्दा निधी दिलेला नाही. असंख्य गावांना पाण्याची टंचाई असतांना ग्रामसभेच्या पाणी पुरवठा समितीचा प्रस्ताव जिल्हा परिषदेकडे प्रलंबित आहे. नंदुरबार जिल्हा परिषदेला या योजनेसाठी निधी उपलब्ध करुन द्यावा, अशी मी विनंती करतो आणि माझे दोन शब्द संपवितो.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.नितीन गडकरी (नागपूर विभाग पदवीधर) : सभापती महोदय, पुरवणी मागण्यांच्या संदर्भात मी एका गंभीर विषयाकडे आपले लक्ष वेधू इच्छितो. खरे म्हणजे बजेटच्या वेळी ज्यांच्या खर्चाचा अंदाज मूळ अर्थसंकल्पात आला नाही, त्यासाठी पुरवणी मागण्या येत असतात. मागच्या 3 वर्षापासून जे सुरु आहे ते विधिमंडळाचा अवमान करणारे आहे. सन 2003-04 मध्ये 19,781.90 लाखाच्या पुरवणी मागण्या सादर झाल्या होत्या. त्या मागण्या एकूण बजेटच्या 23 टक्के होत्या. सन 2004-05 व 2005-06 मध्ये अनुक्रमे 25,260.42 लाखाच्या पुरवणी मागण्या सादर झाल्या होत्या. त्या मागण्या एकूण बजेटच्या 25.28 टक्के होत्या.

यानंतर श्री.सुंबरे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. गडकरी ....

हे जे प्रमाण आहे ते चुकीचे आहे. मला तर अशी भीती वाटते की, पुढील वेळेस तुम्ही 5 हजाराचेच बजेट कराल आणि 40-50 लाखाच्या रकमा पुरवणी मागण्यांद्वारा काढून घ्याल. म्हणजे विदर्भ, मराठवाडा आणि कोकणाला मूर्ख बनविण्याचा हा तुमचा धंदा आहे. कॉंटिजन्सी फंडातून केव्हा आणि किती रक्कम घ्यायची याला देखील काही नियम आहेत पण ते काहीही न मानता तुम्ही निर्णय घेऊन टाकता आणि पुरवणी मागण्यांमधूनच मोठ्या रकमा काढता. जे या विधीमंडळाला विश्वासात घेऊन करायचे, त्यासाठी मंजुरी घ्यायची., ते न करता हे तुम्ही सारे नियमबाह्य आणि घटनाबाह्य असेच वर्तन करीत आहात. म्हणून या निमित्ताने मी माननीय अर्थमंत्र्यांना विनंती करीन की, जेवणामध्ये ज्याप्रमाणे आपण मिरचीचा ठेचा चवीसाठी म्हणून वापरतो त्याप्रमाणे आपण पुरवणी मागण्यामधून रकमा घ्यायच्या असतात. पण तुम्ही कॉंटिजन्सी फंडातूनच मोठ्या मोठ्या रकमा अगदी नियमित खर्चासाठी देखील काढून घेता हे बराबर नाही. हा गळा कापण्याचा धंदा बंद करा अशी माझी आपल्याला सूचना आहे, विनंती आहे. सभापती महोदय, या पुरवणी मागण्यामधून नेमक्या पाटबंधारे खात्याच्या आणि काही ठराविक खात्यांच्यासाठीच रकमा मागितल्या जातात. तेव्हा आज या निमित्ताने आपण या सभागृहाला आश्वासन द्यावे की, पुढील वर्षापासून असे होणार नाही. बजेटमध्येच पूर्ण रक्कम आपण मागून घ्या, पूर्ण रकमेचे बजेट बनवा, अनुशेष भरून काढण्यासाठीच्या नियमांचे पालन करा. पण तुम्ही आज तरी तसे करीत नाही आणि सारे पैसे कॉंटिजन्सीतूनच घेता आणि मग ज्याच्यामध्ये दम असेल त्याने त्यातून आपला हिस्सा वाढवून घ्यायचा हे बरोबर नाही. तुम्ही यातून मागासलेल्या भागांचा विश्वासघात करीत आहात. तेव्हा पुढील वेळेस तरी आपण असे करू नका.

सभापती महोदया, आमच्या सरकारपासून सुरू असणारी जीवनदाई योजना आहे त्या योजनेबाबत या निमित्ताने मी आपल्याला विशेष रूपाने विनंती करणार आहे. या योजनेत दीड लाख रूपये खात्याला मंजूर झालेले आहेत. मी या याजनेसंबंधात संचालकांना पत्र लिहिले होते. तुम्ही दीड लाख रूपये देता पण त्यातील 40-50 लाख रूपयेच प्रत्यक्षात मंजूर होतात. तुमचा आरोग्य विभाग म्हणजे फार गंभीर प्रकार आहे. जे नियमाप्रमाणे काम करतात त्यांचीच बिले रिजेक्ट करतात. यामध्ये ऑपरेशनवर वगैरे खर्च किती द्यायचा हे लिहिले आहे. जे आपले चांगले डॉक्टर्स आहेत ते यातून पैसे मंजूर करताना म्हणतात की, मी खोटे काही लिहिणार नाही. त्यामुळे व्हॉल्व्ह

..... 4एम 2 ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. गडकरी .....

बदलण्याची वगैरे जी ऑपरेशन्स होतात त्यामध्ये फार कमी रक्कमा मंजूर होतात. माझी आपणास विनंती आहे की, एखेाद्या ऑपरेशनसाठी किती रक्कम आहे ते सांगा. त्यामध्ये निकष कशासाठी लावता ? औषधावर किती रक्कम द्यायची याची रक्कम ठरवून द्या. पण तसे होत नसल्याने अनेक गरीब लोकांच्या ऑपरेशन्स होण्यामध्ये अडचण येते. त्यामुळे तुम्ही मदत करता पण तुमच्याच नियमांमुळे ती मदत त्या गरीब माणसाला मिळत नाही. म्हणून याबाबत तुम्ही आता निर्णय घ्यावा. सन्माननीय सदस्य प्रा. कवाडे यांना मी सांगू इच्छितो की, गेली सात वर्षे मी या योजनेमध्ये रिलिजिअसरी काम करीत आहे. महाराष्ट्र सरकारची ही एक अतिशय चांगली योजना आहे आणि यातून आतापर्यंत मी 527 लोकांना ऑपरेशन्स करण्यासाठी मदत मिळवून दिली आहे आणि त्यातील 250-260 कलोक दलित असून ते सारे भंडारा, चंद्रपूर भागातील आहेत. ही एक खूप सुंदर योजना आहे आणि यातून खूप गरीब लोकांचे प्राण वाचविले आहेत व यापुढेही आपण वाचवू शतो म्हणून आपण यामध्ये अधिक इंटरेस्ट घ्यावा. या योजनेमध्ये आपण आता बाय-पास शस्त्रक्रियेबरोबरच कॅन्सर देखील आणलेला आहे. ही अतिशय चांगली योजना असल्याने या योजनेचा आपण रिव्ह्यू घ्यावा आणि आपल्या मंत्रालयात जे कोणी झारीतील शुक्राचार्य बसलेले आहेत त्यांच्यापासून काळजी घ्या. एकदा सांगितले की, क्रॉसचेकने रक्कम लाभार्थींना मिळाली पाहिजे. तेव्हा याबाबत आपण अधिक काळजी घ्यावी अशी माझी आपल्याला विनंती आहे.

सभापती महोदया, 6 जिल्ह्यातील शेतकऱ्यांची पीक कर्जे माफ करण्याची तरतूद यात दाखविली आहे. त्यामध्ये केंद्र सरकारचे किती आणि राज्य सरकार किती देणार आहे हेही आपण येथे सांगितले पाहिजे. सभापती महोदया, मी वारंवार सांगितले आहे, पंडित जी, आप की पार्टी के बारे में समझ नही आता. केंद्रीय सरकार से जो 712 करोड रूपये मिले थे, वह आपने राष्ट्रवादी कांग्रेस पार्टी के लोगों की बैंक को पुनर्जीवित करने के लिए दे दिया. ....

(यानंतर श्री. सरफरे ..... 4एन 1 ...

श्री. नितीन गडकरी...

माननीय श्री. शिंगणे साहेबांची बँक माननीय डॉ. कदम साहेबांनी बरखास्त केली. त्याचप्रमाणे माननीय श्री. मनोहर नाईक साहेबांची बँक आहे, माननीय श्री. हर्षवर्धन देशमुख यांची बँक आहे, माननीय श्री.सुरेश देशमुख यांची बँक आहे. केंद्र सरकारकडून 712 कोटी रुपये आले आहेत ते शेतकऱ्यांचे पैसे आहेत. माननीय श्री.बाळासाहेब थोरात आपण 13 टक्के व्याजाने पैसे वसूल केले. नाबार्डकडून 5 टक्के दराने घेतलेले कर्ज 13 टक्के दराने परत करण्यात आले. म्हणजे 10 हजाराच्या कर्जावर दीड लाखाचे व्याज लावले.

(सभापतीस्थानी माननीय श्री.अरविंद सावंत)

ज्या बँकेसाठी तुम्ही हे पैसे वापरले, आणि त्यासाठी तुम्ही याठिकाणी तरतूद केली. त्यामधून भंडारा, चंद्रपूर, गोंदिया, गडचिरोली आणि नागपूर या पाच जिल्हयांना वगळून टाकले. नागपूर जिल्हयातील शेतकऱ्यांनी आत्महत्त्या केल्यानंतर या जिल्हयाचे आपण किती भले केले? यामध्ये 150 कोटी रुपयांचा घोटाळा झाला आहे. आपण यामध्ये पध्दतशीर हुशारी दाखविली आहे. नाव शेतकऱ्यांचे आणि भले बँकांचे केले आहे. हा पैसा वेळीच जर शेतकऱ्यांकडे गेला असता तर त्याचा शेतकऱ्यांना जास्त उपयोग झाला असता, आणि आमचा अनुशेष कमी झाला असता. माननीय डॉ.पतंगराव कदम साहेब सांगतात की, आम्ही 4 हजार कोटी रुपये 6 टक्के दराने वाटले, सर्वांना देऊन टाकले. परंतु ज्यांना तुम्ही पैसे वाटले त्यामध्ये विदर्भामध्ये एक टक्का सुध्दा माणूस मिळत नाही.तुम्ही खरोखर 6 टक्के दराने कर्ज कुणाला दिले? किती सबसिडी दिली? कोणत्या बँकेमार्फत दिली? त्याची श्वेतपत्रिका काढली आहे काय? तुम्ही शेतकऱ्यांचे पैसे माफ केले म्हणून सांगता, किती लोकांचे पैसे माफ केले ते सांगा? त्याबाबत आपणाकडे माहिती नाही.

सभापती महोदय, सूतकताई करणाऱ्या गिरण्यांना अंशदानासाठी भागभांडवल म्हणून 60 कोटींची तरतूद करण्यात आली आहे. कापूस विदर्भामधील, वस्त्रोद्योग विदर्भातील, विदर्भातील जिल्हे सोडले तर अन्य भागामध्ये कापसाची बोंडे पिकत नाहीत. त्या भागामधील लोक विदर्भातील कापूस घेऊन तो गादी आणि उशांमध्ये वापरतात एवढेच करतात, ते कशासाठी? आमच्याकडील कापूस घेऊन त्यावर प्रक्रिया करणारे उद्योग त्या भागामध्ये आहेत. कापूस उत्पादन करणारे शेतकरी विदर्भातील असून त्या व्यवसायामधून नफा त्यांनी कमवावयाचा? हे कशासाठी? माननीय बॅरिस्टर श्री. अंतुले साहेब महाराष्ट्राचे मुख्यमंत्री असतांना त्यांनी असा निर्णय घेतला होता की, ज्या जिल्हयामध्ये कापूस उत्पादकांसाठी पैसे राखून ठेवले असतील ते पैसे त्या जिल्हयातील

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. नितीन गडकरी...

कापूस उत्पादक शेतकऱ्यांना द्यावेत.आपण त्याकडे बघत नसल्यामुळे नवीन अनुशेष तयार होत आहे. तेव्हा आपण भाग भांडवल वाटप करण्यासंबंधी निकष लावले पाहिजेत. उमरेड रोडवर एक सूतगिरणी आहे त्याठिक्राणी 1128 कामगारांपैकी 853 कामगारांवर गुन्हे नोंदविण्यात आले.ते प्रकरण न्यायालयामध्ये गेले असता न्यायालयाने कामगारांच्या बाजूने निकाल दिला. न्यायालयाच्या निर्णयाप्रमाणे त्या गिरणीमध्ये काम करीत असलेल्या कामगारांना 108 महिन्यांचा पगार, सेवानिवृत्तीचे अंशदान इत्यादींसाठी शासनाने तरतूद करावयाची आहे. त्या न्यायालयाच्या आदेशाच्या विरोधी राज्य शासनाने अजून अपिल केले नाही. तेव्हा सभापती महोदय, माननीय वस्त्रोद्योग मंत्री हे नागपूरचे आहेत. त्यांनी आपल्या कार्यकाळामध्ये नागपूरच्या विकासाबरोबर वस्त्रोद्योगाच्या विकासाचा विचार करावा. नाहीतर मंत्री नागपूरचे आणि सर्व पैसा कोल्हापूर आणि सांगलीकडे चालला आहे. असे होऊ नये म्हणून मी आपणास विनंती करतो.

सभापती महोदय, गृह विभागाने खबरे नेमले आहेत. या खबऱ्यांना बक्षिस देण्यासाठी शासनाने निधीची तरतूद केलेली आहे.परंतु पोलीस विभागामध्ये एक रॅकेट असून पोलीस अधिकारी त्या खबऱ्यांना बक्षिसाचे पैसे देत नाहीत. त्या खबऱ्यांच्या नावाने हे पैसे खात असतात. हा व्यवहार गुप्त राहिला पाहिजे. यामध्ये ऑडिटींग सिस्टीम असली पाहिजे. तुम्ही त्याकरीता फार मोठे ऑडीट करण्याची गरज नाही. कारण तुमचे पोलीसवाले मस्तवाल झालेले आहेत.

(यानंतर श्री. किल्लेदार)

अप्रधारित प्रत / प्रिप्रिंट्सरीता नाही

श्री.नितीन गडकरी (पुढे सुरु....

खबऱ्यांना दिलेले पैसे त्यांना मिळत नाही. या संबंधात डी.जीं.च्या स्तरावर कोणती तरी याचा हिशोब ठेवला पाहिजे त्याची नोंद घेतली पाहिजे, हिशोब पडताळून पाहिला पाहिजे नाही तर त्याचा काही पत्ताच लागणार नाही. तरतूद केलेल्या रक्कमांच्याबाबतीतही पाहून घ्यावे.

त्यानंतर बाब क्रमांक 118 च्या संबंधाने मी बोलणार आहे. मला वाईट वाटते की,पाटबंधारे विभागाचे पूल आणि रस्ते यासंधातील तरतूद बजेटमध्ये का केली जात नाही ? मी मंत्री महोदयांना विनंती करतो की, पुढच्या वेळी पूरक मागणी बजेटच्या 10 टक्केच्या वर यायला नको. याचा बजेटमध्ये या बाबींचा समावेश यायला पाहिजे. पूरक मागण्या म्हणजे खिसा मारण्याची पध्दत आहे. तसे होणार नाही याची काळजी घ्यावी तरच सगळ्या जिल्ह्यांना न्याय मिळेल. पुढच्यावेळी याची काळजी घ्यावी.

दुसरी विनंती आहे की, सन्मानीय सदस्य प्रा. बी.टी.देशमुख साहेब हे दवाखान्यामध्ये आहेत त्यामुळे त्यांना बोलण्याची संधी मिळाली नाही. मध्यम पूल 107 मध्ये भांडवली खर्चाचा जो भाग आहे, त्याला देखील राज्यपालांचे निदेश लागू आहेत. पूरवणी मागण्याच्या माध्यमातून मी अर्थमंत्र्यांना प्रश्न विचारू इच्छितो की, हा जो इरिगेशनचा पैसा आहे याला राज्यपालांचे निदेश लागू आहेत. त्यांच्या परवानगीशिवाय पुरवणी मागण्यांच्या माध्यमातून तरतूद करत आहात. याबाबतीत आपण राज्यपालांच्या निदेशाचे पालन केले आहे काय ? हा खरा मूलभूत प्रश्न आहे. या माध्यमातून डाका मारण्याचा धंदा केला जात आहे, हे चांगले नाही. बाकीच्या विभागांना राज्यपालांचे निदेश लागू झालेले नाहीत. 371 (2) (8) खाली पाटबारे विभागाला राज्यपाल महोदयांचे निदेश लागू झालेले आहेत. या पुरक मागण्यांच्या संबंधाने राज्यपालांच्या निदेशाचे पालन केलेले आहे काय ? केले असेल तर बजेटमध्ये जसे हिरव्या पुस्तकात माहिती देतो त्याप्रमाणे पुरवणी मागण्यांच्या बाबतीतसुध्दा जिल्हाजिल्ह्यामध्ये तरतूद कशी केलेली आहे त्याचा अहवाल सभागृहाला द्यावा. पुरवणी मागणी करून कोणाला किती पैसे दिले याबाबतचा स्पष्ट खुलासा करावा, अशी मागणी करतो व आपली रजा घेतो.

--

2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ MHM/ KGS/ MAP/ MHM/ MAP/ KGS/

डॉ.वसंत पवार (नासिक प्राधिकारी संस्थाद्वारा निर्वाचित) : सभापती महोदय, आपण पूरक मागण्यांच्या संबंधात चर्चा करत आहोत. राज्याचे बजेट हे 14 ते 15 हजार कोटी रुपयाचे असते. या पुरवणी मागण्या 7 हजार 57 कोटी रुपयाच्या आहेत. आताच सन्माननीय सदस्यांनी सांगितले की ही बाब बरोबर नाही. म्हणून मी बसल्या बसल्या पुस्तक पाहिले. त्यामध्ये पुरवणी मागण्या का आलेल्या आहेत हे पाहिल्या. मला असे दिसते की, बाब क्रमांक 52,54,56,57 आणि 58 या सगळ्या बाबी या नैसगिक आपत्तीच्या संबंधातील आहेत. महापूर, अतिवृष्टी अशा नैसर्गिक आपत्तीमध्ये सापडलेल्या लोकांना नुकसान भरपाई म्हणून 1282 कोटी रुपयाच्या पूरवणी मागण्या मांडलेल्या आहेत.

यानंतर श्री.बरवड.....

अप्रमाणित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. वसंत पवार ....

त्यामध्ये अजून ॲड केले तर तो खर्च जवळपास 2 हजार कोटी रुपयांच्या पुढे जात नाही. म्हणजे हा जो 7057 कोटी रुपयांचा खर्च दिसतो तो खूप आहे असे वाटते. वॉटर रिसोर्स डिपार्टमेंट विभागाच्या मागणी क्रमांक आय-1 आणि आय-3 यामध्ये 152 कोटीची तरतूद आहे. मागणी क्रमांक आय-5 यामध्ये 545 कोटीची तरतूद आहे. याची बेरीज केली तर 600 ते 700 कोटी रुपये येतात. 7 हजार कोटीमध्ये 700 कोटी रुपये वॉटर रिसोर्स डिपार्टमेंटला मिळालेले आहेत हे मला या ठिकाणी नमूद करावेसे वाटते. शासनाने नॅचरल कॅलॅमिटीज कॉन्टीन्जंसी फंड आणि डिझास्टर मॅनेजमेंट ॲथॉरिटी तयार करण्याचे ठरविले आहे. मला असे वाटते की, या ठिकाणी डिझास्टर मॅनेजमेंट मिनिस्ट्री तयार करावयास पाहिजे. कारण प्रत्येक वेळी काही तरी होते आणि कल्याणकारी राज्य म्हणून लोकांना नुकसान भरपाई देण्याची गरज पडते. त्यामुळे या ठिकाणी डिझास्टर मॅनेजमेंट मिनिस्टी असणे जास्त महत्वाचे आहे. कधी पूर येतो, कधी दुष्काळ पडतो, कधी भूकंप होतो तर कधी गारपीट होते. अशा वेळी यामुळे चांगले कोऑर्डिनेशन होऊ शकते. त्यामुळे या बाबीचा विचार करणे अत्यंत गरजेचे आहे.

सभापती महोदय, मी शालेय शिक्षण मंत्र्यांना मन:पूर्वक धन्यवाद देतो. बाब क्रमांक 94, 95, 96 यामध्ये आमच्या ज्या मागण्या होत्या त्या पूर्ण करण्याचा प्रयत्न केलेला आहे. अजून थोडेसे बाकी आहे. सन 2003-04 पर्यंतची नॉन सॅलरी ग्रॅन्ट मंजूर केलेली आहे. पुढची ग्रँट प्रलंबित राहणार आहे. त्याचाही विचार करावा अशी मी मागणी करतो. बाब क्रमांक 95 आणि 96 मध्ये ज्युनिअर कॉलेजेसमधील टिचर्सची पदे वाढविली त्याबद्दल माननीय मंत्रिमहोदयांना धन्यवाद देतो. एका छोट्या बाबीचा उल्लेख करु इच्छितो. राज्यामध्ये दोनच भागशाळा राहिलेल्या आहेत. एका शाळेची दुसरी भागशाळा अशा दोनच भागशाळा आहेत. त्या वेगळ्या कराव्यात. त्या ठिकाणी स्टाफ देऊ नये. येवला येथील पाटोदा आणि जवळगाव येऊर या दोन भागशाळा आहेत. या भागशाळांना कोणताही स्टाफ न देता वेगळा दर्जा दिला तर तेथील प्रशासन, गुणवत्ता आणि शिस्त चांगली वाढेल. त्यादृष्टीने शासनाने सहकार्य करावे अशी मी विनंती करतो.

यानंतर मी शालेय शिक्षण विभागाच्या मागणी क्रमांक ई-2, बाब क्रमांक 100 बाबत

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. वसंत पवार ....

बोलणार आहे. श्री. मधुकरराव चौधरी हे शिक्षण मंत्री असताना संगीतकार श्री. वसंत देसाई यांनी एक सूर एक ताल नावाची एक चांगली योजना केली होती. त्या योजनेमध्ये स्वातंत्र्यपर गीते तसेच राष्ट्रभक्तीपर गीते चांगली चालू होती. आता शासनाने ती योजना रिव्हाईव करण्याचे ठरविले आहे. त्याबद्दल मी शासनाला धन्यवाद देतो. त्यासाठी टोकन तरतूद केलेली आहे. यासाठी चांगली तरतूद करणे गरजेचे आहे. दुसरी एक बाब अशी की, स्काऊट अँड गाईडचा राज्य स्तरीय मेळावा नाशिकला चांगल्या प्रकारे घेतला. मी नाशिक स्काऊट अँड गाईड संस्थेचा अध्यक्ष असल्याने आम्ही अशी मागणी केली होती की, राज्यात नवीन जिल्हे झालेले आहेत. 10-20 जिल्ह्यामध्ये स्काऊट ऑड गाईड चे कार्यालय नाही. ही अत्यंत चांगली योजना आहे. होमगार्डच्या धर्तीवर स्काऊट अँड गाईड चा प्रचार आणि प्रसार शालेय शिक्षणामध्ये होणे आवश्यक आहे. कारण "Once a scout, always scout". त्यांना आपण 90 टक्के ग्रँट देतो त्याऐवजी 100 टक्के ग्रँट मिळावी अशी मागणी आहे. आपण त्या मेळाव्यामध्ये ती मागणी मान्य केली परंतु मी पुन्हा आपल्याला त्याची आठवण करुन देतो.

सभापती महोदय, बाब क्रमांक 138 आणि बाब क्रमांक 152 यामध्ये नाशिक जिल्ह्यामध्ये सार्वजनिक बांधकाम विभगाच्या माध्यमातून लासलगाव ग्रामीण रुग्णालय आणि येवला ग्रामीण रुग्णालय बांधावयास घेतले आहे त्याबद्दल शासनाला धन्यवाद देतो.

यानंतर श्री. शिगम...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(डॉ. वसंत पवार ...)

बाब क्रमांक 268, पृ.क्र. 197. मालेगावसंबंधी शासनाने दोन चांगल्या गोष्टी केलेल्या आहेत. मालेगावला चांगले हॉस्पिटल व्हावे अशी तेथील जनतेची मागणी होती. शासनाने त्याठिकाणी 200 खाटांचे हॉस्पिटल सुरु करण्याचे ठरविले असून तेथे भूमिपूजनही झालेले आहे. सदरहू हॉस्पिटलसाठी 1 कोटी रुपयाची तरतूद केलेली आहे. त्या हॉस्पिटलला जाण्या-येण्यासाठी एक पूल होणे अत्यंत गरजेचे आहे. तो पूल नसेल तर हॉस्पिटलमध्ये एकाच बाजूने एण्ट्री होईल. दुस-या बाजूने हॉस्पिटलमध्ये जाता येणार नाही. हा पूल लवकरात लवकर करावा अशी मी या निमित्ताने मागणी करीत आहे. आरोग्य खात्याने 74 पदांची निर्मिती केली या बद्दल मी सन्माननीय सार्वजनिक आरोग्य मंत्र्यांना धन्यवाद देतो. ही सर्व पदे भरली जातील अशी मी अपेक्षा व्यक्त करतो. आणखी एक गोष्ट मी या ठिकाणी नमूद करु इच्छितो की, कुपोषण होऊ नये म्हणून राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षातर्फे ॲनेमिया मुक्तता मोहीम हाती घेतलेली आहे. या मोहिमेचे खासदार श्रीमती सुप्रिया सुळे यांच्या हस्ते उद्घाटन झालेले आहे. संपूर्ण आदिवासी भागातील मुलांना अनेमियासाठी आयर्न टॅबलेट देऊन त्यांच्यातील हिमोग्लोबीनचे प्रमाण कसे वाढेल यादृष्टीने प्रयत्न केलेला आहे. यामध्ये आरोग्य खात्याचाही सहभाग असणे अत्यंत आवश्यक आहे.

बाब क्रमांक 295, पृ.क्र. 228 आणि बाब क्र. 310पृ.क्र.235. ट्रायबल वेल्फेअरने टेक्निकल हायस्कूलसाठी चांगल्या प्रकारची मशिनरी खरेदी केलेली आहे. आदिवासी भागातील 32 नवीन तालुक्यामध्ये आय.टी.आय. होणे गरजेचे आहे. आदिवासी भागामध्ये ज्या आय.टी.आय. शाळा आहेत त्यांना पूर्ण अनुदान देण्याचा ठराव शासनाने केलेला आहे. परंतु या ठरावाची अजून अंमलबजावणी झालेली नाही. या ठरावाची अंमलबजावणी करणे अत्यंत गरजेचे आहे. आज नक्षलाईट एरिया आणि दुर्गम भागामध्ये काम करणा-या सरकारी कर्मचा-यांना 15 टक्के जादा भत्ता देण्याचे शासनाने मान्य केलेले आहे. परंतु सर्वच खात्यातील कर्मचा-यांना हा भत्ता मिळत नाही. कर्मचा-याने त्या भागामध्ये रहावे अशी अट घातलेली आहे. आता एस.टी.मध्ये काम करणा-या कर्मचा-याने तेथे राहाण्याची आवश्यकता नसते. आरोग्य खात्यातील कर्मचा-यांना तेथे प्रत्यक्ष काम करावयाचे असल्याने त्याठिकाणी राहाणे आवश्यक असते. एस.टी.च्या कर्मचा-याला राहाण्याची अट लावण्याची आवश्यकता नाही. तेव्हा एस.टी.च्या कर्मचा-याच्या बाबतीत तेथे राहाण्याची अट शिथिल

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(डॉ. वसंत पवार...)

करुन त्यांना 15 टक्के भत्ता मिळणे अत्यंत गरजेचे आहे.

बाब क्रमांक 342, पृ.क्र. 257. कांदा उत्पादक शेतक-यांना प्रति क्विंटल 50 रु. सबसिडी देण्यासाठी 10 कोटीची तरतूद केलेली आहे. परंतु अजून ब-याचशा केससे पेंडिग आहेत. तरीही ही 10 कोटीची तरतूद केल्याबद्दल मी शासनाला धन्यवाद देतो.

बाब क्रमांक 179, पृ.क्र. 135. वॉटर रिसोर्सेस, फ्लड कंट्रोल वर्कस् यासाठी तरतूद करण्यात आलेली आहे. मी या निमित्ताने माननीय मंत्री महोदयांना विनंती करतो की, नाफेड तालुक्यामध्ये नांदूर मधमेश्वर हे 150 वर्षापूर्वीचे ब्रिटीशकालीन धरण आज संपूर्ण गाळाने भरलेले आहे. त्या ठिकाणी मो-या बांधण्याचे काम चालू आहे, परंतु त्यासाठी निधीची तरतूद केलेली नाही. त्याठिकाणी पुराचे पाणी निघून जाण्यासाठी मोठ्या सुधारणा होणे गरजेचे आहे. तेव्हा नांदूर मधमेश्वर धरणासाठी जास्तीत जास्त निधी द्यावा अशी मी या निमित्ताने मागणी करतो. ह्या 7 हजार 57 कोटीच्या केलेल्या मागण्या रास्त असून ह्या मागण्यांना पाठिंबा देऊन मी माझे भाषण संपवितो.

...नंतर श्री. गागरे..

अप्रधारित प्रत / प्रतिक्षिप्त नाही

श्री.प्रकाश शेंडगे (महाराष्ट्र विधानसभा सदस्यांद्वारा निर्वाचित) : सभापती महोदय, बाब क्रमांक 9 बाबत मी सामान्य प्रशासन विभागाचा आभारी आहे. दिवंगत ग. दि.माडगुळकर या महान व्यक्तीचे स्मारक आपण त्यांच्या जन्मगावी उभारीत आहात. त्यासाठी 35 लाखाची तरतूद केलेली आहे, त्याबद्दल सांगली जिल्हयाच्या नागरिकांच्या वतीने मी आपले आभार मानतो., त्याच वेळी चौंढी येथील अहिल्यादेवी यांच्या स्मारकासाठी युतीच्या शासनाने 2.25 कोटीची तरतूद केली होती, 2 कोटी रुपये त्यावेळी या कामासाठी खर्च करण्यात आला होता. उर्वरित 25 लाख रुपयांची तरतूद करण्यासाठी 3-4 अधिवेशने मी सतत शासनाकडे मागणी करत आहे. शासनाला माझी विनंती आहे की, हा निधी आपल्याकडे नसेल तर आपण तसे जाहीर करावे. मी संपूर्ण धनगर व भटक्या जमातीला आवाहन केले आहे की, शासनाकडे 25 लाख रुपये नसतील तर आम्ही वर्गणी काढून ते स्मारक पूर्ण करु. या स्मारकासाठी उर्वरित 25 लाख रुपये रक्कम मागण्यासाठी मी हे शेवटचे भाषण करीत आहे.

बाब क्रमांक 12 नवीन जेट विमानासाठी 38 कोटींची पुरवणी मागणीची तरतूद करण्यात आली आहे. एवढी नवीन जेट विमाने खरेदी करणे ही काही तातडीची बाब नाही. अशा प्रकारच्या खर्चासाठी मुख्य अर्थसंकल्पामध्ये तरतूद करता आली असती.

बाब क्र. 26 गृह विभागाने पोलीस कर्मचाऱ्यांच्या गणवेशासाठी 50 कोटी रुपयांची तरतूद केली आहे. गणवेशामध्ये बुटांचा समावेश आहे. परंतु जे बुट खरेदी करण्यात आले आहेत, ते लिडकॉम कडून न घेता खाजगी कंपनीकडून घेण्यात आलेले आहेत, परंतु ते निकृष्ट दर्जाचे आहेत. ही बाब यापूर्वी सन्माननीय सदस्य श्री.अरविंद सावंत यांनी देखील उपस्थित केलेली आहे. या संदर्भात चौकशी करण्यात यावी अशी मी मागणी करीत आहे.

बाब क्र.47 शासनाने कोतवालांची भरती करण्याचा निर्णय घेतला आहे. या ठिकाणी मी असे नमूद करु इच्छितो की, भटक्या विमुक्त जमातीच्या अडीच ते तीन पदांचा अनुशेष शिल्लक आहे. हा अनुशेष आपण भरुन काढावा. या संदर्भात मंत्री महोदयांनी उत्तराच्या भाषणात स्पष्टीकरण करावे.

.....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.प्रकाश शेंडगे .... (पुढे सुरु)

बाब क्रमांक 55 पुनर्वसन विभागाने 681 कोटीची मागणी केलेली आहे. मागच्या वेळी पूर आल्याने जी हानी झालेली आहे त्यासाठी ही मागणी केलेली आहे. त्याच्यामध्ये पशुधन वाहून गेलेले आहे, त्याचा समावेश केलेला आहे. मागच्या वेळी हजारो शेळया मेंढया वाहून गेल्या आहेत, 150 ते 250 रुपये अशी मदत जाहीर केली होती, ही अगदी तुटपुंजी आहे. ती रक्कम वाढवून कमीत कमी 1000 रुपये करावी, अशी मी विनंती करतो.

चौसाळा येथे एका महिलेची नग्न करुन धिंड काढण्यात आली होती.या महिलेस त्या गावात राहणे मुश्किल झाले आहे,या महिलेचे बीड किंवा औरंगाबाद या शहरात पुनर्वसन करण्यात यावे ही बाब मी यापूर्वीही उपस्थित केलेली होती पण अद्यापही त्या महिलेला न्याय मिळालेला नाही, याकडे मी मंत्री महोदयांचे लक्ष वेधू इच्छितो.

पशुधन विकासाबाबत अहिल्यादेवी शेळी मेंढी विकास महामंडळ स्थापन करण्यात आले आहे.

..... यानंतर श्री.भोगले

अप्रधारित प्रत / प्रतिक्षेसाठी नाही

श्री.प्रकाश शेंडगे.....

जर या शेळी मेंढी विकास महामंडळाला देण्यासाठी निधी नसेल तर शासनाने हे महामंडळ बंद करावे. खेडयातील गरीब माणूस आता योजना येईल, शेळया मेंढया मिळतील अशा आशेने पहात आहे. 10 कोटी रुपये मागील वेळी मंजूर झाले त्याचे काय झाले हे शासनाला माहिती आहे. या प्रकरणी चौकशी झाली, चौकशी अहवाल सादर झाला. परंतु संबंधित दोषी संचालकांवर कारवाई झालेली नाही. 10 कोटी रुपयांपैकी 5 कोटी रुपयांचा भ्रष्टाचार मी या सभागृहात उघडकीस आणला होता. या भ्रष्टाचारात गुंतलेले जे संचालक आहेत त्यांच्यावर त्वरित कारवाई करावी आणि उर्वरित 10 कोटी रुपये मंजूर करावयाचे आहेत तो निधी ताबडतोब द्यावा अन्यथा हे महामंडळ बंद करावे. परंतु समाजाची दिशाभूल करु नये एवढीच विनंती आहे.

सभापती महोदय, सार्वजनिक बांधकाम विभागासंबंधी बोलत असताना भटक्या व विमुक्तांच्या वाड्या वस्त्यांवर जाण्यासाठी कोणतेही रस्ते नाहीत. ते आजही अंधारात धडपडत आहेत. या भटक्या विमुक्तांच्या ज्या वाडया वस्त्या आहेत त्यांच्याकरीता रस्त्यांची सुविधा देऊन त्यांचा विकास करावा अशी मागणी करुन माझे भाषण संपवितो.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती सुधा जोशी (नामनियुक्त) : सभापती महोदय, गृह विभाग पृष्ठ क्रमांक 16, बाब क्रमांक 21 व 23 मध्ये संवेदनशील क्षेत्रामध्ये कायदा व सुव्यवस्था राखण्याकरीता आणि गुप्त माहिती गोळा करण्यासाठी गुप्त सेवेसाठी तरतूद केली आहे. त्याची आवश्यकता आहेच. परंतु वाढती गुन्हेगारी, द्रुतगती महामार्गावर होणारे वाढते लुटालुटीचे प्रकार यांचा विचार केला असता अधिक पोलीस बळाची आवश्यकता आहे हे नाकारता येणार नाही. आज राज्यात महिलांवर देखील खूप अत्याचार होत आहेत. त्यांचा विचार करता संवेदनशील भागामध्ये स्वतंत्र महिला पोलीस ठाणी उभी केली पाहिजेत. महिलांवरील अत्याचारांना आळा घालण्यासाठी महिला पोलीस कर्मचाऱ्यांची संख्या वाढविण्याची गरज आहे. मुंबईमध्ये सायन, कुर्ला, मानखूर्द, धारावी, रमाबाई नगर अशा ज्या मोठया झोपडपट्टया आहेत त्या पॉकेटमध्ये स्वतंत्र महिला पोलीस ठाणी सुरु करावीत.

सभापती महोदय, वस्त्रोद्योग विभाग, बाब क्र.258, पृ.क्र.345 यामध्ये महाराष्ट्राला लागणारे बहुतांश कापड बाहेरच्या राज्यातून, काही प्रमाणात परदेशातूनही येते. दुस-या बाजूला सूतगिरण्या बंद पडत आहेत, त्यांच्या जागा विकल्या जात आहेत व कामगार देशोधडीला लागत आहेत. राज्यातील कोटयावधी रुपये देऊन सुरु केलेल्या सूतगिरण्या बंद पडत आहेत. कापूस पिकविणारा शेतकरी आत्महत्या करीत आहे. त्यामुळे राज्याच्या धोरणाचा तसेच संबंधित सर्व प्रश्नांचा अभ्यास करण्यासाठी एका स्वतंत्र अभ्यास गटाची स्थापना करावी. जेणेकरुन राज्यातील जनतेला आपल्या मिलचे कापड मिळावे. मुंबईमध्ये ज्या गिरण्या अस्तित्वात आहेत त्या सुरु व्हाव्यात अशी मी अपेक्षा करते.

सभापती महोदय, सार्वजनिक आरोग्य विभाग, बाब क्र.265, पृ.क्र.196 महिला रुग्णालयाच्या संदर्भात उल्लेख आहे. कामा रुग्णालय हे महिलांसाठी व मुलांसाठी मुंबई शहरातील एकमेव खास रुग्णालय आहे.

(नंतर श्री.जुन्नरे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती सुधा जोशी .....

मुंबईमध्ये महिलांची आणि मुलांची संख्या बरीच मोठी आहे. या रुग्णालयाला अद्यावत सुविधा मिळण्याची आवश्यकता आहे. तसेच या रुग्णालयाला अद्यावत यंत्रसामुग्री मिळाली पाहिजे, औषध-पाणी मुबलक प्रमाणात मिळाले पाहिजे, योग्य तो स्टाफ मिळाला पाहिजे. हे जे रुग्णालय आहे त्या रुग्णालयामध्ये काय काय त्रुटी आहेत आहेत त्याचा अभ्यास करण्यासाठी सभागृहातील महिला सदस्यांची एक समिती नेमावी अशी मी माननीय मंत्रीमहोदयांना विनंती करते. तसेच अशाच प्रकारची सूचना माननीय आरोग्य मंत्र्यांना देखील करावयाची आहे. मागच्या आठवडयात सिंधुदुर्ग जिल्हा रुग्णालयाच्या असुविधेच्या संदर्भात सन्माननीय सदस्य श्री अरविंद सावंत तसेच सन्माननीय सदस्य श्री. जयंत पाटील साहेबांनी लक्षवेधी सूचना उपस्थित केली होती. या लक्षवेधी सूचनेच्या चर्चेमध्ये भाग घेतांना मी विचार व्यक्त केले होते की, फक्त सिंधुदुर्ग जिल्हा रुग्णलायचीच दुरावस्था आहे असे नसून इतर अनेक जिल्हा रग्णालयांची, ग्रामीण रुग्णालयांची, आरोग्य केंद्राची अशाच प्रकारे दुरावस्था आहे. मुरुडमध्ये सुध्दा अशाच प्रकारची दुरावस्था आहे. मुरुड हे माझे माहेर आहे. त्यामुळे मुरुडला आरोग्याची काय अवस्था आहे याची मला पूर्ण कल्पना आहे. या ठिकाणी मॅटर्नीटी हॉस्पिटल सुरु झालेले आहे परंतु ते सुध्दा अर्धवटच सुरु झालेले आहे. या ठिकाणी स्टाफ कमी आहे, औषध-पाणी आणि यंत्र सामुग्री कमी प्रमाणात आहे त्यामुळे याकडे सुध्दा लक्ष द्यावे अशी विनंती आहे. तसेच सांगली जिल्हयातल्या मिरज तालुक्यातील बोळंकी इथल्या ग्रामीण रग्णालयाचा उल्लेख मला करावासा वाटतो. या ठिकाणच्या रुग्णालयाची अत्यंत वाईट अवस्था आहे. या ठिकाणी अनेक अडचणी आहेत. या ठिकाणी पुरेसा स्टाफ नाही, त्यामुळे या रुग्णालयाकडेही लक्ष देण्याची आवश्यकता आहे.

सभापती महोदय, आता मी बाब क्रमांक - 281, पृष्ठ क्रमांक 204 वर माझे विचार मांडणार आहे. डॉ. आनंदीबाई जोशी गौरव पुरस्कार योजनेची व्याप्ती वाढवली आहे ही कौतुकाची बाब आहे अशांना प्रोत्साहनाची आवश्यकता आहे.

सभापती महोदय, आता मी कृषी विभागातील बाब क्रमांक 78, पृष्ठ क्रमांक 49 वर माझे विचार व्यक्त करणार आहे. राज्यातील शेतक-यांच्या वाढत्या आत्महत्यांचा विचार करता शेतक-यांना आधुनिक तंत्रज्ञान आणि आर्थिक मॅनेजमेंट शिकवण्याची गरज आहे. पारंपारिक शेतीबद्दल

.....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती सुधा जोशी.....

नवी दिशा दिली पाहिजे. यासाठी कृषी पदवीधरांना एक वर्षाची इंटर्नशीप कंपलसरी करुन गावागावात पाठवले पाहिजे आणि त्यांच्या मार्फत नवीन नवीन तंत्रज्ञानाचे प्रशिक्षण शेतक-यांना दिले पाहिले. आंध्र प्रदेशमध्ये बेअर फूट डॉक्टर्सच्या धर्तीवर बेअर फूट ॲग्रिकल्चरल सांयटिस्ट निर्माण करण्याची योजना विचाराधीन आहे त्याच धर्तीवर आपल्याकडेही ती योजना सुरु करण्याची गरज आहे.

शालेय शिक्षण विभाग- बाब क्रमांक 88, पृष्ठ क्रमांक 60 वर माझे विचार व्यक्त करणार आहे. या राज्यातील शिक्षण हे व्यवसायाभिमुख करण्याची गरज आहे. या राज्यातल्या वाढत्या बेकारीचा विचार करता आता व्यवसाय शिक्षणाला महत्व दिले पाहिजे. यासाठी नवीन अभ्यासक्रमात समाविष्ट झालेल्या हस्तकला आणि कार्यानुभव या विषयाचे प्रशिक्षित शिक्षक प्रत्येक प्राथमिक आणि माध्यमिक शाळेला असले पाहिजेत. जिल्हापरिषदा, नगरपालिका, महानगरपालिका आणि खाजगी मान्यताप्राप्त शाळेमध्ये क्राफ्ट टीचर्सच्या जागा तातडीने भराव्यात याबाबत सर्व विभागांना कळवण्याबाबत मी आपल्या मार्फत शासनास सूचविते. याबाबत काय धोरण आहे ते कृपया माननीय शिक्षणमंत्री महोदयांनी स्पष्ट करावे अशी विनंती आहे.

यानंतर श्री. अजित.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती सुधा जोशी.....

जिल्हापरिषदेतील प्राथमिक शाळांतील बालवाड्या सेविकांना 500 रुपये भाऊबीज देण्याचे ठरविले आहे. हा अतिशय स्तुत्य उपक्रम आहे. परंतु या महागाईच्या काळामध्ये बऱ्यापैकी साडी घेण्यासाठी किमान 700 ते 800 रुपये खर्च येतो. तेव्हा बालवाड्या सेविकांना 800 रुपये भाऊबीज देण्याचा निर्णय आजच घेण्यात यावा अशी माझी या निमित्ताने मागणी आहे. आपण मला बोलण्याची संधी त्याबद्दल आपले आभार मानते आणि या मागण्यांना पाठिंबा देऊन माझे भाषण पूर्ण करते.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.परशुराम उपरकर (महाराष्ट्र विधानसभा सदस्यांद्वारा निर्वाचित) : सभापती महोदय, सन 2006-2007 च्या पूरक मागंण्यावर माझे विचार मांडण्यासाठी मी उभा आहे.

बाब क्रमांक 27, पृष्ठ क्रमांक 18 पोलिसांसाठी, पोलीस गणवेषाच्या वस्तू खरेदी करणे. सभापती महोदय, आपण आपल्या भाषणात पोलिसांच्या गणवेष खरेदीमध्ये भ्रष्टाचार होतो, निकृष्ट दर्जाची खरेदी केली जाते याबाबत आपले विचार मांडले. सभापती महोदय, "दीड हजार रुपयांमध्ये पोलीस गणवेष मिळतो" अशाप्रकारची एक बातमी नागपूर वर्तमानपत्रात छापून आलेली आहे. अशाप्रकारे गणवेष बाजारात मिळत असतील तर मोठ्या प्रमाणावर गुन्हेगारी वाढू शकते. तेव्हा या बातमीचा विचार करुन त्या अनुषंगाने कार्यवाही झाली पाहिजे.

बाब क्रमांक 29, पृष्ठ क्रमांक 19- गस्ती नौकांच्या खरेदीसाठी तरतूद करण्यात आलेली आहे. सिंधुर्दुग जिल्ह्याला ज्या गस्ती नौका दिलेल्या आहेत त्या गस्तीनौकांना स्पीड नाही. त्यामुळे बाजुच्या राज्यांतून मच्छिमारीसाठी नौका येतात त्या आपण अडवू शकत नाही. तसेच मच्छिमारीच्या अतिक्रमणामुळे स्थानिक मच्छिमारांना मासे फार कमी प्रमाणावर मिळतात. सिंधुदुर्ग जिल्ह्यात मत्स्य दुष्काळ झालेला आहे. बाहेरील राज्यातील ट्रॉलर अडविले तरी पाच हजार रुपये भरुन त्यांची सुटका होते. तेव्हा याबाबतही शासनाने विचार करावा आणि सिंधुदुर्ग जिल्ह्यासाठी नवीन स्पीड गस्ती नौका देण्यात याव्यात. त्यासाठी तरतूद करण्यात यावी.

बाब क्रमांक 32, पृष्ठ क्रमांक 19 - पोलीस प्रशासनाचा दर्जा वाढ करण्यासाठी तरतूद. सभापती महोदय, मालवण येथील पोटनिवडणुकीमध्ये शिवसेनेचा एक कार्यकर्ता श्री.रमेश गोयेकर हा बेपत्ता झालेला आहे. तो अजुनही सापडलेला नाही. स्थानिक पोलीस स्टेशनमध्ये तक्रार करण्यात आलेली आहे. परंतु अद्यापपर्यंत त्याचा शोध लागलेला नाही. आम्ही सी.आय.डी.चौकशीची मागणी केली. शेवटी कोर्टामध्ये जाऊन सी.बी.आय.ची मागणी केली. अद्यापपर्यंत श्री.रमेश गोयेकर यांचा शोध लागलेला नाही. जर पोलीस खाते इतके सक्षम आहे तर प्रशासनाच्या दर्जामध्ये वाढ करण्याची आवश्यकता नाही.

दुसरा एक मुद्दा आहे. मी माझ्या मतदारसंघात मालवण येथे जात असताना जिल्हयाचे डी.वाय.एस.पी. श्री.खंडाळे यांनी माझ्यावर लाठीचार्ज केला. आमदारांना अशाप्रकारची वागणूक मिळत असेल तर सर्वसामान्य जनतेचे काय हाल होत असतील याची मंत्रिमहोदयांनी नोंद घ्यावी.

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.परशुराम उपरकर.....

बाब क्रमांक 39, पृष्ठ क्रमांक 21- पर्यटन विकासासाठी विविध ठिकाणी मूलभूत सुविधा उपलब्ध करणे. सिंधुदुर्ग जिल्हा हा पर्यटन जिल्हा म्हणून घोषित झालेला आहे. कोकणात मोठ्या प्रमाणावर पर्यटक येतात. परंतु याठिकाणी पर्यटकांसाठी मूलभूत सुविधा उपलब्ध झालेल्या नाहीत. तेव्हा सिंधुदुर्ग जिल्ह्यात पर्यटकांसाठी मूलभूत सुविधा पुरविण्यात याव्यात अशी मागणी आहे.

यानंतर श्री.पुरी.....

अप्रमाणित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(सभापतीस्थानी माननीय तालिका सभापती डॉ.वसंत पवार)

श्री.परशुराम उपरकर...

सभापती महोदय, मत्स्य व्यवसाय व पशुसंवर्धन आणि उद्योग विभागाबाबत मी बोलणार आहे. मत्स्य व्यवसायासाठी याठिकाणी पुरवणी मागण्या नाहीत. आज मत्स्य दुष्काळ पडला असून याबाबतीत माननीय मंत्रिमहोदयांनी लक्ष द्यावे. आज समुद्रामध्ये मासे मिळत नसल्यामुळे मच्छीमार समुद्रातून परत येत आहेत. त्यांच्या बोटींचा डिझेलचा पैसा वाया जात आहे. त्यांच्या परताव्यासंबंधी मागे सभागृहामध्ये चर्चा होऊन त्याची आकडेवारी पाहून आम्ही पॅकेज देऊ असे माननीय मंत्रिमहोदयांनी सांगितले होते. याबाबतीत आपण केरळ व कर्नाटक राज्याच्या धर्तीवर आपल्याकडील जे छोटे होडीधारक आहेत त्यांना आपण रॉकेलवर सबसिडी दिली तर खऱ्याअर्थाने त्यांना न्याय मिळेल. त्याचप्रमाणे केरळ आणि कर्नाटक राज्याच्या धर्तीवर पारंपारिक जे रोपणसंघ मच्छीमारी करतात, परंतु आता मच्छीमारी बंद असल्यामुळे आपण त्यांना मानधनाच्या रुपाने पेन्शन अनुदान द्यावे. आज समुद्रामध्ये मासे मिळत नसल्यामुळे त्यांच्या 12-12 वर्षांच्या बोटीवरील कर्जामुळे आज त्यांची सबसिडीही कर्जामध्ये जात आहे. याबाबतीत माझी मागणी आहे की, आपण कर्जावरील सबसिडी वर्ग न करता त्याची मुदत आपण 12 वर्षांच्याऐवजी 15 वर्षापर्यंत करावी की जेणेकरुन या मच्छिमारांना न्याय मिळेल.

सभापती महोदय, बाब क्रमांक 122, पान क्रमांक 56-खार भूमीचे बंधारे यावर मी बोलणार आहे. वेंगूर्ला-शिरोडा येथे जो बंधारा बांधलेला आहे, तो निकृष्ट दर्जाचा असून याबाबतीत खारभूमी संरक्षण मिळावयास पाहिजे, परंतु ते मिळत नाही. तशाच प्रकारे जे नवीन बंधारे होत आहेत, ते अर्धवट अवस्थेत आहेत. आमच्या मालवण तालुक्यातील जे नवीन बंधारे अर्धवट अवस्थेत आहेत, त्याबाबतीत माननीय मंत्रिमहोदयांनी लक्ष द्यावे, ही विनंती.

सभापती महोदय, बाब क्रमांक 177, पान क्रमांक 135-जलसंपदा विभागावर मी बोलणार आहे. सिंधुदुर्ग जिल्हयातील नवीन धरणांना मान्यता देत असताना जून्या धरणांना निधी मिळत नाही, अशी परिस्थिती आहे. आज आमच्या सिंधुदुर्ग जिल्हयामध्ये 4 मोठे प्रकल्प होत आहेत. परंतु त्याठिकाणी पुनर्वसन होण्याच्या दृष्टीने कुठल्याही प्रकारचे गावठाण तयार झालेले नाही. ते तयार

..2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.परशुराम उपरकर...

करण्याच्या दृष्टीने माननीय मंत्रिमहोदयांनी लक्ष द्यावे. तसेच, आमच्याकडील जी धरणे बांधलेली आहेत, त्या धरणातील कालवे पावसामुळे फुटलेले आहेत, ते आपण दुरुस्त करावेत. अशा सूचना मी यानिमित्ताने करु इच्छितो व माझ्या सूचनांचा माननीय मंत्रिमहोदयांना गांभीर्याने विचार करुन माझ्या कोकणाला व माझ्या जिल्हयाला न्याय द्यावा, ही विनंती करुन माझे भाषण संपवितो.

..3.....

अप्रधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.जोगेंद्र कवाडे (नामनियुक्त) : सभापती महोदय, पुरवणी मागण्याच्या संदर्भात टिप्पणी करण्याच्या दृष्टीने एक संशोधन संस्था आहे. त्या संस्थेने पुरवण्या मागण्या किती करता येतात ? त्याचे नियम काय ? त्याची वस्तुस्थिती काय? पुरवणी मागण्याच्या संदर्भात अंदाज समितीच्या शिफारशी काय आहेत ? हे सांगितले आहे. गोडबोले समितीची जी शिफारस आहे ती वाचल्यानंतर पुरवणी मागण्या म्हणजे खरेच काय चीज आहे, याच्या जाणीवेसंबंधी माझे सन्माननीय मित्र श्री.मधुकर चव्हाण व श्री.नितीनजी गडकरी यांनी याठिकाणी उल्लेख केला. याची आपण दखल घ्यावी. म्हणून हे पत्रक पटलावर ठेवण्याची माझी इच्छा असून ते मी आपल्याकडे पाठवितो.

नंतर श्री.रोझेकर...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.जोगेंद्र कवाडे.....

सभापती महोदय, गृह विभागाची बाब क्रमांक 21, पृष्ठ क्रमांक 16 संदर्भात अनेक सन्माननीय सदस्यांनी चर्चा केली आहे. संवेदनशील क्षेत्रामध्ये कायदा व सुव्यवस्था राखण्याकरिता गुप्त माहिती गोळा करणे गरजेचे आहे. त्यासाठी गुप्तचर विभाग पोलीस दलामध्ये आहे. ज्याप्रमाणे सन्माननीय सदस्य, श्री.नितीन गडकरी यांनी सांगितले की, पोलिसांना खबरे ठेवावे लागतात. ही एकप्रकारे गुप्त सेवा आहे. कारण अनेक प्रकारच्या, ज्यामध्ये बॉम्बस्फोट, दंगली, चो-या यासारख्या घटना घडतात. त्यासाठी माहिती पुरविणारे खबरे असतात त्यांच्या माध्यमातून अनेक प्रकारची गुप्त माहिती पोलिसांना मिळत असते. गुप्तचर विभाग सक्षम करण्यासाठी जी तरतूद करण्यात आली आहे ती निश्चितच योग्य आहे व त्याचे मी स्वागत करतो.

सभापती महोदय, बाब क्रमांक 23, पृष्ठ क्रमांक 17 बाबत सांगावेसे वाटते की, मुंबईच्या लोकलमध्ये बॉम्बस्फोट झाला. मुंबई महानगरी ही देशाची आर्थिक राजधानी असल्यामुळे त्याची नाळ कशी तोडता येईल हा दहशतवाद्यांचा प्रयत्न असतो. तो हाणून पाडण्यासाठी रेल्वे बॉम्बस्फोटाच्या पार्श्वभूमिवर दहशतवादी प्रतिबंधक पथक स्थापन करण्याचा निर्णय योग्य आहे व ही मागणीही योग्य आहे.

सभापती महोदय, गृह विभागाच्या बाब क्रमांक 27 व पृष्ठ क्रमांक 18 बाबत सांगावेसे वाटते की, पोलिसांसाठी गणवेश आणि लागणा-या आवश्यक वस्तूंसाठी तरतूद करण्यात आलेली आहे. सन्माननीय सदस्य, श्री.शेंडगे यांनी एक उपयुक्त सूचना यासंदर्भात केली. पोलिसांचे गणवेश अत्यंत चांगले असले पाहिजेत, पोलीस स्मार्ट दिसले पाहिजे. पाहणा-या माणसाला पोलीस आपला मित्र वाटला पाहिजे. त्यांना लागणारे जे बुट आहेत ते पोलीस विभागातर्फे खरेदी केले जातात. राज्यात लिडकॉम नावाची संस्था आहे. आपल्या राज्यातील चर्मकार बांधवांच्या विकासासाठी ही संस्था स्थापन करण्यात आलेली आहे. पोलिसांना लागणारे बुट लिडकॉमच्या माध्यमातून खरेदी केले तर राज्यातील या चर्मकार बांधवांना रोजीरोटी मिळू शकेल. पोलिसांना केवळ गणवेश देऊन भागणार नाही तर पोलिसांच्या वागणुकीमुळे, वर्तनामुळे ते गणवेशातील अतिरेकी आहेत, आतंकवादी आहेत, अशी सर्वसाधारण लोकांची भावना होता कामा नये, अशा प्रकारची पोलिसांची वर्तणूक असावयास हवी. गणवेशाच्या माध्यमातून ही मानसिकताही

..2.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.जोगेंद्र कवाडे.....

बदलण्याची आवश्यकता आहे. नाही तर खैरलांजी, वणीसारखे हत्याकांड घडते व निरपराध लोक मारले जातात. म्हणून पोलिसांची मानसिकता ही मानवतेची, समतेची, न्यायाची, बंधुत्वाची, जातीविरहित कशी तयार होईल याचा विचार होण्याची गरज आहे.

सभापती महोदय, बाब क्रमांक 25 अंतर्गत सन 2006-2007 मध्ये नवीन भरती केलेल्या पोलीसांकरिता अतिरिक्त प्रशिक्षण सेवा पुरविण्यासाठी तरतूद करण्यात आलेली आहे. यासंदर्भामध्ये आपल्या माध्यमातून गृह खात्याच्या लक्षात आणून देतो की, पोलीस उपनिरिक्षक पदासाठी परीक्षा सन 2002 मध्ये घेण्यात आली.

यानंतर श्री.बोरले.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.जोगेंद्र कवाडे .....

पोलीस विभागातील लोक या परीक्षेला बसतात. सन 2002 मध्ये त्यांची परीक्षा झाली. जे पात्र उमेदवार होते त्यांची अद्यापपर्यंत पोलीस उपनिरीक्षक पदावर नेमणूक करण्यात आलेली नाही. गृह विभागाच्यावतीने सांगण्यात येते की, राज्यामध्ये 517 पोलीस उपनिरीक्षकांची पदे रिक्त आहेत. असे असतांना देखील त्या उमेदवारांची पोलीस उपनिरीक्षक पदावर नियुक्ती करण्यात आलेली नाही. पोलीस दल कार्यक्षम, अत्कृष्ठ व्हावे यासाठी गृह विभाग प्रयत्नशील आहे. जे पात्र उमेदवार आहेत त्यांची पोलीस उपनिरीक्षक पदी नियुक्ती करण्यात आलेली नाही, याचा गृह विभागाने विचार करणे आवश्यक आहे.

सभापती महोदय, मी सहकार, पणन व वस्त्रोद्योगावर बोलणार आहे. पृष्ठ क्र.259, बाब क्रमांक 348, सहकारी सारखर कारखान्यांना व्याज मुक्त कर्ज. जे 27 पात्र सहकारी साखर कारखाने आहेत त्या सहकारी सारखर कारखान्यांना व्याज मुक्त कर्ज देण्यासाठी 60 कोटी 58 लाख रुपये तरतूद करण्यात आली आहे. विदर्भातील सारखर कारखाने देखील डबघाईस आलेले आहेत. विदर्भातील सहकारी तत्वावर चालणा-या सूत गिरण्या डबघाईला आलेल्या आहेत, बंद पडण्याच्या मार्गावर आहेत. त्यांच्यासाठी अशा प्रकारची तरतूद पूरवणी मागण्यांमध्ये करण्यात आली असती तर आम्हाला आनंद झाला असता. विदर्भावर अन्याय केला जातो असे आरोप केले जातात. या आरोपांना कायमचे नष्ट करावयाचे असेल तर शासनाने याकडे लक्ष द्यावे, अशी मी विनंती करतो.

पृष्ठ क्र.287, बाब क्रमांक 388, विशेष घटक योजना. विशेष घटक योजनेअंतर्गत नागरी क्षेत्रातील दलित वस्तीतील पाणी पुरवठा योजनांसाठी सन 2006-07 या वित्तीय वर्षामध्ये 10 कोटी रुपयांची पुरवणी मागणी करण्यात आली आहे. यामुळे नागरी क्षेत्रातील दलित वस्त्यांमध्ये स्वच्छ, निर्मळ आणि पिण्याचे चांगले पाणी मिळेल. अनेक रोगराईची निर्मिती पाण्याच्या अभावामुळे होत असते. नागरी क्षेत्रातील दलित वस्तीमध्ये पाणी पुरवठा योजनेसाठी करण्यात आलेल्या पुरवणी मागणीचे मी स्वागत करतो.

...2/-

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.जोगेंद्र कवाडे .....

पृष्ठ क्र.90, बाब क्रमांक 131. सभापती महोदय, आमच्या अकोला जिल्हयातील मुर्तिजापूर हा अतिशय उपेक्षित असा तालुका आहे. विशेषत: शेतकरी शेतमजूर, कष्टकरी, ओ.बी.सी., अल्पसंख्यांकांचा हा तालुका आहे. अकोला जिल्हयातील मुर्तिजापूर तालुक्यामध्ये हेंदज नावाचे गाव आहे. त्या ठिकाणी तंत्रनिकेतन उभारण्यासाठी सार्वजनिक बांधकाम विभागाने 1 कोटी 32 लाख रुपयांची पूरवणी मागणीद्वारे तरतूद केलेली आहे, त्याबद्दल मी माननीय सार्वजनिक बांधकाम मंत्र्यांचे आणि राज्यमंत्र्यांचे अभिनंदन करतो.

पृष्ठ क्र.92, बाब क्रमांक 135, मालेगावमध्ये 200 खाटांचे अद्ययावत रुग्णालय बांधणे. मघाशी सन्माननीय सदस्य श्री.चंद्रकांत रघुवंशी बोलले. मी आपल्या म्हणण्याला दुजोरा देतो. मालेगावमध्ये बॉम्बस्फोट झाला नसता तर तेथे 200 खाटांचे अद्ययावत रुग्णालय झाले नसते काय ? त्यासाठी आपल्याला बॉम्बस्फोटाची वाट बघावी लागली. मालेगावमध्ये चांगल्या प्रकारचे हॉस्पिटल झाले पाहिजे. मालेगावमध्ये झालेल्या दुर्घनेमुळे आमच्या शासनाला जाग आली आणि मालेगावमध्ये 200 खाटांचे हॉस्पिटल उभारण्यात येत आहे.

यानंतर श्री.सुंबरे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. कवाडे ....

सभापती महोदय, बाब क्रमांक 137, पृष्ठ क्र.93 या संबंधात बोलताना मी माननीय मंत्री श्री.अनिस अहमद यांना सांगू इच्छितो की, आमच्या गोंदिया जिल्ह्यामध्ये गंगाबाई महिला हॉस्पिटल आहे. भंडारा-गोंदियाचे आमचे मित्र आणि केंद्रीय मंत्री श्री.प्रफुल्ल पटेल यांचे हे जन्मगाव आहे. तसेच सन्माननीय श्री.राजूभाई जैन हे येथे केव्हा येतात कधी येत नाहीत, त्यांना कदाचित वेळ नसतो. पण तरीही ते आमचे चांगले मित्र आहेत. त्याचप्रमाणे सन्माननीय राज्यमंत्री श्री.रविशेठ पाटील यांना मी सांगू इच्छितो की, आपल्या रायगड जिल्ह्यात जिल्हा हॉस्पिटल,अलिबाग मध्ये आपण दुरूस्ती करता आणि केटीएस हॉस्पिटल,गोंदिया येथे 200 खाटांचे हॉस्पिटल आहे त्यासाठी 2 कोटी 20 लाख 74 हजार रूपयांची तरतूद आपण या ठिकाणी केलेली आहे त्याबद्दल आपले मी अभिनंदन करतो.

सभापती महोदय, सहकार, पणन आणि वस्त्रोद्योग विभागाच्या संदर्भात मी आता बोलणार आहे. या निमित्ताने मी वस्त्रोद्योग मंत्र्यांना मी सांगेन की, आप लोगों को कपडे पहनाते हो, मेहरबानी करके अब कपडे उतारने का काम मत करो. पृष्ठ क्र.256, बाब क्रमांक 338 रेशीम किडे जोपासना आणि संवर्धन यासाठी आपण ही पूरक मागणी केलेली आहे. खरे पाहता विदर्भातील भंडारा, चंद्रपूर, गोंदिया या जिल्ह्यातील हा प्रमुख उद्योग आहे पण त्याकडे आता मोठ्या प्रमाणात दुर्लक्ष झालेले आहे. तरीही आता यासाठी पूरक मागणी केलेली आहे तिचे मी स्वागत करतो.

सभापती महोदय, शालेय शिक्षण, क्रीडा विभागाचे बाब क्रमांक 104, पृष्ठ क्र.62 या संदर्भात बोलताना मी सांगेन की, शिवछत्रपती क्रीडा संकुल, बालेवाडी,पुणे येथे 2008 मध्ये राष्ट्रकूल युवा स्पर्धांचे आयोजन होणार आहे आणि त्यासाठी येथे तरतूद करण्यात आलेली आहे ती निश्चितच चांगली आहे. या क्रीडा संकुलातून राष्ट्रकूल युवा स्पर्धोचे आयोजन केले जाणार आहे म्हणून नवे तर आम्ही पाहतो आहोत की, सव्वा कोटीच्या आमच्या या देशामध्ये ऑलिम्पिक आणि एशियाटिक खेळांमध्ये आम्ही मागे राहतो आहोत. आपल्या सव्वा कोटी लोकसंख्येच्या देशाला ही गोष्ट शोभणारी नाही. त्यामुळे कॅच देम यंग ज्याला म्हणतो, त्याप्रमाणे लहान वयातच मुलांना प्रशिक्षित करण्याची योजना आपण लागू केली तर त्यातून चांगले चांगले खेळाडू तयार होतील आणि आपल्या देशाचे नाव उज्ज्वल करतील.

..... 4 वाय 2 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. कवाडे .....

सभापती महोदय, पदुम विभागाची बाब क्र.85, पृष्ठ क्र.51 संबंधात बोलताना मी आपल्याला धन्यवाद देतो. 117 आदिवासी गोवारी बांधवांचा याच नागपुरामध्ये मृत्यू झाला, ते शहिद झाले. गोवारी जमातीचा समावेश आदिवासी जमातीमध्ये करावा या छोट्याशा मागणीसाठी ते या नागपुरामध्ये आले होते. ही स्मृती व पशुपालन संस्था आहे त्यासाठी देखील 23 लाख 14 हजाराची तरतूद आपण केली आहे आणि आमच्या गोवारी बांधवांच्या, शहिदांच्या स्मृतीला मानवंदना दिली त्या आपल्या भावनांचा मी आदर करतो, आपले कौतुक करतो.

सभापती महोदय, सार्वजनिक आरोग्य विभागाची बाब क्र.273, पृष्ठ 201 या संबंधात सन्माननीय सदस्य श्री.गडकरी, श्रीमती सुधा जोशी आणि अन्य सदस्य येथे बोलले आहेत. आपल्या राज्यातील ही एक अत्यंत उत्कृष्ट अशी योजना आहे आणि गरीब माणसाला, जो मरणाच्या दारी आहे त्याला जीवदान देणारी अशी ही जीवनदायी योजना आहे. दुर्बल घटकातील लोकांना या योजनेंतर्गत पूर्वी 70 हजार रूपये मिळत होते आणि ती रक्कम आता वाढवून आपण दीड लाख रूपये केलेली आहे. तसेच पूर्वी यामध्ये कॅन्सर चा समावेश नव्हता. परंतु आता त्याचाही समावेश या योजनेत करण्यात आलेला आहे. त्यामुळे कॅन्सरग्रस्त असलेल्या गरीब लोकांनाही आता दीड लाख रूपयांची मदत निश्चितपवणे मिळणार आहे. त्याबाबतीत संबंधित अधिकारी, डॉक्टर्स आणि हॉस्पिटल जी आहेत त्यांचेकडून कोणत्याही प्रकारची हयगय मात्र होता कामा नये. तेव्हा या जीवनदायी योजनेला नावाप्रमाणे सार्थ करण्याचे प्रयत्न आपण करावेत अशी माझी या निमित्ताने आपणास विनंती आहे. ...

(यानंतर श्री. सरफरे ..... 4झेड 1

अधिकृत पत्र / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. जोगेंद्र कवाडे...

सभापती महोदय, आपल्या माहितीसाठी सांगतो की, जगाच्या पाठीवर अमेरिकेच्या शेजारी एक छोटेसे क्युबा नावाचे राष्ट्र आहे. जगातील कोणतेही राष्ट्र जे करु शकले नाही, अमेरिकेसारखे श्रीमंत राष्ट्र सुध्दा करु शकले नाही असा चमत्कार एका छोटयाशा गरीब, दरिद्री क्युबा या राष्ट्राने केला आहे. या राष्ट्राने सर्वांना मोफत शिक्षण आणि मोफत आरोग्याच्या सुविधा देऊ केल्या आहेत. त्यामध्ये त्यांनी 70 हजार ते दीड लाख रुपयांपर्यंत आर्थिक मर्यादा ठेवली नाही. जी गोष्ट अमेरिकेसारख्या प्रगत राष्ट्राने केली नाही ती क्युबासारख्या गरीब राष्ट्राने केली आहे. त्याबाबत त्या राष्ट्राला धन्यवाद दिले पाहिजेत. त्या राष्ट्राचे अनुकरण आपल्याला करता आले तर त्यामुळे आपला निश्चित फायदा होईल.

सभापती महोदय, बाब क्रमांक 281 व पृष्ठ क्रमांक 244 मध्ये "आनंदीबाई जोशी गौरव पुरस्कार योजना" आपण राज्यामध्ये सुरु केली आहे. राज्याच्या प्रत्येक जिल्हयातील तीन उप केंद्रांना आणि 3 प्राथमिक आरोग्य केंद्रांना उत्कृष्ट सेवेबद्दल पुरस्कार दिला जाणार आहे. डॉ.आनंदीबाई जोशी गौरव पुरस्काराच्या माध्यमातून ग्रामीण भागातील प्राथमिक आरोग्य केंद्रे, उपकेंद्रे निश्चितपणे दुरुस्त होतील व कार्यक्षमतेने काम करतील. आणि पुरस्कार मिळविण्यासाठी ते चांगले काम करतील आणि डॉ. आनंदीबाई जोशी यांच्या नावाचा गौरव वाढवतील अशी अपेक्षा आहे.

सभापती महोदय, आदिवासी विकासासंबंधी खूप काही बोलता येण्यासारखे आहे, परंतु मी जास्त बोलणार नाही. परंतु पृष्ठ क्रमांक 229 व बाब क्रमांक 298 या अत्यंत महत्वाच्या असलेल्या मागणीसंबधात सांगू इच्छितो की, "जनजाती क्षेत्रामध्ये आरोग्य स्वास्थ्यासाठी औषधे व सामुग्रीची खरेदी करण्यासाठी तरतूद करणे" अशाप्रकारची ही मागणी आहे. जनजाती क्षेत्रातील बालमृत्यूचे प्रमाण कमी करण्यासाठी वेगवेगळया एकात्मिक आरोग्याच्या योजना कार्यान्वित करण्यात येत आहे. त्यासाठी करण्यात आलेली तरतूद स्वागतार्ह आहे. परंतु खेदाने सांगावेसे वाटते की, आदिवासी बहुल क्षेत्र असलेल्या नंदूरबार, मेळघाट, धुळे, ठाणे, चंद्रपूर, गडचिरोली या जिल्हयामध्ये आदिवासी बालकांचे मोठया प्रमाणावर कुपोषण होत आहे. हे प्रमाण अद्यापपर्यंत कमी झाले नाही. या संदर्भात मी एक अहवाल वाचला असून त्या अनुषंगाने मला सरकारला सांगावेसे वाटते की तो अहवाल अत्यंत भयानक स्वरुपाचा आहे. तो वाचल्यानंतर असे वाटते की, आदिवासी बालकांचे कुपोषण करण्यास जबाबदार असणाऱ्या लोकांना फासावर लटकविले पाहिजे. अशाप्रकारची माणसे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.जोगेंद्र कवाडे...

या योजनेमध्ये घेतली आहेत. कुपोषित बालकांचे कुपोषण कमी करण्यासाठी मोफत कॅप्सूल देण्याची योजना करण्यात आली आहे. परंतु त्या कॅप्सूलचे संशोधन करण्यात आले त्यावेळी ते एम्प्टी असल्याचे आढळून आले. त्या कॅप्सूलचे आवरण असलेल्या गोळीमध्ये कोणत्याही प्रकारचे औषध न टाकता ती कॅप्सूल आदिवासी विभागामध्ये रिकामी वाटली जाते. आदिवासी विभागातील कुपोषित बालकांना मृत्यूच्या दारातून परत आणण्याचे पवित्र काम या शासनाकडून अशापध्दतीने होणार नाही. आदिवासी बालकांना कुपोषणापासून वाचविण्यासाठी या योजनेमध्ये काम करणाऱ्या सर्व कर्मचारी-अधिकाऱ्यांपासून सरकारपर्यंत सर्वांनी प्रामाणिकपणे काम करण्याची गरज आहे. एवढेच सांगून आणि आपण माझे विचार ऐकून घेतले त्याबद्दल सर्वांना धन्यवाद देऊन या पुरवणी मागण्यांना समर्थन देऊन माझे भाषण संपवितो.

जय भीम.

(यानंतर श्री. किल्लेदार)

अप्रधारित पत्र / प्रतिक्षार्थी नाही

श्री.विनोद तावडे (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, माननीय अर्थ राज्यमंत्री महोदयांनी माझे लक्ष वेधले म्हणून मी दोनच मुद्दे मांडणार आहे. आकस्मिकता निधीच्या संबंधात सगळेच चर्चा करत आहोत. आकस्मिकता निधीची मर्यादा 150 कोटीची होती . आता दोनदा अध्यादेश काढून ती रक्कम 800 कोटी पर्यन्त पोहोचलेली आहे. आता पुरवणी मागणी 936 कोटी म्हणजे जवळपास एक हजार कोटीपर्यन्तची आणलेली आहे. सन्माननीय श्री.पिचड साहेबांच्या अगस्ती आदिवासी,तालुका अकोला, जिल्हा अहमदनगर यांच्या आदिवासी सदस्यांना समभाग खरेदीसाठी व्याजमुक्त कर्ज रुपये 1 कोटी 56 लाख हे आकस्मिकता निधीतून देण्यात आलेले आहे, त्याकरिता पुरवणी मागणी करण्यात आलेली आहे. ही बाब आकस्मिकता निधीमध्ये बसते की नाही, याची मला माहिती नाही.

त्यानंतर सदगुरू दत्त धार्मिक एवं प्राथमिक ट्रस्ट, इंदोर यांना शेतकऱ्यांच्या आत्महत्या रोखण्यासाठी, धरतीपुत्र सेवा अभियान राबविण्यासाठी आकस्मिकता निधीतून रु.10 लाख 14 हजार रुपये देण्यात आले, त्यासाठी पुरवणी मागणी करण्यात आली . त्यानंतर चितळी डिस्टलरी मर्यादित, अहमदनगर या कंपनीने त्यांचे उत्पादन थांबविल्यामुळे व उत्पन्नाचे कोणतेही साधन नसल्यामुळे कर्मचाऱ्यांचे वेतन व भत्ते देण्यासाठी रु. 1 कोटी 69 लाख एवढे कर्ज आकस्मिकता निधीतून देण्यात आले. हा आकस्मिकता निधी आहे की पॉलिटिकल ॲसीलम निधी आहे ?

प्रा.जोगेंद्र कवाडे : माझा पॉईन्ट ऑफ इन्फर्मेशन आहे. आकस्मिकता निधीमधून कोणकोणत्या संस्थांना, व्यक्तींना आर्थिक मदत देण्यात आलेली आहे, याची माहिती पटलावर ठेवण्यात यावी, त्याबाबतचे नियम काय आहेत ? याबाबतची माहिती सभागृहाला मिळाली तर मला वाटते, फार चांगले होईल. 1 हजार कोटी पर्यन्त राज्याच्या आकस्मिकता निधीची रक्कम जाते, ही अतिशय चिंतेची बाब आहे.

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, , गृह विभागाच्या बाब क्रमांक 38 सबंधाने बोलावयाचे आहे. मांढरदेवीमध्ये यात्रेमध्ये चेंगराचेंगरी होऊन लोक मृत्युमुखी पडले, या घटनेला दोन वर्षाचा कालावधी झालेला आहे. अजून चौकशी समितीचा अहवाल आलेला नाही. या समितीला मुदवाढ दिलेली आहे, त्यासाठी तरतूद केलेली आहे. श्री.कोचर यांच्याकडे चौकशीचे काम दिलेले आहे.ते आणखी किती चौकशी समितीवर आहेत ? त्यांना या चौकशीचे काम पूर्ण करणे शक्य आहे काय ? त्याबाबतची माहिती घ्यावी. ज्या चौकशी समित्या नेमलेल्या आहेत, त्यांच्याकडून काही सुधारणा सुचविल्या जातील अशी अपेक्षा असते. अशाप्रकारच्या समित्यांना कालावधीचे बंधन घातले

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ SBT/ KTG/ MAP/

श्री.विनोद तावडे (पुढे सुरू.....

पाहिजे. मांढरदेवीची यात्रा पुढच्यावर्षी होत आहे. नाही तर पुन्हा चेंगराचेंगरीत पाच पन्नास लोक मरतील आणि पुन्हा समिती नेमावी लागेल. गृह विभागाकडून त्याबाबतचा पाठपुरावा होणार नसेल तर ती चिंतेची बाब आहे. याबाबत लक्ष घालावे.

त्यानंतर पान क्रमांक 277 बाब क्रमांक , महिला बाल कल्याणाच्या संबंधाने डोमेस्टीक व्हायोलेशनच्या संबंधात कायदा पारित झालेला आहे. त्यासाठी फक्त 1 लाख रुपयाची मागणी केली आहे. ही मागणी करीत असताना महिला व बाल विभागामध्ये कोणी माईन्ड अप्लाय करतो की नाही ? माननीय पंतप्रधान डॉ.मनमोहन सिंग आणि काँग्रेस अध्यक्षा श्रीमती सोनिया गांधी या नेहमी महिलांबाबत बोलत असतात. महिलांच्या कायद्याच्या अनुषंगाने पोस्टर्स लावली तर महिलांचा आत्मविश्वास वाढेल. एक लाख रुपयामध्ये काय होणार आहे ? याबाबत. संबंधित अधिकाऱ्यांनीही माईन्ड अप्लाय करण्याची गरज आहे. त्याचा विचार केला पाहिजे. डोमॅस्टीक व्हायोलन्सच्या संबंधाने राज्याने काही माईन्ड अप्लाय केलेले दिसत नाही. याबाबत खात्याने गंभीरपणाने विचार केला पाहिजे हे मला निदर्शनास आणून द्यावयाचे आहे.

यानंतर श्री.बरवड....

अप्रधारित प्रत / प्रतिक्षिप्त नाही

(सभापतीस्थानी माननीय उपसभापती)

श्रीमती उषाताई दराडे (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, या पुरवणी मागण्यांवर बोलत असताना प्रथम मी पृष्ठ क्रमांक 11 वरील बाब क्रमांक 15 च्या बाबतीत सांगू इच्छितो. पद्मविभूषण गोविंदभाई श्रॉफ प्रतिष्ठान यास सहाय्यक अनुदान देण्यासाठी तरतूद करण्यात आलेली आहे. पद्मविभूषण गोविंदभाई श्रॉफ प्रतिष्ठान ही सामाजिक संस्था औरंगाबादमध्ये आहे. हे प्रतिष्ठान मराठवाड्याचा इतिहास तयार करणार आहे. मराठवाड्याचा इतिहास ही तशी फार मोठी गोष्ट आहे. म्हणून या तरतुदीला माझा पाठिंबा आहे. हा पाठिंबा देत असताना मला विनंती करावयाची आहे की, ही तरतूद वाढविली पाहिजे. एवढ्या पैशामध्ये मराठवाड्याच्या इतिहासाचे काम होईल असे वाटत नाही. सभापती महोदय, पृष्ठ क्रमांक 11 वर बाब क्रमांक 16 मध्ये स्वातंत्र्य सानिकांना निवृत्तिवेतन देण्यासाठी अतिरिक्त तरतूद करण्यात आलेली आहे. पूर्वी 3 हजार रुपये निवृत्तिवेतन देत होतो. आता 4 हजार रुपये केलेले आहेत. ही रक्कम किमान 5 हजार रुपये करावी अशी मी मागणी करते.

सभापती महोदय, गृह विभागाच्या पृष्ठ क्रमांक 16, 17, 18 वर तसेच पुढच्या ज्या सर्व मागण्या आहेत त्यामध्ये गुप्त सेवांकरिता लागणाऱ्या अतिरिक्त तरतुदी असतील, रेल्वेच्या संदर्भातील तरतूद असेल, या सर्व तरतुदींना पाठिंबा देत असताना काही बाबी नमूद करु इच्छिते. एकंदर पोलीस यंत्रणेमध्ये काम करणारे सर्व पोलीस शिपाई, पोलीस जमादार यांची राहण्याची घरे, त्यांचे लिव्हींग स्टँडर्ड याचा कायमस्वरुपी गांभीर्याने विचार करण्याची गरज आहे. त्यांच्या तीन तीन वर्षांनी होणाऱ्या बदल्या, अनेक वर्षांपूर्वी बांधलेली त्यांची रेल्वेच्या बोगीसारखी घरे याचा विचार झ ाला पाहिजे. त्यांच्यासाठी क्रीडा संकुल तसेच लॅब नाही. त्यांना कसल्याही सेवा सुविधा देण्याचा प्रयत्न केला जात नाही. याचा कायमस्वरुपी गांभीर्याने विचार करावा.

सभापती महोदय, पर्यावरणाच्या संदर्भात पृष्ठ क्रमांक 21 वर बाब क्रमांक 39 मध्ये मराठवाडा विकास कार्यक्रमांतर्गत पर्यटनाच्या विकासासाठी जी तरतूद केलेली आहे त्यामध्ये थोडेसे स्पष्टीकरण व्हावयास पाहिजे. मराठवाड्यातील बीड असेल, माजलगाव प्रकल्प असेल, नायगाव मयूर अभयारण्य असेल, अशा स्थळाचा पर्यटन स्थळ म्हणून विकास करण्यासाठी लक्ष द्यावे आणि त्यादृष्टीने जाणीवपूर्वक प्रयत्न व्हावेत अशी विनंती करते.

...2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ SBT/ KTG/ MAP/

श्रीमती उषाताई दराडे ....

सभापती महोदय, पृष्ठ क्रमांक 35 वर नैसर्गिक आपत्तीपासून बाधित झालेल्या व्यक्तींकरिता अतिरिक्त तरतूद करण्यासाठी तरतूद केलेली आहे. यासंदर्भामध्ये ज्या तरतुदी आहेत त्या सर्व तरतुदींना मी पाठिंबा देते. परंतु गोदावरी नदीमध्ये जे अधिकचे पाणी सोडले त्यामध्ये 3 लाख क्युसेक पर्यंत पाणी होते असे सांगितले जाते. त्यामुळे गोदावरीकाठच्या लोकांचे नुकसान झालेले आहे. त्यांचे पुनर्वसन करीत असताना त्या ठिकाणची जी पूर नियंत्रण रेषा आहे त्या रेषेचा परत सर्व्हे करण्यासाठी वेगळी तरतूद करावी आणि तो प्रयत्न कायमचा मिटविण्याचा प्रयत्न करावा अशी मी सूचना करते.

सभापती महोदय, मराठवाडा कृषी विद्यापीठाच्या संदर्भात पृष्ठ क्रमांक 49 वर जी बांधकामे सुचविलेली आहेत त्यामध्ये लातूर असेल, बदनापूर असेल, आंबेजोगाई असेल, उस्मानाबाद असेल त्यासाठी केलेल्या मागण्या मराठवाड्याचा बॅकलॉग दूर करण्याच्या दृष्टीने योग्य आहेत. त्या मागण्यांना माझा पाठिंबा आहे.

सभापती महोदय, पृष्ठ क्रमांक 64 वर स्काऊटस् अँड गाईडस् च्या संदर्भात पुरवणी मागणी केलेली आहे. त्यामध्ये एकूण खर्चाच्या 90 टक्के रक्कम मिळणार आहे ती रक्कम 100 टक्के करावी. त्याबाबत गांभीर्याने विचार करावा अशी मी सभागृहाला विनंती करते. सभापती महोदय, पृष्ठ क्रमांक 123 आणि आणखी तीन चार पृष्ठांवर जलसंपदा विभागाच्या ज्या पुरवणी मागण्या आहेत त्यांना मी पाठिंबा देते.

सभापती महोदय, पृष्ठ क्रमांक 197 वर बाब क्रमांक 267 मध्ये परभणी व नेकनूर, जिल्हा बीड येथील महिला रुग्णालयासाठी पुरवणी मागणी केलेली आहे. नेकनूर येथील महिला रुग्णालय आज अशा ठिकाणी आहे की, ज्या ठिकाणाहून बीड किंवा आंबेजोगाई येथे जाण्यास वेळ लागतो. त्यामुळे हे रुग्णालय चांगल्या पध्दतीने डेव्हलप करावे. त्या ठिकाणी चांगल्या सुविधा देणे आवश्यक आहे. त्या ठिकाणी जो आठवडी बाजार भरतो त्या बाजारामध्ये त्या परिसरातील 82 गावाचे लोक येतात. ते जिल्ह्यातील फार मोठे डेव्हलपींग सेंटर आहे. यासंदर्भात शासनाने विचार करावा.

यानंतर श्री. शिगम ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती उषाताई दराडे...

पृक्र. 277 वरील बाब क्रमांक 380 अंतर्गत महाराष्ट्र राज्य महिला आयोगासाठी तरतूद करण्यात आलेली आहे. या विषयाकडे फार गांभीर्याने पाहाण्याची आवश्यकता आहे. राज्य महिला आयोग किंवा आर्थिक विकास महामंडळ यांची कामे ही महिला व बाल कल्याण खात्या मार्फत पाहिली जातात. मी मागील 5 वर्षे राज्य महिला आयोगाची सदस्य होते. त्यावेळी श्रीमती निर्मळा प्रभावळकर ह्या आयोग्याच्या अध्यक्षा होत्या. या महिला आयोगाला स्वत:च्या कर्मचा-यांचे पगार आणि सदस्यांचे भत्ते कसे द्यावेत याची विवंचना असते. संपूर्ण राज्यामध्ये कौन्सिलिंग सेंटर्स् चालविली जातात. त्यासाठी पंचायती राज संस्थांकडे बघावे लागते, तसेच स्पॉन्सरर्स शोधावे लागतात. महिला आयोगासाठी करण्यात आलेली तरतूद ही कमी असून त्यामध्ये वाढ करण्याची गरज आहे.

पृ.क्र. 196 वरील आरोग्य खात्याच्या बाबींकडे मी शासनाचे लक्ष वेधून सांगू इच्छिते की, आमच्या बीड जिल्ह्यातील पोहोनेर आणि शिरसाळा ही प्राथमिक आरोग्य केन्द्रे इतक्या दुरवस्थेत आहेत की तेथे डॉक्टरही बसायला घाबरतात आणि रुग्ण येण्यास भीतात. या प्राथमिक आरोग्य केन्द्रासाठी मागणी का आली नाही, असा प्रश्न मला पडलेला आहे. या प्राथमिक आरोग्य केन्द्रांची तातडीने दुरुस्ती करावी अशी मी या निमित्ताने मागणी करते.

उपसभापती महोदय,महिलांच्या संदर्भात डोमेस्टिक व्हॉयोलन्स बिल हे पारित केलेले आहे.याबाबतीत कशा पध्दतीने कार्यावाही होणार आहे ? या संदर्भातील तरतूद वाढवावी अशी मी विनंती करते आणि माझे भाषण संपविते..

===2==

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. केशवराव मानकर (महाराष्ट्र विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, पृ.क्र 113 वरील जलसंपदा विभागाच्या मागण्यांकडे मी माननीय मंत्री महोदयांचे लक्ष वेधू इच्छितो. शिरपूर, पुजारी टोला आणि कालिसरा या तीन प्रकल्पांसाठी अर्थसंकल्पामध्ये 10 लाख रु.ची तरतूद केलेली आहे. एवढ्या मोठ्या कॅनॉल प्रोजेक्टसाठी 350 लाख रुपयाची तरतूद करावी अशी मी या निमित्ताने मागणी करुन माझे दोन शब्द संपवितो.

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. राजन तेली (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, पूरवणी मागण्यांवर बोलत असताना पृ.क्र. 35 आणि 36 वरील बाब क्रमांक 55 आणि 56 कडे मी शासनाचे लक्ष वेधित आहे. कोकणातील सिंधुदुर्ग आणि रत्नागिरी जिल्ह्यांमध्ये नैसर्गिक आपत्तीच्यावेळी केवळ तात्पुरत्या सुधारणा शासना मार्फत केल्या जातात. अतिवृष्टीमध्ये सिंधुदुर्ग जिल्ह्यातील गावे जेव्हा बाधित होतात त्यावेळी त्या गावांसाठी तात्पुरत्या स्वरुपाची सोय केली जाते.याबाबतीत मी एक उदाहरण देऊ इच्छितो. आमच्या कुडाळ तालुक्यातील चंदनवड गावाला पावसाळ्यामध्ये पूर येत असतो. हे गाव चार-पाच दिवस पुराने वेढलेले असते. या लोकांची त्या गावातून बाहेर पडण्याची मानसिकता नसते. या गावातील लोकांची अशा पुराच्या वेळी आजुबाजूलाच कोठे तरी सोय व्हावी एवढीच मागणी असते. त्यासाठी बोट मिळावी अशी त्यांची मागणी आहे. मला वाटते 5-10 लाख रुपयामध्ये ही त्यांची मागणी पूर्ण होऊ शकेल. परंतु या दृष्टीकोनातून शासन कधी लक्ष देत नाही. या गावातील बाधित लोक पुनर्वसनासाठी तयार होत नाहीत. सिंधुदुर्ग जिल्ह्यामध्ये अशी एकूण 78 गावे आहेत. अशा गावातील लोकांच्या छोटया-मोठ्या मागण्या पूर्ण केल्या तर त्या गावांकडे पुन्हा शासनाला लक्ष देण्याची गरज भासणार नाही.

सभापती महोदय, कोकणामध्ये ज्या काही नद्या नाले आहेत त्यामधील गाळ काढण्याचे प्रयत्न आजवर कधी झालेले नाहीत. गाळ न काढल्यामुळे अतिवृष्टीमध्ये पूर येतो, शेतीचे नुकसान होते, तसेचे जिवित व वित्त हानी होते. तेव्हा हा प्रश्न देखील कायमस्वरुपी कसा संपेल यादृष्टीने शासनाने प्रयत्न करावेत.

...नंतर श्री. गागरे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.राजन तेली ..... (पुढे सुरु)

मी बाब क्रमांक 39, पृष्ठ क्रमांक 21 कडे लक्ष वेधीत आहे. सिंधुदुर्ग जिल्हयाला देशातील एकमेव पर्यटन जिल्हा म्हणून ओळखले जाते. त्या ठिकाणी योग्य त्या सुविधा पूर्ण करण्यासाठी पुरवणी मागण्यामध्ये कोठेही तरतूद केलेली दिसत नाही. या जिल्हयामध्ये छत्रपती शिवाजी महाराजांचे 33 किल्ले आहेत. या किल्ल्याकडे जाणारे रस्ते असुविधाजनक आहेत ते पूर्ण करण्याच्या संदर्भात मंत्री महोदयांनी निर्देश द्यावेत.

दाजीपूर येथे अभयारण्य आहे, हा भाग पर्यटनाच्या दृष्टीने सिंधुदुर्ग जिल्हयात येणे आवश्यक आहे.

बाब क्र.124, पृष्ठ क्र.186 बांधकाम विभागासंबंधी आहे. कोकण तटावरील सागरी महामार्ग 2-3 वर्षात पूर्ण होण्याच्या दृष्टीने आणि ॲप्रोच रोड व ब्रिजेस शिल्लक राहिले आहेत, ते पूर्ण करण्यासाठी या पुरवणी मागणीमध्ये मला काही विशेष उल्लेख दिसत नाही.

ओरस येथील 25 सुटचे गेस्ट हाऊस बांधून पूर्ण झाले आहे, येथे फक्त फर्निचर नाही, याबाबत पुर्तता करण्यात यावी. वैभववाडी येथील इमारतही प्रशस्त आहे, फर्निचर नसल्यामुळे सुरु करण्यात आलेले नाही. याबाबत पुर्तता करण्यात यावी.

कोकणातील 60 टक्केपेक्षा जास्त रस्ते जिल्हा परिषदेकडे आहेत. 15 ते 20 टक्के रस्ते सार्वजनिक बांधकाम विभागाकडे आहेत. परंतु जास्तीत जास्त पैसे सार्वजनिक बांधकाम विभागाकडे जातात. जिल्हा परिषदेच्या रस्त्यांकडे दुर्लक्ष केले जात आहे. या रस्त्यांकडे दुर्लक्ष होऊ नये म्हणून विचार करणे गरजेचे आहे.

कोल्हापूरला जोडणारा खोडगे-सोनले धाट करण्यासाठी 25 वर्षापासून मागणी आहे, सदरहू घाटाचे अपूर्ण काम पूर्ण करण्यासाठी प्रयत्न करण्याची गरज आहे.

बाब क्र.257 पृष्ठ 186 नियोजन विभागाच्या जवाहर विहीरीच्या संदर्भात मी बोलत आहे. 3-3 वर्ष प्रयत्न झाले तरी याबाबत निधी मिळण्याचे बाकी आहे. याबाबत सिंधुदुर्ग जिल्हयासाठी पुरेशी तरतूद केलेली नाही.

बाब क्र.157 पृष्ठ 125 जिल्हा परिषदेच्या बाबतीत नातवंडे या धरणाचे काम सुरु आहे. येथील कालव्याचे काम सुरु झालेले नाही. ही सुरुवात होणे महत्वाचे आहे. मोठया व मध्यम पाटबंधारे प्रकल्प दुरुस्तीसाठी कमी तरतूद दाखविली आहे, ही तरतूद वाढविण्याबाबत मंत्रीमहोदयांनी जाहीर करावे. 2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

PNG/ SBT/ MAP/

श्री.राजन तेली ..... (पुढे सुरु)

बाब क्र.269 व 270 पृष्ठ क्र.200 सार्वजनिक आरोग्य विभागाच्या तरतूदीविषयी बोलत आहे. वर्ग-1 ची 14 पदे, तसेच वर्ग 2, वर्ग-3, वर्ग-4 ची बरीच पदे रिक्त आहेत. प्राथमिक आरोग्य केंद्रास 7 वर्षापासून इमारत नाही, पुरेसे डॉक्टर्स नाहीत. कनकवली येथे ब्लड स्टोअर मागितले आहे. मागच्या वेळी कनकवली परीसरात मोठया प्रमाणावर साथीचे रोग आले होते. सिंधुदुर्ग जिल्हयात प्राथमिक आरोग्य केंद्र आहे, काही केंद्रात डॉक्टर्स नाही व औषधांचा तुटवडा मोठया प्रमाणावर आहे.

बाब क्र.372 व 373 पृष्ठ क्र.272 औद्योगिक प्रशिक्षण संस्थेबाबत बोलत आहे. सिंधुदुर्ग जिल्हा पर्यटन जिल्हा म्हणून घोषीत झालेला आहे. आय.टी.आय. मध्ये पुरेसा स्टाफ नाही, येथे पर्यटनासंबंधी विषय सुरु झाले पाहिजेत, पण याचे शिक्षक नसल्यामुळे विद्यार्थ्यांना प्रवेश देता येत नाही. फोंडा, सावंतवाडी, ओरस येथील आय.टी.आय. मध्ये ही परिस्थिती निर्माण झालेली आहे.

मी उल्लेख केलेल्या मागण्यांचा निश्चित विचार करुन त्यासाठी तरतूद करावी अशी मी मागणी करतो व मी पुरवणी मागण्यांचे समर्थन करतो.

..... यानंतर श्री.सोनवणे

अधिकृत पत्र / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. कपिल पाटील (मुंबई शिक्षक) : सन्माननीय सभापती महोदय, पुरवणी मागण्यांना पाठिंबा देत असताना काही आक्षेपार्ह बाबींकड मी आपले लक्ष वेधू इच्छितो, सन्माननीय सदस्य श्री. विनोद तावडे यांनी एका ठळक बाबीकडे लक्ष वेधले त्याला माझा पाठिंबा आहे. शेतकऱ्यांच्या आत्महत्या होत असताना बुवा आणि महाराजांकडे जाण्यासाठी सरकार पैसे खर्च करीत असेल तर त्याला कडाडून विरोध केला पाहिजे. कोण इंदोरचा भैयाजी महाराज त्याला पैसे द्यावयाचे, महाराजांना असली कामे करावयाची असतील तर त्यांनी लोक वर्गणीतून करावीत, स्वत:च्या पैशावर करावीत, सरकारच्या पैशावर डोळा ठेऊन आणि पुरवणी मागण्यांवर डोळा ठेऊन असले उद्योग करु नयेत याची गंभीर दखल शासनाने घेतली पाहिजे. आता माननीय श्री. हंडोरे साहेब बील मांडण्यासाठी येणार आहेत. एका बाजूला जादुटोणा बील मांडण्यासाठी आपण आग्रह धरीत आहोत आणि दुसऱ्या बाजूला जादुटोणा करण्यासाठी आपण 10 लाख रुपये काढून देतो. ही अत्यंत आक्षेपार्ह बाब आहे याची नोंद शासनाने घेतली पाहिजे.

शालेय शिक्षण विभागाची बाब क्रमांक 60-61-62 आणि बाब क्रमांक 89,90, 93 ते 96 या बाबींवर मला शिक्षण मंत्र्यांचे लक्ष वेधावायाचे आहे. नैसर्गिक वाढीमुळे ज्या तुकडया वाढतात त्यांना अनुदान दिले गेल पाहिजे कारण एका शाळेमध्ये आपण जी विषम व्यवस्था निर्माण करतो आणि त्यातून नको ते परिणाम आपल्याला भोगावे लागतात. यासाठी फार खर्च वाढणार नाही. एका बाजूला सरप्लस होणारे शिक्षक, कमी होणाऱ्या तुकडया त्या जरी आपण तेथे रिप्लेस केल्या तर ही मागणी आपल्याला पूर्ण करता येऊ शकेल. शालेय पोषण आहाराच्या निमित्ताने मागणी करण्यात आली आहे. प्राथमिक शाळेतील मुलांसाठी प्रामुख्याने योजना आहेत. पण रात्रशाळेतील मुले ही कष्टकरी विद्यार्थी आहेत. सातवी ते दहावीतील शिक्षण घेणारी मुले आहेत. यांना रात्रीच्या वेळी थकून आल्यानंतर किमान चहाची तरी सुविधा दिली पाहिजे. शक्य नसेल तर निर्वाह भत्ता सुरु केला पाहिजे अन्यथा जी मुले शिकू पहातात त्यांच्या शिक्षणासाठी आपण काही करु शकलो नाही तर त्यातून गळतीचे प्रमाण वाढते.

बाब क्रमांक 98 पृष्ठ क्रमांक 63 संगणक अभ्यासक्रम माहिती तंत्रज्ञान यासाठी आपण भरीव तरतूद करु पहात आहोत. रात्र शाळांसाठी संगणक शिक्षण आपण उपलब्ध करु शकला तर त्यातून संगणक शिक्षणासाठी व या शाळांचा दर्जा वाढण्यासाठी, निकाल वृध्दीसाठी त्याचा उपयोग होऊ शकेल.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. कपिल पाटील.....

बाब क्रमांक 357 उच्च शिक्षण डोंगरी भागातील काही तालुक्यांमध्ये महाविद्यालये नाहीत, कॉलेज नाहीत. महाविद्यालयांना पहिल्या वर्षापासून पूर्ण 100 टक्के अनुदान देण्याचा शासनाचा निर्णय असताना अनेक अशा पात्र महाविद्यालयांना वर्षानुवर्षे वाट पहावी लागते त्यांना तातडीने अनुदान दिले गेले पाहिजे. त्यांना मागील 7 ते 8 वर्षात कोणतेही अनुदान दिलेले नाही. पहिल्या वर्षापासून ते दिले पाहिजे. त्यांचे अनुदान थांबवून ठेवले आहे.

पृष्ठ क्रमांक 269 वर उच्च शिक्षण विभागाची दुसरी एक मागणी आहे. बाब क्रमांक 361 किमान कौशल्यावर आधारीत जे अभ्यासक्रम शासनाने सुरु केलेले आहेत त्या अभ्यासक्रमाची फार दूरावस्था या राज्यामध्ये आहे. शिक्षकांचा व द्विशिक्षकांचा प्रश्न आहे. समान वेतनश्रेणी पासून विद्यार्थ्यांना पुढील उच्च शिक्षणाची संधी दिली पाहिजे. डी.एड व ॲग्रीकल्चरच्या ॲडमिशनचा विषय आहे. हे सगळे विभाग उच्च शिक्षण विभागाकडून शालेय शिक्षण विभागाकडे दिले तर बहुसंख्य प्रश्न सुटू शकतात. गरीब वर्गाशी निगडीत प्लस-2 स्तरावतील अभ्यासक्रम आहे त्यामुळे शासनाने याकडे लक्ष दिले पाहिजे ती बालवाडयांच्या संदर्भातील बाब आहे. बाब क्रमांक 89 च्या बाबतीत जिल्हापरिषदांच्या शाळांमध्ये बालवाडया सुरु आहेत. आता मात्र इतरत्र बालवडयांचे अनुदान थांबलेले आहे. अंगणवाडयाच्या संदर्भात सन्माननीय सदस्या श्रीमती फौजीया खान यांनी मुद्दा उपस्थित केला. तो जर अंगणवाडयांबद्दल शासनाचा दृष्टीकोन असेल तर तो घातक आहेच त्याही पेक्षा याचा दुसरा अर्थ बालवाडी शिक्षण हे आवश्यक आहे. याची निर्मिती महाराष्ट्राने केली आहे.

यानंतर श्री. भोगले.....

अप्रधारित प्रश्न / परिशिष्टासाठी नाही

श्री. सिध्दाराम म्हेत्रे (गृह राज्यमंत्री) : सन्माननीय सभापती महोदय, गृहविभागाच्या पुरवणी मागण्यावर एकूण 11 सन्माननीय सदस्यांनी भाग घेऊन उत्तम प्रकारे चर्चा केलेली आहे. या चर्चेमध्ये प्रामुख्याने गुप्त सेवा, सागरी किनारा व्यवस्था, पोलीस क्वार्टरची दुरुस्ती, महिला पोलीस स्टेशन, पोलिसांचे गणवेष/ बुट, दहशतवाद विरोधी पथक, नवीन पोलीस भरती प्रशिक्षण, कोचर समितीचा अहवाल तसेच 517 पीएसआय आणि एपीआय यांचे प्रमोशन तसेच सायबर क्राईम/वेतनवाढी संदर्भात सन्माननीय सदस्यांनी विचार व्यक्त केलेले आहेत. सन्माननीय सदस्य श्री. जयंत पाटील साहेबांनी सागरी किनाराव्यवस्थे बद्दल प्रश्न उपस्थित केलेले आहेत. सागरी किनारा व्यवस्था बळकट करण्यासाठी केंद्र शासनाच्या मदतीने योजना राबविण्यात येत आहे. या योजनेअंतर्गत सागरी किनारा पोलीस ठाणी निर्माण केली जाणार आहेत. त्यासाठी आवश्यक असणारे बल राज्य शासनाने उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे. केंद्र शासन यासाठी आवश्यक असणा-या इमारती बांधून देणार आहे. शिवाय पोलीस ठाणयासाठी आवश्यक असणारी साधनसामुग्री तसेच अद्यावत बोटी उपलब्ध करुन `दणार आहे. राज्य शासनाने यासाठी 17 फेब्रुवारी, 2006 रोजी 777 पदे उपलब्ध करुन दिलेली आहेत.

सन्माननीय सदस्य श्री. अरविंद सावंत यांनी पोलिसांच्या वेतनवाढीच्या संदर्भात विचार व्यक्त केलेले आहेत. मंत्रीमंडळाने पोलीस दलातील कर्मचा-याचे वेतन वाढविण्याच्या संदर्भात निर्णय घेतला आहे. पोलीस शिपार्याला पूर्वी 3050/ वेतन होते आता ते 3200 + 500 रुपये विशेष वेतन दिले जात आहे. पोलीस नाईक यांना पूर्वी रु. 4000-6000 वेतन होते आता त्यांना 200 रुपये विशेष वेतन दिले जात आहे. पोलीस हवालदार यांना पूर्वी 4000-6000 + 200 विशेष वेतन दिले जात होते परंतु आता 300 रुपये विशेष वेतन दिले जात आहे. याप्रमाणे वेतनात सुधारणा केल्यामुळे शासनावर 111 कोटी रुपये वार्षिक भार पडणार आहे. मंत्रीमंडळाच निर्णयाप्रमाणे आदेश तयार करुन त्यास मान्यता देण्याची वित्त विभागाला विनंती केलेली आहे.वित विभागाने शासकीय निवास स्थानात राहणा-या कर्मचा-यांना भरावा लागणा-या अनुज्ञाप्ती शुल्काचे दर वेतनमार्यादा विचारात घेऊन दि. 21.9.2006 रोजी सुधारले आहेत. तथापि हा शासन निर्णय भाडेमाफ निवासस्थानास पात्र असलेल्याकर्मचा-यांना लागू होणार नाही असा खुलासा वित्त विभागाने केला आहे. त्यानुसार परिपत्रक र्निमीत करणारी कार्यवाही केली जाणार आहे. त्यामुळे पोलिसांच्या पगारावर कोणताही परिणाम होणार नाही.

....2

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, सन्माननीय मंत्रीमहोदय, सांगत आहेत की, पोलिसांचा पगार वाढलेला आहे परंतु मला ब-याच पोलिसांनी सांगितले आहे की, आमचे पगार 500 रुपयांनी वाढले असून 460 रुपये कापून घेतले जात आहेत.

श्री. सिध्दाराम म्हेत्रे : ठीक आहे. तशी वस्तुस्थिती असेल तर ती बाब तपासून योग ती कार्यवाही करण्यात येईल.

सभापती महोदय, गुप्तसेवेच्या संदर्भात 3-4 सन्माननीय सदस्यांनी आपले विचार या ठिकाणी व्यक्त केलेले आहेत. गुप्तसेवा निधीसाठी बाब क्रमांक 21 मध्ये रु. 4.5 कोटी रुपये उपलब्ध करुन देण्यात आलेले आहेत. या निधीचा ऑडीट होत नाही तसेच यासंदर्भात ऑडीट करण्याची तरतूद देखील नाही. या विषयावर अधिक चर्चा करणे उचित नाही. गुप्त कामांसाठी व खब-यांकडून खबर मिळविण्यासाठी याचा उपयोग करावयाचा आहे. एखाद्या खब-याल किती पैसे दिले किंवा त्याचा हिशेब ठेवला, ते पैसे कोणत्या अधिका-याने दिले हे उघड केले तर दोघांच्या जिविताला धोका उदभवू शकतो त्यामुळे यासंदर्भात अधिक माहिती उघड करणे हे बरोबर होणार नाही.

सभापती महोदय, पोलिसांसाठी बांधण्यात आलेलया जीर्ण व दुरावस्थेत असीलेल्या जुन्या इमारतीची दुरुस्ती करण्यासाठी रु. 126 कोटी रुपयांचा प्रकल्प कार्यक्रम केला असून यासाठी सन 2006-2007 मधील अंदाजपत्रकातच रु. 43 कोटींची तरतूद करण्यात आली आहे.

यानंतर श्री. अजित.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सिध्दाराम म्हेत्रे (गृह राज्यमंत्री) : सन्माननीय सभापती महोदय, गृहविभागाच्या पुरवणी मागण्यावर एकूण 11 सन्माननीय सदस्यांनी भाग घेऊन उत्तम प्रकारे चर्चा केलेली आहे. या चर्चेमध्ये प्रामुख्याने गुप्त सेवा, सागरी किनारा व्यवस्था, पोलीस क्वार्टरची दुरुस्ती, महिला पोलीस स्टेशन, पोलिसांचे गणवेष/ बूट, दहशतवाद विरोधी पथक, नवीन पोलीस भरती प्रशिक्षण, कोचर समितीचा अहवाल तसेच 517 पीएसआय आणि एपीआय यांचे प्रमोशन तसेच सायबर क्राईम/वेतनवाढी संदर्भात सन्माननीय सदस्यांनी विचार व्यक्त केलेले आहेत. सन्माननीय सदस्य श्री. जयंत पाटील साहेबांनी सागरी किनाराव्यवस्थे बद्दल प्रश्न उपस्थित केलेले आहेत. सागरी किनारा व्यवस्था बळकट करण्यासाठी केंद्र शासनाच्या मदतीने योजना राबविण्यात येत आहे. या योजनेअंतर्गत सागरी किनारा पोलीस ठाणी निर्माण केली जाणार आहेत. त्यासाठी आवश्यक असणारे बल राज्य शासनाने उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे. केंद्र शासन यासाठी आवश्यक असणा-या इमारती बांधून देणार आहे. शिवाय पोलीस ठाणेयासाठी आवश्यक असणारी साधनसामुग्री तसेच अद्यावत बोटी उपलब्ध करुन `दणार आहे. राज्य शासनाने यासाठी 17 फेब्रुवारी, 2006 रोजी 777 पदे उपलब्ध करुन दिलेली आहेत.

सन्माननीय सदस्य श्री. अरविंद सावंत यांनी पोलिसांच्या वेतनवाढीच्या संदर्भात विचार व्यक्त केलेले आहेत. मंत्रीमंडळाने पोलीस दलातील कर्मचा-याचे वेतन वाढविण्याच्या संदर्भात निर्णय घेतला आहे. पोलीस शिपार्याला पूर्वी 3050/ वेतन होते आता ते 3200 + 500 रुपये विशेष वेतन दिले जात आहे. पोलीस नाईक यांना पूर्वी रु. 4000-6000 वेतन होते आता त्यांना 200 रुपये विशेष वेतन दिले जात आहे. पोलीस हवालदार यांना पूर्वी 4000-6000 + 200 विशेष वेतन दिले जात होते परंतु आता 300 रुपये विशेष वेतन दिले जात आहे. याप्रमाणे वेतनात सुधारणा केल्यामुळे शासनावर 111 कोटी रुपये वार्षिक भार पडणार आहे. मंत्रीमंडळाच निर्णयाप्रमाणे आदेश तयार करुन त्यास मान्यता देण्याची वित्त विभागाला विनंती केलेली आहे.वित विभागाने शासकीय निवासस्थानात राहणा-या कर्मचा-यांना भरावा लागणा-या अनुज्ञाप्ती शुल्काचे दर वेतनमार्यादा विचारात घेऊन दि. 21.9.2006 रोजी सुधारले आहेत. तथापि हा शासन निर्णय भाडेमाफ निवासस्थानास पात्र असलेल्या कर्मचा-यांना लागू होणार नाही असा खुलासा वित्त विभागाने केला आहे. त्यानुसार परिपत्रक निर्गमीत करणारी कार्यवाही केली जाणार आहे. त्यामुळे पोलिसांच्या पगारावर कोणताही परिणाम होणार नाही.

....2

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, सन्माननीय मंत्रीमहोदय, सांगत आहेत की, पोलिसांचा पगार वाढलेला आहे परंतु मला ब-याच पोलिसांनी सांगितले आहे की, आमचे पगार 500 रुपयांनी वाढले असून 460 रुपये कापून घेतले जात आहेत.

श्री. सिध्दाराम म्हेत्रे : ठीक आहे. तशी वस्तुस्थिती असेल तर ती बाब तपासून योग्यती कार्यवाही करण्यात येईल.

सभापती महोदय, गुप्तसेवेच्या संदर्भात 3-4 सन्माननीय सदस्यांनी आपले विचार या ठिकाणी व्यक्त केलेले आहेत. गुप्तसेवा निधीसाठी बाब क्रमांक 21 मध्ये रु. 4.5 कोटी रुपये उपलब्ध करुन देण्यात आलेले आहेत. या निधीचा ऑडीट होत नाही तसेच यासंदर्भात ऑडीट करण्याची तरतूद देखील नाही. या विषयावर अधिक चर्चा करणे उचित नाही. गुप्त कामांसाठी व खब-यांकडून खबर मिळविण्यासाठी याचा उपयोग करावयाचा आहे. एखाद्या खब-याल किती पैसे दिले किंवा त्याचा हिशेब ठेवला, ते पैसे कोणत्या अधिका-याने दिले हे उघड केले तर दोघांच्या जिविताला धोका उदभवू शकतो त्यामुळे यासंदर्भात अधिक माहिती उघड करणे हे बरोबर होणार नाही.

सभापती महोदय, पोलिसांसाठी बांधण्यात आलेलया जीर्ण व दुरावस्थेत असीलेल्या जुन्या इमारतीची दुरुस्ती करण्यासाठी रु. 126 कोटी रुपयांचा प्रकल्प कार्यक्रम केला असून यासाठी सन 2006-2007 मधील अंदाजपत्रकातच रु. 43 कोटींची तरतूद करण्यात आली आहे.

यानंतर श्री. अजित.....

अप्रधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सिध्दाराम म्हेत्रे.....

ती संबंधित अधीक्षक अभियंता यांचेकडे खर्चासाठी सुपूर्द केलेली आहे.

सभापती महोदय,पोलिसांच्या गणवेषाबाबत येथे मुद्दे उपस्थित करण्यात आले. पोलिसांच्या गणवेषासाठी लागणारे कापड हे महाराष्ट्र राज्य यंत्रमाग महामंडळाकडून खरेदी केले जाते.

माननीय न्यायमूर्ती श्री.कोचर हे किती व कोणकोणत्या समित्यांवर आहेत अशी विचारणा झाली. त्यासंबंधातील माहिती घेऊन ती पटलावर ठेवण्यात येईल. मांढरदेवी प्रकरणी मार्च अखेर अहवाल अपेक्षित आहे.

पोलिसांच्या बुटांची खरेदी करण्याबाबतचा मुद्दा उपस्थित करण्यात आला. त्याबाबत सांगू इच्छितो की, सध्याच्या धोरणानुसार पोलीसदलासाठी लागणारी पादत्राणे खुल्या बाजारातून निविदा मागवून खरेदी करण्यात येतात. पोलीस विभागाकडून ठरविण्यात आलेल्या गुणवत्तेनुसार व स्पर्धात्मक भावानुसार लीडकॉम व कारागृहे यांची उत्पादन क्षमता विचारात घेऊन ऑर्डर दिली जाते व उर्वरित पादत्राणांची खुल्या बाजारातून निविदाद्वारे खरेदी केली जाते.

श्री.अरविंद सावंत : सभापती महोदय, पोलिसांच्या बुटाची खरेदी बाटा कंपनीकडून करण्यात यावी. ते जर शक्य नसेल तर चर्मोद्योग महामंडळाकडून ही खरेदी करण्यात यावी.

श्री.सिध्दाराम म्हेत्रे : सन्माननीय सदस्य प्रा.जोगेंद्र कवाडे यांनी पी.आय.च्या प्रमोशनबद्दल मुद्दा उपस्थित केला होता. त्या संदर्भातील प्रकरण न्यायालयात प्रलंबित आहे. या संदर्भात शासनाने त्यांचे म्हणणे मांडावे असे न्यायालयाने सांगितलेले आहे. शासन आपले म्हणणे लवकरात लवकर मांडणार आहे. सन्माननीय सदस्यांनी उपस्थित केलेल्या सर्व मुद्दांचा मी परामर्ष घेतलेला आहे. माझी सभागृहाला विनंती आहे की, गृह विभागाच्या पुरवणी मागण्या मंजूर कराव्यात.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयप्रकाश दांडेगावंकर (सहकार, पणन वस्त्रोद्योग, व्यसनमुक्ती कार्य राज्यमंत्री) : सभापती महोदय, सहकार, वस्त्रोद्योग व पणन या विभागाच्या मागण्यांवरील सन्माननीय सदस्य सर्वश्री जयंत प्र.पाटील, मधुकर चव्हाण, नितीन गडकरी, डॉ.वसंत पवार, प्रा.जोगेंद्र कवाडे, डॉ.नीलम गोऱ्हे आणि श्रीमत सुधा जोशी यांनी चर्चेत भाग घेतला. त्याबद्दल मी त्यांना मनापासून धन्यवाद देतो.

सन्माननीय सदस्य श्री.जयंत प्र.पाटील यांनी भूविकास बँक चालू करण्याबाबतची सूचना केली. वैद्यनाथन समितीने अल्पमुदतीच्या परताव्याबाबतीतील शिफारशी सरकारने स्वीकारलेल्या आहेत. दीर्घमुदतीच्या परताव्याबाबतीत वैद्यनाथन समितीची बैठक चालू आहे. भूविकास बँकेबाबत दोन वेळा चर्चा झालेली आहे. त्याबाबत अंतिम निर्णय झाल्यानंतर भूविकास बँकेच्या पुनरूज्जीवनाबाबत कार्यवाही करता येईल.

सन्माननीय सदस्य श्री.मधुकर चव्हाण यांनी वस्त्रोद्योगावर जादा मागण्या झालेल्या आहेत असे सांगितले. त्याबाबत त्यांना सांगू इच्छितो की, कापूस या राज्याचा प्रमुख घटक आहे. त्यामुळे वस्त्रोद्योगाच्या मागण्या जास्त वाटत असल्या तरी त्या न्याय्य मागण्या आहेत.

सन्माननीय सदस्य श्री.नितीन गडकरी व डॉ.नीलम गोऱ्हे यांनी शेतकऱ्यांकडून आकारण्यात येणाऱ्या व्याजाबाबतचा मुद्दा उपस्थित केला. त्यांनी सांगितले की, सहा जिल्ह्यांनाच याचा फायदा मिळतो इतर जिल्ह्यांना फायदा मिळत नाही. याबाबत नमूद करु इच्छितो की, चालू वर्षात सर्वच ठिकाणी सहा टक्के व्याजदर आकारण्यात येणार आहे. यामध्ये सहकारी बँक असो, राष्ट्रीयकृत बँक असो, त्यांना शेतकऱ्यांना सहा टक्के दराने कर्ज पुरवठा करण्याच्या सूचना दिलेल्या आहेत आणि त्याप्रमाणे कार्यवाही करण्यात येईल. सन्माननीय सदस्य श्री.नितीन गडकरी यांनी शेतकऱ्यांच्या व्याजमाफीमध्ये शासनाचा हिस्सा किती आणि केंद्र शासनाचा हिस्सा किती असा मुद्दा उपस्थित केला. मी त्यांना सांगू इच्छितो की, यामध्ये केंद्र शासनाचा आणि राज्य शासनाचा हिस्सा पन्नास-पन्नास टक्के आहे.

सन्माननीय सदस्य डॉ.वसंत पवार यांना मी धन्यवाद देतो. त्यांनी चांगल्या कामांची नोंद घेतलेली आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयप्रकाश दांडेगावंकर .....

सन्माननीय सदस्या श्रीमती सुधा जोशी यांनी वस्त्रोद्योगासाठी एक अभ्यासगट स्थापन करण्याची सूचना केलेली आहे. त्यांच्या सूचनेची तपासणी करुन योग्य ती कार्यवाही करण्यात येईल.

सन्माननीय सदस्य प्रा.जोगेंद्र कवाडे यांनी साखर कारखान्यांना कर्जमाफी दिली असे सांगितले, मी त्यांना सांगू इच्छितो की, ही बाब सूत गिरण्यासंबंधीची आहे.

यानंतर श्री.पुरी...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयप्रकाश दांडेगांवकर...

साखर कारखान्यांच्या दृष्टीनेही सरकार प्रयत्न करीत आहे. यापूर्वीही साखर कारखान्यांच्या बाबतीत विदर्भातील विकासाच्या दृष्टीने 2-2 कोटी रुपये दिलेले आहेत. अजूनही साखर कारखान्यांच्या बाबतीत, सूत गिरण्याच्यांबाबतीत चर्चा करण्याच्या दृष्टीने सरकार तयार आहे. परंतु याबाबतीत विदर्भातील व मराठवाडयातील सर्वच लोकप्रतिनिधींनी अंतर्मूख होऊन विचार करण्याची आवश्यकता आहे. याठिकाणी उल्लेख करण्यात आला की, सगळया सूत गिरण्या पश्चिम महाराष्ट्रात जास्त असून सगळे पैसे तिकडेच जात आहेत. आज आपल्या सूत गिरण्यांची व साखर कारखान्यांची अवस्था फारच वाईट असल्याचे मतही प्रकट झाले. याबाबतीत मी सांगू इच्छितो की, यासंबंधी आपण सुधारणा करु शकतो व यासंदर्भात सर्वच कापूस उत्पादकांनी व सर्वच लोकप्रतिनिधींनी अंतर्मूख होऊन विचार केला पाहिजे, एवढे बोलून सहकार व पणन, रोजगार हमी योजना विभागाच्या पुरवणी मागण्या सभागृहाने मंजूर कराव्यात, अशी मी विनंती करतो.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, याबाबतीत प्रबोधनाची आवश्यकता आहे, असे माननीय मंत्रिमहोदयांनी सांगितले. विदर्भातील/मराठवाडयातील सूत गिरण्यांच्या बाबतीत आम्ही अंतर्मूख होऊन विचार करावा असे त्यांनी सांगितले. आपण मात्र त्या बाजूचे लोक अक्कल हुशारी दाखवत आहात. आमच्याकडे आपण दोन कोटी रुपये देऊनही आमच्या अमरावतीमध्ये आत्महत्या झालेल्या आहेत. तेव्हा याबाबत आपल्या बाजूचे लोकच हुशार असल्यामुळे आपणच याबाबतीत आम्हाला मार्गदर्शन करावे.

उपसभापती : आता मार्गदर्शन नको. आता माननीय डॉ.राजेंद्र शिंगणे, पुनर्वसन मंत्र्यांनी आपल्या विभागाच्या मागण्यासंदर्भात उत्तर द्यावे.

. ..2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.राजेंद्र शिंगणे (पुनर्वसन राज्यमंत्री) : सभापती महोदय, पुनर्वसन विभागाच्या मागण्या मांडत असताना सन्माननीय सदस्य डॉ.वसंत पवार, श्री.प्रकाश शेंडगे, श्री.राजन तेली यांनी याठिकाणी काही सूचना केल्या, त्या सूचनांचा निश्चितपणे विचार करुन योग्य ती कार्यवाही केली जाईल. त्यामुळे याठिकाणी ज्या पुनर्वसन विभागाच्या मागण्या मांडलेल्या आहेत, त्या सभागृहाने मंजूर कराव्यात, अशी मी विनंती करतो.

..3....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

<u>औचित्याच्या मुद्दासंबंधी</u>.

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा असा आहे की, या सभागृहाच्या माजी महिला सदस्या श्रीमती इंदुमती नाकाडे या आज गडचिरोली जिल्हाधिकारी कार्यालयासमोर उपोषणासाठी बसल्या आहेत. भगवानपूर गावच्या काही समस्येसाठी त्यांनी 7-8 महिन्यांपूर्वी उपोषण केले होते. त्यावेळी शासनाच्या प्रशासनाने आश्वासन दिले होते की, ताबडतोब सिंचन प्रकल्पाच्या कामाला सुरुवात करु, परंतु 8 महिने लोटले तरी कुठल्याही कामाला सुरुवात झालेली नाही. त्यामुळे पुन्हा त्या जिल्हाधिकारी कार्यालयासमोर उपोषणाला बसल्या आहेत. त्या या सदनाच्या माजी महिला सन्माननीय सदस्या आहेत, त्यामुळे आपण याबाबत शासनाला सूचना द्याव्यात व त्यांची मागणी समजून त्यांचे उपोषण सोडवावे, अशी माझी विनंती आहे.

उपसभापती : सन्माननीय विरोधी पक्षनेते श्री.पांडुरंग फुंडकर यांनी या सभागृहाच्या माजी सन्माननीय सदस्या श्रीमती इंदुमती नाकाडे यांनी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर काही मागणी केल्या होत्या, त्याच्या पुर्ततेसंबंधी उपोषण केले अशी माहिती त्यांनी सभागृहात दिली. श्रीमती इंदुमती नाकाडे यांनी माझ्याकडेही 1-2 वेळा येऊन याबाबतीत मागणी केली होती व त्यासंबंधी मीही प्रशासनाला पत्र दिले होते. विशेषत: गेली 8 महिने प्रतिक्षेमध्ये काढले असताना पुन्हा त्यांच्यावर उपोषणाची पाळी यावी, अशा प्रकारची जी शासकीय उदासीनता आहे, ती योग्य नाही. त्यामुळे मी शासनास निर्देश देतो की, आज ताबडतोबीने त्यांच्या मागणीसंदर्भात विचार-विनिमय करुन त्यांच्या कामाची पुर्तता होण्याच्या दृष्टीने संबंधित जिल्हाधिकारी किंवा संबंधित अधिकाऱ्यांना सूचना द्याव्यात. तसेच, जिल्हाधिकाऱ्यांनी किंवा शासनाच्या प्रतिनिधींनी त्याठिकाणी जाऊन त्यांचे उपोषण सोडवण्यासंदर्भात ताबडतोब कार्यवाही करावी व याबाबतचा अहवाल या सभागृहात उद्या दुपारपर्यंत म्हणजे प्रश्नोत्तराच्या तासानंतर सभागृहात सादर करावा.

प्रा.वसंत पुरके : सभापती महोदय, होय.

नंतर श्री.रोझेकर...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सन 2006-2007 च्या खर्चाच्या पूरक विवरणपत्रावर चर्चा

(चर्चा पुढे सुरु.....

डॉ.सुनील देशमुख (वित्त राज्यमंत्री) : सभापती महोदय, या पुरवणी मागणीच्या अनुषंगाने सन्माननीय सदस्य, श्री.मधुकर चव्हाण, सन्माननीय सदस्य, श्री.नितीन गडकरी, सन्माननीय सदस्य, प्रा.जोगेंद्र कवाडे यांनी अत्यंत मुलभूत प्रश्न या ठिकाणी उपस्थित केला आहे. पुरवणी मागण्यांन्वये जास्त रकमेच्या तरतूदी का होतात ? अर्थसंकल्पात या तरतूदी का केल्या जात नाहीत ? अशा प्रकारचे मुलभूत प्रश्न त्यांनी उपस्थित केले. विभागाचा नियतव्यय दिलेला असतो. तो अर्थसंकल्पाच्या वेळी पूर्ण होत नाही. काही प्रकल्प असतात, योजना असतात त्या निश्चित व्हावयाच्या असतात आणि येणा-या काळामध्ये त्या निश्चित होतात तेंव्हा आपण पुरवणी मागणी करतो आणि त्यामुळे या मागण्या वाढतात. या वर्षी देखील नैसर्गिक आपत्तीसाठी अतिरिक्त निधी उपलब्ध करुन द्यावा लागला, कापसासाठी 750 कोटी रुपये उपलब्ध करुन द्यावे लागले, मराठवाडा एकात्मिक प्रयोजनासाठी 610 कोटीची अतिरिक्त तरतूद केली. तसेच, माननीय राज्यपालांनी दिलेल्या निदेशाप्रमाणे 533 कोटी रुपयांची तरतूद केली. या सर्व गोष्टींमुळे जास्त रकमा दिसत आहेत. सन्माननीय सदस्य, श्री.मधुकर चव्हाण यांनी जलसंपदा विभागासाठी एवढया अतिरिक्त रकमा का दाखविल्या ? याबाबतचा प्रश्न विचारला आहे. यावर्षी सन 2006-2007 मध्ये योजनेतर 4599 कोटी रुपये आणि योजनेअंतर्गत 2984 कोटी रुपये नियतव्यय असतांना 584 कोटी रुपये जलसंपदा विभागाचे आहे, त्याच्या कंपेरिझनमध्ये 693 कोटीची मागणी सभागृहासमोर ठेवली आहे. ही टक्केवारी पाहिली तर 9.21 कोटी होते. त्यामुळे या विभागासाठी मोठया प्रमाणावर मागणी करण्यात आलेली आहे या म्हणण्यामध्ये प्रथमदर्शनी तथ्य आढळून येत नाही. सिंधुदूर्ग जिल्हयातील महमंदवाडी धरणासाठी 13 लक्ष रुपयांचा निधी यावेळी उपलब्ध करुन देण्यात आलेला आहे.

श्री.अरविंद सावंत : सभापती महोदय, त्या ठिकाणी कालव्याचे काम बंद केलेले आहे. त्यामुळे निधी आणि कालव्याचे काम अशा दोन्ही मागण्या मंजूर कराव्यात, अशी माझी विनंती आहे.

...2.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.सुनील देशमुख : सभापती महोदय, निधीची पूर्तता करु व कालव्याचे काम देखील सुरु करु. त्याचप्रमाणे सन्माननीय सदस्या, डॉ.नीलम गो-हे यांनी चासकमान धरणाचा प्रश्न उपस्थित केला होता. महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळाअंतर्गत अेआयबीपीमधून 27.50 कोटीची तरतूद उपलब्ध आहे. पुनर्वसनाचे काम जलसंपदा विभागाने पूर्ण केलेले आहे. शिरुर पुनर्वसन इमारत नगरपरिषदेला जोडावी अशा प्रकारची नवीन मागणी आलेली आहे. याबाबत शासन विचार करीत आहे.

उपसभापती : चासकमान कालव्याचे वेस्ट वॉटर जाते आहे. टेलएंडला पाणी जाण्यास अद्यापपर्यन्त चालना मिळाली नव्हती. विभागाने कालव्याचे ड्रेसिंग सुरु केले आहे. मी पाणी वाटप समितीचा अध्यक्ष आहे. मी या प्रकल्पाची पाहणी केली तेंव्हा माझ्या असे लक्षात आले की, काम अतिशय धिम्या गतीने सुरु आहे. याबाबत विचारणा केली असता अशी माहिती मिळाली की, 70 ते 80 कोटी रुपयांचे काम त्या ठिकाणी सुरु असून कुठल्याही प्रकारची आर्थिक तरतूद न केल्यामुळे हे काम अत्यंत धिम्या गतीने सुरु आहे. यानंतर जानेवारीमध्ये पाणी सोडावयाचे आहे. त्यावेळी ये रे माझ्या मागल्या असे होऊ नये. 70 ते 80 कोटी रुपये एवढया निधीची आवश्यकता असली तरी कालव्याच्या कामाला चालना मिळावी म्हणून ताबडतोबीने शासन या कामासाठी 20 ते 25 कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करुन देणार काय ?

यानंतर श्री.बोरले.....

अप्रमाणित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.सुनील देशमुख : सभापती महोदय, एवढा मोठा निधी उपलब्ध करुन देण्याबाबत काही अडचणी असतील तर त्याची पाहणी करण्यात येईल. परंतु, संबंधीत अधिका-यांना सांगून कामांचा वेग कोठेही कमी होणार नाही, याची काळजी घेण्यात येईल.

उपसभापती : निधी अभावी काम थांबलेले आहे त्यामुळे मी वारंवार हे विचारीत आहे. 70 ते 80 कोटी रुपये उपलब्ध करुन द्यावेत, असे मी म्हणत नाही.

डॉ.सुनील देशमुख : सभापती महोदय, एवढया मोठया निधीबाबत मी या ठिकाणी काही आश्वासन देणे योग्य होणार नाही. परंतु, निधी अभावी काम अडणार नाही याची मी शाश्वती देतो.

उपसभापती : याचा अर्थ त्या प्रकल्पाला निधी दिला जाईल.

डॉ.सुनील देशमुख : सभापती महोदय, एवढया निधीच्या तरतुदीसंबंधी आताच काही सांगणे योग्य होणार नाही.

उपसभापती : जेवढा शक्य असेल तेवढा निधी उपलब्ध करुन देण्यात यावा.

डॉ.सुनील देशमुख : जेवढा शक्य असेल तेवढा निधी देण्यात येईल आणि कामाचा वेग कोठेही कमी होणार नाही याची दक्षता घेण्यात येईल.

डॉ.नीलम गो-हे : सभापती महोदय, माननीय मंत्री महोदयांनी चासकमान धरणग्रस्तांच्या पुनर्वसनाचा आढावा घेण्यासाठी पुण्यामध्ये एक बैठक घ्यावी. त्या बैठकीला आपणाला व मला देखील निमंत्रित करावे आणि धरणग्रस्तांच्या पुनर्वसनासंदर्भात छोटे छोटे प्रश्न आहेत त्यासंदर्भात तोडगा काढावा, अशी माझी विनंती आहे.

डॉ.सुनील देशमुख : सभापती महोदय, अर्थसंकल्पिय अधिवेशनापूर्वी बैठक घेतली जाईल. सन्माननीय सदस्य श्री.नितीन गडकरी यांनी पुरवणी मागण्या माननीय राज्यपालांच्या निदेशानुसार आहे की नाही याबाबत खुलासा मागितला आहे. मी त्यांना सांगू इच्छितो की, माननीय राज्यपालांच्या निदेशानुसारच या पुरवणी मागण्या सादर करण्यात आलेल्या आहेत. मला सांगण्यास आनंद होत आहे की, मागच्यावेळी जे अप्रायझल झाले होते, जो अतिरिक्त निधी उर्वरित महाराष्ट्राला देण्यात आला होता त्या बाबी आपण यावेळी करेक्ट केलेल्या आहेत. माननीय विरोधी पक्ष नेते श्री.पांडुरंग फुंडकर आणि सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी याबाबत संघर्ष केलेला आहे. सन 2005-06 मध्ये उर्वरित महाराष्ट्राची टक्केवारी 30.4 होती. उर्वरित महाराष्ट्राला 685 कोटी रुपये द्यावयाचे होते ते 685 कोटी रुपये त्यांना दिलेले आहेत.

...2/-

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.सुनील देशमुख .....

मराठवाडयाची टक्केवारी 23 होती. मराठवाडयाला 518 कोटी रुपये दिले होते. परंतु प्रत्यक्ष वाटप 120 कोटी रुपयांचे झाले आहे. 398 कोटी रुपयांचा फरक होता. जुलै, 2006 मध्ये 250 कोटी रुपये या वेळचे शिल्लक राहिलेले होते. आपण 148 कोटी रुपयांऐवजी 160 कोटी रुपये दिलेले आहेत. हा जो फरक होता तो पुरवणी मागण्यांद्वारे पूर्ण केलेला आहे. विदर्भातील टक्केवारी 46.6 होती. विदर्भाला 1050 कोटी रुपये वाटप करावयाचे होते. प्रत्यक्ष वाटप 228 कोटी रुपये झाले आहेत. फरक जवळ जवळ 821 कोटी रुपयांचा होता. जुलैच्या पुरवणी मागणीमध्ये 328 कोटी रुपये आणि आता 373 कोटी रुपये असे एकूण 821 कोटी रुपये दिले आहेत.

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, आता जिल्हापरिषदेच्या निवडणुका होणार आहेत. आता 373 कोटी रुपये दिल्याचे माननीय मंत्री महोदय सांगत आहेत. निधीमुळे कामे पूर्ण होण्यास विलंब झालेला आहे. उपरोक्त निधीच्या निविदा आचारसंहितेच्या आधी काढून काम सुरु करण्यात येईल काय ?

डॉ.सुनील देशमुख : सभापती महोदय, मी माननीय विरोधी पक्ष नेते श्री.पांडुरंग फुंडकर यांना सांगू इच्छितो की, विदर्भ सिंचन महामंडळाला हे पैसे खर्च करण्यासाठी 31 मार्चची मुदत राहणार नाही. त्यामुळे हे पैसे व्यपगत होण्याची शक्यता नाही. उर्वरित महाराष्ट्राला शून्य रक्कम मिळाली आहे. जे अप्रायझल झाले होते ते आपण यावेळी करेक्ट केलेले आहे. मागास भागातील लोकांचे जे पैसे होते ते यावर्षी या पुरवणी मागण्यांमार्फत दिलेले आहेत. सभापती महोदय, जलसंपदा विभागाच्या 693 कोटी रुपयांच्या एकूण 24 अतिरिक्त पुरवणी मागण्यांना सभागृहाने मंजुरी द्यावी, अशी मी आपल्यामार्फत सभागृहाला विनंती करतो.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, 610 कोटी रुपये मराठवाडा एकात्मिक विकास मंडळाचे आहेत, त्याचा उल्लेख या पुरवणी मागण्यांमध्ये आहे काय ?

यानंतर श्री.सुंबरे .....

अधिकृत मत / रेकॉर्डसाठी नाही

डॉ. सुनील देशमुख : सभापती महोदय, या पुरवणी मागण्यांमध्ये त्या 610 कोटी इतक्या निधीचा अंतर्भाव आहे, म्हणजे 2006-07 या वर्षासाठी. ....

श्री. दिवाकर रावते : तर मग आपण मघाशी उत्तर देताना जे म्हटले आहे ते चुकीचे आहे. म्हणूनच मी मुद्दामहून आपल्याला त्याबाबत विचारणा केली आणि आपल्याकडून माहिती घेतली आहे. आता मी आपल्यावर हक्कभंगाचा प्रस्ताव आणू शकतो की आपण सदनाला चुकीची माहिती दिली म्हणून.

डॉ. सुनील देशमुख : तरीही मी ते तपासून घेतो. सभापती महोदय, आतापर्यंत सिंधुदुर्ग जिल्ह्याच्या प्रलंबित देणी संबंधात सन्माननीय सदस्य श्री.तेली यांनी विचारणा केली होती त्यावेळेस त्यांनी म्हटले होते की, सिंधुदुर्ग जिल्ह्याच्या जवाहर साठीचा निधी दिलेला नाही. सभापती महोदय, या संदर्भात मी आपल्याला सांगू इच्छितो की, यामध्ये 2003-04 साठी 28 लाख आणि 2004-05 ला 2.37 लाख आणि 2005-06 साठी 51 लाख इतका प्रलंबित निधी आपण दिलेला आहे. तरी माझ्या खात्याच्या सर्व पुरवणी मागण्यांना आपण मान्यता द्यावी अशी मी विनंती करतो.

****

..... 5एल 2 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(सभापतीस्थानी - माननीय तालिका सभापती श्रीमती सुधा जोशी)

श्री. धर्मरावबाबा आत्राम (महिला व बालविकास राज्यमंत्री) : सभापती महोदया, महिला व बालविकास विभागाच्या पुरवणी मागण्यांवर सन्माननीय सदस्य डॉ. नीलम गोऱ्हे, सन्माननीय सदस्य श्री.विनोद तावडे आणि सन्माननीय सदस्या श्रीमती दराडे या तिघांनी आपले विचार मांडले आहेत. मुख्य म्हणजे यामध्ये आपल्याला प्रोटेक्शन अधिकारी नेमावयाचा आहे आणि त्यासाठी आपण गृह विभागाकडे मागणी केलेली असून यासाठी तरतूददेखील गृह विभागच करणार आहे. कारण त्या विभागाशी संबंधितच ही बाब आहे. तरी आपण सर्वांनी माझ्या विभागाच्या पूरक मागण्यातील बाब क्र. 378 ते 384 या मान्य कराव्यात अशी विनंती आहे.

श्री. सतीश चतुर्वेदी (माजी सैनिकांचेकल्याण व रोजगार व स्वयंरोजगार मंत्री) : सभापती महोदया, माझ्या विभागाच्या पुरवणी मागण्यांच्या संदर्भात कोणाही सन्माननीय सदस्यांनी येथे चर्चा केलेली नाही. तरी आपण सर्वांनी माझ्या विभागाच्या पुरवणी मागण्या मान्य कराव्यात अशी मी आपल्याला विनंती करतो.

****

..... 5एल 3 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. वसंत पुरके (शालेय शिक्षण, क्रीडा व युवक कल्याण मंत्री) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.जयंत पाटील, श्री.अरविंद सावंत, श्रीमती फौजिया खान, डॉ.नीलम गोऱ्हे, डॉ.वसंत पवार, श्रीमती सुधा जोशी, प्रा. कवाडे, श्रीमती उषाताई दराडे, श्री.कपिल पाटील आदींनी या ठिकाणी माझ्या विभागाच्या पुरवणी मागण्यांवरील चर्चेत भाग घेऊन महत्त्वाच्या सूचना दिलेल्या आहेत तसेच बऱ्याच ठिकाणी आभार आणि अभिनंदनही केलेले आहे. मी या ठिकाणी सर्व सम्माननीय सदस्यांच्या सुचनांची काळजीपूर्वक दखल घेईन. खरे म्हणजे त्यामध्ये त्यांनी एक महत्त्वाची सूचना बालेवाडीमध्ये असलेल्या मॅनेजमेंटमधील त्रुटीसंबंधात केली आहे. तेथे 200 खोल्या आहेत पण मॅनेजमेंट बरोबर नसल्याने तेथे चांगली व्यवस्था नाही असे सांगितले आहे ते खरे आहे. त्यामुळे त्याबाबत निश्चितपणे दखल घेतली जाईल. तसेच सन्माननीय सदस्या श्रीमती दराडे आणि प्रा. कवाडे यांनी स्काऊटच्या संबंधात मुद्दा उपस्थित केला होता. त्याबाबत मी आपल्याला सांगू इच्छितो की, त्यांच्याबाबतीत 90 टक्के आणि 10 टक्के निधी द्यावा हे सरकारने तत्त्वत: मान्य केलेले आहे त्यामुळे आपण केलेल्या सूचनांचीही मी निश्चितपणे दखल घेईन.

सभापती महोदया, सन्माननीय सदस्य श्री.अरविंद सावंत यांनीही या ठिकाणी दोन शाळांच्या बाबतीत सूचना केल्या आहेत त्याची नोंद मी घेतलेली आहे. आंबेगाव तालुक्यातील मरडेवाडी आणि अन्य एका गावाचे त्यांनी नाव घेतले आहे. त्या गावांची नावे मी त्यांच्याकडून घेऊन त्याबाबत योग्य ती कारवाई करीन एवढेच या निमित्ताने सांगू इच्छितो. मी आपल्याला असेही सांगू इच्छितो की, शाळांना अनुदान देण्याच्या बाबतीत आपण योग्य ती भूमिका अगोदरच घेतलेली आहे. त्यानंतर सन्माननीय सदस्य श्री.मोते यांनी थकित वेतनासंबंधात मुद्दा उपस्थित केला आहे. त्यासंबंधात मी त्यांच्याशी व्यक्तीश: बोलेन, कारण त्यामध्ये काही तांत्रिक अडचण आहे ....

श्री. रामनाथ मोते : सभापती महोदय, त्यामध्ये जे न्यायालयीन प्रकरण आहे त्याबद्दल माझा अजिबात आग्रह नाही. परंतु त्या संस्थेचे जवळपास 10 वर्षांचे अनुदान राहिलेले आहे त्याबाबतीत बैठका होऊन आदेश देखील दिले गेले होते पण अद्याप कार्यवाही झालेली नाही. मी अनेक वेळा त्याबाबत भेटलो देखील आहे. तेव्हा त्यामध्ये काही तांत्रिक अडचण असेल तर ती तो भाग वेगळा पण एखाद्या संस्थेचे अशा प्रकारे 10-10 वर्षे अनुदान थकित ठेवणे बरोबर होणार नाही ते आपण त्वरित देण्याची व्यवस्था करावी.

(यानंतर श्री. सरफरे ..... 5एम 1 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. वसंत पुरके : सभापती महोदया, सन 2004 मध्ये 100 टक्के अनुदान दिले आहे.

श्री. रामनाथ मोते : त्या संस्थेला गेली 10 वर्षे अनुदान मिळाले नाही. म्हणून माझी आपणास विनंती आहे की, आपण ही तांत्रिक बाब लक्षात घ्यावी.

प्रा. वसंत पुरके : ही बाब तपासून घेऊन योग्य तो निर्णय घेतला जाईल. सभापती महोदया, याठिकाणी सर्व माननीय सदस्यांनी ज्या सूचना केल्या आहेत त्यांची नोंद घेण्यात आली आहे. तेव्हा बाब क्रमांक 88 ते 104 पर्यंतच्या रुपये 638 कोटी 30 लाख 87 हजार रुपयांच्या पूरक मागण्यांना सभागृहाने पाठिबा द्यावा अशी विनंती करुन माझे भाषण संपवितो.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रणजित कांबळे (सार्वजनिक आरोग्य, कुटुंब कल्याण, पाणी पुरवठा व स्वच्छता राज्यमंत्री) : सभापती महोदया, काही माननीय सदस्यांनी पाणी पुरवठा व स्वच्छता विभागाच्या पूरक मागण्यांवर आपले मत व्यक्त केले आहे. त्यामध्ये प्रामुख्याने माननीय सदस्य श्री. जयंत पाटील व माननीय सदस्य प्रा. जोगेंद्र कवाडे यांनी दलित वस्तीसंबंधी आपले मत व्यक्त केले. आणि त्याठिक्राणी आणखी निधीची तरतूद करणे आवश्यक असल्याचे सांगितले. माननीय सदस्य श्री. जयंत पाटील यांना सांगू इच्छितो की, दलित वस्तीकरीता मागील वेळी 27.3 कोटी आणि यावेळी 10 कोटी रुपयांची मागणी करीत आहोत. माननीय सदस्य श्री. चंद्रकांत रघुवंशी यांनी सांगितले की, जिल्हा परिषदेमध्ये पाणी पुरवठा योजनेकरीता आदिवासींकरीता निधी आहे परंतु बिगर आदिवासींकरीता निधी नाही. त्यांच्या माहितीसाठी सांगतो की, आदिवासी गावांकरीता जवळपास 32 कोटी आणि बिगर आदिवासी 50 टक्क्याच्या आत असलेल्या गावांसाठी 6.69कोटीं ची तरतूद जिल्हा परिषदेमध्ये केली आहे. नंदूरबार जिल्हयासाठी हा निधी नाही, त्याबाबत चौकशी करुन माननीय सदस्यांना पुन्हा माहिती देण्यात येईल. सभापती महोदया, सन 2006-07 च्या पाणी पुरवठा व स्वच्छता विभागाच्या पूरक मागणी क्रमांक 385, 386, 387, 388 ना सभागृहाने मान्यता द्यावी अशी मी विनंती करतो.

त्याचप्रमाणे सार्वजनिक आरोग्य विभागाच्या मागण्यांवर बोलत असतांना माननीय सदस्य सर्वश्री. जयंत पाटील, अरविंद सावंत यांनी आपले विचार मांडले. त्यांनी मुरुड मेडिकल डिस्पेन्सरीबाबत उल्लेख केला. ही मेडिकल डिस्पेन्सरी रुरल हॉस्पिटलच्या जवळ आहे. त्या हॉस्पिटलमध्ये पुरेसा कर्मचारी वर्ग आहे. परंतु तज्ज्ञ डॉक्टर्सचा तुटवडा आहे हे मी नाकारीत नाही. त्याठिक्राणी स्त्री रोगतज्ज्ञ डॉक्टरची आवश्यकता आहे असे आपण विचारले होते. म्हणून ऑन डेप्युटेशनवर एक स्त्री रोगतज्ज्ञ डॉक्टरची तात्काळ नेमणूक करण्यात येईल. त्यांचा दुसरा प्रश्न हा ईक्विपमेंटसंबंधी होता, त्याठिकाणी एक्स-रे मशीन चालू असून ते इन्स्टॉल करावयाचे आहे. माननीय सदस्य सर्वश्री नितीन गडकरी, मधुकर चव्हाण यांनी जीवनदायी योजनेचा उल्लेख केला. माननीय सदस्य श्री. नितीन गडकरी यांनी या योजनांमध्ये काही त्रुटी असल्याचे सांगितले. सद्याचा जो जी. आर. आहे त्यातील तरतुदीनुसार वन टाईम ऑपरेशन अँड नो रिकव्हरी आहे. त्यामध्ये फक्त कंझ्युमेबल अलाव्हेबल आहे. पूर्वी तशाप्रकारची तरतूद जी.आर. मध्ये होती तो जी.आर. आम्ही बदलणार आहोत. केंद्र सरकारची नॅशनल असेसमेंट स्किम आहे त्यामध्ये सर्व

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ KGS/ KTG/ MHM/ SBT/

श्री. रणजित कांबळे...

प्रकारच्या ट्रिटमेंटचा समावेश केला आहे. तो जी.आर. आम्ही केंद्र सरकारकडून प्राप्त करुन घेणार आहोत. तशाप्रकारचा जी.आर. निघाला तर बाकीच्या लोकांना सुध्दा त्याचा फायदा होईल. माननीय सदस्या प्रा. फौजिया खान यांनी परभणी येथील महिला हॉस्पिटलमध्ये असलेल्या कर्मचाऱ्यांच्या पगारासंबंधी उल्लेख केला. या पुरवणी मागण्यामध्ये त्याकरीता तरतूद करण्यात आली आहे असे मी त्यांना यानिमित्त सांगू इच्छितो. माननीय सदस्या डॉ. श्रीमती नीलम गोऱ्हे यांनी मंचर येथील रुरल हॉस्पिटलच्या ट्रॉमा युनिटबाबत उल्लेख केला.

(यानंतर श्री. किल्लेदार)

अप्रमाणित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रणजित कांबळे (पुढे सुरू....

त्यांना लागणारी जी काही इक्वीपमेंटस आहेत तसेच डॉक्टर, स्टाफ या बाबी आहेत, त्याचा विचार केला जाईल. त्यानंतर सन्मानीय सदस्या श्रीमती सुधाताई जोशी, श्रीमती उषाताई दराडे यांनी प्राथमिक आरोग्य केंद्राच्या संबंधात मुद्दा उपस्थित केला. सन्माननीय सदस्या श्रीमती उषाताई दराडे यांना सांगू इच्छितो की, मराठवाड्याच्या पॅकेजमध्ये प्राथमिक आरोग्य केंद्राच्या दृष्टीने जिल्हापरिषदेने डीपीडीसीमध्ये तरतूद करणे आवश्यक आहे. त्यानंतर सन्माननीय सदस्य डॉ.वसंत पवार साहेब आणि प्रा.जोगेंद्र कवाडे साहेब यांनी काही गोष्टींचा उल्लेख केला. आपल्याकडे डॉक्टर्स कमी आहेत हे मी नाकारत नाहीत. परंतु आता दिनांक 2-12-2006 रोजी एम.पी.एस.सी.मार्फत परीक्षा घेतलेली आहे. आपण त्यांच्याकडे 1200 डॉक्टर्सची मागणी केलेली आहे. त्यामधून आपल्याला डॉक्टर्स मिळतील. सन्माननीय सदस्य श्री. धोंडीराम राठोड यांनी मंठा येथील 50 खॉटांचे हॉस्पिटल अपग्रेड करण्याबाबतचा मुद्दा उपस्थित केला. आम्ही ते हॉस्पिटल अपग्रेंड करणार आहोत. त्यामध्ये ट्रॉमा सेंटरचाही समावेश आहे. सन्माननीय सदस्य श्री. मधुकर चव्हाण यांनी अमरावती येथील सिव्हील हॉस्पिटलमधील भ्रष्टाचाराचा उल्लेख केला. मी सांगू इच्छितो की, यामध्ये फक्त भ्रष्टाचार आहे असे नाही तर आमच्या म्हणण्याप्रमाणे त्यांनी सरकारी तिजोरीवर डाका टाकलेला आहे. यामध्ये प्रथमदर्शनी डेप्युटी डायरेक्टर, अधिक्षक यामध्ये इन्व्हॉल्व आहेत. या प्रकरणी डेप्युटी डायरेक्टर यांना निलंबित केलेले आहे. यामध्ये माननीय मुख्यमंत्री महोदयांनी दखल घेतलेली आहे. या प्रकरणाची चौकशी सी.आय.डी. कडे दिलेली आहे. मी स्वत: आणि वित्त राज्य मंत्री महोदय श्री.देशमुख साहेब तसेच त्यांच्या विभागाचे प्रधान सचिव, आमच्या विभागाचे प्रधान सचिव यांच्यासमवेत बैठक झाली.

श्री.मधुकर चव्हाण : आजपासून त्यांना सस्पेंड करणार आहात काय ? सिव्हल सर्जनला सस्पेड केल्याचा उल्लेख केला. त्यांच्यावर फौजदारी गुन्हा दाखल करणार आहात काय ? याचाही विचार केला पाहिजे.

श्री.रणजित देशमुख : माननीय मुख्यमंत्री महोदयांनी स्वत: यामध्ये लक्ष घातलेले आहे. अमरावतीचे सिव्हील सर्जन सेवानिवृत्त झालेले आहेत. अकोला येथील सिव्हील सर्जनला सस्पेंड

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रणजित कांबळे (पुढे सुरू...

केलेले आहे. सन्माननीय मुख्यमंत्री महोदयांनी सभागृहामध्येच आश्वासन दिलेले होते, त्याप्रमाणे त्यांना निलंबित केलेले आहे. या विभागातील कर्मचारी जेवढे जबाबदार आहेत, तेवढेच ट्रेझरी विभागातील अधिकारी, कर्मचारी जबाबदार आहेत. या संदर्भाने सन्माननीय वित्त राज्यमंत्री मी, वित्त विभागाचे प्रधान सचिव आणि आमच्या विभागाचे प्रधान सचिव यांची बैठक झाली. कारण यामध्ये ट्रेझरी विभागाचे कर्मचारी, अधिकारी देखील जबाबदार आहेत. ट्रेझरी ऑफीसर, सबट्रेझरी ऑफीसर यांच्यावर सुध्दा केसेस घालणार आहोत. ते सुध्दा या प्रकरणातून सुटणार नाहीत. त्यांच्यावरही ॲक्शन घेतली जाणार आहे. या प्रकरणामध्ये ज्यांची नावे समोर येतील, त्यांना सोडणार नाही. जे कोणी दोषी आढळतील त्यांची मालमत्ता जप्त करणार आहोत, त्यांचे अकाऊंट्स जप्त करणार आहोत, एवढे सांगू इच्छितो. सभापती महोदय, सन 2006-2007 च्या आरोग्य विभागाच्या पुरवणी मागण्या क्रमांक 263, 264, 266 ते 281 या सगळ्या मागण्यांना सभागृहाने मान्यता द्यावी अशी सभागृहाला विनंती करतो.

यानंतर श्री.बरवड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रविशेठ पाटील (सार्वजनिक बांधकाम, आदिवासी विकास राज्यमंत्री) सभापती महोदया, या हिवाळी अधिवेशनामध्ये सन 2006-07 करिता सार्वजनिक बांधकाम विभागाच्या 41 पुरवणी मागण्या सादर करण्यात आलेल्या आहेत. त्याची एकूण रक्कम 228.50 कोटी रुपये आहे. आज सभागृहात या पुरवणी मागण्यांच्या संदर्भात सन्माननीय सदस्य श्री. जयंत प्र. पाटील, श्रीमती फौजिया खान, डॉ. नीलम गोऱ्हे, सर्वश्री नितीन गडकरी, राजन तेली तसेच धोंडीराम राठोड या सर्व सदस्यांनी ज्या सूचना मांडलेल्या आहेत त्या ग्राह्य धरुन सार्वजनिक बांधकाम विभागाच्या क्रमांक 114 ते 154 अशा एकूण 41 पुरवणी मागण्या सभागृहाने मान्य कराव्यात अशी मी विनंती करतो.

सभापती महोदया, या हिवाळी अधिवेशनामध्ये सन 2006-07 साठी आदिवासी विकास विभागाच्या एकूण 45 पुरवणी मागण्या सादर करण्यात आलेल्या आहेत. त्यांची एकूण किंमत 413 कोटी 95 लाख रुपये आहे. आज सभागृहामध्ये या पुरवणी मागण्यांच्या संदर्भातील चर्चेत सन्माननीय सदस्यांनी सहभाग घेऊन आपले विचार मांडले. त्याबद्दल मी त्यांना धन्यवाद देतो. सभापती महोदया, आदिवासी विकास विभागाच्या पुरवणी मागण्या क्रमांक 292 ते 336 अशा एकूण 45 पुरवणी मागण्या सभागृहाने मान्य कराव्यात अशी मी सभागृहाला विनंती करतो.

..2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ SBT/ KTG/

श्री अनिस अहमद (पशुसंवर्धन, दुग्धविकास, मत्स्यव्यवसाय मंत्री) : सभापति महोदया, पशुसंवर्धन, दुग्धविकास एवं मत्स्यव्यवसाय विभाग की मांगों पर बोलते हुए माननीय सदस्यों ने अपने विचार रखे हैं, मैं उनका आभार प्रकट करने के लिए और उनके उठाए गए मुद्दों का उत्तर देने के लिए खड़ा हुआ हू. मैं यह बताना चाहता हूं कि पिछले दो साल के दौरान महाराष्ट्र सरकार ने दूध के भाव में तीन रुपये की वृध्दि की है. विदर्भ में किसानों की आत्महत्या रोकने के लिए किसानों को कृषि के साथ जोड़धंधा देने की योजना बनाई गई है. किसानों की आय बढ़ाने के लिए भी योजना बनाई गई है. किसानों को जोड़ धंधे के रुप में गाय और भैंस बांटने का काम शुरु किया गया है. विदर्भ के हर जिले में 1 हजार गाय बांटने का काम शुरु किया गया है. इस योजना की वजह से विदर्भ में दूध का उत्पादन तीन गुना बढ़ गया है.

श्री दिवाकर रावते : आप किसानों को जो गाय दे रहे हैं, उस गाय की कीमत कितनी है और उसमें सरकार कितनी सहायता दे रही है और किसानों को कितने पैसे देने पड़ रहे हैं ?

श्री अनिस अहमद : सभापति महोदया, गाय की कीमत 15 हजार रुपये हैं. इसमें 12 हजार सबसीडी के रुप में सरकार दे रही है और किसानों को करीब 25 प्रतिशत यानी 3 हजार रुपये अपनी जेब से देने हैं.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदया, मला मुद्दाम एक बाब रेकॉर्डवर आणावयाची आहे. आत्महत्या केलेल्या शेतकऱ्यांच्या कुटुंबियांना जोडधंदा देण्यासाठी ज्या गाई आणलेल्या आहेत त्यासाठी त्या कुटुंबियांना 3 हजार रुपये द्यावे लागतात. 12 हजार रुपये शासन भरणार आहे. या गाईंची किंमत 6 हजार रुपयांपेक्षा जास्त नाही. पश्चिम महाराष्ट्रातून, अहमदनगर जिल्ह्यातून या गाई येतात. त्या गाईची किंमत 6 हजार रुपये आहे. शासन या गाई 15 हजार रुपयांमध्ये विकत घेत आहे. यामध्ये मोठा भ्रष्टाचार होत आहे. या प्रकरणाची विदर्भामध्ये सगळीकडे चर्चा आहे. या गाई 2 लीटर सुध्दा दूध देत नाहीत.

यानंतर श्री. शिगम...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री अनिस अहमद : वह किसानों की जिम्मेदारी है. किसान खुद तीन बार गाय का दूध निकाल कर अपनी पसंद की गाय लेते हैं. इसलिए इस योजना के अन्तर्गत सरकार जो गाय दे रही है वह दो लीटर से ज्यादा दूध नहीं देती है, यह कहना गलत होगा. सरकार पूरी ईमानदारी के साथ बड़ी संख्या में गाय बांट रही है. दूसरी बात यह है कि हर जिले के किसानों को प्रशिक्षण देने का काम भी किया जा रहा है. सरकार ने यह विचार किया है कि किसान कृषि के साथ दूध का धंधा भी करेगा तो उसकी आय बढ़ेगी. अमरावती, यवतमाल, बुलढाणा, अकोला, वाशिम और वर्धा में किसानों को प्रोत्साहन देने के लिए किसान दिंडी का आयोजन किया गया था.इस दिंडी के माध्यम से किसानों को बताया गया था कि कृषि के साथ जोड़ धंधे के रुप में मुर्गीपालन, दुग्धव्यवसाय शुरु करें. हर तालुके में किसान दिडी के माध्यम से किसानों को जानकारी दी गई थी. पश्चिम महाराष्ट्र के तालुके में ढाई लाख लीटर दूध का उत्पादन होता है. जबकि विदर्भ में 50 हजार लीटर से ज्यादा दूध का उत्पादन नहीं होता है. पश्चिम महाराष्ट्र में 55 पैसे कमीशन दिया जाता है और विदर्भ में 1 रुपये 10 पैसे कमीशन दिया जा रहा है. इस योजना के कारण अमरावती और यवतमाल में तीन गुना दूध का उत्पादन बढ़ा है. मैं माननीय सदस्यों को यह बताना चाहता हूं कि सरकार किसानों को सिर्फ गाय ही नहीं बांट रही है बल्कि उसके साथ ही साथ बकरी भी बांटने वाली है. इस साल सरकार किसानों को 44 हजार बकरी बांटने वाली है. महिला गट को 10 बकरी और एक बकरा बांटने का काम शुरु किया गया है. गाय के साथ चारा देने की भी व्यवस्था कर रहे हैं. इस प्रकार से मैं यह बताना चाहता हूं कि आने वाले दिनों में किसानों को जोड़ धंधा मिलने की वजह से आत्महत्या रुक सकती है. मैं विरोधी पक्ष के माननीय सदस्यों से अनुरोध करुंगा कि वह इस कार्य में कंधे से कंधा मिलाकर हमें सहयोग दें. पिछले दिनों बर्ड फ्ल्यू की समस्या खड़ी हो गई थी. उस समय सरकार ने मुर्गी पालन का धंधा करने वालों को 20 रुपये प्रति बर्ड के हिसाब से सहायता दी थी. इस कार्यक्रम के अन्तर्गत 50 करोड़ रुपये बांटे गए थें. इस प्रकार से उस समय मुर्गी पालन का व्यवसाय करने वालों को सरकार की तरफ से सहायता की गई थी. मेरे विभाग की तरफ से विदर्भ में गाय की संख्या बढ़ाने का काम भी किया जा रहा है. 8 लाख जानवरों में कृत्रिम प्रजनन की प्रक्रिया द्वारा गाय की संख्या में वृध्दि कर रहे हैं. कृत्रिम प्रजनन द्वारा ढाई लाख बछड़े पैदा किए गए हैं और इन बछड़ों को रखने की

...2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

व्यवस्था भी की गई है. इस कृत्रिम प्रजनन कार्यक्रम के अन्तर्गत तीन साल में 10 लाख बछड़े पैदा करने का लक्ष्य रखा गया है. इस कार्यक्रम के माध्यम से किसानों को आर्थिक फायदा होगा. इस कार्यक्रम को काफी सराहा गया है. इसी सिलसिले में अमरावती जिले के बीजेपी के एक विधायक ने मेरा सत्कार भी किया है और मुझसे कहा है कि बहुत ही अच्छा कार्यक्रम आपके विभाग द्वारा लिया गया है. इस कार्यक्रम के अन्तर्गत अगर आप कोई सुझाव देना चाहते हैं, तो आप वे सुझाव मुझे दीजिए, मैं उस पर जरुर विचार करुंगा. इस कार्यक्रम के लिए 27 करोड़ रुपये उपलब्ध किए गए हैं. इस धनराशि से किसानों को भैंस देने का काम शुरु किया जाएगा. अब तक 4486 गाय और भैंस बांटी हैं. अब तक इस कार्यक्रम के अन्तर्गत 5 करोड़ रुपये खर्च किए गए हैं. शेळी-मेंढी बांटने के लिए 6 करोड़ 99 लाख रुपये उपलब्ध किए गए हैं. 488 शेळी-मेंढी बांटी गई है. माननीय प्रधानमंत्री जी ने जो पॅकेज जाहिर किया है, उसके अन्तर्गत महाराष्ट्र सरकार को 6 करोड़ रुपये प्राप्त हुए हैं. इस कार्यक्रम के अन्तर्गत लाभार्थी की सूची तैयार की गई है. गाय-भैंस खरीदने का कार्यक्रम शुरु करने जा रहे हैं. वर्धा और बुलढाणा जिले में इस पॅकेज के अन्तर्गत तीन साल में काम होगा. इस पॅकज से दूध का उत्पादन बढ़ा है. किसानों को प्रशिक्षण देने का काम भी शुरु किया है.

भाषण जारी, 5क्यू-1 पर

अप्रधारित पत्र / प्रतिलेख नहीं

श्री अनिस अहमद .....

सभापति महोदय, माननीय सदस्य श्री अरविंद सावंत जी ने शासकीय दूध योजना, नागपुर के 105 अस्थायी कर्मचारियों को नियमित करने के बारे में मुद्दा उठाया है. इस बारे में मंत्रिमंडल में चर्चा हुई है. इस विषय में जैसे ही मंत्रि मंडल की मंजूरी मिलेगी, यह काम हो जाएगा.

श्री अरविंद सावंत :ये कर्मचारी वहां पर 22 साल से सर्विस कर रहे हैं.मैं आपका अभिनंदन करता हूं. अब आप इस बारे में जल्दी से जल्दी केबिनेट की मंजूरी प्राप्त करें, ऐसा मेरा अनुरोध है.

श्री अनिस अहमद : माननीय सदस्य श्री राजन तेली ने यहां पर फिशरीज के संबंध में कुछ जानकारी दी है. उन्होंने बताया कि गोवा और गुजरात से लोग महाराष्ट्र में आकर मछलियां पकड़ रहे हैं. मैं उन्हें यह बताना चाहता हूं कि महाराष्ट्र ही एक ऐसा राज्य है जहां डीजल के लिए सबसीडी दी जा रही है. महाराष्ट्र में डीजल पर टैक्स नहीं लिया जा रहा है. महाराष्ट्र में 720 किलोमीटर समुद्रतट है. फिशरीज के सिलसिले में 150 करोड़ रुपये की योजना की गई है. इस योजना के माध्यम से सहायता देने का काम किया जा रहा है. 30 लाख रुपये डी-सिल्टिंग के काम पर खर्च किए गए हैं. यह काम अभी जारी है. आठ दिन के अन्दर टेंडर के बारे में अंतिम निर्णय लिया जाएगा. इस कार्य के सिलसिले में एक कमेटी बनाई गई है. आज ही कमेटी ने रिपोर्ट दी है. मैंने सचिव से कहा है कि जल्द से जल्द कमेटी की सिफारिशों के संबंध में निर्णय लिया जाए. इस कार्य में ज्यादा से ज्यादा सहायता दी जाएगी. मैं डी-सिल्टिंग के काम के सिलसिले में यह कहना चाहूंगा कि यह काम शुरु है.

सभापति महोदय, नागपुर शहर में वेटरनरी डॉक्टरों ने एक मोर्चा निकाला था. एलडीओ रिक्त पदों को जल्दी से जल्दी भरने के सिलसिले में कोशिश कर रहे हैं. मैं यह जानता हूं कि एलडीओ की बहुत जरुरत है. महाराष्ट्र लोक सेवा आयोग के माध्यम से 650 पद भरे जाएंगे. इनमें 400 पद पिड़ड़े समाज के उम्मीदवारों के लिए रखे गए हैं. 1 महीने के अन्दर इस संबंध में काम शुरु कर दिया जाएगा. इस कार्य के लिए सर्वोच्च प्राथमिकता दी जाएगी.

सभापति महोदय, मैं अंत में माननीय सदस्यों से अनुरोध करुंगा कि वे मेरे विभाग की मांगों को स्वीकृत करें. इतना कह कर मैं अपना भाषण समाप्त करता हूं.

....

यानंतर श्री भोगले

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे : सभापती महोदया, सन्माननीय मंत्रीमहोदयांनी त्यांच्या उत्तराच्या भाषणात चार ते पाच वेळा असा उल्लेख केला की, सचिव साहब को कह दिया हैं, सचिव साहब को कह दिया हैं. पुरवणी मागण्यांवरील उत्तरामध्ये असे वक्तव्य रेकॉर्डवर येणे अतिशय अयोग्य वाटते.

तालिका सभापती (श्रीमती सुधा जोशी) : आदेश दिले आहेत.

श्री.विनोद तावडे : आमचा विभाग हे करीत आहे असे सांगितले पाहिजे. सचिवांकडून काम करुन घेण्यामध्ये त्यांना अडचण येते का? राज्य सरकार चालविणारे राजकीय पक्षाचे प्रतिनिधी असतात. मंत्रालय आणि सचिवालय वेगळे आहे का? असेल तर तसे सांगावे. अन्यथा आक्षेपार्ह वक्तव्य रेकॉर्डवरुन काढून टाकावे.

तालिका सभापती : मंत्रीमहोदयांना योग्य शब्द वापरावयाचे आहेत का?

श्री.अनिस अहमद : आदेश दिले आहेत.

तालिका सभापती : सन 2006-2007 च्या खर्चाच्या पूरक विवरणपत्रावरील चर्चा आता संपली आहे.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी.: कामगार संघांना मान्यता देण्याबाबत आणि अनुचित कामगार प्रथांना प्रतिबंध करण्याबाबत (सुधारणा) विधेयक.

मु.शी.: कामगार संघांना मान्यता देण्याबाबत आणि अनुचित कामगार प्रथांना प्रतिबंध करण्याबाबत (सुधारणा) विधेयकावरील संयुक्त समितीचे पुनर्गठन.

तालिका सभापती : विधानसभेकडून एक संदेश आलेला आहे. सचिव तो वाचून दाखवितील.

संदेश

सहसचिव : कळविण्यात येत आहे की, सन 2005 चे वि.स.वि.क्रमांक 78- महाराष्ट्र कामगार संघांना मान्यता देण्याबाबत आणि अनुचित कामगार प्रथांना प्रतिबंध करण्याबाबत (सुधारणा) विधेयक, 2005 यावर विचार करण्यासाठी दिनांक 16 डिसेंबर, 2005 रोजी नियुक्त केलेल्या संयुक्त समितीवरील सदस्य सर्वश्री अनंत तरे व रामदास चंद्रभानजी तडस, वि.प.स. यांच्या विधानपरिषद सदस्यत्वाचा कालावधी संपुष्टात आल्यामुळे या रिक्त झालेल्या जागांवर विधानपरिषदेच्या दोन सदस्यांची समिती सदस्य म्हणून नियुक्ती करण्याची शिफारस विधानपरिषदेस करावी.

श्री.बाबा सिद्दीकी (कामगार राज्यमंत्री) : महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील प्रस्ताव मांडतो :-

" सन 2005 चे वि.स.वि.क्रमांक 78- महाराष्ट्र कामगार संघांना मान्यता देण्याबाबत आणि अनुचित कामगार प्रथांना प्रतिबंध करण्याबाबत (सुधारणा) विधेयक, 2005 यावर विचार करण्यासाठी दिनांक 16 डिसेंबर, 2005 रोजी नियुक्त केलेल्या संयुक्त समितीवरील सदस्य सर्वश्री अनंत तरे व रामदास चंद्रभानजी तडस, वि.प.स. यांच्या विधानपरिषद सदस्यत्वाचा कालावधी संपुष्टात आल्यामुळे या रिक्त झालेल्या जागा भरण्याच्या बाबतीत विधानसभेने केलेल्या शिफारशींशी हे सभागृह सहमत असून सर्वश्री अनंत तरे व रामदास चंद्रभानजी तडस, विधानपरिषद सदस्य यांच्या जागी श्री.सुरेश कन्हैयालाल जेथलिया व प्रा.फौजिया खान, विधानपरिषद सदस्य यांची समिती सदस्य म्हणून नियुक्ती करावी."

प्रस्ताव मतास टाकून संमत झाला.

यानंतर श्री. जुन्नरे....

अप्रमाणित प्रत / प्रारूप प्रती नाही

तालिका सभापती : विधेयके आता घ्यावयाची आहेत काय?

श्री. मधुकर चव्हाण : महोदय, आता बराच वेळ झालेला असल्यामुळे आता विधेयके न घेता उद्या विधेयके घेण्यात यावीत तसेच आज ज्या लक्षवेधी सूचना कामकाजात दाखविण्यात आल्या होत्या त्या आपण उद्याच्या कामकाजात दाखविणार आहात काय?

तालिका सभापती : होय. आजच्या लक्षवेधी सूचना उद्या घेण्यात येणार आहेत. शासकीय विधेयके सुध्दा उद्याच घेण्यात येणार आहेत. आजचे राहिलेले कामकाज उद्या घेण्यात येईल. सभा□हापुढील □म□ज संपलेले आहे. सभा□हाची बैठ□ आता स्थ□ित होऊ□ उद्या मंगळवार, दि□ां□ 12 डिसेंबर, 2006 रोजी स□ाळी 10.30 वाजता पु□: भरेल. उद्या सकाळी 10.30 ते 11.45 वाजेपर्यंत सभागृहाची विशेष बैठक होईल. विशेष बैठकीत शासकीय विधेयके घेण्यात येईल. त्यानंतर सभागृहाची नियमित बैठक दुपारी 12.00 वाजता सुरु होईल.

(सभा□हाची बैठ□ 9 रात्री वाजू□ 57 मि□ि□ां□, मंगळवार, दि□ां□ 12 डिसेंबर, 2006 च्या स□ाळी 10.30 वाजेपर्य□त स्थ□ित झाली)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही